लोकरंग

म. रा. सं. ठाणे.
विषय : निबंध
सं. क्र. 3230



REFBK-0025443

संपादक : प्रा. चंद्रकुमार जलमे, डॉ. गंगाधर पानतावणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 DEC 1987

16 DEC 1987

14 [illegible]

27 JAN 1987

10 FEB 1988

18 AUG 1996

28 FEB 1988

13 MAR 1988

20 MAR 1988

20 MAR 1988

7 MAY 1989

1 AUG 1990

(कृ. मा. पहा)
५०००-११-८६

संदर्भ निबंध
3230
24883
ग्रंथालय



लोकरंग



संपादक
प्रा. चंद्रकुमार नलगे
डॉ. गंगाधर पानतावणे


REFBK-0025443

सुरेश एजन्सी
पुणे

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© सर्व हक्क संपादकांचे स्वाधीन

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती
७ जून १९८७

किंमत पन्नास रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ 'शिव-पार्वती'
पुणे ४११०३०

मित्रवर्य
नानासाहेब पालकर
आणि
शशी गजवणी
यांनाच

दर्शन : 'लोकरंग'च्या पूर्वरंगाचे

अलीकडील काळात जीवनाच्या नवप्रवाहाबरोबरच मराठी साहित्यातही नवीन वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. त्यांचा विलक्षण प्रभाव जनमानसावर तसेच साहित्यातही पडलेला आहे. त्यामुळे साहित्यक्षेत्रालाही एक नवी सबल जाग आल्यासारखी झाली आहे. सामाजिक स्थितीगतींच्या परिवर्तनाचा वेध घेणारे साहित्यही नवप्रेरणांनी झळाळून गेल्यासारखे वाटते. त्याच्या कक्षा निश्चितपणे विस्तारित झाल्या आहेत. म्हणूनच आजच्या काळातील साहित्यातील विविध प्रवाहांचा चेहरामोहरा निरखून, पारखून पाहण्यासारखा आहे.

अशा नव वाङ्मयीन प्रवाहांपैकी दलित साहित्याच्या प्रवाहाने आपल्या धगधगीत अनुभवविश्वाने आपली मुद्रा मराठी साहित्यात उमटवली आहे. त्याचा जाणीवपूर्वक अभ्यास व्हावा, यासाठी आम्ही निवडक दलित कथालेखकांच्या कथांचे संपादन 'दलित कथा' या नावाने केले. अशा पहिल्याच निवडक 'दलित कथा' संग्रहाचे स्वागत सर्व स्तरांवर चांगलेच झाले. त्यातील काही कथांची इंग्रजीत भाषांतरे झाली. शिवाजी विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, इंदूर विद्यापीठ, कर्नाटक विद्यापीठ या विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश केला आहे.

दलित साहित्यातील आणखी एक तरारून आलेला हुंकार म्हणजे दलितांची आत्मकथने. मराठी साहित्यात 'आत्मकथन' हा शब्दप्रयोग प्रथम आला तो या शतकानुशतके सर्वस्वाला वंचित राहिलेल्या दलितांच्याच आत्मकथनांमुळे! आतापर्यंत उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेल्या समाजातील जाती-जमातीतील लेखकांनी आपल्या भोगल्या जीवनाची जळजळीत, परखड, प्रामाणिक आत्मकथने लिहिली. त्यातील निवडक लेखकांच्या आत्मकथनातील उतारे निवडून पहिलेच 'दलित आत्मकथन' हे पुस्तक संपादित केले. त्यालाही अपेक्षेपेक्षा प्रतिसाद मिळाला. दै. लोकसत्ताने तर या पुस्तका-

वरच अग्रलेख लिहून त्याचा गौरव केला. शासनाच्या वतीने डॉ. जब्बार पटेल यांनी महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त निर्माण केलेल्या 'महाराष्ट्र राज्याची पंचवीस वर्षांची वाटचाल' या माहितीपटात त्याची नोंदही घेण्यात आली आहे. शिवाय सागर विद्यापीठ (मध्यप्रदेश), इंदूर विद्यापीठ, कर्नाटक विद्यापीठ यांनी आपल्या अभ्यास-क्रमात हे पुस्तक नियुक्त करून प्रतिदाद दिली.

आजचा दुसरा वाङ्मयीन प्रवाह म्हणजे ग्रामीण-प्रादेशिक साहित्य. त्याचाही ठसठशीत ठसा मराठी साहित्यात उमटलेला आहे. त्यातील कथा, कादंबरी इ. वाङ्मय प्रकारांनी एकूणच मराठी साहित्यात गुणात्मक भर घातली आहे; त्याचप्रमाणे ग्रामीण जीवनातील विविध समृद्ध अनुभवांचे सकस चित्रण करणारे ललित लेखनही झाले आहे. आता तर ग्रामसंस्कृतीतील नव्या नव्या जाणिवांचे भावस्पर्शी दर्शन अत्यंत उत्कटपणे ललित लेखांच्या रूपाने होत आहे. अशा ग्रामीण जीवनाचा मागोवा घेणाऱ्या ललित लेखांचा एक वाङ्मयीन अनुबंध संकलित व्हावा, या प्रकारच्या नव्या ललित लेखनाचा अभ्यास व्हावा म्हणून हा नवा संकल्प केला. महाराष्ट्राच्या वैविध्यपूर्ण प्रादेशिक जीवनाचे रंग, पैलू, संदर्भ ज्या ललित लेखातून प्रतिबिंबित झाले आहेत, असे ललितलेख निवडले. सिद्धहस्त साहित्यिक मान्यवरांना संमतीसाठी विनंती केली. त्यांनाही ही कल्पना मना-पासून आवडल्याने उतारे घेण्यास परवानगी दिली, तेव्हाच प्रादेशिक महाराष्ट्राचे हे 'लोकरंग' आपल्यापर्यंत पोचवता आले. त्या सर्वांचेच अत्यंत ऋणी आहोत.

'लोकरंग'चे रूपरंग तयार होत असता मित्रवर्य अहमद यासीन बागवान, मा. व्यंकटेश माडगूळकर, प्रा. आनंद यादव, प्रा. केशव मेश्राम, प्रा. बापूराव जगताप, प्रा. फ. मुं. शिंदे, प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्राचार्य ए. आर. साळुंखे, प्राचार्य एस. आर. सूर्यवंशी, प्रा. एस. एन्. पाटील, जयंत सबनीस, टी. ए. पाटील, प्रा. वसंतराव देसाई, अनंत तिबिले यांचे प्रेमळ सहकार्य लाभले. प्रा. डॉ. शारदा देशपांडे, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. सौ. मंदाकिनी श. चांदेकर, प्रा. एम्. टी. सूर्यवंशी, प्रा. मंदा कदम, श्री. औताडे यांचा लोभ लोकरंगच्या पाठीमागे होताच, तसेच ग्रंथालयाच्या शोधवाटा श्री. मधुकर शिरगावकर, रवी चपाले, आनंद शिंदे, बिभीषण पाटील, शिवाप्पा मादर, प्रताप पाटील, गोपाळ पाटील, धोंडीराम पाटील यांनीच दाखविल्या, म्हणून हे लोकरंग खुले झाले.

'लोकरंग'ला देखणे सौष्ठव लाभले ते कल्पना मुद्रणालयाचे मा. अण्णासाहेब लाटकर, ख्यातनाम चित्रकार सुभाष अवचट यांच्यामुळेच. सुरेश एजन्सीचे मा. बाळासाहेब कारले यांच्या मुग्ध, गोड, लोभस व्यक्तिमत्त्वामुळेच अशी नक्षत्रांची गावे डवरून येतात.

—संपादक

अनुक्रम

१. मोहरलेला कडुनिंब / ग. दि. माडगूळकर १
२. नवेगाव बांध : पाऊलखुणा / व्यंकटेश माडगूळकर १२
३. आडवळणी गाव / शंकरराव खरात २७
४. पाऊलवाटा / शंकर पाटील ३९
५. माती.. आणि माती / रणजित देसाई ४७
६. बाबीस एकरी / आनंद यादव ५३
७. आखरातल्या जागणाऱ्या रात्री / मधुकर केचे ६५
८. खडकावरची म्हातारी / शिवाजी सावंत ७४
९. सोकारी / केशव मेश्राम ८३
१०. गाणे / शान्ता ज. शेळके ९६
११. गोवा आणि गोवेकर / सुभाष भेंडे १०२
१२. आंब्या-फणसाचे दिवस / मधु मंगेश कर्णिक ११०
१३. जिणं ! / सरोजिनी बाबर ११६
१४. खमंग हुरड्याचे खमंग दिवस / चंद्रकुमार नलगे १२२
१५. म्हाईचा दिवस / महादेव मोरे १२७
परिशिष्ट

निमित्त : लोकरंग

अलीकडे मराठी साहित्य, विविध दालनांनी समृद्ध होऊ लागलेले आहे. अलक्षित व अव्यक्त जीवनानुभव साहित्याचा विषय होऊन त्याला एक व्यापकता प्राप्त होऊ लागलेली आहे. दलित आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव कथा, कविता, नाट्य, कादंबरी आणि ललित लेखनाचा विषय होऊ लागले आहे. कोंडीत / आवर्तात अडकून पडलेल्या साहित्याला नवा स्पर्श होऊन साहित्याचे नवनवे उन्मेष तरारून येऊ लागले आहेत. साहित्याला हे एक प्रकारचे योगदानच होय. साहित्यात किंवा समाजात जेव्हा नव्या परिवर्तनाची चाहूल येते; तेव्हा ते नवे चटकन् स्वीकारले जात नाही. परंतु कालांतराने त्याला साहित्याचे अक्षरत्व येते. हा साहित्याचा विकासक्रम असतो. तो नाकारून चालत नाही. मराठी ललित लेखनाच्या प्रांतातही ग्रामीण आणि दलित जीवनाचे हुंकार उमटू लागले आहेत. साचेबंद ललित लेखनाला एक दिशा प्राप्त होऊ लागली आहे, हे सुचिन्ह होय.

मराठी ललित लेखन कधीही सर्वस्पर्शी नव्हते. त्यामुळेच तेथे एक आवर्त निर्माण होत गेले. कोणताही साहित्यप्रकार जेव्हा साचेबंद होतो तेव्हा त्याची काही वैशिष्ट्येही स्थिर अशा स्वरूपात जाणवत राहतात. काही ठोकताळे निर्माण होतात. त्या त्या साहित्यप्रकाराला विशिष्ट असे रूप प्राप्त होते. हे रूप त्याची सीमाच असते. परंतु ही सीमा उल्लंघिण्याचे कार्यही होत असते आणि नवे रूप पुनः प्राप्त होत असते. आजच्या ललित लेखनाचे पूर्वस्वरूप असलेल्या निबंधवाङ्मयप्रकारापासून हे घडत आले आहे. त्याचा विचार करणे प्रस्तुतच ठरेल.

एखादा विचार सुसंगत रीत्या मांडण्याच्या हेतूने निबंध जन्माला आला. हा निबंध राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र किंवा इतिहास अशा विषयांशी निगडित राहून नंतर आपल्या विचारक्षेत्रांच्या दिशा निश्चित करीत राहिला. तर्कशास्त्र आणि सूत्रबद्ध प्रतिपादनाचा वेष परिधान करून मराठी निबंधाने, आपली अनेक वैशिष्ट्ये प्रदर्शित केली असली तरी, आपला विचार, आपले मत, किंवा आपला सिद्धान्त मांडण्याचा हव्यासही जोपासला गेला. क्वचित चित्तवेधकता असली तरी अनिर्बंधता हा निबंधाचा स्वभावधर्म

राहिला. निबंधाच्या या सांकेतिकतेतूनच 'गुजगोष्टी' किंवा 'लघुनिबंधा' चा उदय झाला. लघुनिबंधाने आपला नवा संसार उभा केला. निबंधातील तर्कनिष्ठा, उपदेशपरता, बंदिस्तपणा, रूक्षता, विचारप्रधानता अव्हेरून आत्मपरता आणि आत्माविष्कार यांचा आश्रय घेतला. पाल्हाळिकपणापेक्षा मनःपूर्वकता आणि दीर्घाकारापेक्षा लघू आकार अस्तित्वात आला. 'I am myself the subject of my book' या आद्य लघुनिबंधकार मॉंतेन यांच्या उद्गाराला लघुनिबंधकारांनी प्रमाण मानले. मनोरंजकता आणली. नाट्यात्मता, कल्पनारम्यता आणि भावार्ततेला स्थान प्राप्त झाले. चिंतनशीलता आली. मानवी जीवनातील घडामोडींना सौंदर्यात्म दृष्टिकोणातून शब्दांकित करण्यात येऊ लागले. रेखीवपणा व आखीवपणाही आला. लघुनिबंध अशा विविधतेने नटू लागला. कालांतराने येथेही एक आवर्त निर्माण झाले. लघुनिबंध म्हणजे मनोरंजन, स्वैरता, विषयांतर, उथळपणा, खेळकरपणा, सुभाषितांची पेरणी, विनोदाची झालर, असे काहीसे स्वरूप रूढ झाले. एक प्रकारचा साचेबंदपणा निर्माण झाला. तांत्रिकता आली. लालित्यही आले. मग लघुनिबंध याऐवजी 'ललित निबंध' असा शब्दप्रयोगही प्रचारात आला. ललितनिबंधाचा विषय सामान्य असावा, त्यात पांडित्यप्रदर्शन असू नये, लेखकाने आपल्या जीवनातील हलक्याफुलक्या गोष्टीतही सौंदर्य / काव्य हुडकावे आणि मार्मिकतेने त्याचे दर्शन घडवावे, असे काही संकेत स्थिर झाले. या संकेतांनाच यशस्वी लेखनाची मुद्रा डकविण्यात आली. आणि त्याचे दुष्परिणामही झाले. लेखक आपल्या जीवनातील अति सामान्य घटनांतही काव्य शोधण्याचा अट्टाहास करू लागला. आणि ते शब्दांकित करण्यात समाधान मानू लागला. 'लेखकाचे अंतरंग लघुनिबंध जेवढे उघडे दाखवील, लेखकाच्या आवडीनिवडी, त्याचे रागलोभ, त्याने केलेल्या चुका, पांडित्याचे यत्किंचितही प्रदर्शन न करता जेवढ्या प्रमाणात लघुनिबंधातून प्रकट होतील तेवढी लघुनिबंधाची गोडी वाढते.' अशी विचारसरणी स्थिर होऊ लागली. अशा गृहीततत्त्वामुळे लघुनिबंधातील आत्मपरतेला आत्मचरित्रपर लेखनाचेही स्वरूप आले, आणि लेखकाच्या व्यक्तित्वाचे रंग पुसट होत गेले. पण ही सांकेतिकता बदलण्याचेही प्रयत्न झाले. लघुनिबंधातील संकोचकल्पना विरून नवे धुमारे फुलू लागले. एका विशिष्ट वृत्तीतून केलेले जीवनानुभवाचे अवलोकन, परंतु त्याची विविध रूपे शब्दांकित होऊ लागली. नवे अनुभव आणि नव्या जाणिवा समर्थपणे व सकसपणे अवतरू लागल्या. अनुभवाचे व चिंतनाचे क्षेत्र विस्तारले. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे कधी गडदगहिरे तर कधी तरल-संवेदनक्षम असे रंग आविष्कृत होऊ लागले. हे रंग कधी निसर्गात रमले तर कधी विविध भावकृतीत व मनोवृत्तीत. आयुष्यातील अनेक घटनांना, ह्या व्यक्तित्वरंगांनी सोनस्पर्श केला तर कधी अप्रकट मनाचे बांध मुक्त करण्यासाठी वाट करून दिली. अनुभवांच्या व्याप्तीचे जग असे विस्तारले. आणि मग व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, पत्रलेखन, उपहासजन्य लेखन अशी दालने अस्तित्वात आली. ह्या संकुलाला

'ललित गद्य' अशी संज्ञा दिली गेली.

'ललित गद्य' ही संज्ञा व्यापक आहे. पूर्वीच्या लघुनिबंधापासून ललित गद्याने आपले वेगळे असे बस्तान बांधले. 'ललित गद्य' ही संज्ञा अर्थपूर्ण की अर्थसंकोच करणारी अशी चर्चाही झाली. मग गद्य आणि ललित यांचा अन्योन्य संबंध काय? गद्याला लालित्याचा स्पर्श होतो तरी केव्हा? गद्यलेखन हे जर विचारप्रधान आहे तर मग लालित्याशी त्याचे नाते संभवते काय? असे विविध प्रश्न उपस्थित झाले. प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणाले, "लेखन हे गद्य असो वा पद्य असो ते ललित ह्या पदवीस तेव्हाच योग्य ठरते की जेव्हा तद्द्वारा एखादा अनन्यसाधारण अनुभव अक्षरशः साक्षात् होतो." ('आजचे मराठी गद्य' महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जाने. फेब्रु. मार्च. १९६१) तेव्हा लेखक आपल्या अनुभवाला साक्षात् करतो म्हणजे नेमके काय करतो तर त्याला जे काही उत्कटपणे जाणवले असेल ते आत्मानुभूत तो कल्पनाशक्तीच्या साहाय्याने प्रकट करतो. त्याच्या आत्मानुभूतीला आकार येतो. एक रूप प्राप्त होते. ही रूपात्मता प्रकट होताना शब्दांना लालित्याचा स्पर्श होतो. हा अर्थपूर्ण अनुभव 'मी'चे मन व्यक्त करीत असतो. म्हणून ललित गद्यलेखनात 'मी' हा केंद्रवर्ती आहे. ह्या 'मी'ची विविध रूपे ललित गद्यातील विविध दालनांत समृद्धपणे व्यक्त झालेली दिसून येतात. फडके-खांडेकरांच्या लघुनिबंधांच्या सांकेतिकतेतून मुक्त होऊन दुर्गा भागवत, विंदा करंदीकर, गो. रा. दोडके, इरावती कर्वे, पु. ल. देशपांडे, रा. भि. जोशी, ना. मा. संत, वि. वा. शिरवाडकर यांसारख्या लेखकांच्या लेखनातून, ललित गद्याच्या रूपासंबंधीच्या नव्या जाणिवा प्रकट झाल्या. प्रसंग, घटना, व्यक्ती, मानवी व्यवहार यांतील संगती आणि असंगती यांचा शोध भावनिक आणि वैचारिक या दोन्ही पातळ्यांवर ह्या लेखकांनी घेतला. लघुनिबंधातील सांकेतिकता मोडण्याचा हा पवित्रा होता. स्वाभाविकता, सहजता आणि नैसर्गिकता ही अनुभव घेण्याच्या आणि मांडण्याच्या प्रवासातील आकाररूपे होती. यातूनच आत्मवर्तित्वापेक्षा चिंतनशीलता आणि आत्मप्रेमापेक्षा आत्मशोध यांचे दर्शन मराठी साहित्याला घडले. यातही कालांतराने सांकेतिकता येत गेली हे मान्यच केले पाहिजे. परंतु आपल्या व्यक्तिमत्त्वाचे विविध रंग प्रकट करणाऱ्या अनेक वाटा मराठीतील ललित लेखनाच्या रूपाने अस्तित्वात आल्या ह्यात शंका नाही. ग्रामीण वा दलित जीवनाची अनुभवसृष्टी, भाषा, शब्दधन ह्यांनी ललित लेखनाचे नवे अंकुर जोपासले, आणि ही बाब मराठी ललित लेखनाच्या दृष्टीने लक्षणीय मानावी लागेल. 'लोकरंग' ही त्याची एक साक्ष आहे.

आजवरचे वव्हंशी मराठी ललित लेखन हे मध्यमवर्गीय किंवा नागरी तरी राहिलेले आहे. म्हणूनच मराठी ललित लेखन हे सर्वस्पर्शी नव्हते असे जे प्रारंभी म्हटले ते याच अर्थाने. अलीकडे मात्र ह्या अलक्षित जीवनाचा आणि मनांचा वेध घेतला जात आहे. या लेखनातून प्रादेशिकता आली, प्रादेशिक बोली आली. ग्रामीण जीवन व लोक-

व्यवहार आला. या सर्वांशी भावनिक व वैचारिक अनुबंध जोडले गेले. आपल्या लेखनासाठी ग्रामीण परिसर किंवा ग्रामीण भाषा निवडणे ही एक 'ट्रिक' ठरू शकते. त्यातून निर्जिवताही येण्याची शक्यता असते. परंतु ग्रामीण वा दलित संस्कृतीशी, लोकव्यवहाराशी एकरूप झालेलं संवेदनशील मन लेखनातून व्यक्त होणं म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा एक नवा आशय प्रकट करणे होय. असे व्यक्तिमत्त्वाचे विविध रंग 'लोकरंग'मध्ये अनुस्यूत आहेत. त्यातून लोकसंस्कृतीचं दर्शन तर घडतेच परंतु जीवनाकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोणही प्रस्फुरित होतात. निसर्ग, व्यक्ती, घटना, स्मृती यांना एक व्यक्तिमत्त्व लाभते. लेखक आणि लोकसंबद्ध घटक संवादी बनतात. मग गावाकडच्या आठवणींनी मोहरून आलेलं ग. दि. माडगुळकरांचं मन, पायवाटांशी संवाद करताना जणू त्या पायवाटा मानवी संवेदनाच प्रकट करू लागतात, ह्याचा शंकर पाटलांनी घडविलेला प्रत्यय, खिळवून ठेवणाऱ्या व्यंकटेश माडगुळकरांच्या नवेगाव–बांधच्या पाऊलखुणा, मधुकर केचांच्या आखरातल्या रात्री, खेड्यातील बदलणाऱ्या नव्या व्यवसाय संस्कृतीचा यादवांनी चितारलेला मर्ममेदी आलेख, जग बदलत असूनही शंकरराव खरातांच्या आडवळणी गावाचा न बदललेला चेहरा, माणसातील आस्थेचा रणजित देसायांनी घेतलेला वेध, आपल्या मनाच्या कणसाचे कितीतरी पापुद्रे आपल्या कुणबी जबानीनं उलगडून दाखविणारी शिवाजी सावंतांची खडकावरची म्हातारी, आडदांड व्यक्तिमत्त्वाच्या बेबंद सखारामचा केशव मेश्रामांनी चितारलेला करुण अंत, लेकीच्या दुःखाने उन्मळून पडलेल्या ताईच्या मनाचं शांताबाई शेळक्यांनी अक्षरबद्ध केलेलं आक्रंदन, सरोजिनी बाबरांनी ग्रामीण स्त्रीजीवनासंबंधी व्यक्त केलेली चिंता, मधु मंगेश कर्णिकांच्या 'आंब्या-फणसाच्या', चंद्रकुमार नलगे यांच्या खमंग हुरड्याच्या आणि महादेव मोरे यांच्या म्हाईच्या दिवसाच्या आठवणी, तसेच गुणसंपन्न आणि कलासंपन्न गोव्याची आणि गोवेकरांची सुभाष भेंड्यांनी घडविलेली दर्शने, 'लोकरंग'च्या पानापानांमधून वाचकांशी संवाद करतील.

आत्मीय भावबंधाला मानवी जीवनात अनुपम असे स्थान आहे. ज्या व्यक्तीशी, वस्तूशी, वास्तूशी किंवा स्थानाशी आपले भावबंध जडतात त्यासंबंधी ममत्व तर प्रकटतेच पण गहिवरही प्रकटण्याची दाट शक्यता असते. ही संभाव्यता नाकारता येत नाही. परंतु ग. दि. माडगुळकरांचा 'मोहरलेला कडुनिंब' आपले भावबंध जपतो तो अकृत्रिमतेने. त्यात दिमाख नाही की अहंकार. आपल्या गावाशी असलेले अनुबंध हा माडगुळकरांच्या वाङ्मयीन प्रेरणेचा विषय होतो आणि मग त्यांच्या मनात दाटून आलेल्या आठवणी अत्यंत सहजपणे प्रकट होतात. अशा वेळी त्यांची भाषाही प्रवाही होते. ह्या आठवणींना उत्कटतेचा आणि आत्मीयतेचा स्पर्श झाला म्हणजे प्रसंग कसे मोहरून येतात आणि हे प्रसंगच अनुभवांचे सजीवत्व कसे व्यक्त करतात ते माडगुळकरांच्याच शब्दात अनुभवायला हवे.

"...दिवसाचा देव अगदी माथ्यावर आला होता. कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रातील वाळू तापून रणरण करीत होती. गावाकडील बाजूच्या गुडघाभर धारेलादेखील कड आला असावा. वाळवंटातील शिरगोळ्याप्रमाणं पाण्याचा पृष्ठभागही चमचम चमकत होता. पाणोठ्यावर आता चिटपाखरूही नव्हतं. नाही म्हणायला गावचा परीट आणि त्याची दणगट बायको खाली लांब परीटधुण्यावर एक पासोडी झोडपत होती. त्याचा आवाज डगरीपर्यंत येत होता. पलीकडच्या मळईत शेवरीची हिरवी झाडं स्तब्ध राहून नाइलाजानं उन्हात तापत होती. हालता येत असतं तर तीदेखील उठून म्हातारवडाच्या गार सावलीत येऊन कलंडली असती..." (पृ. ५)

गाव म्हटलं की परंपरा आणि त्या परंपरेने जोपासलेले वाडे सामाजिक घावांच्या खुणा म्हणूनच स्थिरपद झालेले. परंतु माडगुळकरांचा महारवाडा, मांगवाडा, रामोसवाडा, त्यांच्या गावचा चेहराच बदलून टाकणारे. स्वच्छ महारवाड्याने लेखकाच्या मनावर एक अपूर्व संस्कार केलेला. सर्व जाति-धर्माची माणसं परस्परांशी आपुलकीनं जिव्हाळ्यानं व्यवहार करतात. माडगूळकर स्वतःला 'गावचं लेकरू' म्हणवून घेतात ते याच संपन्न अनुभवातून. 'मोहरलेला कडुनिंब' या प्रतीकात्मक शीर्षकातून लेखकाने संस्कृतीची नवी पदचिन्हे मनामनांत साठविली आहेत. त्याचा एक सुंदर आलेख वाचकांच्या मनावर ठसतो तो सहजसुंदर अशा या लेखातील शब्दांकनाने.

माडगुळकरांच्या बदललेल्या गावाचे चित्र मनात ठसत असतानाच वरपांगी बदललेल्या पण आतून पूर्णतः पुराणमूल्यांशी तडजोड करणाऱ्या या देशातील दुसऱ्या एका गावाचे चित्र मनात सलत राहते. हे आडवळणी गाव आहे शंकरराव खरातांचे. गाव भौतिक दृष्ट्या बदलत असल्याचा भास होतो, कारण माणसं तीच जुन्या पोषाखाची, जुन्या वळणाची आणि कागदी चेहऱ्याची असतात. खरातांनी एका विलक्षण अलिप्ततेनं या दुसऱ्या गावाचं प्रत्ययकारी चित्र रेखाटलं आहे. माणसाच्या स्थितिशीलतेची, एक जीवघेणी परिक्रमा येथे प्रत्ययाला येते. तकलादू नि खोट्या जगाची भीषणता बुद्धिवादी मनाला विलक्षण धक्का देते. गावात यंत्र आलं पण माणसं बदलत नाहीत हे एक विदारक वास्तव लेखकमनाला कसा दंश करते ते बघा—

"गाव नवे झाले तरी ती खरी वरवरचीच सुधारणा. बाहेरून बगळ्यासारखे सफेद, आत काळे अंतःकरण. माणसात, गावात बाहेरून बदल होऊन काय उपयोग? खरा अंतरीचा बदल माणसात झाला पाहिजे. तेव्हाच तो खरा बदल म्हणता येईल. नाही तर बाहेर एक, आत दुसरे.

नव्या गावात रस्त्यावर खांबाला दिवा लागला. त्याचा वाटेवर प्रकाश पडला. पण नव्या गावात माणसाच्याच अंतःकरणात, मनात नव्या विचारांचा प्रकाश पडला पाहिजे, तरच रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाला शोभा आहे, नाही तर

माणसाच्या मनात रूढीचा काळाकुट्ट अंधार असताना रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाचा फक्त उपयोग काय ?" (पृ. ३८)

खरातांची भाषा साधी, सरळ व निवेदनस्वरूप आहे. पण तरीही त्यांची विचारांची बीण मात्र घट्ट आहे. या विचारांच्या मागे चिंतनाचा धूसर असा पदर असतो.

आनंद यादव ग्रामीण कथाकार / कादंबरीकार. ग्रामीण जीवनातील वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण घडविण्यात त्यांच्या लेखणीने आपले सामर्थ्य प्रकट केले आहे. शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर या पूर्वसूरींच्या खांद्यावरच त्यांचे लेखन उभे आहे. तरीही त्यांच्या स्वतंत्र खुणा त्यांच्या लेखनात जाणवतात. ग्रामीण जीवनातील बदलणाऱ्या मानसिकतेचे चित्र यादवांच्या 'बाबीस एकरी' सारख्या ललित लेखात प्रभावीपणे प्रकट झाले आहे. शितोळे मास्तरांसारखा निवृत्त शिक्षक जेव्हा शेतीच्या व्यवसायात व्यावहारिक धोरणाने पडतो आणि गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी ज्या शिताफीने मिळवतो त्यात एक प्रकारचे 'थ्रील' आहे. शेतीव्यवहार करून वस्तान बसविणारा एकेकाळचा शिक्षक, थंडपणे एका 'वर्गा'चा कसा प्रतिनिधी बनतो याचे थक्क करून सोडणारे चित्र यादवांनी रेखाटले आहे. शितोळे मास्तर आता 'श्वेत' संस्कृतीचे घटक बनले आहेत. शेतमजुरी करणारी माणसं एकीकडे लाकडांच्या बाहुली-सारखी त्यांच्या अंगावरची कातडी हाडांना चिकटलेली, दारिद्र्याने थिजून गेलेले हे एका काळचे शेतकरी मालक आता मजूर होऊन शितोळे मास्तरांपुढे एका सधन शेतकऱ्यांपुढे आठवडी रोजीसाठी तळहात पसरत आहेत आणि अजूनही पन्नाशीतीलच वाटणारे, गोरेपान, पांढऱ्याशुभ्र विजारीतील मास्तर आयुष्याचे चक्रवाढी गणित मांडत आहेत. ग्रामीण जीवनातील त्या भेदक वास्तवाचा, आनंद यादव अत्यंत संयतपणे दंभस्फोट करतात. जणू दोन संस्कृतींतील विसंवादच ते शब्दबद्ध करतात. "सगळ्यांच्या रक्तामांसांचा घाम होऊन तिथं गळत होता नि मास्तरांच्या बाबीस एकरी शेतीला खत मिळत होतं. त्यातनं एक पांढऱ्या विजारीचा शेतकरी सुधार जातीच्या उसासारखा डंग उगवत होता." (पृ. ६४) नव्या शेतकऱ्याचे नवे जग कसे आकाराला येऊ लागले आहे ह्याचे अत्यंत विदारक चित्र अत्यंत प्रभावीपणे यादवांनी चितारले आहे.

शिवाजी सावंतांची 'खडकावरची म्हातारी' कुटुंबवत्सल पण नेहमीच्याच परिचयाची वाटते. मात्र केशव मेश्रामांचा सखाराम सोकारी वाचकांना अस्वस्थ करीत राहतो. व्यक्तिचित्रांच्या बाबतीत एक समज असा आहे की, ती श्रेष्ठ व्यक्तींचीच असावीत. मग त्या कोणत्याही क्षेत्रातील असोत. परंतु हा समज योग्य नव्हे. सावंतांची 'म्हातारी' किंवा मेश्रामांचा 'सखाराम' ही सामान्य जीवन जगणारी माणसे आहेत. पण त्यांना लेखकांच्या शब्दशक्तीचा स्पर्श होताच ती कशी जिवंत होतात त्याचे प्रत्यंतर येते. हे खरे आहे की, सामान्य वाचकांचे कुतूहल श्रेष्ठ व्यक्तींच्या जीवनचित्रणात असते. मग तो राजकारणधुरंधर असेल, कलावंत असेल, योद्धा असेल, विक्रमी अंतराळवीर असेल

आणि हे कुतूहल अखंड असते. ह्या श्रेष्ठ व्यक्ती विशिष्ट असा ध्येयवाद जगत असतात आणि ध्येयासाठी दिव्येही करीत असतात. त्यांच्या जीवनातील संघर्षशील, रोमहर्षक प्रसंग सामान्य वाचकांना आकृष्ट करीत असतात. आणि लेखकही त्या त्या श्रेष्ठ व्यक्तींच्या जीवनातील असे प्रसंग चित्रित करण्यात धन्यता मानतात. पुष्कळदा त्यामागील भावना व्यक्तिगौरवाची किंवा व्यक्तिपूजनाची असते व त्यामुळे एक प्रकारची चाकोरी निर्माण होते. अशा श्रद्धेतून लिहिली गेलेली व्यक्तिचित्रे नेहमीच कलात्मक किंवा रेखीव होतील ह्याची शाश्वती नसते. उलट ती ठिसूळ व पोखरलेली होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर लोकजीवनातील 'सखाराम' सारख्या व्यक्ति-रेखा अधिक सजीव वाटतात. सखारामच्या व्यक्तिमत्त्वातील बेदरकारपणा, गैरशिस्त, कष्टाळूपणा, बेडरपणा, ताठरता, जगण्याची जिद्द अशा सर्व गुणदोषांचे रसायन असे काही बेमालूमपणे मेश्रामांनी तयार केले आहे की, वाचकांना एक वेगळी व्यक्तिरेखा अनुभूत होते. सावंतांची म्हातारीही लक्षात राहते ती तिच्यातील जीवलावूपणाच्या हळुवारतेमुळे. आणि म्हणूनच लेखकाचा स्पर्श हा व्यक्तिचित्रणाचा गाभाच असतो, असे म्हटले पाहिजे.

'आंब्या-फणसाचे दिवस,' 'खमंग हुरड्याचे खमंग दिवस' आणि 'म्हाईचा दिवस' हे कोकणच्या, पश्चिम महाराष्ट्राच्या आणि कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमावरील प्रदेशांची आठवण करून देतात. चैत्र-वैशाखाची दारे उघडून आंब्या-फणसाचे दिवस कसे येतात. पौष महिन्यात झाडावर पिकलेल्या आंब्यांचे पिवळे शेंदरी घड कसे लोंबतात, वैशाखाच्या मध्याला फणसांना पिकल्याशिवाय कसं राहावत नाही, वैशाख संपता संपता मृगाच्या चाहुलीने, करांद्यांचे, चिन्यांचे, आणि कणग्यांचे तांबडेलाल कोमल अंकुर कसे तरारून माना उंचावतात यांचे मोठे मनोवेधक व काव्यात्म चित्र मधु मंगेश कर्णिकांच्या 'आंब्या-फणसाचे दिवस' या लेखात येते. वेगवेगळे ऋतू, वेगवेगळे पक्षी, आणि वेगवेगळी भाज्याफळे यांची वर्णने तर बहारदार आहेत, पण या सर्वांचे मध्यवर्ती केंद्र आहे लेखक आणि त्याचे मित्र. निसर्गाच्या विविध घटकांशी रममाण झालेली मानवी मनं किती सौंदर्यलक्ष्यी आणि सौंदर्यवेधी ! कर्णिकांचे शब्दांकनच त्याची ग्वाही देईल—

"आंब्या-फणसांच्या नि जांभळांच्या या दिवसांत एरवी उघड्याबोडक्या दिसणाऱ्या रानालासुद्धा एक शोभिवंत रूप येते. ठायीठायीची झाडे वसंतऋतूची लव्हाळी अंगावर लेवून उभी असतात. बकुळीला बहर येतो. सुरंगीवरही शे-दोनशे फुले शिल्लक असतात. मोगरा तडाकेबंद फुलतो. बावलीच्या दारातला मोगरा, पान न् पान झडून सांगाडा राहिलेल्या शेवरीवर चढून असा बेबंद फुलतो, की ते शेवरीचे एरवी नग्न वाटणारे झाड शुभ्र वस्त्रात गुरफटल्यासारखे वाटते. तसाच राठ काळपट पानांच्या पारिजातालाही वेडा बहर येतो. पारिजातकाचा

श्रावणातला बहर किती वेगळा नि हा वैशाखातला बहर किती विलक्षण!

आणि भुईचाफा! विनपानांचे हे नाजूक फूल जमिनीतून हलकेच वर येते, अबघी बागशाई भारून टाकते." (पृ. ११४)

दुर्गाबाईंच्या ऋतुचक्राची आठवण व्हावी ती क्षणभरच! परंतु कर्णिकांचे कल्पना-सौंदर्य आणि भावसौंदर्य मनात सारखे रेंगाळत राहते ते उपरोक्त नाजुकशार अशा वर्णनातून. व्यक्तित्वसंपन्नतेचे असे देखणेपण कर्णिकांच्या सबंध लेखात दरवळासारखे पसरून आहे.

हुरड्याच्या दिवसातल्या राखणदारांचा हाकारा, भरदार घोसांच्या देखण्या जोंधळ्याच्या शिवाराचा पट्टा, झाडाझाडांवरून कलकलत जाणाऱ्या भोरड्यांच्या झुंडी, चिमण्या पाखरांचा गलका, पोपटांचे हिरवे थवे, पांढऱ्या बगळ्यांचा गस्तीचा पहारा ही सारी दृश्यचित्रे म्हणजे प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या मोहक शैलीचा प्रत्ययच. नलग्यांची भाषा काव्यात्म तर आहेच परंतु तिच्यात एक नाट्यही आहे. शब्दांनी वातावरण निर्माण करण्याचं फार मोठं कसब त्यांच्या लेखणीत आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'खमंग हुरड्याच्या खमंग दिवसा'त येतो. लेखाचे शीर्षक खमंग असले तरी लेखकाची भाववृत्ती तरल आणि संवेदनक्षम आहे, यात शंका नाही. आपल्या मातीचा संस्कार घेऊन आलेल्या नलग्यांची भाषा जशी चित्ताकर्षक आहे तशी अर्थवाही शब्दांची पेरणी सार्थ आणि समुचित अशी आहे.

एक आगळावेगळा लोकजीवनाचा अनुभव प्रकट करणारा महादेव मोरे यांचा 'म्हाईचा दिवस' खऱ्या अर्थाने खमंग आहे, असे म्हणता येईल. ग्रामीण जीवनातील अस्सलपणाचा बाज येथे आकळतो. एका जीवन-पद्धतीचा आणि सांस्कृतिक विशेषांचा हा दस्तऐवजच होय. त्यामुळेच आपल्या मनातील सोवळेपणाच्या कल्पनांना धक्का बसतो, आणि आपल्या मनातील पारंपरिक शुचितेच्या कल्पना किती बरबरच्या आहेत ह्याचा एक आगळा प्रत्यय येतो. ग्रामीण जीवन किती वैविध्याने भरले आहे, त्याची अव्यक्त रूपे म्हणजे संस्कृती आणि सभ्यतेची चित्रदर्शी दर्शने याचा आलेख मोऱ्यां-सारखा सक्षम लेखक कसा चितारतो हे पाहण्यासारखे आहे. लोकजीवनातील श्रद्धा, पारंपरिकता आणि त्यात विरून जाण्याची प्रवृत्ती म्हणजे माणसांच्या खोलवर रुतलेल्या मानसिकतेच्या मुळ्याच. 'म्हाईचा दिवस' ही त्याची साक्ष आहे. अनेक तपशिलांसह लेखक या मानसिकतेचे बारकावे व्यक्त करतो तेव्हा हे तपशील पाल्हाळिक होत नाहीत हे विशेष. म्हाईच्या दिवसाची आतुरतेने वाट पाहणारे लोक, लेकी-सुना, काळभैरीसाठी म्हाई करायची बकरं कापून त्यालाच त्याचं रक्त अर्पण करणं, बकऱ्याचं मांस चुलीवरील हंड्यात रटरट शिजताना चविष्ट-खमंग वासानं तरंगून जाणं, हातपाय धुऊन बसलेल्या पंगती, त्यानंतरचा महारांचा तमाशा, त्यातच संपून गेलेली रात्र, हे सारे प्रसंग लेखकाने साक्षात् उभे केलेले आहेत. हे प्रसंग म्हणजे लोकजीवनाचे अतूट धागे होत. प्रतिष्ठित-

पणाची खोटी झूल अंगावर न घेता किंवा सोवळेपणाचे फाजील प्रदर्शन न करता लेखक जे लोकजीवन त्याच्या वैशिष्ट्यांसह उभे करतो ते मध्यमवर्गीय किंवा नागरी जीवन नव्हे याची सतत जाणीव करून देते. 'लोकरंग'मधील महादेव मोऱ्यांचा बाण वेगळा आहे ह्यात शंका नाही.

कवी अपरिहार्यपणे ललित गद्यलेखक असतोच असे नाही. परंतु मराठीतील अनेक कवींनी समृद्ध असे ललित लेखन केले आहे. नावेच आठवायची तर कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मधुकर केचे, केशव मेश्राम, मंगेश पाडगावकर, शांता शेळके यांची नावे सहजच आठवतील. काव्याच्या प्रांतात दिंडी घेऊन जाणारे मधुकर केचे ललितलेखनाच्या प्रांतातही आपला वऱ्हाडी ढंग घेऊन उभे आहेत. त्यातली खुमारी व ठसका जादाच आहे. केच्यांच्या निवेदनशैलीला मिस्किलपणाचे अंगही आहे. ह्या साऱ्या विशेषांची प्रचीती त्यांच्या 'आखरातल्या जागणाऱ्या रात्री' त येते. आखरात झोपणाऱ्या लोकांच्या गप्पांतून, आखरात झोपायला, धावत धावत येणाऱ्या आणि कुणाच्या तरी अंगावर धाडकन् कोसळणाऱ्या पुंडलिक पाटलांच्या स्वभावातून केचे जसा मिस्किलपणा प्रदर्शित करतात, तसेच आखराशी निगडित असणाऱ्या अनेक आठवणींचे धागेही ते सहजतेने उलगडतात. क्वचित काही प्रसंगात कोरडेपणा असला तरीही प्रसंगांची गुंफण करण्याची त्यांची लबक ढंगदार आहे. केचे मुळातच कवी असल्याने, कविमनाचे प्रतिबिंब एखाद्या परिच्छेदात कसे प्रकटते ते पाहता येईल—

"वावरे चांदी फुलल्यासारखी दिसतात. बोंडांतली रग बाहेर फुटून चमकते आणि डोळे दिपवते. पानांच्या हिरव्या आंथरीवर हे रानलक्ष्मीचे डोळे हिऱ्याप्रमाणे चमकतात; जोडीला असतात कांबोडीची पिवळी-लाल फुले. हिरवे हिरवे आकाश बोंडातून फुटलेल्या लसलसणाऱ्या नक्षत्रांनी नुसते भरून निघते आणि त्याच आकाशात रंगीत फुलांचे थवे इंद्रधनुष्याशी नाते सांगतात. पुढे पुढे तर कापसाचा जोर असा वाढतो की, पऱ्हाटीवरची हिरवी पानेच दिसेनाशी होतात. काही काळबंडून भुईभेट होतात. उरतो केवळ कापूस. त्याचे मस्त दोन–तीन वेचे होतात. मग कापूस संपलेले पऱ्हाटीचे सांगाडे तेवढे उरतात. अति भकास. त्यातही चालू मालाचे झाड असते एरंडासारखे उंच! ते कसेसेच वाटते. ते कसेबसे उभे असतात. जमिनीची मायाच तशी चिवट म्हणून तशाही अवस्थेत एकटीदुकटी हिरवी पाने त्या भाकड झाडावर आढळतात. पण त्या सरत्या हिरव्या हुंदक्यांना फारसे मोल नसते." (पृ. ६५)

वावरातल्या कापूससुगीचे चित्र कसे दृश्यस्वरूप होते याचेच हे प्रत्यंतर!

शांताबाई शेळके आणि डॉ. सरोजिनी बाबर ह्यांनी टिपलेली स्त्रीमनाची स्पंदने म्हणजे स्त्रीजीवनाचा सुखदुःखाची भाषितेच. शांताबाईंचं 'गाणं' हे एका अटळ दुःखाचं गाणं आहे. सुलोचनाआत्याच्या मृत्यूचा प्रसंग, पण त्या प्रसंगाने सबंध

कुटुंबात पसरलेलं कारुण्य विलक्षण आहे. त्याचं आत्मीयतेनं पण तितक्याच उत्कटतेनं लेखिकेनं शब्दांकन केलं आहे. सरोजिनीबाईंचं 'जिणं' हा ग्रामीण स्त्रीच्या मनाचा आरसाच होय. शहरे बदलली आणि त्याची छाया खेड्यावरही पडली. ग्रामीण स्त्री बदलू लागली. परंतु व्यवस्थेत, हा बदल बरवरचा होता असंच म्हणावं लागेल. कारण पुरुषवर्चस्वातून ती पूर्णतः मुक्त झालेली नाही. तिचं कुटुंबातलं स्थान, तिचा भावडेपणा, तिचा साधेपणा, अजून आहे तसाच आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्रीही बदलत चालली आहे असे म्हणणे हे पूर्णार्थाने बरोबर नाही. एकीकडे ग्रामीण स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला मर्यादा पडल्या आहेत तर दुसरीकडे तिचा सन्मान, तिचा गौरवही होतो आहे. तिचे सामर्थ्यही प्रकट होत आहे. अशा द्वंद्वातील ग्रामीण स्त्रीसंबंधीचे विचार सरोजिनीबाईंनी व्यक्त करून तिला उपदेशही केला आहे. तो स्त्री-मनाची स्वाभाविकता प्रदर्शित करतो.

यांत्रिक युग आलं असलं तरी शेतकरी निसर्गाशी 'आपलं नातं तोडायला तयार नाही हे सत्य रणजित देसाई यांनी 'माती...आणि माती 'मध्ये नेमकेपणाने पकडले आहे. या सत्यावरोबरच ग्रामीण मातीचे काही वेगळे रंगही देसाई दर्शवितात. हे रंग माणुसकीचे आहेत, निर्भयतेचे आहेत, व्यवहारकुशलतेचे आहेत, कृतज्ञतेचे आहेत. प्रेमाची, मायेची ऊब शोधणारा शेतकरी ती मिळताच हरखून जातो आणि ती मिळाली नाही तर तो उद्ध्वस्त होतो. 'ऊब' हा मानवी जीवनातला विसावा कसा आहे, ह्यासंबंधी देसाईंनी केलेले चिंतन लक्ष्यवेधी आहे. माणसं खरं तर इथून तिथून सारखीच असतात. ती विकारवश असतात, कलाप्रेमी असतात, स्वार्थी असतात, कृतज्ञ असतात, निर्भय असतात, जीवलागू असतात. अशी माणसं खेड्यात असतात, शहरात असतात, कोल्हापुरात असतात आणि गोव्यातही असतात. फरक एवढाच की भौगोलिक वा ऐतिहासिक कारणांनी त्याचे वेगळेपणे प्रतीत होत राहते. सुभाष भेंड्यांनी गोवा चितारला तो सांस्कृतिक विशेष घेऊन उभा असलेला. त्यांनी झाडा-पानांची, समुद्राची, वाळूची, वाटांची चित्रे रेखाटली नाहीत तर माणसांनी वेढलेल्या गोव्याची आणि गोव्याला आपली प्रतिमा देणाऱ्या गोवेकरांची प्रतिमा अक्षरबद्ध केली. त्यामुळे भेंड्यांचा गोवा वाचकांना, 'सुशेगाद' आहे सुखासीन आहे हे कळते. पोर्तुगीजांच्या छायेत वाढलेल्या गोवेकरांची मानसिकता जशी येथे दिसते, तशीच पश्चिमी संस्कृतीचा संस्कार घेऊन उभी राहिलेली मनेही इतस्ततः हुंदडताना दिसतात. भेंड्यांनी गोवेकरांतील माणूस टिपला आणि त्यात त्यांना जाणवले की, गोवेकरांची 'जीभ' आस्वादासाठी आसुसलेली आहे. आणि त्यांना विशेष अप्रूप वाटते ते गोवेकरांची भावुकता, सश्रद्धता, अगत्य, कलाप्रेम, उत्सवप्रियता पाहून कोकणातल्या माणसासारखाच पण अनेक बाबतींत त्यांच्यापेक्षा वेगळा असलेला गोवेकर पूर्व-पश्चिम संस्कृतीचा कसा भोक्ता आहे ह्याचे सुरेख वर्णन भेंड्यांनी केले आहे.

'लोकरंग'मधील व्यंकटेश माडगुळकरांचे प्रवासवर्णन आणि शंकर पाटलांचे मुक्त-

चिंतन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनोखे दर्शन घडवितात. व्यंकटेश माडगूळकर छंदवेडे आहेत. पण त्यांना भौतिक जगाचेही भान आहे. रानावनातील अद्‌भुत जगाविषयी त्यांच्या छांदिष्ट मनात अपार कुतूहल आहे. आणि या कुतूहलापोटीच त्यांचे रानावनाशी 'मैत्र' जुळते. मग वृक्षविशेष, लतावेलींची सुकुमारता, निसर्गाची श्रीमंती, पक्षी-प्राण्यांची वर्दळ हे सारे सारे अनुभव होऊन शब्दातून साकार होतात. नवेगाव बांधच्या पाऊलखुणा शोधण्याच्या निमित्ताने आपल्या अनुभवांची पखरण करीत जातात. आणि वाचकांना एका नव्या जगाचा प्रवास केल्याचा आनंद मिळतो. 'माडगुळकरांमधला 'मी' किती सजग, किती सौंदर्यवेधी, किती अनुभवसंपन्न आणि किती निसर्गप्रेमी आहे हे प्रत्यही जाणवत राहते. शंकर पाटलांच्या 'पाऊलवाटा' अशाच कलासक्त मनाने घेतलेला शोध होय. पाटलांचे ह्या पाऊवाटांशी जसे भावनिक नाते आहे, तसे बैचारिकही. पण ह्या पाऊलवाटा आहेत खेड्यातील. शहरातील डांबरी रस्ते आणि खेड्यातील पाऊलवाटांमध्ये लेखकाला विलक्षण अंतर जाणवते. कुसुमाग्रजांनी आपल्या एका कवितेत शहरातील जल्लोश आणि खेड्यातील आर्त अभंगाचा निर्देश करून, आर्त अभंगाच्या स्मृतीने सुखावणारे मन जसे चित्रित केले होते अगदी त्यासारखेच. म्हणून ह्या पायवाटा त्यांना मोहवून टाकतात. त्या त्यांना चित्रासारख्या वाटतात. किती सुंदर कल्पना आहे ही! वाटांची रूपं तरी किती! मानवी स्वभावांचे प्रतिबिंबच जणू या वाटांत उतरले आहे. शंकर पाटलांच्या लेखणीच्या स्पर्शाने या पायवाटांना जे व्यक्तिमत्त्व लाभले आहे ते अनुपम आहे. म्हणूनच त्या लेखकांशी जसा संवाद करतात तसाच वाचकांशीही संवाद करतात. शंकर पाटलांचा भाषाशैलीचे ललितसुंदर रूप अशा वेळी भराला येते.

"खेड्यातल्या पायवाटा मला अशा एखाद्या चित्रासारख्या दिसतात. त्यांना रंग असतो, गंध असतो, आकार असतो; आणि एक आगळं रूपही असतं. कधी ती एकांडी वाट चुकल्यासारखी दिसते; तर कधी कमळवेलीप्रमाणं त्याचं जाळं विणलेलं असतं. ती कधी काळीभोर दिसते; तर कधी हळद लागलेल्या नवरीसारखी गोरीपान दिसते. एखादी वाट पायातल्या पायात घोटाळते, आणि एखादी धामणीगत वाकडीतिकडी पळताना आढळते. अनेक रूपं धारण करणाऱ्या या पायवाटा एकमेकींहून किती वेगळ्या असतात!

नदी चढून वर येणारी मळीची वाट, आणि काळ्या मातीतून जाणारी वाट–या दोन्ही वाटा एक नसतात. फोंड्या माळावरून जाणारी तांबडी वाट, आणि पाणंदीतून चिखल तुडवत जाणारी तांबडी वाट, रानामाळातून वळसे घेत गावच्या वेशीला येऊन मिळणारी वाट, आणि गवताळ कुरणातून नदीला जाणारी वाट–या सगळ्या पायवाटाच, पण प्रत्येकीचं वळण निराळं असतं, ठेवण निराळी असते." (पृ. ३९–४०)

'लोकरंग'चे अंतरंग हे असे आहे. येथे विविध वृत्तिप्रवृत्तींचे, मानवी संबंधांचे, मानवी विसंगतीचे दर्शन जसे घडते, तसे अर्थहीन संकेतांचे आरेखनही दिसते. व्यक्ती, निसर्ग, लोकव्यवहार, लोकसंस्कृती यांच्या अनुबंधांतून लेखकांचे मनोविश्व जसे दृग्गोचर होते तसे स्वतःकडे पाहण्याचा आणि स्वतःला चाचपडण्याचाही प्रयत्न दिसतो. लेखकाच्या उत्कट मनोवस्थांचे चित्र जसे येथे उमटते तसे कल्पनासौंदर्याची आणि शब्दसौष्ठवाची स्थळेही प्रतीत होतात. क्वचित कुठे मिस्किलपणा, चटकदारपणा आणि केवळ वर्णनपरताही जाणवते, तसेच कलात्मकता जाणीवपूर्वक सिद्ध करण्याचा आग्रहही आढळास येतो. लोकजीवनाशी निगडित असणारे असे हे विविध रंग.

कालचे ललित लेखन जेथे सांकेतिकतेच्या भोवऱ्यात अडकू पाहात होते, तेथूनच लोकसंस्कृतीच्या, ग्रामीण जीवनाच्या नव्या वाटा, नवा आशय घेऊन ललित लेखनाचे नवे स्वरूप उदयाला आले. लोकभाषेचा समर्थ वापर करून लोकजीवनाची विविध रूपे लेखकांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वासह प्रतिबिंबित झाली. कुणी सांगावे, पुढे केव्हा तरी या नव्या जाणिवा, नव्या वाटा सांकेतिकतेच्या भोवऱ्यात अडकून पडतील. निबंध ते ललित गद्य या प्रवासात वेळोवेळी तंत्रबद्धता व सांकेतिकता निर्माण झाली आहे, म्हणूनच आजच्या मराठी ललित गद्याला नवे सामर्थ्य प्रदान करणाऱ्या लेखकांनी, लालित्याबरोबरच चिंतनशीलतेला आग्रहपूर्वक सामोरे जायला हवे.

— संपादक

१ मोहरलेला कडुनिंब

ग. दि. माडगूळकर

एका चित्रपटासाठी मी एक गीत लिहीत होतो. गीत चित्रपटाच्या नायिकेच्या तोंडचं होतं. नुसत्या कीर्तिश्रवणानं ज्याच्याबद्दल नायिकेच्या मनात ओढ निर्माण झाली आहे, तो नायक आज येणार असतो. राहत्या घराच्या आगाशीत वारंवार येऊन, नायिका त्याची वाट न्याहाळीत असते. त्या वाटेवरची घरं, वृक्ष, माती, पाषाण, सारंच तिला सुंदर वाटत असतं. ती वाट आज इतकी सुंदर का वाटते, हाच विचार तिच्या मनात घोळत राहतो. प्रतीक्षेतील अधीरपणा आणि वाटेच्या दृश्याला आलेलं आगळेपण हेच भाव तिच्या ओठी गीतरूप घेतात. ती गुणगुणू लागते—

'वाट मज ती आवडे, ग वाट मज ती आवडे....'

गीताच्या ओघात मी लिहून टाकलं होतं.....

'बाभळीला बहर पिवळा, वरुन बोले कावळा,
आज कानां लागतो का साद त्याचा वेगळा?"

गीत गाणारी तरुणी आधुनिक होती. ग्रामीण खास नव्हती. प्रियागमनाच्या वाटेवर तिला बाभळीसारखी रूक्ष झाडं दिसण्याचं काहीच प्रयोजन नव्हतं. एखाद्या प्रतीक्षागीतात 'कावळ्या'चा कर्कश स्वर येण्याचं तर काहीच कारण नव्हतं. गीत गाणारी नायिका एका विनोदी चित्रपटाची नायिका होती, म्हणून या ओळी पचल्या, ही गोष्ट वेगळी; पण मी विचार करीत राहिलो की, हा

'बाभळीवरचा पिवळा बहर' आणि 'कावळ्याचा साद' या गीतात घुसला कुठून ?

या कल्पनेच्या तीरानं उगमापाशी पोचताच पटकन माझ्या ध्यानात आलं की, ही कल्पना माणदेशी खेड्यात उगम पावली आहे. माझ्या खेड्यात ज्या वाटा आहेत, त्यांच्या काठांवर बाभळीचे भकास वृक्ष उभे असतात. या वृक्षांवर पिवळा-धमक फुलोरा डवरला म्हणजे ते खरोखरच सुंदर दिसतात. एक अतिसूक्ष्म सुगंधही त्यांच्या आसमंतात दरवळत राहतो. बाळपणी अनुभवलेला हा सुगंधच माझ्या स्मरणातून कल्पनाशक्तीत मिसळला.

कावळाही माझ्या गावाकडून उडत आलेला. घरासमोरच्या निंबावर बसून कावळा कोकू लागला की अजूनही माझ्या खेड्यातल्या आया मुलांना सांगतात, 'कावळा बोलतो आहे, आज पाहुणा येणार!' पाहुण्याची प्रतीक्षा आणि कावळ्याचं कोकणं, यांचा हा अन्योन्य संबंध माझ्या मनावर बाळपणापासून ठसला असावा. प्रतीक्षामग्न नायिकेच्या भावोद्‌गारात कावळ्याचे स्वर येणं म्हणून अपरिहार्यच झालं.

'बाभळीला बहर पिवळा, वरुन बोले कावळा
आज कानां लागतो का साद त्याचा वेगळा ?'

या ओळी माझ्या एका गीतात येऊन गेल्या, याचं नवल तर काहीच नाही. ज्ञानदेवासारखा तत्त्ववेत्ता कवीदेखील बाळपणी ऐकलेला तो संकेत विसरू शकला नाही. पंढरीच्या परब्रह्माची वाटुली पाहताना तेही म्हणून गेले आहेत—

'पैल तो काऊ कोकताहे, शकुन गे माये सांगताहे
उड रे उड रे काऊ, तुझे सोनियाने मढविन पाऊ
पाहुणे पंढरीराऊ, घरा कै येती...'

हा सोन्याच्या पायांचा कावळा संस्कारक्षम कविमनाच्या आकाशातून असा सदैवच घिरट्या घालीत असतो. अनुभव आणि अभ्यास याच्या जोरावर साहित्य-कार कितीही प्रगत झाला, तरी बाल्यातील संस्कार व ऋणानुबंध त्याच्या साहित्य-कृतीत वारंवार डोकावत राहतात.

माझं खेडेगाव, त्या खेड्यातील चालीरीती, तिथलं वातावरण, तिथला झाड-झाडोरा, माती-पाषाण, असेच माझ्या स्मरणात टिकून राहिले आहेत. खेड्यातल्या माणसांच्या आकृती आणि स्वभावरेखाही अशाच मनावर ठसून गेल्या आहेत.

नवं वाङ्मय लिहीत असताना त्यातील अनेक दृश्यं, अनेक प्रसंग आणि अनेक स्वभावछटा माझ्या लिखाणात येतात, सदैव येतात, मग ती चित्रपटकथा असो, लघुकथा असो, गीत अथवा कविता असो, संगीतिका असो वा नाटक असो.

माझ्या एका ग्रामीण चित्रपटात आलेला त्रिशूळाचा माळ हा माझ्या गावच्या पूर्वेला असलेला खंडोबाचा माळ आहे. औरस चौरस दीड-दोन मैलांच्या या माळावर एकसुद्धा झुडूप नाही. नाही म्हणायला जुन्या बांधणीचं एक खंडोबाचं मंदिर मात्र तिथं उभं आहे. गावातले लोक सांगतात, ' माडगुळे ' गावाची वस्ती प्रथम या माळावर होती. पाण्याच्या सान्निध्यासाठी ती परत पश्चिमेकडे गेली.

खंडोबाच्या देवळापासून सुमारे दोन फर्लांग अंतरावर आणखी एक पडकं देऊळही या माळावर आहे. देऊळ कसलं ते, देवळाचं खिंडार मात्र आहे. भिंतीचा एखादा अवशेषही त्या ठिकाणी दिसत नाही. चौथऱ्याचा दगड पूर्वी कधी काळी एकसंध असावा. आता जागोजागी उद्ध्वस्त त्याच्या ठिकऱ्या झाल्या आहेत. चौथऱ्यासारखीच उद्ध्वस्त गेलेली एक शिवाची शाळुंखा आणि तोंड तुटलेला एक भुंडा दगडी नंदी, त्या चौथऱ्यावर धूळ खात पडला आहे. माळच असल्यानं साक्षात पार्वतीपरमेश्वरांच्या या अवशेषांवर कसलीही छाया नाही. नेपतीचं एक झुडूप चिरलेल्या चौथऱ्यातून वर आलं आहे. कुणीही गुराख्यानं न तोडल्यानं ते भलं उंच वाढलं आहे. त्या पर्णहीन झुडुपावर अनेकरंगी फुलं डवरतात तेव्हा ती जागा मोठी गूढरम्य दिसते.

या माळाबद्दलच्या अनेक दंतकथा आमच्या गावात रूढ आहेत. कुणी म्हणतात, या ईश्वरपार्वतीच्या खिंडारात एक भला मोठा पुरातन नाग आहे. त्याच्या अंगावर बोट बट केस आहेत. या नागाच्या अस्तित्वाबरोबर गुप्तधनाची दंतकथाही अपरिहार्यपणेच या माळाशी जोडली गेली आहे. पूर्वी गावठाणच इथं असल्यामुळं या उजाड माळाखाली कुठंतरी गुप्तधन असावं, ही कल्पना कळतेपणीदेखील मला विश्वासार्ह वाटत राहिली. परवा परवा पुण्याला मला वार्ता समजली की, गावच्या खंडोबाच्या माळावर कुणा मांगाच्या पोराला, पैशांनी काठोकाठ भरलेला एक गडवा सापडला. मी गावी गेल्याबरोबर त्या मांगाच्या मुलाला विचारलं, " निल्या, खंडोबाच्या माळावर तुला पैक्याचा गडवा सापडला हे खरं का ? "

" व्हय जी. " मांगाचा पोर उत्तरला.

"कुठायत ते पैसे ?" मी औत्सुक्यानं विचारलं.

"इकलं !" तो उत्तरला.

"पैसे विकलेस ?" हा असंभाव्य व्यवहार कसा घडला या शंकेनं मी प्रश्न केला.

"समदं तांब्याचंच पैसं हुतं. कासाराला घातलं मोडीत !" ती सर्व तांब्याची नाणी होती व कैक वर्षांची जुनी होती, इतकं मी जाणलं व त्यांतील एखादंतरी नाणं ठेवायचं होतंस, असं कळकळीनं बोललो. निल्या मांग तातडीनं झोपडीकडे पळाला आणि एक काळपटलेलं तांब्याचं नाणं घेऊन आला. त्यानं ते नाणं माझ्यापुढं टाकलं. नाणं थोडंसं हाताळून न्याहाळल्यावर माझ्या ध्यानात आलं की ती एक शिवराई आहे. शिवशाहीत माझा गाव अस्तित्वात होता एवढा एकतरी शोध मला लागला. निल्यानं कासाराला विकून टाकलेली सर्व नाणी असलीच होती, की त्यात आणखी कसल्या नाण्यांची भर होती कोण जाणे ! खंडोबाच्या माळाखाली असलेल्या गुप्त धनाचा विसार हाती येऊनही निल्यानं त्याची वाट लावून टाकली होती; त्यामुळं मला अधिक संशोधन करता आले नाही. हा खंडोबाचा माळ आणि त्याखाली असलेलं गुप्त धन थोडंसं वेशान्तर करून माझ्या एका चित्रकथेत येऊन गेलं होतं.

खंडोबाच्या माळानं पश्चिमेकडे चालत राहिलं की माझा गाव येतो. माझ्या प्रांतात उन्हाळा फार. गाव सदा उन्हात तळपत असतं. माझ्या ग्रामीण कथांतून या उन्हाचा ताप सारखा वर्णिला जातो...

"दुपार नुसती जळत होती. खंडोबाच्या माळावरच्या चिमखड्यांच्या फुलून लाह्या होतील इतकं ऊन तावत होतं. नेसी बोराट्यांच्या फांद्या चित्रांसारख्या स्तब्ध होत्या. बघताच डोळ्यांना अंधारी येऊन, उन्हात चित्रविचित्र रंगाच्या रेघोट्या सरपटत होत्या. सारा माळ निर्मनुष्य, भकास होता. खंडोबाच्या देवळात पडक्या भिंतीला, टीचभर सावलीत देवाचा रेडा अंग दाटून बसला होता. बाकी सारा शुकशुकाट. तापलेले खडे आणि माती तुडवीत तुकाराम येत होता. त्याच्या पायांत काही नव्हतं..."

'वीज' नावाच्या माझ्या लघुकथेतील हा उतारा आहे. तुकाराम तुडवीत होता तो माळ माझ्या गावचा आहे. आणि त्याला भाजत होतं ते रणरणणारं ऊन तर खास माझ्या गावची निशाणी आहे. बाळपणभर खाल्लेल्या या उन्हाचा

माझ्यावर इतका विलक्षण परिणाम झाला आहे की, कथेची पार्श्वभूमी उचलून कृष्णाकाठी नेली तरी माझ्या माथ्यातलं ऊन नाहीसं होत नाही. 'मुके प्रेम' या कृष्णाकाठी घडलेल्या गोष्टीचा प्रारंभसुद्धा हा असाच आहे :

'....दिवसाचा देव अगदी माथ्यावर आला होता. कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रातील वाळू तापून रणरण करीत होती. गावाकडील बाजूच्या गुडघाभर धारेलादेखील कड आला असावा. वाळवंटातील शिरगोळ्याप्रमाणं पाण्याचा पृष्ठभागही चमचम चमकत होता. पाणोठ्यावर आता चिटपाखरूही नव्हतं. नाही म्हणायला गावचा परीट आणि त्याची दणगट बायको खाली लांब परीटधुण्यावर एक पासोडी झोडपत होती. त्याचा आवाज डगरीपर्यंत येत होता. पलीकडच्या मळईत शेवरीची हिरवी झाडं स्तब्ध राहून नाइलाजानं उन्हात तापत होती. हालता येत असतं तर तीदेखील उठून 'म्हातार-वडा'च्या गार सावलीत येऊन कलंडली असती....'

खेडं सोडून तपं लोटली तरी माझ्या खेड्यातला हा उन्हाळा माझ्या साहित्यात आल्यावाचून राहात नाही.

खंडोबाचा माळ ओलांडून आत आलं की, गावाच्या प्रारंभी महारवाडा लागतो. सर्व गावात ही वसाहत अत्यंत स्वच्छ आहे. वसाहतीच्या मध्यभागी 'तक्क्या' नावाची जी टुमदार इमारत लागते, तिचं वेगळेपण तर लहानपणापासून माझ्या मनात आदर उत्पन्न करीत आलेलं आहे. कष्टासाठी जीवन जगणाऱ्या हरिजनांनी आपल्या सांघिक कष्टाच्या बळावरच ही इमारत उभी केलेली आहे. कुणाही धनिकाच्या दिवाणखान्याला लाजवील अशी त्या इमारतीची बांधणी आहे. रात्रीच्या वेळी महारमंडळी त्या इमारतीत जमतात आणि जिवाची करमणूक करून घेतात. या तक्क्यात होणारी भजनं मी अनेकदा पाहिली व ऐकली आहेत. तिथल्या भजनाचे स्वर आणि विषय माझ्या कानांना अजून स्मरत आहेत. या स्मरणातूनच 'काय देवाची सांगू मात, झाला महार पंढरीनाथ' या गाण्याचा जन्म झाला.

महारवाड्याची स्वच्छ वस्ती ओलांडून बाहेर आलो की मांगांची घरं लागतात. लाकडी फिरक्या हातात धरून एखादा मांग आणि एखादी मांगीण दोराला पीळ भरीत असताना अजूनही दिसते. एका चित्रपटात मी या मांगवाड्यातील अनेक दृश्यं चितारली आहेत.

मांगवस्तीनंतर रामोसवाडा डाव्या अंगाला सोडून वळलं की गावमारुतीचं देऊळ, माझी लहानपणीची शाळा, आणि गावचा चव्हाटा म्हणून ओळखला जाणारा कडुनिंबाचा पार लागतो. ही जागा तर मी माझ्या आयुष्यात कधीच विसरणार नाही. कैक वर्षप्रतिपदांना मी या पारावरच्या निंबाची पालवी खाल्ली आहे. या निंबाखालीच माझं बालपण हुंदाडलं आहे. पिकलेल्या निंबोळ्यांनी कुरकुल्या भरून याच पाराखाली मी आंब्याच्या व्यापाराचा खेळ खेळलो आहे. पारापुढच्या चौकात टाकलेले दगडी नाल उचलतात की नाही या अजमासावर मी माझं वाढतं बळ अजमावलं आहे. बालवयात रांगेत उभा राहून परवचा म्हणण्यापासून, प्रौढ वयात जमलेल्या गावकऱ्यांना 'स्वातंत्र्य मिळालं म्हणजे काय झालं?' हे समजावून सांगण्यापर्यंतचं माझं वक्तृत्व याच निंबाखाली मोहरलं आहे. या कडुनिंबाबद्दल मला इतका विलक्षण जिव्हाळा आहे की, त्याच्या उत्पत्तीची अद्भुत कथा सांगण्यासाठी 'अमृतवृक्ष' नावाची एक दीर्घ संगीतिका मी मोठ्या हौसेनं लिहिली आहे. औषधीपती चंद्राच्या अश्रूंतून जन्म पावलेला हा दिव्य वृक्ष माझ्या भकास खेड्याला सदैव सावली देत आला आहे. माझ्या गावात अगर गावाबाहेरील रानात प्रामुख्यानं कडुनिंबाचेच वृक्ष आहेत. वसंतकालात मोहरलेला कडुनिंब ज्यांनी पाहिला असेल, त्यांना माझं म्हणणं त्वरित पटेल. पतीच्या अश्रूंतून निर्माण झालेल्या कडुनिंबाला सत्तावीस यक्षकन्यका वर देतात—

आम्ही साऱ्या देऊ याते अमुचे तेजःकण
फुले होउनी फुलवितील ते याचे कटु जीवन
सुगंधीत या येतिल सुमने आम्रमंजिरीसवे
वनस्पतींना वृक्षराज हा होवो लेणे नवे!

नक्षत्रांगणांनी दिलेले तेजःकणच निंबाच्या झाडावर वासंतिक मोहोराच्या रूपानं लहडतात अशी माझी कल्पना. माझ्या गावातील गांवढळ वृक्षाच्या माथ्यावर हा स्वर्गीय मुकुट मला बसवावासा वाटला, याचं कारण काय? त्या वृक्षाचे आणि माझे अतूट ऋणानुबंध—अविस्मरणीय सहवास.

कोकणातील व गोमंतकातील कवी—लेखक आपल्या प्रांतातील अशी निसर्ग-शोभेची वर्णनं तन्मयतेनं करतात. वर्ण्यविषय व्हावं असं निसर्गसौंदर्य माझ्या गावाला नाही. पण म्हणतात ना, सौंदर्य दृश्यात नसतं,—ते बघणाराच्या दृष्टीत असतं.

पाचपन्नास माळवदी घरांनी आणि दहा-वीस मळक्या वाटांनी ओबडधोबड आकार धारण केलेली एक दरिद्री वस्ती, असंच माझ्या गावाचं स्वरूप आहे. हे स्वरूप कुणालाच लोभनीय वाटणार नाही; पण मला ते वाटतं–शपथपूर्वक वाटतं. अतिस्नेहानं अपरिहार्य होणारी अतिशयोक्तीही टाळून माझी कविता माझ्या गावाचं वर्णन करते—

'नजिक नाझरे श्रीधर कविचे, नदी माणगंगा
नित्य नांदते खेडे माझे धरून संतसंगा...'

अभिमान वाटण्यासारखी दुसरी कुठलीही गोष्ट माझ्या गावात नाही, पण ते लोककवी श्रीधराच्या नाझऱ्याजवळ वसत आहे, हे काय कमी झालं! माणसाची पारख जर त्याच्या मित्रमंडळावरून करतात, तर गावाची पारख त्याच्या सहवासी नगरावरून का करू नये? 'रामविजय', 'हरिविजय', 'पांडवप्रताप' यांसारखे ग्रंथ बाळबोध ओवीत सांगणारा श्रीधर माझ्या गावापासून अवघ्या अडीच मैलांवर होऊन गेला, याचादेखील मला अभिमान वाटतो. 'पुष्पसंगे मातीस वास लागे.' श्रीधराच्या जन्मानं नाझरे सुगंधित झालं आहे. त्या सुगंधाचा सौम्य दरवळ माझ्या गावापर्यंत खचित यावा, तेही थोडं सुगंधित व्हावं, हे साहजिकच नाही का?

शिवशाहीतील तांब्याची काही नाणी निल्या मांगाच्या हाती आली, बाकी शिवशाहीची कसलीच निशाणी माझ्या गावात नाही. माझ्या गावातले शेतकरी मुळी मराठे नाहीतच. ते आहेत वैश्य वाणी. म्हणून काय झालं? महाकवी तुकाराम नव्हता का वाणी? आणि बरं झालं, नुसती 'वडिलांची कीर्ती सांगणारे मूर्ख' माझ्या गावठाणात पैदा होण्याचा धोका टळला. मला त्याच गोष्टीचा आनंद आहे.

'इथे न नांदे शिवशाहीचा संबंधी वंश
गर्व–सर्प या करू न शकला ओझरता दंश'

पावसाळ्यात गढूळ पाण्यानं भरून वाहणारं माळावरचं तळं सोडलं तर माझ्या गावात एकही जलाशय नाही. पण शेताशेतात कावळ्याच्या डोळ्यासारख्या निवळशंख पाण्याच्या विहिरी मात्र आहेत. घराघरांतून दोन हात रुंद आणि दोन हात लांब एवढंच तोंड असलेले चिमुकले आड आहेत. ग्रामवैशिष्ट्याचं वर्णन

करणारं एक लोकगीत माझ्या गावच्या पंचक्रोशीत रूढ आहे. त्यात चक्क ओळ आहे—

'नथीचा आकडा नाझरकरणी, पाण्यात बंगला माडगूळकरणी'

प्रत्येकाच्या रानाखाली आणि घराखालीच महामूर पाणी असल्यावर निळ्या जलाशयाचं कौतुक ते काय?

'निळा जलाशय नाही येथे, नाही उद्यान
अन्नासाठी मात्र हिरवळे भंवतीचे रान....'

निसर्गसौंदर्य नाही, इतिहास नाही, आधुनिक तरी एखादी दृष्ट लागण्यासारखी इमारत खेड्यात असावी–तर तीही नाही. मी स्पष्टच सांगतो—

'आधुनिकतेचा नाही येथिल वास्तूंना वास
धाब्यावरती घरे बसविती उन्हापावसास...'

माझ्या गावातल्या माणसांसारखीच तिथली घरंही काटक आहेत. उन्हापावसाला ती अक्षरशः धाब्यावर बसवितात! कुठल्याही संकटानं तिथल्या माणसांचं वा घराचंही धाबं दणाणत नाही.

माझ्या गावातही अठरापगड जमाती आहेत. महारवाडा आहे, रामोसवाडा आहे, होलारवाडा आहे, ब्राह्मण आळी आहे, मोमिन मुलाण्यांची घरं आहेत, बलुतेदारांच्या झोपड्या आहेत. पण त्यांच्यात कधी मारामारी होत नाही. ब्राह्मणांच्या घरी गणपती बसल्यावर मोमिनाची खाला त्याला हात जोडते. चावडीत ताबूत तयार झाला म्हणजे त्याला मलिद्याचा नैवेद्य कुलकर्ण्याच्या घरून जातो. ब्राह्मणांची मुलं अलाव्याभवती नाचतात, आणि मुसलमानातील तरुण गणपतीच्या मिरवणुकीपुढं गदगाफरी खेळून दाखवतात.

'जातिजमाती इथे जन्मती सुखे नांदण्यास
पिरास करतो नवस मराठा, मिया मारुतीस
नाडित नाही अज्ञानांना पदोपदी ज्ञान
अनुभव आणि वार्धक्याला मात्र इथे मान
न्यायासाठी पाच मुखांचा परमेश्वर बोले
गावापाठी इथे व्यक्तिची निर्भयता चाले.....'

असा आहे माझा गाव!

आज विज्ञानाचं युग आहे. सरकारी आदेशानुसार खेडी जागृत होत आहेत.

माझ्या गावात फक्त एक एंजिन आलं आहे आणि एक रेडिओ सेट बोलू लागला आहे. रेडिओवर कीर्तन असेल तर गावकरी भगिनी ते ऐकायला येतात. शेतीचं ज्ञान त्या यंत्राकडून घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. गव्हावर तांबेरा पडला तर गावातल्या वृद्ध शेतकऱ्याला ते विचारतील, त्याच्या विचारे वागतील.

वाडवडिलांनी घालून दिलेले सर्व सण माझ्या गावातील लोक साजरे करतात. पावसाची कृपा होईल तो दिवस उत्स्फूर्त आनंदानं साजरा करतात. मृगागमनानं त्यांना झालेला आनंद मी अनेकवार पाहिला आहे. कवितारूपानं तो माझ्या साहित्यकृतीत साकारला आहे—

'माऊलीच्या दुधापरी, आले मृगाचे तुषार
भुकेजल्या तान्ह्यासम, तोंड पसरी शिवार
तुकोबाच्या अभंगाला मंद चिपळ्यांची साथ
भरारतो रानवारा, तसा झाडाझुडपांत
पिऊनिया रानवारा, खोंड धावे वारेमाप
येता मातीचा सुगंध, स्तब्ध झाले आपोआप
अवखळ बाळांपरी, पक्षी खेळती मातीत
उभारल्या पंखावरी, थेंब टपोरे झेलीत
धारा वर्षता वरून, बैल वशिंड हालवी
अवेळीच फुटे पान्हा, गाय वत्साला बोलवी
गावानेच उंच केला, हाच दैवी प्रासाद
भिजूनिया चिंब झाला, गावदेवीचा कळस
निसर्गाने दिले धन, द्यावे दुसऱ्या जाणुनि
झाली छपरे उदार, आल्या पागोळ्या अंगणी'

माझं गाव गोकुळासारखं आनंदी आहे, असं मी म्हणत नाही. तिथं दुःख आहेत, हेवेदावे आहेत, पण मला ते दिसत नाहीत. मला माझ्या गावाचं मोठेपण तेवढं दिसतं. कारण मी स्वतःला त्या गावाचं लेकरू म्हणवितो. दुःखाकष्टातूनही जीवनानंद वेचण्याची वृत्ती मला त्या गावाच्या मातीनं दिली आहे. माझ्या गावाभोवती तट नाही, गर्द झाडीही नाही. तरी मला वाटतं, माझं गाव बंदिस्त आहे. त्याला एक मोठा दरवाजा आहे. तो दरवाजा भल्या पहाटे निळ्या हातांनी उघडला जातो. शुक्राची चांदणी उगवली की माझ्या गावात 'ये-जा' सुरू

होते. मला वाटतं, माझ्या नगरीचं द्वार शुक्रच उघडतो. मग कोवळी उन्हं आत येतात, गाई धारा देतात. हा भास नाही; हा साक्षात्कार आहे. मी ईश्वराचं अस्तित्व मानतो. त्याच्यापाशी मागितलेलं मिळतं, अशीही माझी धारणा आहे. मला भावत असलेला ग्रामनिवासच मी देवाकडे मागतो--

' खेड्यात मला या सात जन्म लाभावे
हे असे खगांनी रोज पहाटे गावे
या दार नगरिचे शुक्राने उघडावे
कोवळ्या उन्हांनी आत सकाळी यावे
पोसल्या गायींनी दूध सुधेचे द्यावे
धारेत सखीचे कंगणनाद भरावे
फेसाळ हासणे पेल्यावर डवरावे
आकंठ पिउन ते जीवन मी जगवावे '

खेड्यातल्या जीवनाचा सोस वाटावा इतकं माझ्या स्मृतीतलं खेडेगाव सुंदर होतं. गोड होतं. सुखी होतं. जमाना बदलतो आहे; मला माहीत आहे. त्याबरोबर माझं खेडेगावही बदलणार आहे. त्याचा कायाकल्प होणार आहे. नागर-सोयींनी माझं गाव सुंदर आणि संपन्न झालं तर मला हवंच आहे, पण जुना जिव्हाळा आणि जुनी माणसाई त्यातून निघून गेली तर मात्र ते माझं गाव माझं राहणार नाही. माझं गाव मग माझ्या कवितेत राहील तेवढंच. माझी कविता नष्ट झाली तर तेही नष्ट होऊन जाईल.

माझ्या गावचे विचार सदैव माझ्या डोक्यात असतात. फॅशनेबल टीकाकार मला प्रतिगामी म्हणतील याची मला दिक्कत वाटत नाही. ' कायाकल्प 'सारख्या कवितेच्या द्वारे मी माझी मळमळ बोलून टाकतो. ' खेडी बदलली तर तिथली माणसाई टिकणं कठीण आहे ! ' माझ्या कवितेतील प्रतिमा मला माझ्या गावानंच दिलेल्या आहेत. अतर्क्य ज्ञानाकडे झेपावणारं कविमन ज्ञानाच्या कुंपणात अडकून पडल्याची दुर्घटना वर्णन करताना मला माझ्या गावातील मेंढवाडा आठवला. कूपात अडकून मेलेलं ' कोकरू ' आठवलं.

नव्या मूल्यांचा जन्मसोहळा वर्णन करताना मला खेड्यातल्या घरात झालेलं स्त्रीचं बाळंतपण आठवलं. तिच्या यातना स्मरल्या. अवतीभवतीच्या मुद्रांवरचे परिणाम आठवले. शान्तिपाठ म्हणणारा ब्राह्मण, दारात खोचलेल्या कडुनिंबाचा

डहाळादेखील आठवला. या प्रतिमा मला माझ्या गावानं दिल्या. ज्ञानदेवाच्या स्तन्यासाठी धडपडणाऱ्या एका ज्ञानपिपासू मनाची मुकी तक्रार मी 'टाहो' कवितेत वर्णिली. पाळण्यातील मुलाचं ते रडणं मी माझ्या गावातच ऐकलेलं आहे.

केवळ परिपाठ म्हणून रामराज्याची कथा सांगणारा गोंधळीही माझ्या खेड्यातून आलेला; पेंगणारे श्रोते आणि ज्यांच्यासाठी हा कुलधर्म ते पति-पत्नी मात्र भोगात दंग असलेले. या साऱ्या प्रतिमा मला माझ्या खेड्यानं दिलेल्या. माझा गाव माझ्या साहित्यात ठायीठायी प्रतिबिंबित झाला आहे. ती प्रतिबिंबस्थळं शोधून काढणं मला स्वत:ला कठीण आहे. तुम्ही कुणी मला शोधून दाखविलीत तर मी मान डोलवीन आणि सांगेन, 'माझ्या गावातल्यासारखं दिसलं ते माझ्या गावचंच आहे!'

माझा पिंड जसा माझ्या गावच्या वातावरणानं घडला आहे, तसंच माझं लेखन माझ्या गावच्या संस्कारानं मढलेलं आहे. स्वत:इतकाच मला माझ्या गावाचा अभिमान आहे. अनुभवांनी कडवट झालेलं माझं मन, गावाकडच्या आठवणींनी म्हणूनच मोहरून येतं.

(मंतरलेले दिवस)

२

नवेगाव बांध : पाऊलखुणा

व्यंकटेश माडगूळकर

'सामान्यत: जो अर्थ गृहीत धरला जातो, त्या अर्थानं मी पशूंना हिंस्र समजत नाही. त्यांच्याकडे मी एवढा ओढला गेलो, याचं कारण त्यांच्या तोंडून मी कधी मूर्खपणाचं वक्तव्य ऐकलं नाही.'

— थोरो

रात्री मधेच कधीतरी जाग आली. फॉरेस्ट बंगल्याच्या चौकीदारानं बांबूच्या छडयांचे आधार देऊन खुबीनं उभ्या केलेल्या मच्छरदाणीत मी होतो. बारीक करून कोपऱ्यात ठेवलेल्या कंदिलात थोडी धुगधुगी बाकी होती. डोक्याकडे असलेल्या खिडकीतून थंडगार चंद्रप्रकाशाचा चौकोन जमिनीवर, भिंतीवर पसरलेला होता.

हळूच उठलो, पलीकडच्या खाटल्यावर झोपलेल्या मित्रवर्य मारोतराव चितमपल्लींची झोपमोड होऊ नये, अशा बेतानं दार उघडलं आणि बाहेर व्हरांड्यात आलो. अंगणात उतरलो, फाटक उघडून उघड्यावर आलो.

आजूबाजूला फुललेली आमराई होती. डाव्या बाजूला मोहरानं फुलून गेलेली आंब्याची झाडे निश्चल उभी होती. मंजिऱ्यांचा सुगंध सर्वत्र दरवळून उरला होता. शेजारी शेजारी उभ्या अशा दोन उंच आंब्यांच्या काळ्या आकृतींमधून पलीकडे वाटोळा चंद्र दिसत होता आणि दुरून तनमोराचा टाहो पुन्हा-पुन्हा कानी येत होता.

हा फेब्रुवारीचा मध्य होता. तनमोरांचा हा अंडी घालण्याचा काळ होता. मीलनोत्सुक अशा पक्षिणीचा टाहो समोर पसरलेल्या विस्तीर्ण जलाशयावरून सरसरत दूर जाऊन विरत होता.

एकाएकी मला एवढा उत्साह वाटला, की पंख फडफडवीत आणि मान फुगवून उंच बांग द्यावी !

भंडारा जिल्ह्यातल्या ' नवेगाव बांध ' ह्या राष्ट्रीय उद्यानातून गेले दोन-तीन दिवस भटकत होतो. साग, धावडा, गराडी ऐन, साजा, मोहा, बांबू अशा वृक्षविशेषांनी, आणि त्यांना वेढून राहिलेल्या लतावेलींनी काळोखी आणलेल्या ह्या वनातून हिंडताना मला विलक्षण आनंद होत होता.

जंगलातील अरुंद वाटेवरून पळत असलेल्या आमच्या जीपसमोरून कधी चकोतऱ्या तुरगत जात, तर कधी मोठ्या सोग्याचे मोर माना उंच करून सावट घेत उभे असलेले दिसत. लगेच मारोतराव सांगत,

" ग्रे आणि रेड जंगल फाऊल ह्या दोन्ही जाती सहसा एकत्र नसतात, पण इथं त्या आहेत, बरं का ! "

माझं मन एकदम भरारून खूप मागे गेलं. नवी बंदूक माझ्या हाती आली होती. कारवारकडे गुंजावती गेमब्लॉकमध्ये आम्ही दहा-बारा जण शिकारीला गेलो होतो. बांबू फुलांवर आला होता आणि त्याच्या बियांवर ताव मारण्यासाठी प्रचंड संख्येनं रानकोंबड्या आणि कोंबडे आले होते.

जंगलातला कोंबडा हा भलता हुशार पक्षी असतो. बांबूच्या बेटातून फिरताना तो इतकी सावधानी बाळगतो, की भल्या भल्या शिकाऱ्यांची त्याला टिपताना अब्रू जाते. त्यात, जयंतराव टिळकांनी आम्हा नव्या पोरांसाठी पैज लावली होती :

कोंबडा मारील, त्याला एक रुपया बक्षीस !

रोज सकाळी आणि संध्याकाळी मी दोन्हीकडे बांबूची दाट बेटं असलेल्या वाटेवरून फेरफटका घेई आणि कोंबडा मारण्याची खटपट करी. अनेकदा कोंबडे दिसले, आणि बंदूक सुधारायच्या आत बांबूच्या बेटाआड झाले. फक्त एकदाच एक सुरेख कोंबडा टप्प्यात आला. त्याला मी दिसलो नव्हतो. एक बेटाआडून

माना काढून काढून तो बघे आणि भरकन् दुसऱ्या बेटाआड जाई. लपत लपत मी वारुळाच्या आडोशाला लपलो. नीट दिसेना, म्हणून वारुळावर चढून दोन पायांवर बसलो, आणि तेवढ्यात हा टप्प्यात आला. नेम धरून मी बार घातला आणि सैल धरल्यामुळं बंदुकीच्या दस्त्याचा असा दणका छातीला बसला, की वारुळावर निसमाळ्या बसलेला मी, बंदूक छातीवर घेऊन उताणा मागे कोसळलो. तिकडे कोंबडा फर्रकन उडूनही गेला. आजूबाजूला कोणी नसतानासुद्धा मी विलक्षण ओशाळून गेलो. एका नवशिक्या पोराची फजिती बघून तो कोंबडा पोट धरधरून हसला असेल.

पंधरा दिवसांच्या त्या मुक्कामात मला फक्त एक लहानशी कोंबडी मारता आली, पण तिला बक्षीस नव्हतं !

ह्या गोष्टीला तीस वर्षं उलटून गेली होती.

आता मी शिकारी उरलो नव्हतो. पाठीशी बंदूक नव्हती. गळ्यात फक्त दुर्बीण होती. ह्या जंगलाचा भूगोल माझ्या परिचयाचा नव्हता. कुठून कुठं चाललो आहोत, काही कळत नव्हतं.

पवनी नावाचं लहानसं गाव वाटेत लागलं. इथले जिम कारबेट माधवराव पाटील धोतराचा काच्या मारून आणि खाकी शर्ट घालून आमच्याबरोबर हिंडायला आले. त्यांनीही आता हत्यार टाकलं होतं. गेली तीस-चाळीस वर्षं जंगलातून हिंडल्यामुळं ही सगळी भूमी त्यांना तळहातासारखी माहीत होती. आजतागायत ह्या शिकाऱ्यानं पायात काही पादत्राण वापरलं नव्हतं. आजही ते अनवाणीच आमच्याबरोबर हिंडत होते. जंगलातल्या गच्चाळ वाटांवरून कौशल्यानं जीप चालवीत होते.

मधेच पायउतार होऊन त्यांनी मला, विद्वानाच्या भेटीला न्यावं, तसं एका वृक्षाच्या भेटीला नेलं. वाट काढीत काढीत आम्ही एका नाल्याच्या काठी आलो. ओल्या मातीत खूप रुतलेले गव्याचे खूर लागले, अगदी ताजे. एकुलता असा हा काळा गवा असला पाहिजे. दाट जंगलात राहणारा गवा दृष्टीस पडणं कठीणच. सहा फूट उंची आणि दोन हजार एकाहत्तर पौंडांपर्यंत वजन, चमकदार काळा रंग, चारी पाय मात्र मोजे घातल्यासारखे पांढरे. असा गवा म्हणजे जंगलाचं भूषण असतं. तरणेबांड गवे गर्द किरमिजी रंगाचे असतात,

आणि जून गवे काळे. शिंगं जबरदस्त. सर्वांत मोठी शिंगं सापडल्याची नोंद आहे, ती साडेएकतीस इंचांची.

बारा ते वीस अशा कळपानं गवे हिंडतात. बांड गवे, जून गवे आणि गाया कळपात असतात. काही नेणती वासरंही असतात. कळपाचं म्होरकेपण अनुभवी अशा गाईकडं असतं. पोरंबाळं, तरणे गवे, गाया मधे आणि जून काळे गवे पिछाडीला. कळपाची पुढारीण साठ-शंभर फूट पुढं राहून सारखी सावट घेत जात असते आणि मागला कळप बेफिक्रीरपणे, निर्धास्तपणे जात असतो.

दोन अनोळखी गव्यांची गाठ होते, तेव्हा कोण ताकदवान, ह्याचा निर्णय होणं आवश्यक असतं. पण ह्यासाठी टक्कर खेळावी लागत नाही. ताकदवान असतो, तो डोकं खाली घालून आणि पाठीशी कमान करून आपल्या शरीराचं प्रदर्शन एखाद्या बॉडीब्युटिफुलवाल्या पहिलवानाच्या झोकात करतो. दुसरा तीस एक फुटांच्या अंतरावर नमून उभा राहतो. मग ताठ पायानं, सावकाश आपल्या प्रतिस्पर्ध्याभोवती चक्कर घेऊ लागतो. तसा हा जागा न सोडता, त्याला डोकं देत अंगाभोवती फिरत राहतो. हा एकमेकांची ताकद अजमावण्याचा प्रकार पाच दहा मिनिटं चालतो आणि शेवटी दोघांपैकी एकजण, 'बरं, बाबा, तू मोठ्या बापाचा' असं म्हणून लहानपणा पत्करून चालता होतो. विजयी योद्धा खुरानं माती उकरतो, डिरक्या देतो आणि जंगलातला एक नाट्यपूर्ण प्रवेश संपतो.

थोडं पुढं गेलो आणि बिबट्याची पावलं लागली. अगदी पहाटे पहाटे हा नाला ओलांडून गेला होता. पावलं अगदी ताजी होती.

आणखी थोडं पुढं गेलो, आणि तो वृक्षविशेष दिसला. खोल, खडकाळ नाल्याच्या काठावर एक उंचापुरा अंजन ताठ उभा होता. एखाद्या कुशल शिल्पकाराच्या नाजुक हत्यारानं नक्षीकाम करावं, असं त्याचं सगळं खोड सुशोभित झालं होतं. माधवराव म्हणाले, "हे अस्वलाचं झाड आहे. वर लागलेली मधाची पोवळी खाण्यासाठी ह्यावर अस्वलं चढतात आणि उतरतात. त्यांच्या नखांनी हे नक्षीकाम केलंय, बघा."

बघणाऱ्याच्या डोक्याची टोपी पडावी, एवढी अंजनाची उंची होती. इतक्या उंचीवर चढणाऱ्या अस्वलांना खाली बघताच भोवळ येत असेल. आपल्या हाती

कॅमेरा नाही, म्हणून सहसा मी कधी हळहळत नाही. इथं हळहळलो. हे नक्षीकाम रेखाचित्रात दाखविण्यापलीकडचं होतं. अंजनाला भेटून पुन्हा आम्ही आल्या वाटेनं परत फिरलो. जीपमध्ये बसलो. चितमपल्ली म्हणाले, "माधवराव आता तल्लागुडीला जाऊ. तरसाचं ठिकाण बघू."

पुन्हा अरुंद जंगलवाटेवरून बराच प्रवास. गप्पागोष्टी. पुन्हा जीप वाटेवरच ठेवून पायपीट. ह्या नाल्यातून जाऊन ती चढण—ती चढण उतरून दुसरी चढण. आणि मग समोर उंचवट्यावर प्रचंड शिलाखंडाचा ढिगारा. एक एक फत्तर हत्तीच्या आकाराचा. काळाभिन्न. सांदीखोपाट्यांतून बांबूची बेटं उठलेली.

अगदी नमुनेबाज जागा होती.

बांबूचे फराटे हातानं बारीत आम्ही तो तरसाचा किल्ला चढलो आणि वाकून वाकून बघू लागलो. शिळांच्या खाली अंधारी जागा होती. नीट पाहिलं, तर तरसाचा चौसोपी वाडाच होता. इथं तिथं तरसं बसल्याच्या खुणा होत्या. गळलेले केस होते. जुनीपुराणी हाडं होती. पण तूर्त, आजच्या घडीला इथं तरसाची वस्ती आहे, असं मात्र वाटत नव्हतं. एखाद्या इतिहासकालीन वास्तूची कळा ह्या जागेला होती. ते काही का असेना, आजमितीला काही कारणांनी ही वस्ती सोडून तरसं दुसरीकडे का गेली असेनात, वाडा तरी बघायला मिळाला. तरसांनी ही जागा फार हुशारीनं शोधली होती. बाहेरून इथपर्यंत येण्यासाठी नाले होते, म्हणजे आडोशानं जाण्या-येण्यासारख्या वाटा होत्या. जागा बेताच्या उंचीवर होती. इथं बसून चौफेर नजर ठेवता येत होती. ऊन, वारा, पाऊस ह्यांपासून संरक्षण होतं. शिवाय ह्या ऐसपैस वाड्याला चोहो अंगांनी बाहेरची दारं होती. हल्ला झाला, तर कोणत्याही दारानं बाहेर पडता येईल, अशी सोय होती.

आफ्रिकेच्या जंगलात गेमवार्डन म्हणून अनेक वर्षं काढलेल्या हॅरी ओल्नेरच्या 'मेमरीज् ऑफ ए गेमरेंजर' पुस्तकातली तरसाची एक हकीगत मला आठवली. तो लिहितो : 'लहानशा डबक्याकाठी विश्रांती घेत मी बसलो होतो. जराशानं समोरच्या झाडीतून एक तरस पळत पळत माझ्या दिशेनं येताना दिसलं. त्याच्या तोंडात काहीतरी होतं. मी दडल्या जागी गप्प बसून बघत होतो. तरस आपल्या नादात होतं. माझ्याकडं त्याचं मुळीच लक्ष नव्हतं. ते डबक्यापाशी आलं

पाण्यात उतरलं. चारी पाय पाण्यात अर्धेमुर्धे बुडल्यावर त्यानं एकवार आजूबाजूला पाहिलं आणि तोंडातून आणलेली वस्तू पाण्यात टाकली. पुन्हा इकडे तिकडे बघून घेतलं. दरम्यान पाण्यात टाकलेली ती वस्तू वर आली. त्यासरशी त्याच्या तोंडावर आश्चर्य दिसलं. ती वस्तू पुन्हा तोंडात घेऊन ते थोडं पुढं सरकलं आणि तिथं वस्तू टाकून क्षणभर थांबलं.

' वस्तू पुन्हा वर आली ! तरस विलक्षण गोंधळून गप्प उभं राहिलं.

' आता मात्र माझीही उत्सुकता शिगेला पोचली. मी जागचा उठून उभा राहिलो आणि चुकचुकलो. त्यासरशी चकित होऊन त्यानं कान उभारले, आणि शेपटीचा गोंडा उडवून पोबारा केला.

" पाण्यात उतरून मी ती वस्तू तपासली. वाईल्ड बीस्ट नावानं ओळखल्या जाणाऱ्या जनावराचं ते फुप्फुस होतं. सिंहानं शिकार केलेल्या वाईल्ड बीस्टवर तरसानं मनमुराद ताव मारला असला पाहिजे. खाऊन उरलेलं भक्ष्य कुठंतरी सुरक्षित जागी ठेवायचं आणि पुन्हा भूक लागल्यावर खायचं, ही तरसाची संवयच असते. हे पाण्याचं डबकं ही ह्या तरसाची खाद्य ठेवण्याची नेहमीची जागा असली पाहिजे. फुप्फुसासारखा हलका पदार्थ पाण्यावर तरंगून तात्काळ वर येतो, ही गोष्ट बापडया तरसाला माहीतच नसावी. दहा इंच खोलीच्या त्या डबक्यात शोध घेतल्यावर मला कुजलेली हाडं सापडली. मांसापासून जुन्या बुटापर्यंत काहीही खाद्य गोड करून घेणाऱ्या तरसाची ही कोठीची जागा होती."

तल्लागुडीचं तरसाचं ठिकाण पाहीपर्यंत माध्यान्हसमय झाला होता, म्हणून आम्ही पवनीला परतलो. माधवराव पाटलांच्या वाडयावर ताटाला निमंत्रण होतं.

वाडयाचं भलं मोठं पटांगण शेणानं सारवून लखलखीत केलेलं होतं. वर मांडव घातला होता. कसला समारंभ आहे, म्हणून चौकशी केली तर माधवराव म्हणाले,

" नाटक आहे. "

" कुणाचं ? "

" आपल्या गावकऱ्यांनीच बसवलंय. गावकरीच करणार. "

" लिहिलंय कुणी ? "

माधवराव हसून म्हणाले,

" लेखक गावकरीच आहेत एक. "

नाटक संगीत होतं आणि माधवराव त्याच्या तालमी घेत होते.

जेवणखाण आटपून आम्ही इथून चाळीसएक किलोमीटर अंतरावर असलेल्या पालांदूर गावी निघालो. रात्री पालांदूरच्या फॉरेस्ट बंगल्यात मुक्काम करणार म्हटल्यावर माधवराव म्हणाले,

" मग मला परवानगी द्या. आज नाटकाची शेवटची तालीम आहे. "

यावर काय बोलणार ? माधवराव पाटलांना त्यांच्या नाटकी संसारात सोडून आम्ही पुढं निघालो.

तिसऱ्या प्रहरच्या सुमारास इटिहाडोहाच्या सरन्यावर वसलेल्या पालांदूरला आलो. आमराईच्या गर्दीत लहान दोन खोल्यांचा बंगला होता. पाणी आणवून आंघोळ केली. धुळीनं माखलेलं अंग स्वच्छ होताच सरन्यावर निघालो.

बॅक-बॉटरला मराठीत चांगलासा शब्द नाही. गोंडी बोलीत आहे : स र ना. आणखी कितीतरी सुरेख शब्द चितमपल्लींनी मला सांगितले. हॅरॉनला 'ढोकरी', स्टोन कर्ल्यूला ' तनमोर ' (तृणमोर ?), माऊस डिअरला ' तन सांवर ' (तृण सांबर ?), नाईट जारला ' रातवा ' आणि कूटला ' चांद्या ' (का, तर काळ्या-भोर कूटच्या कपाळावर पांढरा टिळा असतो.)

झाडाझुडपांतून, खाचखळग्यांतून वाट काढीत सरन्यावर पोहोचलो. समोर गर्द हिरवं रान, त्यापलीकडे दूरपर्यंत पसरलेलं पाणी, मधे मधे लहान बेटं. सरन्याच्या शांत पाण्यात काळीभोर वाळकी झाडं उभी होती. आणि त्यावर पाणकावळे, बगळे शांत बसून होते. झाडाचं, पाखरांचं प्रतिबिंब पाण्यात हलत होतं. कुठून तरी एक परपल हॅरॉन आला आणि काठावरच्या उंच झाडावर, अगदी टोकाशी बसला. मान उंच करून आमच्या दिशेनं बघू लागला. निरभ्र अशा झुळझुळीत निळ्या आकाशातून कंकर पक्ष्यांचा पांढरा थवा आपल्या रात्रीच्या मुक्कामावर निघून गेला.

पार पलीकडच्या काठावरून डोमा धीवर आणि त्याचा कोणी जातवाला आपली लहानशी डोंगी वल्हवत आले. मला दाखवण्यासाठी डोमानं घुई नावाचा किडा पकडून आणला होता. तो रसाळ, लठ्ठ किडा माझ्या पुढं धरून डोमानं खुलासा केला,

" असल्या घुया आम्ही माशाच्या गळाला लावतो. "

" पण त्या मिळतात कुठं, डोमा ? "

" भातखाचरात कुदळीनं थोडं उकरलं, की रग्गड, गाडगं भरून घावतात."

हा घुई म्हणजे दुसरं तिसरं काही नव्हतं. 'मोल क्रिकेट' होता. मी चिमटीत धरला, तर आपल्या पुढच्या दोन्ही दातेऱ्या, बळकट पायांनी अशा जोरदार लाथा त्यानं हाणल्या, की यँव ! हे रातकिडे जमिनीखाली बिळं करून राहतात. त्यांच्या सहा पायांपैकी पुढचे दोन्ही पाय म्हणजे जमीन उकरण्याची हत्यारंच असतात. बारीक किडामुंगी, पाला, मुळं हे त्यांचं खाद्य. मादी वसंत ऋतूत अंडी घालते, ती संभाळते. उबवते. पोरांची पुरी वाढ होण्यासाठी दोन वर्षं लागतात.

माझ्या देखतच बांबूचं एक दोन वावं दांडकं पाण्यात रोवून डोमानं त्याला गळ बांधला. गळाच्या टोकाशी आमिष म्हणून घुई टोचला. पाण्यात पडताच तो गोलगोल वर्तुळं काढत राहिला.

डोमा म्हणाला,

" मासे ह्याला लटकतात राती. "

" कोणते मासे ? "

" वारंगा असतोय, मरळ असतोय, रोहू असतोय. "

असे अनेक गळ टाकून पालांदूरची धीवर मंडळी रात्री घरी परततात आणि सकाळी सूर्योदयाच्या आत, डोंग्या वल्हवत, लागलेले मासे गोळा करतात.

" किती मासे मिळतात ? "

" काही मिळतात, काही हुदाळे खाऊन टाकतात. "

माझा चेहरा प्रश्नार्थक झाला, तेव्हा चितमपल्लींनी खुलासा केला,

" हुदाळे म्हणजे ओटर्स. ह्या पाण्यात ओटर्स आहेत. त्यांना गळाशी लागलेले मासे आयते मिळतात. ही हुशार जनावरं धीवराच्या गळाला लागलेले बरेच मासे खाऊन टाकतात. "

माशांइतक्याच सराईतपणे पाण्यात पोहणारी ही पाणमांजरं प्रत्यक्ष डोळ्यांनी बघावीत म्हणून आसाममधल्या मान्स अभयारण्यात नदीच्या काठानं मी पुष्कळ हिंडलो होतो. पण ह्या महाचपळ जातीचं दर्शन काही मला झालं नव्हतं.

दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयात मी ती पहिल्यांदा पाहिली.

मुद्दाम बांधलेल्या, नालाच्या आकाराच्या डबक्यात त्यांना सोडलं होतं. ती सारखी पाण्यातून शिवाशीव खेळत होती, डुब्या मारत होती आणि जमिनीवर येऊन दोन पायांवर उभी राहून, माझ्याकडं बघून चक्क शिट्या मारीत होती. दोन पायांवर उभं राहून आपल्याकडं बघणारी ओटर्स फारच गोजिरवाणी दिसतात. इतक्या निष्पाप दिसणाऱ्या ओटर्सनी बापडया डोमा धीवराच्या गळाला लागलेले मासे खाऊन टाकावेत आणि त्याचा तळतळाट घ्यावा, हे मला बरं वाटलं नाही.

माझ्या नवेगाव बांधच्या सफरीचा उद्देश ओटर्स आणि दुसऱ्या लोकांनी केलेल्या कमाईवर डल्ला मारणारे लोक यांतील साम्य शोधणं हा जरी नसला, तरी गरीब बापडया धीवरांनी खटपटीनं पकडलेल्या माशांवर ओटर्सनी बिनदिक्कत डल्ला मारावा, माशांचा चांगला भाग तेवढा खावा आणि डोकी तेवढी धीवरांना ठेवावीत, याचा अचंबा वाटला.

डोमाचं म्हणणं असं, की डोकं खाऊ, तर आपणही गळाला लटकू, हे शहाणपण हुदाळ्यांनी अनुभवानं कमावलं आहे.

ओटर्स फार हुशार असतात. धीवरांनी त्यांना पाळलं आणि शिकवलं, तर आपल्या धन्यासाठी नदीतले मासे मारण्यासाठीही त्यांचा उपयोग करता येतो, ही माहिती डोमाला नव्हती. तो वरचेवर म्हणत होता,

" हेंचा तरासच आहे आमाला. दिवसा ही दिसत नाहीत. सगळा येपार रातचा चालतो हेंचा ! "

खरं म्हणजे ह्यात हुदाळे डोकं वापरत होते, का तोंडापर्यंतचा मासा, एवढंच त्यांचं भक्ष्य होतं, कोण जाणे !

हुदाळ्यांचं राहण्याचं ठिकाण पाण्यातच नसतं. त्यांची घरं जमिनीखाली, पण दारं पाण्यात असतात. मासे, बदकासारखे पाणपक्षी, बेडूक, खेकडे हे त्यांचं खाद्य. हुदाळ्यांची जमिनीखालची घरं शोधायची, म्हणजे त्यांनी पोरासाठी आणलेल्या माशांचा वास, कुठं भोकातून वर आला, तर त्या जागी जमीन खोदून बघायची. नाहीतर पाणाड्याप्रमाणं जमिनीला कान लावून त्यांच्या पोरांचा चिवचिवाट ऐकायचा. एरवी, जिथं माणसांचा वावर आहे, अशा ठिकाणी हुदाळे

दृष्टीला पडणं कठीणच. ते फराऱ्यासारखे नित्य दडूनच राहतात.

डोमाबरोबर मी सरन्याच्या काठाकाठानं हिंडलो. कुठं हुदाळ्याची पावलं लागली, कुठं ते लोळल्याच्या खुणा दिसल्या. एका ठिकाणी दगडावर विष्ठेचा ढीगही दिसला. ह्या कामासाठी एकच एक जागा वापरण्याची त्यांची खोड आहे. प्रत्यक्ष हुदाळे मात्र नजरेला पडले नाहीत. नवेगाव बांधला येताना नागपुरातच लोक मला म्हणाले होते,

'साहेब, तुम्हाला प्राणी बघायचे, तर नागझिरा उत्तम. नवेगावला जनावरं फार आत आहेत, दृष्टीला पडत नाहीत. नुसत्या पाऊलखुणांवर समाधान मानावं लागेल.'

गोष्ट खोटी नव्हती. मला आतापर्यंत तरी सगळी पावलंच दिसली होती.

आता पश्चिम दिशा नाना रंगांनी न्हाऊन गेली होती. सूर्याचा केशरी तांबडा गोळा पाण्यात बुडायला अगदी थोडा अवकाश होता. निळा डोंगर जांभळा झाला. सूर्याचा गोल पाण्यावर टेकला. तापल्या लोहरसाच्या भट्टीसारखं त्याचं प्रतिबिंब पाण्यात सरसरून, आम्ही उभे होतो, त्या काठाकडे येऊ लागलं. आणि बघता बघता सारे रंग मावळून आल्हाददायक संधिप्रकाश तेवढा उरला. आभाळाचं प्रतिबिंब वागवणारं पाणी आयन्यासारखं चमकू लागलं. तनमोराचे टाहो आणि रातव्यांचं चक् चक् चर्कर चक् हे ओरडणं सुरू झालं.

झाडाचं खोड पोखरून तयार केलेल्या डोमा धीवराच्या चिंचोळ्या डोंगीतून मी दूरवर पाण्यात गेलो. पार पलीकडे लहानसं बेट होतं. शिकारी कुत्रे मागे लागले म्हणजे हे एवढं अंतर तोडून सांबरं त्या बेटावर आश्रयाला जातात, असं डोमा म्हणाला.

मी म्हणालो,

"मला त्या बेटावर घेऊन चल, डोमा."

"दादा, दिसतंय, तेवढं बेट जवळ नाही. आपल्यापाशी दिवाबत्ती नाही. मधी पाणी खोल आहे. वारा सुटला, तर आपली डोंगी उपडी होईल."

यावर मी नाराजीनं म्हणालो,

"बरं. फिरू या माघारी."

खरं तर त्या निर्जन वेटावर जावं आणि शेकोटी पेटवून रात्र काढावी आणि दिवसाउजेडी तिथं झाडंझुडं कोणती आहेत, पक्षी कोणते आहेत, हुदाळ्याची घरं तिथं आहेत का, हे सगळं बघावं, अशी माझी फार इच्छा होती.

काठावर परत येईपर्यंत अंधार दाटून आला. हुदाळे बघण्याचं वेड माझ्या डोक्यातून गेलं नव्हतं.

फॉरेस्ट गार्ड म्हणाला,

" साहेब, त्या फलाण्या-फलाण्याला जागा माहीत आहेत. रात्री त्याला घेऊन मी बंगल्यावर येतो. तो आपल्याला बीळ उकरून दाखवील. "

मी म्हणालो,

" ठीक आहे. त्याला घेऊन ये. "

रात्री दहा-साडेदहाच्या पुढे फॉरेस्ट गार्ड आला. म्हणाला,

" चला. "

चला, तर चला.

हातात कंदील घेऊन फॉरेस्ट गार्ड पुढे आणि मी आणि चितमपल्ली मागे, असे गावाबाहेर पडलो. सरन्यावर दुसऱ्या वाटेनं आलो. पाण्याच्या काठाकाठानं उंच बांध होता. डावीकडं खोल भात-खाचरं आणि उजवीकडे पाण्याकाठी झाडं, गवत, एकाला एक लागून झुडपं. त्यापलीकडचं पाणी दिसतही नव्हतं. बरीच पायपीट झाल्यावर गार्ड म्हणाला,

" ह्या हितंच जागा आहे त्यांची. "

आम्ही सावकाश, आवाज न करता चालू लागलो आणि काठावर बसलेल्या कोणी धपकन् पाण्यात उडी घेतल्याचा आवाज झाला.

तिघेही थांबलो. सावट घेतला. झुडपाटातून पलीकडचं काही दिसत नव्हतं.

चितमपल्ली म्हणाले,

" हे ओटरच. काठावर होतं. ते आपली चाहूल लागताच पाण्यात पडलं. "

आणखी पुढं जाऊन थांबलो. तो फलाणाफलाणा परस्पर येणार होता.

त्याची बराच वेळ वाट बघावी लागली. माझ्या दोन सिगरेटी ओढून झाल्या.

अखेर वैतागलेला गार्ड पुन्हा परत गेला.

फलाण्याच्या नावानं त्यानं घातलेल्या हाका स्पष्ट ऐकू आल्या.

अखेर दोघंही आले. फॉरेस्ट गार्डनं त्याला खूप ताणला असावा. विथरलेला फलाणा, आम्हा अनोळखी लोकांना बघून फार बुजला. हे कोणीतरी मोठे फॉरेस्ट साहेब असावेत, आजकाल नाना कायदेकानू झालेत, आपण हुदाळ्या उकरून काढला आणि, 'तू ह्या प्राण्यांना कायम उकरून काढून मारत असशील', असं म्हणून ह्यांनी आपल्याला धरून डांबलं, दंड केला, तर नसती बैदा होणार, असा विचार करून की काय, कोण जाणे, तो भरवशाचा साक्षीदार उलटतो, तसा एकदम उलटला. गार्डाला म्हणाला,

"मला जागाबिगा काई ठाऊक न्हाई. असल्या अंधाऱ्या रात्री तू साहेब लोकास्नी का म्हणून ह्या भयान जागंत आणलंस? हे काय टाईम आहे का?"

"अरे, त्यांना हुदाळ्या बगायचा आहे. तू नव्हतीस का एकदा बीळ उकरून पिलं काढलीस?"

"मी? कधी?"

"भले, तूच म्हणालास, की मी काढली होती. कबूल केलं होतंस, आतही काढून दाखवीन. आत्ता खोटं बोलतोस. काय मानूस हायेस!"

"मी म्हणलोच न्हाई. आन् एखाद्या साली कधी बीळ घावलं असलं, तरी ते सदोदित घावतं काय? रानची जनावरं ती, बांधून घातल्यासारखी जागी कशी घावतील?"

आम्ही थक्क झालो.

सगळ्यांनी मिळून आर्जवं केली. गार्डानं आरत्या केल्या. पण फलाणा कबूल होईना. आम्ही निराश होऊन परत फिरलो. बंगल्यावर येऊन मच्छरदाणीत शिरलो.

ही सगळी कालची हकीकत झाली. आता ह्या भल्या पहाटे मला विलक्षण प्रसन्न वाटत होतं. सरन्यावरून आलेला गार, आम्रमंजिऱ्यांचा गंध असलेला वारा पिऊन मी परत बिछान्यावर पडलो.

राहायला सिमेटाचं घर, अंगावर धुतलेले कपडे, आणि रोजच्या जेवणात मांस, लोणी, पोळी आपल्याला लागतं. ह्या वस्तू मिळाव्यात, म्हणून आपण रोज आठ-आठ तास खाली मान घालून लिखापढी करत राहतो. डोमासारखं साधंसुधं जिणं पत्करून आपण निसर्गाचं लेकरू होऊन का बरं राहू नये?

अबोल, निरागस अशा ह्या घीवराबद्दल माझ्या मनात जिव्हाळा दाटून आला. कधी मासे धरून ते दूरच्या आठवडा-बाजारात विकावे, मोलमजुरी करावी, एवढंसं भात-खाचर पिकवावं, सर्पणाच्या मोळ्या डोक्यावरून वागवीत मैलोन्‌गणती पायपीट करावी आणि त्या विकाव्यात, असं काहीबाही करून हा डोमा गुजराण करीत होता, पण तो सुखी होता. आनंदी होता. हे सगळं त्याच्या शरीराकडं, डोळ्यांकडं बघितल्यावर कळत होतं. त्याच्या निर्मळ हसण्यातून जाणवत होतं.

कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासारखे महामानव ह्या भूमीवर झाले, म्हणून मला जसं कृतज्ञ वाटतं, तसं डोमासारखी साधीसुधी माणसंही ह्या भूमीवर जन्माला आली, म्हणूनही वाटतं.

'पोलादाचा चिरला साग' अशा शरीराचा तो बळकट डोमा धीवर डोंगी वल्हवतो आहे आणि मी पाणी कापीत सरन्यावरून हिंडतो आहे, असं सारखं वाटत राहिलं. अगदी झोप लागेपर्यंत मी डोंगीतच होतो.

भल्या सकाळी डोमा सरन्यावरून आला. येताना त्यानं मला दाखवण्यासाठी हुदाळ्यानं गळ्यापर्यंत खोल्लिला वारंगा मासा आणला होता. समोर उभा करून मी माझ्या वहीत भराभरा डोमाचं रेखाचित्र काढून घेतलं. फोटोसाठी निश्चल उभं राहावं, तसा डोमा उभा होता. हे लहानसं गाव, आजूबाजूचं जंगल, पाणी, गावातले लोक आणि पाण्यातले हुदाळे हे सगळंच किती मनोहारी होतं! इथं मनसुराद राहावं, चित्रं काढावीत आणि ह्या सगळ्यावर एक सुरेख पुस्तक लिहावं, असं मला फार वाटलं. पण एवढ्यात लक्षात आलं, की सकाळचे दहा वाजले, आणि घाईगर्दीनं आम्ही परत फिरलो. माझी रजा संपत आली होती. अजून मला नागझिरा अभयारण्य बघायचं होतं, नागपूरला पोचायचं होतं आणि नोकरीच्या जागी पुण्याला वेळेवर हजर राहायचं होतं. लवकरच पुन्हा पालांदूरला येईन, असं वरचेवर डोमाला सांगून मी परत फिरलो.

वाटेवर असताना मारोतरावांच्या आणि माझ्या अनेक विषयांवर गप्पा झाल्या. पक्ष्यांवर, प्राण्यांवर, आणि पुस्तकांवर. मी म्हणालो,

"उपविभागीय वन अधिकारी म्हणून तुम्हांला चाकरी मिळाली, ही केवढी उत्तम गोष्ट आहे. मला तुमचा हेवा वाटतो."

ते म्हणाले,

" हो, तुम्ही फॉरेस्ट डिपार्टमेन्टमध्ये हवे होता. "

खरी गोष्ट होती. पण प्राणी, पक्षी पाहणं आणि त्यावर लिहिणं एवढंच मी करत राहिलो असतो. सागवानी बल्ल्यांचा लिलाव करणं किंवा बांबूंच्या तोडीवर देखरेख करणं ही गोष्ट माझ्या अकलेबाहेरची होती. वनाधिकारी म्हणून मी लायक सरकारी नोकर मुळीच ठरलो नसतो.

मग आमच्या गोष्टी सारंगागारावर झाल्या. कोणा जैन ग्रंथकाराचं हस्तलिखित ' मृगपक्षिशास्त्र ' मारोतरावांना गवसलं होतं. हा ग्रंथ मराठीत करावा, म्हणून त्यांनी संस्कृत भाषा शिकून घेतली होती आणि ग्रंथाचं भाषांतर इत्यादी त्यांच्यापाशी तयार होतं. मृगपक्षिशास्त्रकर्त्यानं हॅरॉनरीला सारंगागार शब्द योजलेला होता. ही सारंगागारे गावातील चिंचेच्या झाडावरच का असतात, याचं कारण देताना त्यानं म्हटलेलं होतं, की जंगलातील प्राण्यांचे भयकारी आवाज ऐकून ह्या पक्ष्यांची पोरं भीतीनं घरट्यातून खाली पडतात. म्हणून जलाशया-जवळच्या गावातील एखाद्या चिंचेसारख्या झाडावर पावसाळ्याचे चार महिने घरटी करणं, अंडी घालणं, पोरांना उडायला शिकवणं, चारा घालणं ही पाखरं पसंत करतात. ढोक, करकोचे, बगळे असल्या पाणपक्ष्यांच्या ह्या वसाहती पाहणं ही गोष्ट अतिशय आनंदाची आहे. चार महिने धामधूम चालते आणि त्यात निसर्गाचं केवढं तरी नाट्य दृष्टीला पडतं. वसाहतीला सुरुवात होण्या-आधी झाडाशेजारच्या एखाद्या मोकळ्या जागी पाणपक्ष्यांचा मेळावा हळूहळू जमू लागतो. एक, दोन करता करता अनेक पक्षी जमा होतात. खांदे काढून स्वस्थ उभे राहतात. मेळावा असला, तरी प्रत्येक जण एकाकी असल्यासारखा, दुसऱ्याची दखल न घेता बसून असतो. दंगाधोपा, आरडाओरडा काही होत नाही. हे सारे नर असतात. बराच मेळा जमला, म्हणजे झाडावर घरट्यासाठी जागा धरल्या जातात. तात्पुरतं काटक्या-कुटक्यांचं घरटं घालून, सगळे नर मादीची वाट बघत बसून राहतात. एखादी मादी आली, की पंख फडफडून, अंग फुलवून तिला आपल्याकडे आकर्षित करण्याचा उत्सव सुरू होतो. असं करता करता पसंतीनुरूप जोड्या जमतात. मग घरटं नीट बांधण्याचा खटाटोप सुरू होतो. मादी जाग्यावरच राहते, नर दूर उडत जाऊन चोचीतून एक एक काटकी

घेऊन येतो. मादी ती तपासून, बरी असली, तर स्वीकारते; नसली, तर नापसंत करून खाली टाकून देते. नर पुन्हा बांधकामासाठी योग्य अशा साहित्याच्या शोधासाठी जातो.

मग मीलन, अंडी, आणि पोरं. पोरांना रोज भरवणं. इतके आईबाप झाडावर असतात, प्रत्येकजण उडून जाऊन चारा घेऊन येतो, पण आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या पोरांना आपले आईबाप नेमके कळतात. दूरवर ते दिसले, की यांचा भूकओरडा सुरू होतो. कधी बांब माशासारखा लांबडा मासा घेऊन बाप घरट्यात उतरतो. हा एकच मासा दोन पोरं दोन्ही टोकांकडून गिळू लागतात. अर्धा ह्याच्या पोटात, अर्धा त्याच्या पोटात. चोचीला चोची भिडतात. मग जे दणकट पोर असतं, ते दुसऱ्याच्या घशातून घास ओढून काढतं आणि एकटं मटकावून टाकतं. बाकीची पोरं रडत, ओरडत राहतात.

पोरं मोठी होतात. घीटपणानं घरटं सोडून फांदीवर येऊन बसतात. पंख हलवण्याचा, ह्या फांदीवरून त्या फांदीवर जाण्याचा व्यायाम सुरू होतो. आईबाप प्रोत्साहन देतात, शिकवतात, पोरं मोठी होतात.

पावसाळ्याच्या अखेरीला सगळं झाड मोकळं होतं. पाखरं उडून जातात. रिकामी घरटी तेवढी राहतात. एखादं नांदतं गाव ओसाड पडावं, तसं होतं.

नवेगाव बांधच्या परिसरात अशी काही सारंगागारं आहेत. माधवराव पाटलांच्या पवनी गावी, एका मोठ्या चिंचेच्या झाडावर प्रत्येक वर्षी हा नव-निर्माणाचा सोहळा दिसतो, हे समजल्यावर मी हरखून बोललो,

"मला हे सगळं बघायचं आहे, ह्या पावसाळ्यात मी नक्कीच येतो."

चितमपल्ली म्हणाले,

"जरूर या, तुम्हाला आम्ही सगळी मदत करू. या आणि छान पुस्तक लिहा. मराठीत कोणी ह्या विषयावर लिहीत नाही."

"येतोच. इथं राहून मी एक का, चार पुस्तकं लिहीन!"

मी परत पुण्याला आलो. मार्च-एप्रिल-मे गेला, जूनही गेला. जुलै संपत आला. प्रपंचाच्या ह्या लिगाडातून अजून माझा पाय निघालेला नाही.

(जंगलातील दिवस)

३

आडवळणी गाव

शंकरराव खरात

एका आडवळणी गावाला जाण्याचा माझ्यावर प्रसंग आला होता. मला त्या गावाला जाणं भागच होतं म्हणून मी त्या गावाला गेलो होतो. गेलो होतो म्हणजे पायी-पायी चालत. ते आडवळणी गाव आणि त्या गावची वाट मी कधीच विसरणार नाही. माणसाला कधी कधी अशा आडवळणी गावाला जाण्याचा प्रसंग येतो. तसाच प्रसंग माझ्यावरही आला होता.

ते आडवळणी गाव म्हणजेच एकदम आडवळणी—बाजूला आजूबाजूला कुठं तरी एका कोपऱ्यात. हे गाव असं लांब लांब कुणी वसवलं होतं, याचा त्या वसवणारालाच हेतू माहीत असावा. मुख्य सडकेपासून एकदम चौदा मैल आत लांब दूर वाळीत टाकल्यावानी.

मला वाटतं हे आडवळणी गाव कुणाच्या स्मरणात होतं का नाही ते कळत नव्हतं. अर्थात त्या गावचे गावकरी आपलं गाव कसं विसरणार ! पण इतरांनी या आडवळणी गावाची कधी कुणी वास-पूस केली नाही तशी कुणाला पाच-पाच वर्षांत कधी गरजही पडली नाही. अर्थात या गावानं कधी मोटारीचं तोंड पाहिलं नव्हतं, किंवा मोटारीनंही या गावाची गाव-शीव कधी बघितली नाही हे सांगणं नकोच !

—अशा आडवळणी गावाला मी निघालो होतो. मी तर मुख्य सडकेवर बाभळीच्या झाडाजवळ नाक्यावर उतरलो पण तिथं वाटंवर चिटपाखरूदेखील

नव्हतं. कुणी माणूस दिसेना. तिथंच उभा राहून मी आजूबाजूला फुटणाऱ्या वाटा पाहिल्या. त्यात एक-दोन गाडवाटा होत्या. एक-दोन पाऊलवाटा होत्या. आता यांपैकी कुठल्या वाटेनं जावं ? माझ्यापुढं प्रश्न होता. म्हणून मी थोडा वेळ तिथंच बाभळीच्या झाडाखाली थांबलो. तेवढ्यात गुराखी मुलं आपली गुरं-शेरडं हिंडवत सडकेनं आल्याची दिसली. त्यांना पाहून मला बरं वाटलं. ती पुढं आल्यावर मीच थोडं पुढं जाऊन त्यांना विचारलं,

" काहो ! आडवळणी गावाची वाट कोणती ? "

" ही ! ही ! पाऊलवाट ! "

—असं म्हणून त्या गुराख्यानं मजकडे खालीवर पाहिलं व तो पुढं निघाला. मीही त्या पाऊलवाटेने निघालो. मुख्य सडकेपासून, गाव लांब होतं, याची मला पूर्ण कल्पना होती. पण त्या वाट-फुटी जागेपासून आडवळणी गावाची वाट सापडली हे विशेष.

मी त्या गावच्या पाऊलवाटेनं निघालो. ती पाऊलवाट म्हणजे पुसटच पाऊलवाट होती. तीच माणसाला कशीतरी ओघळनाल्यातून, दरड-डगरीवरून चढउताराच्या टेकाड-पांदीतून पुढं निघत होती. मी मागं-पुढं पाहात झपाझपा पाऊल टाकत होतो. ऊन झाल्यानं मध्ये-मध्ये झाडाच्या सावलीला बसून विसावा घेत होतो. त्या वेळी माणसाच्या ऐवजी झाडावरच्या पक्ष्यांचीच भेट होत होती.

—या आडवळणी गावाला पुढं पुढं एक गाडीवाट लागली. तीही अशीच लपडाव खेळतच निघाली होती. त्या वाटेनं जावं म्हणून मी पाऊलवाट सोडली पण ती गाडी-वाटही नाळ्यातून, ओघळीतून, पुढे तर नाल्याच्या दरड-कडेनं डगरीच्या उतारानं निघत पण कशीतरी रखडत आपटत-झपटत आडवळणी गावाला मला घेऊन पुढं चालली होती.

खरं तर ती नावालाच गाडीवाट होती. या गाडीवाटेनं बैलगाडी जाणार असेल, तर ती बैलाची जोडी तरणी-बांड अवखळ पाहिजे. बैलगाडीही तशीच मजबूत पाहिजे तरच बैलगाडी कसरत करत करत वाटेतून गावाला जीव घेऊन कशीबशी पोहोचेल. मरतुकड्या, ढेपाळलेल्या बैलगाडीची ही खरी वाट नव्हेच !

मी वाट चालत होतो. अंतर कमी करत होतो. त्यात ऊनही चांगलंच चपचपा लागत होतं म्हणून मी पुढंच एका झाडाखाली सावलीला बसलो. रखरख ऊन होतं. पक्षी झाडाच्या विसाव्याला बसलं होतं. मी वाटेवर मागंपुढं नजर टाकत

होतो, तेवढ्यात आडरानातून एक माणूस पुढे येत होता. तो थेट वाटेकडंच आला. आला तो मजकडंच आला. झाडाच्या सावलीला येऊन मला त्यानं विचारलं,

" कुठं चालला पावणं ? "

" आडवळणी गावाला ! "

" इतक्या लांब ? "

" हो ! माझं तसं कामच आहे ! "

" असल्या गावी कसलं काम ? "

" माझी तिथं शाळा-मास्तर म्हणून नेमणूक झालीया ! "

" असं होय ! चला ! मला तिकडंच जायाचं हाय ! "

—मला बरं वाटलं. सोबतीला माणूस भेटला. आम्ही दोघं निघालो. चालता चालता मी त्याला विचारलं, " काहो ! या गावची किती ही बिकट वाट ? —अन् अशा वाटेनं बैलगाडी तरी कशी जाते ? "

माझ्या या प्रश्नानं त्याला तोंड फुटलं. तो बोलू लागला.

" अवो ! ही वाट त्या बैलांना अन् गाडीलाच माहीत ! ही वाट लय वंगाळ ! कमी जीवाच्या मरतुंगड्या बैलांनी माणसानी भरलेल्या बैलगाड्या कवा कवा उलट्या पालट्या केल्यात ! त्यात कुणी लंगडे—तर कुणी हातमोडकं झालंय. कुणा बिचाऱ्याला कायमचं जायबंदी करून ओढ्याला पोचतं केलंय !"

तो गडी बोलतच होता—

" या गाडीवाटेनं गावातील मी मी म्हणणाऱ्यांना चांगलाच हात दावला होता. त्यांची रग-खोड या वाटेनं चांगलीच जिरवली होती ! त्यात नीट बैलगाडी पळवणारं चांगलं पाणीदार—खोंड या गावाला कशी मिळणार ? "

मग मध्येच त्याला विचारलं,

" काहो ! अशा आडवळणी गावाला सोयरीक तरी कशी मिळते ? "

माझ्या प्रश्नानं त्याचा चेहरा खुळाळला. तो म्हणाला,

" मी तुम्हाला सांगतो, माझं नीट ऐका ! ! "

—असं बोलून त्यानं सुरुवात केली,

" आवो अशा आडवळणी गावाला कशी काय सोयरीक मिळायची-जुळायची ? तसा या गावाला ल्योक-लेकींच्या सोयरिकेचा मुद्दा लय अवघड ! या

आडवळणी गावातली लेक बाहेरगावच्या चांगल्या भरल्या घरी कवा सून म्हणून गेली न्हाय ! अन् या गावात पण कवा थोरल्याघरची मुलगी सून म्हणून मिळाली न्हाय ! ती कशी मिळणार बो ! अशा मोठ्या घरची लेक-सून सासरी-माहेरी पायवाटेनं कशी पायपाय चालणार ? मग या गावाला लेकी-सुना पाय झुलीनं सजवलेल्या कुठल्या बैलगाड्या ! मग थाट-माटात पोचवायला निघणारे मुराळी लांबच ! " असं सांगून तो जरा निराशेत पुढं बोलला,

" म्हणून या गावात कुणी मुलगी द्यायचं म्हटलं तरी नाक मुराडतं ! या गावची लेक-सून म्हणून करायचं म्हटलं तरी परगावचा सोयरा टाळाटाळ करतो. मग अशा गावात कोण मुलगी देणार ? लय झालं तर कुणी गरीब नडला आडला मुलीचा बापच ! अन् या गावची लेकधनीन कुणा नाचार-दुबळ्याच्या घरात सून म्हणून उभं आयुष्य काबाडकष्टात घालवत राहते बघा ! "

त्याचे निराशेचे अनुभवी बोल ऐकून मलाही वाईट वाटलं, पण त्याला दुसरा मार्गच नव्हता ! तरी मी त्याला दुसरा प्रश्न विचारला, " काहो ! या आडवळणी गावचं अन् सरकारी अधिकाऱ्यांचं कसं ? "

त्यावर तो लागलीच बोलला,

" आवो ! चांगल्या अधिकाऱ्यानं या गावाला कधी तोंडच दावलं न्हाय ! मोठ्या अधिकाऱ्याचं तर या गावाला कवा पायच लागलं नाहीत ! या गावाला धड वाट न्हाय ! त्यात बैलगाडीचा प्रश्न ! मग मोटार कशी काय येणार ? मग बोला ! एवढी सात कोस लांब वाट तुडवत कोण बो हौशी या गावाला येणार ! अन् असा कुणी मायेचा पूत आलाच तर त्याचं पण दोन-तीन दिवस मोडीत निघणार ! समजा कुणी अंमलदार गावात आलाच तर त्यानं कुठं राहावं ? त्यानं कुठं मुक्काम करावा ? "

—त्या गड्यानं असं सांगताच मी त्याला विचारलं,

" पण गावात शाळा, चावडी, देऊळ असेलच की ! गावाला शाळामास्तर, तलाठी कुणीच येत नाही का ? "

" मोठ्या अंमलदाराची ही कथा ! मग तलाठी तर काय, तो पक्काच बहाद्दर माणूस ! तो तर सडकेवरच्याच गावी मुक्कामाला राहतो अन् या गावची हजरी लावतो. आता आडवळणीच गाव, त्यात पीक-पाणी तेच ! मग सालोसाल पीकपाण्यात कुठलाबी बदल ! एकच एक नोंद ! गावचा वसूल जमा

दा. क. ... ...

करायला मात्र सालातून एखादा-दुसरा दिवस गावात येतो. तेच त्याच्या डोक्यावरून पाणी जाते. न्हायतर तलाठ्याची अन् गावकऱ्यांची भेट सडकेवरच्या आठवड्याच्या बाजारातच ठरलेली ! कागदाची नोंद त्याच बाजारात. तक्रार-चौकशी त्याच बाजारात ! ''

त्याचं बोलणं ऐकून मी चाटच पडलो. मी तर आता गावात शाळामास्तर म्हणून चाललो होतो यामुळे मी माझ्या शाळेचा प्रश्न काढला.

'' पण शाळा-मास्तरचं कसं काय ? ''

मी शाळामास्तराचं नाव काढताच त्याचा आवाज चढला. तो म्हणाला,

''आवो ! गावात शाळा हाय ! पण ती कागदोपत्री रेकॉर्डलाच फकस्त हाय ! शाळा खात्याला हे गाव म्हणजे सजाच ! एखाद्या पक्क्या बनेल मास्तरला सजा द्यायची म्हणजे या गावाला बदली करतात. अशा लांब बदलीच्या गावी आलेला तो पण वस्तादच ! तो खात्याला, अधिकाऱ्याला पुरा ओळखूनच ! मग काय तो बहाद्दर आपलं पाणी शाळा-खात्याला दावतो ! अधिकाऱ्याला पण टांग मारतो ! शेवटी कागदोपत्रीच शाळा चालते ! ''

त्याचं हे ऐकून मी गप्पच झालो. पण मी मात्र शाळा-मास्तर म्हणून त्या गावाला चाललो होतो. तोच गडी मला कसा विचारतो,

'' कावो ! तुमीपण शाळा-मास्तर म्हणून गावाला आलाय म्हणा की ! ''

'' होय ! ''

'' मग तुम्ही पण गावच्या शाळेचा असाच दिवा लावणार म्हणा की ? ''

त्याच्या या प्रश्नानं गप्प झालो. आता वाटेनं बोलण्याचा–वाद घालण्याचा मुद्दा नव्हता ! पण त्या गडयाची शंका वाटेतच कशी काय दूर करणार ?

सूर्य पार बुडाला होता.

गाव अजून दोन मैल तरी लांब होतं. समोरच्या झाडीत ते लपल्यासारखं दिसत होतं. समोरची झाडी पाहून मनाला बरं वाटलं. ओढ्याकाठचा थोडा हिरवा मळ्याचा भाग सोडला तर गावाच्या भोवती समळं जिरायत शिवार होतं. त्यात निम्मं माळरान होतं. ते खरं तर गुरं-ढोरांचं चरायचं रान दिसत होतं.

गावच्या ओढ्यात आम्ही उतरलो. कडुसं पडलं होतं.

ओढ्यात उतरल्यावर तो गडी मला बोलला, '' आता तुम्ही सरळ गावात

पुढच्या पांदीनं निघा ! पांदीतून पुढंच गाव हाय ! मी आता माझ्या मळ्यातल्या वस्तीवर जातो ! ''

—असं बोलून तो आपल्या मळ्याच्या वाटेनं कर कर वाळू तुडवत निघाला. मी ओढ्यातून वर आलो. गावच्या पांदीत शिरलो. त्या वेळी अंधार पडत चालला होता. पक्षी झाडात गप्प बसले होते. मीच एकटा त्या पांदीतून पुढं पुढं निघालो होतो. पांद मागं टाकली आणि अंगावर अंधार घेतच मी त्या आडवळणी गावात प्रवेश केला.

—आणि गावच्या तोंडालाच अंधारात मला पाहून कुत्र्यांनी भुंकून कालवा केला. नुसता कालवाच नाही तर त्यांनी मला त्या अंधारात पूर्ण घेरलं ! आणि मी त्या अंधारात फक्त हाड S हाड SS हाड SSS एवढेच शब्द मोठ-मोठ्यांदा ओरडत होतो !

तो गडद अंधार, मी आणि कुत्री यांचा तो सामना चालला होता.

हे आडवळणी गाव मी कधीच विसरणार नाही !

मी पाहुण्याच्या गावी गेलो होतो.

चांगला पाऊस झाल्यानं ओढे—ओघळी वाहत होत्या. तापलेल्या जमिनीला मनसोक्त पाणी मिळालं होतं. भूमी तृप्त होती. दुष्काळात भुंड्या झालेल्या झाडांना नव्या पालवीचे कोंब फुटत होते. काही झाडांना कोवळी पानं फुटली होती. पावसानं मोकळ्या रानात गवतानं जीव धरला होता. रानावर हिरवळ उठत होती. गावातली गुरं-ढोरं, शेरडं-करडं त्या हिरवळीवर दात आपटत होती.

गावातील गल्लीबोळांतून फिरताना गावच्या खालच्या आळीला मी आलो. त्या आळीच्या शेवटच्या टोकाला मला गवंड्याचं घर दिसलं. त्या घरातला गवंडी माझ्या चांगल्या परिचयाचा. त्याला आपण भेटावं म्हणून मी त्याच्या घराकडं निघालो. त्याच्या दारात गेलो. दारात त्याच्या घरापुढच्या छपरात डोकावलं. छपरात एक गडी बसलेला दिसला. त्याला मी हाक मारली,

'' गवंडी आहेत का घरात ? ''

त्याचं खरं नाव होतं गोपाळा. पण त्याला सगळं गाव ' गवंडी ' या नावानंच ओळखत होतं. त्या गावचा तो मूळ एकटाच गवंडी. त्याच्या हाताखाली काम करून, शिकून दुसरे गवंडी तयार झाले होते. पण गाव त्यालाच ' गवंडी ' या

नावाने हाक मारीत होतं. त्याचं कारण या गोपाळ गवंड्याचा हात गावातल्या निम्म्या-अर्ध्या घरांना लागला होता. त्या भागात त्याचा हात धरणारा गवंडी नव्हता. त्यानं जसं गावचं काम केलं होतं, तसं त्या भागातल्या आजूबाजूच्या, जवळ-लांबच्या गावांतही त्यानं चांगलीच कामं केली होती.

माझी हाक ऐकल्यावर त्यानं बसल्याजागी हालचाल केली. डोळ्यांवर हात लावून माझ्याकडं पाहिलं. बसलेला गडी हाच 'गवंडी' अशी माझीही खात्री झाल्यावर मीही चार पावलं टाकून पुढं गेलो व पुन्हा आवाज दिला,

"ओळखलं का नाही! मी आहे!"

मग माझा आवाज हेरून, गवंडी बसल्याजागी जरा दमा-दमानं उठला व पुढं होऊन पाऊल टाकत हसऱ्या चेहऱ्यानं बोलला,

"फार दिवसांनी आमच्या गावी आला!"

"हो, आलो पाहुण्याकडं! म्हटलं आपल्याला भेटावं!"

"चांगलं झालं!"

एवढंच बोलून त्यानं आपली मान खाली घातली. तोच त्याच्याकडं बारीक नजरेनं पाहात मी त्याला म्हटलं,

"काय फार अंग टाकलं?"

तो लागलीच बोलला, "दिवसानं दिवस माणूस थकत जाणारच. कवा तरी वरची हाक येणार."

गवंडीबुवानं आज बोलताना वेगळ्याच तत्त्वज्ञानाची तार लावली. असं का त्यानं बोलावं? याचं उत्तर गवंड्याच्या शरीरप्रकृतीत दिसत होतं. त्याची प्रकृती भलतीच उतरली होती, पार थकली होती. त्याच्या चेहऱ्यावर म्हातारकळा उतरली होती. मी त्यांना पुन्हा विचारलं,

"बरं वाटत नाही का?"

"आता बरं अन् वाईट! आम्हाला सारखंच की!"

"माझ्या विचारण्याचा मुद्दा असा की तुम्ही आजारी होता की काय?"

"छे! छे! तसं काही नाही. पण या दुष्काळानं चांगलं माणूस ठकवलं. तेला आजाऱ्यागत केलं!"

तो बोलताना माझी नजर त्याच्या घराकडं गेली. बगलेची एक भिंत पडली होती. घरात पावसाच्या पाण्याचा ओलावा अजून दिसत होता. पुढच्या छपरातून

सगळं आभाळ दिसत होतं. मी त्यांना विचारलं,

" काय गवंडीबुवा ! तुमच्या घराची काय ही कळा झालीय !"

तोच तो म्हणाला,

" आवो हा पाऊसच भारी झाला. त्यात घराची भिंत खाली आली. त्यात गेला दुष्काळ. घर काय वरून गवत–काडीनं शेकारलं नव्हतं. आवो ! गेल्या साली काळच पडला. घर शेकारायची काय जरूरच पडली नाही. त्यात उंदीर-घुशीनं घराची चाळण केली बघा ! त्यात मेघराजा आला तो कोसळतच आला. मग या गोष्टीकडं बघायला सवड कुठाय !"

त्यानं सांगितलं हे खरंच ! पाऊस जोराचाच पडला. त्यात कैकांची अशी अर्धी कच्ची–म्हातारडी घरं खाली आली. एखाद्या–दुसऱ्या भिंतीनं लंगडीपण झाली. पण माझ्यापुढं असा प्रश्न होता. हा माणूस गवंडी. यानं गावची अन् आजूबाजूच्या भागात कैक लोकांची घरं बांधली, त्यांना कायमचा निवारा करून दिला. ज्या माणसाने–कारागिराने दुसऱ्यांची घरे बांधून निवारा उभा करण्यात उभी हयात घालवली, त्या माणसाचं घर मात्र पडकं. तो माणूस मात्र उन्हाळ्यात उनात ! पावसाळ्यात पावसाच्या ओलाव्यात ! अन् हिवाळ्यात थंडीच्या गारठ्यात ! काय या माणसाची ती अवस्था ? असा विचार माझ्यापुढं आला व त्याला मी स्पष्टच विचारलं,

" कायहो गवंडीबुवा, सगळ्या दुनियेची घरं बांधून तुम्ही निवारा उभा केला अन् तुम्ही मात्र शेवटी पडक्या घरात ? हे आहे तरी काय ? "

त्यावर गवंडीबुवा म्हणाले,

" आम्हा कारागिरांचं असंच ! दुसऱ्याच्या सुखापाय आम्ही राबतो अन् आम्ही मात्र शेवटी उनात ! "

" हे पाहा ! आता तुमचं तुम्ही पाहिलं पाहिजेच ना ! "....

" ते खरं ! पण या जगात आम्ही कारागीर आमच्यासाठी राबलो, तर बाकी उनात येतील त्याचं काय ? "

" हा एक प्रश्न असला तरी, तुम्ही मात्र कायमच उनात राहावं यात काहीच अर्थ नाही ! "

त्यावर तो अनुभवी गवंडी मला कसा म्हणतो, " अहो, गवळी फक्त ताकाचा धनी ! बाकी लोणी खाणारं वेगळंच ! असाच या जगात उलटा न्याय आहे ! "

तोच मी म्हटलं,

" हा न्याय आता बदलला पाहिजे ना ! "

त्यावर गवंडीबुवा निराशेत बोलला,

" असा न्याय देणारं कवा जल्माला येणार हो ? "

मी एका नव्या गावाला निघालो होतो. नवे गाव म्हणजे मला ते जुनेच होते. त्या गावाला मी तसा अनेक वेळा गेलो होतो. त्या गावात राहिलो होतो. नवे म्हणण्याचं कारण नव्या पंचायत राज्यात ते गाव आता नवं झालं होतं. गावाचा कायापालट झाला होता. विकास-योजना आल्या होत्या, नव्या सुधारणा दिसत होत्या.

नव्याचं आकर्षण सर्वांनाच असतं. जुनं ते सोनं म्हणणाऱ्यांनाही नव्याचं आकर्षण असतं, फुलाच्या उमलत्या कळीनं कुणाचं मन प्रसन्न होणार नाही ! उमलत्या फुलाच्या सुगंधानं कोण धुंद होणार नाही. उगवत्या सूर्याची किरणं पाहून मनाला आनंद होतोच. आपल्यालाही आता जुन्या गावातून एक नवं गाव पाहायला मिळणार याचं एक मनाला नवं आकर्षण होतं. त्यामुळेच मी मनानं त्या गावाकडं ओढलो होतो. एस. टी. पुढं उधळत होती. धुराळा, फुपाटा मागे फेकत होती. तिला वेग आला होता. डोळ्यांसमोर गाव दिसू लागलं. मनाला बरं वाटलं.

एस. टी. स्टँडवर उतरलो. नवी ' शेड ' उभी होती. सिमेंटच्या पत्र्याची सावली झाली होती. रखरखत्या जागी सावलीचा आधार झाला होता. उन्हाच्या जागी सावली आली होती. सावलीला वाटसरू-प्रवासी कसे निवांत बसले होते.

मी तेथून सरळ गावात निघालो. एस. टी. स्टँडपासून गावाला सरळ रस्ता झाला होता. पूर्वीची खाचखळग्यांची, दगड-टोळ्यांची वाट आता नष्ट झाली होती. जुन्या आडवळणाच्या, दगड-गोट्याच्या वाटेनं कितीतरी जणांना ठेचा बसल्या होत्या. अंधाऱ्या रात्री तर त्याच वाटेवर कुणी आपटले होते. झपाटले होते. पण आता वाट नीट झाली होती. नीट म्हणजे सरळ, गाडीवाट. मुरमाची खडीची पक्की. आता जुन्या आडवळणी खाचखळग्यांच्या वाटेची भीती नव्हती. नव्या वाटेनं गावची सरळ वाट दाखवली. गावाच्या वेशीच्या तोंडालाच असलेले जुनाट वडाचे झाड दिसले नाही. तो जुना वटवृक्ष वाऱ्या-वावटळात उन्मळून पडला असेल, असे मला वाटले. पुन्हा वाटले कदाचित हा जुना वृक्ष वाऱ्यावादळात

पडेल आणि आपण पडता पडता त्याखाली दुसऱ्या जीवांचा जीवही घेऊन जाईल. त्यामुळे नव्या ग्रामपंचायतीनं त्याच्यावर कुऱ्हाडीचे घाव घालून त्याला मुळासकट काढला असेल. अर्थात त्याच जागी नव्या वृक्षाची फांदी लावली होती. त्या नव्या फांदीला नवी पाने, नवी पालवीही फुटली होती. त्यातूनच सावली देणारा वृक्ष निर्माण होणार होता.

—गावच्या तोंडाच्या वेशीची भिंत पूर्वी पडलेली होती. त्या पडक्या भिंतीशी मोठे खिंडार झालं होतं. दगड-टोळ्यांचा खिळगा-ढीग पडलेला होता. त्या दगडाच्या ढिगात-खिळग्यात सापा-किरडाची, विंचूकाट्याची दडण होती. अंधाराची तर अधिक भीती. तो दगडाचा ढिगारा आता उचलला दिसत होता. त्याच जागी ग्रामपंचायतीचा कंदील-दिव्याचा डांब उभा होता. तो पाहून बरं वाटलं. अंधारात उजेड ! काळोखात प्रकाश ! हे नवे होते खरे.

वेशीच्या आतल्या अंगाच्या पटांगणात वर लाल बंगलोरी कौलं असलेला एक नवा इमला होता. ती नवी इमारत आजूबाजूच्या जुने वाडे—घरांतून उठून दिसत होती. त्या नव्या इमारतीला बाहेरच 'समाजमंदिर' अशा नावाचा ठळक अक्षरांचा बोर्ड होता. गावातली जुनी 'चावडी' गेली आणि त्याच्या जागी आता समाजमंदिर उभं राहिलं. इमला नवा. नाव नवं.

गावातली जुनी चावडी म्हणजे एक दबदब्याचं ठिकाण. "चावडीवर बोलावणं झालं आहे !" असा कुणाला घरी—दारी निरोप आला तर माणूस बसल्या जागी घाबरत होता. उभ्या जागी थरथरत होता. गाव चावडी म्हणजे मुलकी पाटील, पोलिस पाटील, तलाठी, गावकामगार—तराळ, राखणदार यांचं स्थान. त्यातच आधीमध्ये वरच्या मामलेदार—फौजदार, अंमलदाराची ! अशा दाबजोर लोकांशी चावडीत खरा सामना. माणूस चावडीत येताना त्याचे हात जोडलेले असणार. तसा चावडीचा दरारा च गावकऱ्यांना, मळ्या—वस्तीवर होता. ती जुनी चावडी गेली. त्यातली माणसं गेली आणि त्याच जागी आता समाज-मंदिर आले. गावात समाज-मंदिराबरोबर ग्रामपंचायत आली. आता जुनी ग्रामपंचायत गेली. जातपंचायत गेली. त्या ठिकाणी ग्रामपंचायत आली. गावच्या इनामदार—सावकाराच्या वाड्यातून मुलांची शाळा बाहेर पडली. ती आता गावाच्या उगवतीला नव्या कौलारू इमारतीत आली. गावातून वाटेनं चालताना मला हे सगळं दिसत होतं. गावात नवं हॉटेल आलं होतं. नवी दुकानं आली

होती. त्या त्या हॉटेल-दुकानांची नावे नव्या बोर्डावर उठून दिसत होती. सार्वजनिक विहीर झाली होती. तालीम झाली होती.

गावातून चालताना मला गावात विकासयोजनेचं वारं आल्याचं दिसत होतं. त्यातच वाटेत मध्येमध्ये ग्रामपंचायतीच्या दिव्यांचे खांबही दिसत होते. हे सगळं पाहिल्यावर मला वाटलं जुन्या गावातून नवं गाव जन्माला येत आहे. चांगली प्रगती आहे.

असेच काही दिवस गेले आणि मला त्याच गावाला जाण्याचा प्रसंग आला. एका अन्यायप्रकरणाच्या निमित्ताने. माझ्याबरोबर माझे दुसरे साथीही होते. त्याच गावी दलितांच्यावर अन्याय झाला होता. गावच्या दलितांनी गावच्या सार्वजनिक विहिरीचे पाणी स्वत:च्या हाताने (ओढून) घेतले होते. त्यामुळे गावकऱ्यांनी दलितांच्यावर बहिष्कार टाकला होता.

आम्ही गावात रात्री जेवण-वेळेला गेलो होतो. त्याच वेळी आम्हाला कळाले की गावकऱ्यांनी समाज-मंदिरात बैठक घेऊन दलितांची हजेरी घेण्याचे, त्यांना दमदाटी देण्याचे काम चालविले आहे. आम्ही तसेच समाज-मंदिराकडे गेलो.

समाज-मंदिराच्या पुढं कंदील लागलेला होता पण आजूबाजूच्या अंधारात त्याचा प्रकाश घुटमळत होता. त्याच अंधारात माझ्या कानावर चाललेल्या बैठकीतले एक एक सवाल-जबाब पडत होते. त्यावरून त्या दाट अंधारात नवे गाव वडत चाललयासारखं वाटत होतं.

" काय रे संब्या ! तुम्ही आपल्या पायरीनं वागलं पाहिजे. " एक कडक आवाज.

" आवो ! आमच्या गोरगरिबांच्या घराला काय पायऱ्या नाहीत ! आता तुम्हीच तुमच्या जुन्या वाड्याच्या ढासळत्या पायऱ्या सांभाळा. " सवालाला जबाब.

दुसरा करडा सवाल : " कायरे लेकांनो ! तुम्ही गावच्या विहिरीचं पाणी बाटवलं ! "

" गंगेच्या पाण्याला कसला बाट आलाय वो ! देवागत पाण्याला सगळी माणसं सारखीच की ! " असं संबानं उत्तर देताच, दुसरा एक पोरगा एकदम बोलला की " गावची विहीर तुमची तशी आमचीही विहीर ! आम्हीही याच गावचे आहोत ! तुमच्यागत आम्हीही माणूस ' आहोत ! ' "

यावर एक गावकरी अंधारातून बोलला, " आरं आमी माणसं, तुमी माणसं

म्हणता पण माणसामाणसांत काय फरक हाय का नाय ! पाची बोटं का सारखी असतात ? ''

तोच दलिताचा संबा म्हणाला, '' पण पाची बोटांत रक्त एकच असतं, हेचा विचार करा ! ''

'' आयला लय आडवं बोलताय रं ! '' एक आवाज.

'' यासनी शब्दानं बोल्लन कळायाचं नाय. दंडुक्याचीच भाषा कळंल ! '' दुसरा आवाज.

'' च्यायला हे वाडवडलाची जुनी रीतरिवाज मोडायला लागल्याती, यासनी पडोस्तर हाणा की !''

असा तिसरा आवाज उठताच माणसांत कालवा उठला, गोंधळ झाला....

आणि हा सगळा संवाद ऐकून माझी पूर्ण खात्री झाली हे नवे गाव झाले असले तरी या नव्या गावातली माणसं मात्र जुनीच आहेत. ते नव्या समाज-मंदिरात बसले तरी त्यांचे विचार जुने रूढिग्रस्तच आहेत.

गाव नवे झाले तरी ती खरी वरवरचीच सुधारणा. बाहेरून बगळ्यासारखे सफेद, आत काळे अंत:करण. माणसात, गावात बाहेरून बदल होऊन काय उपयोग ? खरा अंतरीचा आतला बदल माणसात झाला पाहिजे. तेव्हाच तो खरा बदल म्हणता येईल. नाही तर बाहेर एक, आत दुसरे.

नव्या गावात रस्त्यावर खांबाला दिवा लावला. त्याचा वाटेवर प्रकाश पडला. पण नव्या गावात माणसाच्याच अंत:करणात, मनात नव्या विचारांचा प्रकाश पडला पाहिजे तरच रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाला शोभा आहे, नाही तर माणसाच्या मनात रूढीचा काळाकुट्ट अंधार असताना रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाचा फक्त उपयोग काय ?

नव्या गावाबरोबर माणूसही नवा बनला पाहिजे तरच गावाला शोभा, माणसाला शोभा. नाही तर जुन्या चावडीला नवा (समाजमंदिराचा) बोर्ड लागल्यासारखे फक्त चित्र दिसेल.

४

पाऊलवाटा

शंकर पाटील

रोज डांबरी रस्त्यावरून चालताना एखाद्या दिवशी मला माझ्या खेड्यातील पायवाटांची आठवण होते. त्या इथं दिसत नाहीत, म्हणून खरोखर माझा जीव कासावीस होऊन जातो. अशा वेळी मनात विचार येतो की, दुतर्फा सिमेंट काँक्रीटच्या घरांच्या रांगांमधून, पाटीवर नीट रेघ आखून घ्यावी, तसा नाकासमोर बघून सरळ जाणारा हा डांबरी रस्ता कधी संपतच नाही का ? तो संपून एखादी पायवाट का नाही लागत ? शहरात कितीही चालत राहिलं, तरी उभे-आडवे काळे पट्टे ओढलेले दिसतात. शिवाय जीव उबवणारी माणसांची आणि वाहनांची गर्दी, टेलिफोनची घंटा खणखणावी, तसा सारखा आवाज कानांवर येत असतो. अशा या गर्दीच्या आणि धावपळीच्या रस्त्यांवरून जीव सांभाळून चालत असता, एखाद्या दिवशी एक सुरेख डिझाईन डोळ्यांपुढं येतं. चित्रकारानं कागदावर रंगवलेलं नव्हे—खेड्यातल्या मातीत आपोआप आकार घेणारं हे चित्र असतं !

खेड्यांतल्या पायवाटा मला अशा एखाद्या चित्रासारख्या दिसतात. त्यांना रंग असतो, गंध असतो, आकार असतो; आणि एक आगळं रूपही असतं. कधी ती एकांडी वाट चुकल्यासारखी दिसते; तर कधी कमळवेलीप्रमाणं त्याचं जाळं विणलेलं असतं. ती कधी काळीभोर दिसते; तर कधी हळद लागलेल्या नवरी-सारखी गोरीपान दिसते. एखादी वाट पायातल्या पायात घोटाळते; आणि एखादी धामणीगत वाकडीतिकडी पळताना आढळते. अनेक रूपं धारण करणाऱ्या या

पायवाटा एकमेकींहून किती वेगळ्या असतात !

नदी चढून वर येणारी मळीची वाट. आणि काळ्या मातीतून जाणारी वाट– या दोन्ही वाटा एक नसतात. फोंड्या माळावरून जाणारी तांबडी वाट आणि पाणंदीतून चिखल तुडवत जाणारी तांबडी वाट, रानामाळातून वळसे घेत गावच्या वेशीला येऊन मिळणारी वाट, आणि गवताळ कुरणातून नदीला जाणारी वाट– या सगळ्या पायवाटाच; पण प्रत्येकीचं वळण निराळं असतं, ठेवण निराळी असते.

सूर्योदयाच्या वेळी पायवाटेनं कधी टेकडी चढला आहात तुम्ही ? कोवळं ऊन पाठीवर घेत कधी डोंगर चढलाय ? निदान कधी सकाळच्या वेळी मळीच्या वाटेनं चाललाय ? छातीगळ्याएवढ्या वाढलेल्या गवतातून जी नागमोडी वाट जाते, त्या वाटेनं संध्याकाळी फिरायला गेलाय ? वाऱ्यानं दोन्ही अंगाला गवत डोलत असतं आणि वारा नाकातोंडात शिरत असतो, अशा वेळी या कुरणाच्या वाटेनं मैलन् मैल चालण्यात जे एक सुख असतं, ते कधी तुम्ही अनुभवलंय ! ज्वारी हुरड्याला आली असता बांधाच्या कडेनं जी पायवाट जाते, त्या पायवाटेनं जाताना पिकाचा जो वास येतो, त्यानं कधी तुमचं मन धुंद होऊन गेलं आहे ? झुळूझुळू वाहणाऱ्या ओढ्याच्या कडेनं जी मऊ चिखलवाट जाते, त्या वाटेनं कधी चालून तुमच्या पायाला चिखल लागला आहे ? अशा वाटेनं चालताना आपल्या पायांच्या तळव्यांना जे सुख मिळतं, ते कधी उपभोगलं आहे ? श्रावणातल्या ऊन-पावसाचा खेळ कधी माळवाटेनं चालताना पाहिला आहे ? पावसाची चिपळी येऊन जाते, पुन्हा ऊन पडतं, आणि तांबड्या पाण्यानं माळावरच्या पायवाटा भरून जातात. माळावर दिसणारी पायवाटांची ही ओली नक्षी कधी तुम्ही डोळ्यांनी बघितली आहे ? निसर्गाच्या या रांगोळीवरून कधी चालत गेला आहात ?

किती विविध रूपं घेतात या वाटा ! पावसाळ्यात दिसणारं रूप निराळं, आणि ग्रीष्मातलं रूप निराळं. नाटकातल्या स्त्रीपात्रानं प्रत्येक प्रवेशाला नवी साडी लेण्याची हौस दाखवावी, तशा या पाऊलवाटा प्रत्येक ऋतूबरोबर नवं रूप धारण करत असतात. वाटसरू जर हौशी असेल तर नित्य बदलणारा त्यांचा हा साज त्याच्या ध्यानात आल्याशिवाय राहात नाही. ग्रीष्मात पाय पोळत असले, तरी रसिक वाटसरू दिसणाऱ्या सौंदर्यातच गुंग असतो.

आणि काही वाटा अशा असतात की, मृगात पाऊस बरसला म्हणजे त्या मरून जातात. त्यांचे अवशेषही दिसेनासे होतात. पण थोडी उघडीप होते, पेरणी होऊन जाते, पिकं उगवून वर येऊ लागतात आणि या मळल्या पायवाटाही पुन्हा दिसू लागतात. पीक उगवून यावं, तशा त्या उगवून येतात. धोरणी शेतकरी पेरणीच्या वेळीच आपल्या रानाभोवती कुंपण घालून त्यांना आत यायला बंदी करतो; पण पिकं उगवून वर आली की, या वाटा शेतकऱ्याचा डोळा चुकवून एखाद्या दिवशी आपसुक रानात घुसतात. काटेरी कुंपण असलं तरी ते मोडून आत शिरतात. अखेर शेतकऱ्याचा निरुपाय होतो, त्याचे सगळे प्रयत्न फसतात आणि मग एक दिवस तोही त्याच वाटेनं आपल्या रानाकडं जाऊ लागतो ! मुकाट्यानं आपल्या कोवळ्या पिकांचा एक आरा किंवा एखादी काकरी त्या वाटेला बक्षीस देऊन गप बसतो. काय करणार ? वाटच हट्टी पडली ना ?

अशा काही वाटा फार हट्टी आणि लागट असतात. एखाद्या रानात त्यांना एकदा प्रवेश मिळाला, की मग तुमची पाठ सोडत नाहीत. घरातल्या मांजराला कितीही हुसकून बाहेर काढलं तरी ते जसं पुन्हा घरात येतं तशी एकदा शिरलेली वाट हुसकून बाहेर हाकलली, तरी ती पुन्हा आत शिरतेच. सोडचिठ्ठी देऊन बायकोला घराबाहेर काढता येतं; पण वाटेच्या बाबतीत काडीमोडीचाही उपयोग होत नाही. तक्रारच सुरू झाली, तर ती आपला वहिवाटीचा हक्क शाबीत करते; आणि टिच्चून तुमच्या नाकावर बसते !

अशा या वाटा केवळ नुसत्या हट्टीच असतात असं नाही; तर मोठ्या आतल्या गाठीच्याही असतात. एखाद्या भाबड्या प्राण्याला त्या हातोहात फसवतातही. त्यांच्यावर विश्वास ठेवून रात्रीअपरात्री बाहेर पडणं जरा धोक्याचंच असतं. विशेषत: अमावास्येच्या रात्री तर शहाण्यानं कधी असा विश्वास टाकू नये. पायाखालची वाट आहे या कल्पनेनं माणूस मनात शंका न घेता चालत राहतो; आणि बरोबर त्यांच्या जाळ्यात अडकतो ! एकीला दोघी, दोघीला चौघी अशा त्या सामील होतात; आणि आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ सुरू होतो. चक्रव्यूहात सापडावं, तशी माणसाची स्थिती होते. चोहो-बाजूंना या वाटा त्याला घेरून टाकतात, आणि रात्रभर चालूनही माणूस एकेच ठिकाणी हिंडत असतो. पायाखालची वाट काही त्याला सापडत नसते. रात्रभर आपण त्याच परिसरात

फिरत राहतो; आणि पहाटे फटफटल्यावर चकवा ध्यानी येतो ! अशा या वाटा कधीकधी आपली गंमत करतात, आणि ती जन्मभर आपल्या लक्षात राहते.

तसेच, काही माणसांचा जसा थांग लागत नाही, तसा वाटेचाही अंदाज लागत नाही. माणसाची 'खोली' एक वेळ अजमावता येते; पण या वाटेची लांबी कधी समजत नसते. कदाचित म्हणूनच पाऊलवाटांची लांबी मोजण्याच्या भानगडीत कोणी पडत नसावा. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जाणाऱ्या मोठ्या रस्त्यावर मैलाचे दगड दिसतात; पण पाऊलवाटेवर मैलाचा दगड अजून कोणी रोवलेला नाही ! आपली मोजमापं कोणी घेऊ नयेत, याच बुद्धीनं ती वाकडी चालत असावी. एकंदर तिची चालच मोठी मजेशीर असते. जरा नीट चाळून पुढं गेल्यासारखी ती करील, मग एकदम डाव्या अंगाला वळून लवणात गडपच होईल; तर पुढं काही अंतरावर उजव्या अंगाला वळलेली दिसेल. मध्येच उभी राहून मागं फिरून पाहील, आणि पुन्हा चालू लागेल. अशा पाऊलवाटेला टेप कुठं लावायचा आणि तिची लांबी कशी मोजायची ?

आणि मग जी लांबी आपण मनाशी गृहीत धरून चालू लागतो, ती सहसा कधी बरोबर नसते. अशा एखाद्या पाऊलवाटेनं परक्या गावाला तुम्ही कधी चालत गेला आहात ? मग सांगा, कुत्र्याच्या 'भुंकेवर' म्हणजे किती ? माणसाच्या 'हाळीवर' म्हणजे किती ? फर्लांग, दोन फर्लांग, फार तर एखाद्या मैलाचा आपण मनाशी विचार करत असाल, तर आपलं गणित एकदम चूक ! आपलं गणित कसं चुकतं, हे पाहायचं असलं, तर असा अनुभव घ्यावा. अशा एखाद्या वाटेनं जाऊ लागावं, आणि कुणाला तरी विचारावं, "बाबा, अमकं अमकं गाव किती लांब राहिलं ?" मग तो म्हणेल, "हाय एका हाळीवर." दुसऱ्या एखाद्याला विचारलं तर तो सांगेल, "हाय कुत्र्याच्या भुंकेवर."

पण तुम्ही थकला असलात तर एवढीच खूणगाठ बांधा की, अजून चांगली चार-पाच मैलांची वाट आपल्याला चालायची असते ! तेव्हा अंगात ताकद येण्यासाठी जवळची शिदोरी वाटेवरच सोडावी, हे उत्तम !

या पाऊलवाटांनाही एक स्वतःचं असं वेगळं व्यक्तित्व असतं. काही वाटा सरळ असतात. त्या सरळमार्गी माणसाप्रमाणं नाकापुढं पाहून चालत असतात. काही मुळातच वाकड्या चालीच्या असतात. त्यांचं पाऊल कधी सरळ पडत नसतं. काही वाटा बाळबोध वळणाच्या असतात, तर काहींना लचकण्या-

मुरडण्याची हौस असते. काही खोडकर असतात, काही लागट असतात, आणि काही वाटा फार लोभसही असतात. त्यांचा आपल्याला लळा असतो, आणि काहींच्यावर जीव जडतो.

मी अधूनमधून जेव्हा माझ्या गावी जातो, तेव्हा एकदा तरी कुरणाच्या वाटेनं मैल-दोन-मैल मजेनं फिरून येतो. हत्ती गवताचा मातकट वास सगळीकडं दरवळलेला असतो; आणि कुरणातली हिरवी वाट वळणं घेत पुढं जात असते. दिवस मावळून कडुसं पडलं तरी या वाटेनं आपण चालतच राहतो ! संध्याकाळचा वारा भणाणत असतो, दोन्ही अंगांचं गवत डोलत असतं आणि आपल्या पायांची चक्रं फिरत राहतात....

काही वाटा मात्र निसरड्या असतात. आमच्या मळीची वाट अशीच आहे. पावसाळ्यात या वाटेनं चालताना फार जपून चालावं लागतं. जरा आपलं अवधान ढळलं तर पाय घसरलाच म्हणून समजा ! ओढ्याच्या दगडावर परटिणीनं धुणं बडवावं, तसं अंग सुबकून निघतं. लहान-थोरांचा विचार न करता भल्याभल्यांची अब्रू घ्यायला ही वाट कमी करत नाही ! अशा या साम्यवादी विचारसरणीच्या वाटेला शहाण्यानं दुरूनच नमस्कार करावा, हे बरं ! तिच्या वाटेला न जाणं चांगलं.

युद्धकाळात शत्रुपक्ष जसा वाटेवर सुरुंग पेरून ठेवतो, तशा काही वाटा काटे पेरून ठेवतात. ते डोळ्यांना दिसत नसतात; पण बेसावधपणे तुम्ही पाय ठेवला, की ते बरोबर तुमच्या पायाच्या तळव्यात येऊन बसतात. कधीकधी तर वहाणा असूनही ते पायात मोडतात. तेव्हा एखाद्या पाऊलवाटेनं चालण्यापूर्वी तिचा जरा अंदाज घेऊन आपलं पाऊल टाकणं चांगलं. पायात वहाणा आहेत, या भरवशावर जाणंही धोक्याचं असतं. एकदा वाट काटेरी आहे, हे समजलं की सावधान ! पण खरं सांगू का ? प्रेमात जसं अवधान राहात नाही, तसंच या वाटेनं चालताना होतं. आपण सावधान होतो, ते पायात काटा मोडून कळ आल्यावर ! मला तर अशा वेळी पायातली कळ सोसता सोसता त्या वाटेचं कौतुक करावंसं वाटतं !

याशिवाय गावाला काही चोरवाटाही असतात. त्या सहज कळून येत नाहीत. कधी अंगावर वस्त्र घ्यावं, तोंडावर बुरखा घ्यावा, तशा त्या भोपळ्याच्या, कलिंगडाच्या, खिऱ्याच्या, गुळवेलीच्या, दोडक्याच्या किंवा काकडीच्या वेलींनी लगटलेल्या असतात. कधीकधी घाणेरीही मातलेली असते. निवडुंगाचे फडे असते. किंवा

घायपाताचे गड्डे असतात; आणि आपल्याला वाट दिसून येत नसते. एखादी वाट तर पडक्या घराच्या आड किंवा दरडीआड लपून बसलेली असते. चोरांना ती उपयोगी पडते, हे सांगायला नकोच; पण गुरुजींचा मार चुकवण्यासाठी या वाटांचा चांगला उपयोग होतो. लहानपणी शाळेत असताना पडक्या घराआड लपलेल्या एका वाटेनं मला अनेकदा वाचवलं आहे. त्या वाटेबद्दल मला वाटणारी कृतज्ञता कायमची माझ्या मनात घर करून आहे ! आणि सांगू का ? दुसऱ्याच्या मळीतली मक्याची कणसं डोळा चुकवून खायला मिळायची, तीही अशाच एका वाटेच्या पुण्याईनं ! आणि काय सांगायचं ? काही चोरवाटा तर आम्हीच पहिल्यांदा पाडल्या; आणि पुढं काही कालावधीनं ते राजमार्ग होऊन बसले ! त्या लोकांना फितूर झाल्या आणि आम्हालाच त्या वाटेनं जायला चोरी होऊन बसली. बहुतेक सगळ्याच चोरवाटांचं असं असतं. त्या पहिल्यांदा चोरांना सामील असतात, आणि नंतर लोकांना फितूर होतात. पुन्हा नव्या वाटा पाडणं भाग पडतं. त्याही लहानाच्या मोठ्या होतात आणि आपल्या आई-बापांना विसरून जातात. कर्तेपणी त्या आपल्याला विसरून जात असल्या तरी बालपणी त्यांच्यापासून मिळणारं सुख काय थोडं आहे ? आपल्या मुली नाही का लग्न होऊन सासरी जात ? तशाच या वाटाही सासरी जातात, असं म्हणायचं आणि त्यातच सुख मानून गप बसायचं.

काही वाटांचं नाक सारखं वर असतं. आपलं अस्तित्व सोडायला त्या तयार नसतात. आमच्या गावी आता स्टेशनला जायला गाडीवाट छान झाली आहे. पण गाडीवाटेला चिकटून मूळची पायवाटही जातेच ! टोपपदरी लुगड्याला रुंद किनार असावी तशी ती दिसते. गाडीवाट आली तरी मी इथनं हलणार नाही, अशा हट्टी वृत्तीनं ती सारखी धावतच असते. तिच्या या चिकाटीला आता काय म्हणावं ? बाई, तुझी सद्दी संपली आहे. पेन्शन घेऊन गप बसायला तुझं काय जातं ? पण ती कुणाचं ऐकून घेईल असं वाटत नाही. आपली कुडी जिवंत असेतोवर ती अशी धावणारच.

आणि अशा काही पायवाटा असतात, की त्या चालताना लौकर ओसरतच नाहीत. नांदायला गेलेली लेक जेव्हा पहिल्यांदा माहेरी परत येते, तेव्हा वाट कशी सारखी पळत असते; आणि चार दिवस माहेरचं सुख घेऊन ती जेव्हा सासरी जायला निघते, तेव्हा तीच वाट ओसरेनाशी होते. आपलं जन्मगाव

सोडून.दूर पोटार्थी भटकत असताना आपल्यालाही हाच अनुभव येत नाही का ? गाव सोडताना किती अवघडल्यासारखं वाटतं, आणि परत गावी जायला निघताना जीव कसा अधीर होऊन जातो....आणि पुढं या पायवाटा आपल्याशी किती एकजीव होऊन जातात !

मला अजूनही आठवतं की, एकदा माझी आई फार आजारी असताना मी जेव्हा गावी गेलो, तेव्हा माझ्याप्रमाणंच ती वाटही अवघडली होती. माझ्याबरोबर सुन्न मनानंच तीही चालत होती. ना बोलणं, ना चालणं....

हां, जिव्हाळ्याची एखादी पाऊलवाट आपल्याशी बोलतेही !

मी दोन वर्षांपूर्वी एकदा गावी गेलो; आणि आगगाडीतून उतरून पायवाटेला लागलो. गावच्या ओढीनं भराभर पाय उचलत निघालो; आणि चक्क मला हाक ऐकायला आली ! मी मागं वळून बघितलं; तर त्या वाटेशिवाय दुसरं कोणीही तिथं नव्हतं. पायाखालची वाट आणि मी असं दोघंच चालत होतो; आणि एकाएकी बोलणं सुरू झालं–

" फार दिवसांनी आलास ? "

" हो, काय करणार ? रजा मिळत नाही ना ? "

" रजा मिळत नाही; का गावची आठवण होत नाही ? "

मी म्हणालो, " गावची आठवण होत नाही असं कसं होईल ? "

थोडा वेळ ती गप्प बसली, आणि मग एकदम आठवण झाल्यासारखी करून ती बोलली, " शामू गुरवाची कहाणी कळली का तुला ? "

" हो, त्यावर लिहिलंयसुद्धा मी ! " असं म्हणून मी विचारलं, " काय म्हणतंय गाव ? काय नवीन घडामोडी ? "

" काय म्हणायचंय गाव ? नवीन कायदं आलं. लोक हवालदिल झाल्यात. ऐकायला मिळंलच तुला आता. "

एवढं बोलून ती गप्प झाली. खोदून खोदून विचारलं तरी ती बोलेनाशी घाली. इतक्यात गाव जवळ आलं, आणि ती म्हणाली, " बरंय, ओळखदेख असू द्या. मी जाऊ आता ? "

आणि तिचा निरोप घेऊन मी गावात शिरलो. कधी कुणाशी न बोलणारी पायवाट अशी त्या दिवशी माझ्याशी बोलली. आता जेव्हा जेव्हा मी गावी जातो, तेव्हा मला कोणाच्या सोबतीची आवश्यकता नसते. ती मला सोबत करते. नुसतंच

वरकरणी बोलते असं नव्हे; तर अंतर्मुख होऊन खरोखरच आमची सुखदु:खांची बोलणी होऊ लागतात. गाडीतून उतरून मी पायवाटेला लागतो; आणि तिची हाक ऐकायला येते. ती जवळ येते, आणि विचारते,

"दिवाळीला आला नाहीस?"

"नाही जमलं."

"तुला शिरमीची हकीगत कळली?"

"नाही."

"तुला कळली नसेल तर मी सांगते. आंधळ्या शारीसारखीच ही गोष्ट आहे. अगदी लिहून छापण्यासारखी बघ...."

"हां हां, ती शिरमी होय?"

"तीच! आठवली का?"

"ते सगळं माहीत आहे..."

"मग तुला हे माहीत आहे?"

"काय?"

आणि मग गाव जवळ येईतोवर ती गोष्ट सांगू लागते. मला लिहायला गोष्ट सुचेना झाली, की वाटतं—आपण गाडीत बसावं, आणि गावी जावं. आगगाडीतून उतरून पायवाटेला लागल्यावर आपल्या गोष्टींना काय तोटा? नित्य नव्या कथानकांचा तो एक झराच आहे!

(पाऊलवाटा)

५

माती....आणि माती

रणजित देसाई

काळ्याभोर शिवाराची नांगरट केव्हाच झाली होती. कुळव शेतातनं फिरायला लागले होते आणि म्हातारा पोरांनी चालवलेली कुळवट बघत होता. अचानक कुळवाचे बैल थांबले. आकाशाकडं बघून हुंगू लागले. बांधावरच्या बाभळीच्या सावलीत बसलेल्या म्हाताऱ्यानं आपल्या पोरांना हाक दिली. पोरं जवळ येत म्हातारा बांधावर पडलेल्या बिढोळ्या म्हणजे जमिनीला पडलेल्या भेगा निरखीत होता. पोरं जवळ येताच म्हातारा म्हणाला,

" औत सोडा. "

" का गा ? "

एका पोरानं विचारलं,

" पाऊस येणार. "

पोरांनी आकाशाकडं पाहिलं. आकाश निरभ्र होतं. कुठंही ढगाचा पत्ता नव्हता. फक्त रणरणतं ऊन खाली उतरत होतं.

म्हाताऱ्याचा एक पोरगा रामा हसून म्हणाला,

" म्हाताऱ्या...पाऊस येईल कसा ? "

म्हातारा म्हणाला,

" काळ्याचे पांढरे झाले. या शिवारात आलेलं जनावर हुंगाय लागलेत. जरा बिढोळ्या बग. त्याची कड आता ढासळाय लागली. आता घर गाठूया. "

औत सोडले गेले. आणि म्हातारा आपल्या पोरांच्या समवेत गावाकडे चालू लागला. म्हाताऱ्याच शेत गावापासून एक कोस अंतरावर होतं. उन्हानं हैराण झालेला म्हातारा आपल्या मुंडाशानं घाम टिपत होता. त्याचं लक्ष पूर्वेकडं जात होतं.

पूर्वेला आकाशात पांढऱ्या ढगांच्या गौळणी उठत होत्या. गाव गाठेपर्यंत त्यांचं रूप पालटत होतं. त्यांचं पांढरं रूप सावळं बनत होतं आणि पश्चिमेचा वारा सुरू झाला. शेतातून चक्री वादळं उठू लागली. आणि एकदम वारं थांबलं.

पूर्वेला काळ्याकुट्ट ढगांची वेल आकाशात चढत होती. शिवारातली जनावरं, चरायला गेलेली जनावरं गावाकडे धावत होती. ढगांची गुरगुर सुरू झाली. पाहता पाहता सारं आकाश ढगांनी व्यापलं गेलं. विजा लखलखू लागल्या. आणि एक वीज कडाडत शिवारात उतरली.आणि पाठोपाठ पाऊस कोसळायला लागला.

खेडेगावातला शेतकरी हा आजच्या यांत्रिक युगात देखील निसर्गाशी रमलेला आहे. त्याचं निसर्गाशी अतूट नातं आहे.

रोहिणी झाली की कोरड्या पडलेल्या नद्यांना पाणी येऊ लागतं. बेडकांची पिलं गढूळ ढवामध्ये खेळू लागतात. आणि आपल्या मातीच्या घरांना झडपा बांधायचं काम गावात सुरू होतं. कारण बेडकांची पिलं गावात येऊ लागली की त्या पाठोपाठ पाऊस बरसणार याची जाणीव होते. ते अंदाज सहसा चुकत नाहीत.

पावसाळा सुरू होतो. नदीला तांबडंभोर पाणी येतं. त्या नदीचं स्वागत करायला गावच्या सुवासिनी हाती नारळ घेऊन नदीकडं जातात. त्या आधीच पेरण्या झालेल्या असतात. त्याला धूळोओप म्हणतात. भात उगवतं. इरली घेऊन शिवारात शेतकरी शेतातलं तण काढण्यात गुंततात. लहान मुलं सोडली तर गाव ओस पडल्यासारखं वाटतं.

हंगामाचे दिवस आले तर शेतकऱ्याला तो हंगाम चुकवून परवडत नाही. मग घरी एखादं लहान पोर वारलं. तर टोपलीखाली झाकून हा शेतकरी, त्याची बायको आपल्या भिजल्या डोळ्यांनी शेतात जातात. तेही दृश्य मी पाहिलेलं आहे. आणि संध्याकाळी घरी आलं की, मग आक्रोश होतो.

गावचे लोक आज पुष्कळ शहाणे झालेत. पण आयुष्यात मुरलेली सावधगिरी त्यांची कमी झालेली नाही.

एका दिवशी धूळ उडवत पोलिस गाडी येते. ती गाडी वेशीत थांबते. खाकी कपड्यातला फौजदार उतरतो. आजूबाजूचे लोक नम्रतेनं पुढे होतात. फौजदार विचारतो,

" तो धोंडीरामाचा लेक चौगुले इथेच राहतो ना ? "

सगळी एकमेकांकडं पाहात असतात. एक म्हातारा आपलं डोकं खाजवीत म्हणतो,

" साहेब कोण म्हणालासा ? धोंडीरामा ? "

जवळच्या माणसाकढे वळून तो म्हणतो,

" अरं कोण रं धोंडीरामा ? "

तोवर फौजदार का आलाय ? धोंडीरामाची चौकशी का करतो ? याच्या डोळ्यांच्या खुणांनी चौकशा होतात. मग कुठूनसं कळतं, धोंडीरामावरती समन्स निघालेलं असतं म्हणून फौजदार गावात टपकलाय. फौजदार वेशीत चौकशी करीत असतानाच धोंडीरामाला शिवारात जाऊन लपण्याची सूचना दिलेली असते.

एखादा माणूस आजारी पडला तर त्या पेशंटला डॉक्टरकडे नेलं जातं. नेणारा खिशात असलेली एक आठ-बारा आण्याची चिल्लर खुळखुळावीत असतो. तो डॉक्टरला सांगतो,

" हे बघा साहेब, हवी तेवढी खर्ची येऊ दे. पर हे पोर उटलं पायजे बघा. चांगली सुई टोचा. सुई टोचल्याबिगार हे पोर बरं नाही होणार. ती सुई टोचली पाहिजे. "

ते पोर त्या डॉक्टरचं औषध घेत राहतं. बरं होतं. बिल ६०–७० रुपयांचं झालेलं असतं. जेव्हा डॉक्टरचा कंपाउंडर बिल मागायला जातो तेव्हा तो शेतकरी धीट मनाचा होतो.

" अरे सुगी अजून दूर हाय. काय गाव सोडून पळून जाणार हाय काय ? सांग जा तुझ्या डाक्टरला. सुगी झाल्यावर बिल देतो म्हणून. "

ही संवय त्या डॉक्टरलाही माहीत असते. तोही सुगीची वाट बघत राहतो. कारण दारी आलेल्या पेशंटला घालवणं त्याला परवडत नसतं.

आता अनेक खेडेगावांतून हेल्थ सेंटर्स निघाली आहेत. पण तिथे पुरेशी औषधे नसतात. मग गावात आपोआप निकड म्हणून औषधाची दुकाने काढली

जातात. सरकारी डॉक्टरशी नाती बांधली जातात. स्नेह जोडला जातो आणि आलेल्या पेशंटला त्याच दुकानात तिथे जे उपलब्ध आहे ते औषध लिहून दिलं जातं.

शेतकरी आपलं घर जेवढं जपत नाही त्यापेक्षा तो आपलं शेत सांभाळत असतो. मग ज्या वेळेला शेताची नांगरट येते तेव्हा तो आपल्या शेजारच्या बांधातल्या कडेनी शेजारच्या शेतामधल्या जागेतली एखादी कुरी म्हणजे फार तर सहा इंचांची जागा आपल्या शेतात मिळवण्याचा प्रयत्न करीत असतो. शेजारचा शेतकरीसुद्धा त्याच प्रवृत्तीचा असतो. खेडेगावात एक म्हण आहे की, "जीवनात आई आणि जमीन कधी घालवू नये." आणि यातून खटला सुरू होतो. तालुक्याला धावपळ होते. दोन्ही बाजूचे वकील खटलं जिंकण्याचा आश्वासनं देत असतात. एखादा लाचखाऊ न्यायाधीश असेल तर तो दोन्ही बाजूचे पैसे खातो.

ज्याच्या बाजूनं खटला जिंकला जातो तो कृतज्ञतेनं त्यांचं पाय धरायला जातो. साहेब सांगतात,

"खरं पाहिलं तर तुमच्या बाजूनं केस होणार नव्हती. पण मी कायद्याच्या काही गोष्टींचा आधार घेऊन तुमच्या बाजूनं निकाल दिला."

"साहेब, लई उपकार झाले."

"अहो, पण उपकार फेडायचे असतात."

"साहेब, ते मी विसरणार नाही."

आणि तो खिशातून पाचशे रुपये साहेबासाठी देतो.

साहेब इकडे तिकडे पाहतो. त्या नोटा खिशात घालतो. म्हणतो,

"तुम्ही दिलेत त्यात मला समाधान आहे. पण कामाच्या मानानं रक्कम फार कमी आहे. जेव्हा सुगी होईल तेव्हा एखादं भाताचं पोतं पाठवून देत चला. आपली ओळख राहील. पुढं काय काम पडलं तर मी तुमच्या पाठीशीच राहीन."

जो हरलेला असतो त्याला वकील म्हणतो,

"तुला माहिती आहे ना, मी तुला किती मदत केली ती. पण काय करणार? साहेबाला लाच दिली. सारं केलं. पण तुझ्या विरुद्ध राहिलेल्या माणसाची ताकद फार मोठी होती. त्यात मी हरलो."

डोळे पुसत तो शेतकरी म्हणतो,

" साहेब, तुमची काय चूक नाही. माझं नशीब फुटकं. त्याला तुम्ही काय करणार ? "

डोळे पुसत तो शेतकरी उठतो. आणि त्याच वेळेला वकिलाचे शब्द त्याच्या कानावर येतात,

" अरे.... माझ्या फीचे ५० रुपये अजून राहिलेत. "

शेतकरी म्हणतो,

" साहेब, मेलो तरी कुणाच्या रीनात मी राहणार नाही. "

आपल्या दंडक्याच्या खिशातून ५० रुपये काढतो. ते वकिलाच्या हातात देत तो म्हणतो,

" साहेब, लई उपकार झाले. तुमी माझ्यासाठी लई केलंसा. यश देणारा तो पांडुरंगच हाय. कुठंतरी पूर्वजन्मीचं पाप असल. तुम्ही वाईट वाटून घेवू नगा."

शेतकरी खेडेगावात जगत असला तरी त्याच्या घरात चार भावांच्या वाटण्या झालेल्या असतात. चार खोल्यांमध्ये चार चुली मांडून ते जगत असतात. नवऱ्याबरोबर शेतावरती सबंध दिवस काम करून त्याची पत्नी आपल्या कोंबड्या हुडकत असते. ओळखीसाठी प्रत्येक कोंबडीवर निरनिराळे रंग दिलेले असतात. त्यांतली एखादी कोंबडी जर हरवली तर ही बाई गल्लीबोळातून सैरावैरा धावत असते. दमून ती घरी येते. तिच्या डोळ्यासमोर ती अंडी देणारी कोंबडी नाहीशी होते. " कुणी भडव्यानं चोरली असेल का ? " कोंबडीनं घातलेलं आंडं आज खेडेगावामध्ये सहा आणे–आठ आणे भावानं विकलं जातं. ती वैतागाने दारात येते. नवरा हसून विचारतो,

" सापडली कोंबडी ? "

तिच्या डोळ्यांत पाणी येतं. ती म्हणते,

" मसनवाट होवो मेल्यांची. केवढी चांगली माझी कोंबडी होती. "

सिनेमातले प्रेमप्रसंग आमच्या ग्रामीण भागामध्ये कधी घडत नाहीत.

खाटल्यावर बसलं असताना तो म्हणतो,

" ती टोपली उचल. "

त्यात ती कोंबडी असते. त्या कोंबडीलाच ती जवळ घेते. त्या कोंबडीचं मुके घेते. तिला आंजारते, गोंजारते. नवरा शांतपणे त्या दृश्याकडे बघत असतो.

डोळे पुसत ती विचारते,



" धनी.... कुठं मिळाली ही ? "

तो हसून सांगतो,

" कुठे नाही. ती तुझ्या गोधडीत बसली होती. "

" खरंच ? "

शेवटी माणूस उबेची जागा शोधीत असतो. पुढच्या जीवनामध्ये ऊब मिळावी, ओलावा मिळावा आणि कुणीतरी आपलं म्हणावं असं माणसाला वाटतंच. रानावनात चरून आल्यानंतर सुद्धा एका जीवाला एका गोधडीची ऊब मिळते आणि ती सुखानं तिथेच विसावते. माणसाचं मनसुद्धा तसंच आहे. जगात वावरून त्याला सुद्धा वाटतं, एखादा प्रेमाचा जिव्हाळा लाभावा. मग ते वडील असो, आई असो, मुलगी असो, मुलगा असो अथवा पत्नी असो. दाराशी आल्यानंतर कोणीतरी विचारतं,

" फार थकलात का ? "

या प्रश्नाची आवश्यकता प्रत्येक माणसाच्या मनात असते. काहींना ती लाभते. काहींना ती लाभतही नाही.

❀

६

बावीस एकरी

आनंद यादव

उनं उतरणीला लागली नि मी दारात येऊन बसलो. दिवाळीच्या सुटीवर पंधरा दिवसांसाठी आलो होतो. वर्षभर गाव पाहिलेलं नसतं, वर्षातनं एकदा पंधरा दिवस गावात आलेलो असलो तरी गावाला निवांतपणं भेटता येत नसतं. संध्याकाळी असं दारात बसलं की अनेक माणसं दिसतात. सगळ्या गावाचा चित्रपट समोरून चालू होतो. या चित्रपटातला एक नि एक माणूस ओळखीचा असतो. त्याला बघितलं की त्याचा सगळा इतिहास आठवू लागतो. तासराती-पर्यंत सगळ्या गावाच्या इतिहासाचं वाचन होतं.

शेतातून येणाऱ्या वाटा गावात जिथं एक होतात त्याच गल्लीत आमचं घर. बाजारपेठही तिथनं जवळच. संध्याकाळी बाजारपेठेत वैरणीचा बाजार भरतो. त्यामुळं शेतातनं अनेकजण गवताचे, बाटकाचे, शिपाट-लपाटाचे, उसाच्या हिरव्या पाल्याचे भारे घेऊन बाजारात चालले होते. कुणी आपली दुधाची म्हसरं सकाळपासनं माळाला चारायला नेलेली लौकरच परत घेऊन येत होतं. लेकुरवाळ्या बायका आपआपल्या शेतावरनं डोळ्या उजेडी परतत होत्या. सगळ्यांच्या तोंडओळखी लागत होत्या. माणसं लाकडाच्या बाहुल्यांसारखी दिसत होती. त्यांच्या अंगावरची कातडी हाडांना चिकटून गेलेली. मांस, चरबी कुणा अज्ञात शक्तीनं खरडून नेलेली. त्यामुळं सांध्यांजवळचे हाडांचे खोंबारे वर आलेले. अंगावरची फाटकी कापडं बंगल्यात बरेचदा फरशी पुसलेल्या फडक्या-

सारखी दिसणारी. त्यांना मातीचा, मळीचा रंग कायमचा भिनलेला. पुरुषांच्या दाढ्या वाढलेल्या. बायकांची पोटं वाढलेली. उघडी-वाघडी, शेंबडी पोरं शेरडं-करडं घेऊन पळणारी. सगळं गाव कसं भंगार होत गेल्यागत वाटलं. दारिद्र्य या माणसांच्या पाचवीला पुजलेलं आहेच; पण आता ते पराकोटीला गेल्या-सारखं वाटत होतं. तरुणपणात पैलवानी करणारा दत्तू ऐनापुऱ्या म्हशीच्या मागनं काठी टेकत चालला होता. त्याच्या गुडघ्यांच्या वाट्या वर आलेल्या होत्या नि पैलवानी मांड्यांच्या जागी काठ्या उभ्या राहिल्या होत्या. कमरेत वाकून खाली मुंडी घालून तो चालला होता. दहा वर्षांत किमयेनं एखाद्या हत्तीचं हडकुळं डुकर व्हावं तसं त्याचं झालं होतं....गल्लीच्या त्या टोकापर्यंत जाऊन दिसेनासा होईपर्यंत मी त्याच्या खुळखुळ्याकडं नुसता बघतच राहिलो.

त्या टोकातूनच लांबवरून पांढरीशुभ्र विजार आणि वरती तांबड्या बारीक काड्यांचा सदरा घातलेले शितोळेमास्तर येताना दिसले. तेवढ्या लांबून मी त्यांना ओळखलं. त्यांच्या हातातली मोठ्या वेताची वाकडी काठी दहापंधरा वर्षांपूर्वी जशी रुबाबात फिरत होती, तशीच ती आताही फिरताना दिसली. पांढरीशुभ्र इस्त्रीची विजार हे त्यांचं खास वैशिष्ट्य. त्यांनी मला हायस्कूलमध्ये गणित आणि नागरिकशास्त्र शिकवलं. गणितापेक्षा त्यांचं नागरिकशास्त्रच माझ्या लक्षात विशेष राहिलं. त्यांची कपड्यांची स्वच्छता, गोरापान रंग, वर्गातली कडक शिस्त, मुलांना हातांनी न मारता छडीनंच मारणं, खडूसाठी कापराचा चपटा डबा वापरणं यामुळं ते मला स्वत:च आदर्श नागरिकाच्या शास्त्रशीर शिस्तीनं वागणारे वाटत होते.

पायात तांबडे कापडी, रबरी तळाचे बूट घालून ते येत होते. मी थोडा सावरून बसलो. उठून आत जाणं शक्य नव्हतं. त्यांच्या करड्या नजरेतून ते सुटलं नसतं; म्हणून उगीच बसून राहिलो.

दारासमोर आले नि मी त्यांना नमस्कार केला.

" कधी आलास ? " एकाच हातात पिशवी आणि काठी घेत ते बोलले.

" आठ दिवस झाले. "

मी अधूनमधून येतो याची त्यांना कल्पना होती. माझं सगळं घरच इथं होतं.

" किती दिवस आहेस ? "

" अजून आठ दिवस तरी आहे. "

" चल मग. असंच फिरत जाऊन येऊ मळ्याकडं. संध्याकाळ आहे; नुसती फेरी टाकून येऊ. "

त्यांनी ' चल ' म्हटल्यावर " आलोच एक मिनिटात " म्हणून मी बाहेर जाण्यासाठी कपडे केले.

दहा वर्षांपूर्वी आमच्या हातातून गेलेल्या मळ्याचंही दर्शन मला होणार होतं. मला तो कधी तरी एकदा पाहायचा होता. स्वत:लाच भूतकाळात जाऊन भेटल्यागत होणार होतं, जुन्या आठवणींना उजाळा मिळणार होता. आयुष्यातली पहिली पंधरावीस वर्षे ज्या मळ्यात काढली, ज्या मातीत माती खाऊन वाढलो, ज्या बांधांवरची गवतं कापली ते बांध, तो मळा, ती माती पुन्हा बघणार होतो.

मी तत्परतेनं निघालो.

मास्तरही निवृत्त होऊन दहाएक वर्षं झाली होती. पण त्यांचा चेहरा पन्नाशी-तल्या गृहस्थासारखा रसरशीत होता. बोलण्यात पूर्वीसारखाच डौल होता. ते हायस्कूलमध्ये मास्तर होते, पण त्यांची मैत्री गावातल्या वकिलांशी होती, व्यापाऱ्यांशी होती. त्यांचे कुणीतरी नातेवाईक कोल्हापूरच्या पोलिसखात्यात मोठ्या हुद्द्यावर होते. आम्ही शिकत असल्यापासनं आम्हाला हे माहीत होतं. त्यांना हेडमास्तरही भिऊन असत. माझी फी-माफीची कामं वगैरे असतील तर मी प्रथम शितोळेमास्तरांनाच भीतभीत भेटत असे.

मळ्याकडं जाताना त्यांनी माझी सगळी चौकशी केली. अनेक वर्षांनी भेटलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी शिक्षकांनी करण्याचा जो पायंडा होता त्याला धरूनच ती होती. तरी मी सविस्तर सांगितलं. पिढीजात करत असलेली शेती गेल्यामुळं घरादाराची कशी वाताहत झाली तेही सांगितलं.

मग ते आपल्या कर्तृत्वाविषयी सांगू लागले. मीही त्यांना विचारत राहिलो. त्यांना तीन मुलं, दोन मुली होत्या. थोरला मुलगा सोलापूर जिल्ह्यात कॅनॉलच्या पाणीपुरवठा-योजनेवर ओव्हरसिअर होता. त्याच्या खालचा मुलगा पुण्याला आर० टी० ओ० मध्ये होता. सर्वांत लहान नुकताच शिक्षणखात्यात नोकरीला लागला होता. मास्तरांच्या ओळखीचा फायदा मुलांना मिळाला होता. मुलींची लग्नं होऊन त्या आपापल्या घरी गेल्या होत्या. सुना आल्या होत्या.

त्यांनी गेल्या आठनऊ वर्षांतच शेती करायला प्रारंभ केला. मला त्याविषयी जिज्ञासा होती. मी त्यांना जवळिकेनं प्रश्न विचारला, " सर, निवृत्तीपर्यंत तुम्ही

शिक्षकी पेशाच स्वीकारला; त्यानंतर शेतीकडं कसं काय वळलात ?''

''सध्याच्या काळात शेतीसारखा व्यवसाय नाही.''

''असं ?''

''तुम्ही शहरात कोणताही उद्योगधंदा सुरू करा; सरकारी दृष्टे तुमच्यावर आलेच म्हणून समजा. 'भांडवल किती ? कुठनं आणलं ? फायदा किती झाला? लायसन काढलं का ? किंमती ठरवून घेतल्या का ? टॅक्स भरला का ? उलाढालीचा नीट हिशोब ठेवला का ?' एक ना दोन, हजार कटकटी ! शेतीचं तसं नाही. कशाचाच हिशोब नाही. फायदा किती झाला नि तोटा किती झाला याबद्दल सरकार तुम्हाला विचारतच नाही.—दुसरं असं की कामगारांच्या संपाची कटकट नाही. त्यांचे पगार ठरवून देण्याची भानगड नाही. इथं रोजगारी माणसांना कामाला सांगितलं की बाराबारा तास राबतात. संप नाही की पगारवाढ नाही. उलट रोजगारी मुबलक मिळतात. पावसाळ्यात तर रुपया-दोन रुपयांवर राबतात. बरं, हे सगळे काम करणारे लोक त्यांना काम दिल्यामुळंच इतके लाचार होतात की ते तुम्हाला परमेश्वरासारखे मानतात.''

मास्तर खूप बोलत होते. पहिल्या दोन्ही मिळवत्या मुलांविषयी त्यांना अभिमान वाटत होता. ''माझा बाबू, माझा बाळ'' असे ते त्यांचे सारखे उल्लेख करत होते.

दहाएक वर्षांपूर्वी आमच्या वडिलांकडनं मळ्याच्या मालकानं फसगतीनं मळा काढून घेतला नि एक वर्ष घरात ठेवून दुसऱ्या वर्षी शितोळेमास्तरांना साठ हजारांना विकला.

सहा एकराचं रान मास्तरांनी साठ हजारांना घेतलं. मग शेजारच्या दोनतीन, दोनतीन एकरांच्या पट्ट्या मुजावर, बल्लाळ, कुंभार, दिवाण, ऐतवडे यांच्याकडनं नंतरच्या दहा वर्षांत घेतल्या. तीन विहिरी काढल्या. सगळं बावीस एकरांचं रान बुलडोझर घालून मधले बांध आणि झाडं काढून एक करून टाकलं. प्लॉट पाडून नारळीची, आंब्याची झाडं केली. दोन एकरांत द्राक्षं लावली. नवी बियाणी, नवी खतं, नवी औषधं वापरून पिकं भरमसाट आणली.—मास्तर अनावरपणे सगळं सांगतच होते. किती लाखाची रानं विकत घेतली, आता त्याचे किती लाख होतील, विहिरींना किती हजार खर्च झाले, त्यांचं बांधकाम किती हजारांचं झालं, सगळे प्लॉट एका पातळीत आणण्यासाठी बुलडोझरला किती हजार द्यावे लागले,

रोपं किती हजारांची आणली यांचे हिशेब सांगत होते. मी थक्क होत होतो. त्यांचे सगळे पैशांचेच हिशेब चालले होते. एका दृष्टीनं ते मास्तरांच्या तोंडी शोभून दिसत नव्हते. मला ते फळ्यावरच्या प्रचंड गणितातल्यासारखे वाटत होते.

पण त्यांच्या सांगण्यामुळं तो बावीस एकरांचा एकच एक सलग मळा, मधे बांधच नसलेला एका पातळीतला रानाचा हिरवा विस्तार पाहायला मी उत्सुक झालो होतो. मास्तरांनी मळ्याला नावही छान दिलं होतं : ' बावीस एकरी. ' अधनंमधनं त्यांच्या बोलण्यात ते लय धरून होतं. कसं का असेना, हे बावीस एकर म्हणजे माझ्या मळ्याच्या भोवतीचाच पसारा. माझा मळा मध्यावर अंगठीतल्या पाचूसारखा दिसत असेल. मास्तरांनी घेतलेल्या त्या सगळ्या पट्ट्या मळ्याच्या भोवतीनंच आहेत. त्यांचं आता त्या मळ्याला कोंदण झालं असेल...

मी मास्तरांच्या बरोबर उत्सुकतेनं वाट चालू लागलो. माळ संपला नि म्हारकीची रानं लागली. मधली पायवाट. मास्तर काठीनं जोंधळ्याची धाटं बाजूला करत, एका हातानं विजार वरती धरत, तांबूस कापडी बुटांना फार चिखल लागू नये म्हणून पसरलेल्या भुईमुगाच्या वेलावर पाय देत, माझ्याशी गप्पा मारत चालले होते. माझी स्थिती थोडी वेगळी झाली होती. आता मी फक्त मास्तरांना हुंकारच भरत होतो. मनानं माझ्या जुन्या मळ्यातल्या जोंधळ्यात घुसलो होतो. समोरचा जोंधळा जिवाभावाचा झाला होता. त्याला बाजूला न सारता त्याच्या रुंद-लांब हिरव्या पानांचे गार स्पर्श अंगावर, तोंडावर घेत, त्यांना कुडत्याला घासून घेत, एखाद्या जोंधळ्याच्या शेंड्याला हातानं धरून तोंडाजवळ आणत, त्याचं कोवळं शेंडपान तोंडाला लावत, पायाखालच्या भुईमुगाच्या वेलावर पाय न देता बाजूला कसे पडतील याची काळजी घेत, पायांतल्या चपलांची फिकीर न करता त्यांना चिखलात घालत चाललो होतो. मन उमाडल्यासारखं झालं होतं. ढोरागत हिरव्यात जाऊ बघत होतं.

म्हारकी ओलांडल्यावर ओढा आला. वरच्या बाजूला काय घडतंय याची फिकीर न करता पाणी आपल्या नादात सनातन सत्यासारखं अखंड वाहात होतं. त्यात ठेवलेल्या दगडावरून पाय ठेवत मास्तर पार झाले. मी थोडा थांबलो. चपला हातात घेतल्या. पाण्यात उतरलो. कशाचाही विचार न करता चूळ भरली. तोंड धुतलं. बारके मासे तेवढ्यात पायाभोवतीनं गोळा झाले नि तोंड मारू लागले. त्यांच्या गुदगुल्या होऊ लागल्या. पायांना जुन्या संवेदना झाल्या.

ते भुक्केल्या देवाला भक्त भेटल्यागत शांत झाले. त्यांचं पोट भरलं. त्यांच्याभोवती गारगार प्रदक्षिणा घालून पाणी मनाशी घुळघुळत पुढं जातेलं. तसाच पायांना पाणी देत पलीकडं गेलो.

अजून आमचा मळा हाकेवर होता. तरी मास्तर ओढा ओलांडून वर आले नि बांधावरच उभे राहिले.

" इथनंच आमचं रान सुरू होतं." त्यांनी डाव्या बाजूचा कोपरा दाखवला. दिवाणाच्या जुन्या शेताचा तो कोपरा. चाळीसएक पावलांवरच विटांचं एक मोठं पोकळ घर बांधलं होतं.

" हे दोनच वर्षांपूर्वी एक साधं घर बांधलं. त्या वेळी वरच्या पत्र्यासह याला सतरा हजार रुपये खर्च आला. "

" हं ! "

आम्ही तिकडं चालत गेलो. समोरच हाकेच्या अंतरावर पसरलेल्या तंबाखूच्या वावरातनं एकजण विजार फडक फडक करत मास्तरांना बघून धावत आला. त्यानं आतनं गडबडीनं दोन लोखंडी खुर्च्या आणल्या नि घरासमोरच्या फरशीवर मांडल्या.

" हा आमचा कारभारी बरं का. शंकर. बस. " मास्तर म्हणाले.

" मी खालीच वसतो. एखादं घोंगडं आणतोस काय ? " मी शंकरला म्हणालो. मळ्यात खुर्च्या मी प्रथमच बघत होतो.

" का ? अरे, वर बस ना. " मास्तरांना वाटलं, मी त्यांना संकोचतोय.

" नको. खुर्ची जन्मभर आता आहेच. आपल्या गावात कसलं खुर्चीवर बसायचं ? आणि आम्ही या गावात शेतकऱ्याचीच पोरं." हसत हसत मी म्हणालो.

शेवटी मास्तरांनी बूट काढले आणि तेही घोंगड्यावर बसले.

थोडा वेळ गप्पा झाल्या. शंकर इकडं आला तरी माणसं तंबाखूच्या रानात खुरपण करतच होती. शंकरनं आम्हा दोघांना कपबशीतनं निरशा दुधाचा चहा दिला. पलीकडच्या गोठ्यात तीन जर्सी गाई बांधलेल्या दिसल्या. एकएकीची कास दुधाच्या हंड्यासारखी....मुंगीराणी नुसती पिलांसाठी जगवली जाते. एका जागेवरून दुसऱ्या जागेवर न्यायची असेल तर तिला शेकडो मुंग्या उचलून नेतात. ती नुसती पिलं देणारी. म्हणूनच तिला पोसायची. तशा या गाई. नुसतं दूध देण्यासाठी जन्माला आलेलं जिवंत यंत्र. त्यांच्या सबंध शरीरापेक्षा

त्यांची कासच मोठी. म्हणूनच तिला जगवायची.

आसपास सुखवस्तू माणसांसारखी पिकं पोसलेली. त्यांच्या बियाण्यांविषयी, खतांविषयी मास्तर बोलू लागले. जर्सी गाईंसारखाच तोही प्रकार वाटला. माझं मन त्यात रमेना. संधी साधून मी मास्तरांना म्हणालो, "सर, आपण त्या भटाच्या मळ्याच्या विहिरीवर जाऊ या. आमची जुनी विहीर ती."

"जाऊ या. ती अशी आता आत आहे. असं फिरत फिरत जाऊ."

ते आणि मी उठून तंबाखूच्या रानातून चालू लागलो. माणसं खुरपणी करत होती तिथं गेलो. कोगल्याचा गोविंदा, खाडयाचा सुबराव, हिरामावशी, तानामावशी, जाधवाचा खंडया, सिद्धू बल्लाळाचा पोरगा बरोबर ओळखून काढले. बल्लाळाचा पोरगा तर बरोबरीचा. शेजारीच त्याची पट्टी होती. आश्चर्य वाटलं ते माझ्या अडाणी राहिलेल्या भावाचं. तोही इथंच कामाला आला होता. सवता राहात होता. दिवसभर मजुरी करून संसार चालवत होता.

सगळयांशी बोललो. दोन-दोन गोष्टी केल्या. चौकश्या केल्या. मास्तर चकित झाले. त्यांना यातली काहीच कल्पना नव्हती. आमच्या गल्लीच्या आसपासची नि मळ्याच्या आसपासचीच माणसं होती ती. माणसं कामाला सांगण्याचं काम शंकर करत होता. तो कारभारी होता. कामं करून घेत होता. पैसे किती झाले ते सांगत होता. मास्तर फक्त आठवडयाच्या आठवडयाला पैसे चुकते करायला येत असत. माझी त्या माणसांशी ओळख आहे हे पाहून त्यांना आश्चर्य वाटलं.

थोडयाच वेळात माझ्या लक्षात आलं, की आताही मास्तर बरोबरच्या छोट्या पिशवीत पैसे घेऊनच आठवडयाचा हिशोब चुकता करायला आले आहेत.

शंकरनं बरोबर आणलेलं घोंगडं रानात टाकलं नि मास्तर त्याच्यावर बसले. बसता बसता मला म्हणाले, "पाचच मिनिटांत यांचा बटवडा करू या नि मग तिकडं जाऊ या."

"बरं." म्हणून मी उभा राहिलो.

मास्तरांनी वही काढली नि उद्योगाला लागले. एकएक जण आपले चिखुळलेले हात एकमेकावर दाबून घासत, लागलेल्या चिखलाच्या लोळ्या खाली टाकत पुढं येऊ लागला. त्याच हातांनी रक्कम घेऊन परत जाऊ लागला. घसटताना त्याच्या ढुंगणाच्या जागी लागलेल्या चिखलमातीच्या लोळ्या लोंबताना

दिसत होत्या. मागून आणलेल्या जुन्या चड्ड्या, चिंध्या झालेली जुनेरं, धोतरं, कुडती अंगावर घेऊन सगळे कामाला आले होते. दिवसभर राबत होते. अधिक वाईट वाटलं ते अडाणी राहिलेल्या भावाचं. एके काळी तो समोरच्या मळ्याचा जवळजवळ मालक म्हणून राबत होता. बळ्ळाळाच्या पोराचंही तेच. ते स्वत:ची पट्टी विकून त्याच पट्टीवर रोजगारी होऊन राबायला आलं होतं.

दिवस हळूहळू खाली चाललेला. मास्तरांचे हिशेब चिवटपणं आणि चौकश्या करत चाललेले. एखाद्या पैसेवाल्यानं गोरगरिबांना दानधर्म करताना पैसेवाल्याचा नि गरिबाचाही जसा चेहरा होतो तसाच मास्तरांचा आणि मजुरी घेणाऱ्याचाही दिसत होता. मी अधीरपणे म्हणालो, "सर, मी फिरून येतो इथनं. तोवर तुम्ही हिशोबाचं बघा. मग आपण परत फिरू."

"ठीक आहे. ये जाऊन, तोवर मी आवरतो."

एकटाच चाललो... आमच्या मळ्याचं रान कुठं सुरू होतंय याची कल्पनाच येईना. बांध, बांधावरची बाभळीची, खैराची झाडं, बोरीची झुडपं, ओळखीचे दगड सगळे काढून टाकले होते. सलग रान बघून गोंधळल्यासारखं झालं.

मी सरळ विहिरीच्या दिशेनं चाललो. तिच्या काठांवर दोन–दोन बाव लांबी-रुंदीची एक पत्र्याची खोली उभी केली होती. त्या दिशेनं चालताना पायाखाली वेगळंच रान येत असल्यासारखं झालं.

काठावर येऊन उभा राहिलो नि विहिरीची जुनीजुनी ओळख लागली. तिच्या पहिल्या दोन खुंटपायऱ्या उघड्या झाल्या होत्या. पहिली पायरी उघडी झाली की आंघोळीला, कपडे धुवायला बरं वाटत असे. ती बुडल्यावर आंघोळ करताना आणि कपडे धुताना काठावरची माती हळून पाणी लगेच खडूळ होत होतं. विहीर सखलातच असल्यामुळं पावसाळ्यात ती तुडुंब भरून पाणी काठा-बाहेर येतं. दुसऱ्या पायरीवर एक पाय ठेवून दगडानं घासलेलं अंग, पायावर घेऊन कपड्यांना लावलेला साबण यांच्या आठवणी झाल्या. बाकीच्या पायऱ्या बुडाल्या होत्या तरी मनानं उतरत उतरत, प्रत्येक पायरीपाशी थांबत, सहावी पायरी कशी मोडलेली आहे ते बघत नि तेथून हळूच खाली जात पार पार खाली उतरलो नि ऐन उन्हाळ्यातली थंडगार आंघोळ जयीच्या दगडावर उघडा-बंब बसून करून वर आलो.

तिचं बाहेरचं रूप बदललं होतं. काठावरून तिरकी वर आलेली बाभळ तोडून

टाकली होती. उंबराचं झाड मात्र तसंच होतं. त्याच्यावर अजून चिमण्यांच्या घरट्यांचे राजमहाल लोंबकळत होते. पलीकडच्या बाजूला इडाचं झाड लावलेलं त्याची रोगट इडं पाण्यात पडून तरंगत होती. भोवतीची झुडपं तोडून जागा सफय केलेली. तिथं पांढरे आणि फिकट गुलाबी रंगाचे गुलाब लावलेले. काठावर बांधलेल्या खोलीत विजेचा पंप. तिथून बाहेर आलेला लोखंडी नळा विहिरीत तोंड घालून बुडालेला. जुन्या वळणाचं मोटवण काढून टाकलेलं. साध्या दगडांचा पाट जाऊन घडीव दगडांचा माठदार पाट बांधलेला....माझ्या वेळची कष्टकरी वेडीबागडी विहीर सुधारल्यासारखी दिसत होती....तिच्या पाण्याचा थेंब न् थेंब पंपानं पिळून घेऊन त्या घडीव पाटातनं अलगद उसात जात होता. मुंग्यांच्या विळात, भुईच्या भळीत पाणी जाण्याचा नि काठावर हिरवळ फुलण्याचा प्रश्नच नव्हता. पाणी दिलं तरच काठावरच्या झाडांना ते मिळत असे....मला आतून कसली तरी खंत वाटली. शेतकऱ्याचा मूठपसा थोडा इकडंतिकडं जातो. त्यावर किडामुंगी, गोरगरीब, झाडझूड पोसतं. ते आता बंद झालं. आता पाट सिमेंटचे झाले...आता ते आपल्याच मळ्यातून आपल्याच घरात वाहणार. विहिरीला नि मळ्याला आता नुसते मास्तरच भोगणार....शेतकऱ्याचं उघडं राज्य गेलं !

विहिरीच्या भोवतीच्या जागेवर नजर टाकता टाकता एक चमत्कारिक आठवण झाली : कुरुकलीचा एक देसाई ब्राह्मण आमच्या गावी येऊन राहिला होता. गावच्या फौजदाराची नि त्याची मैत्री होती. त्याचं त्याला संरक्षण होतं. देसायानं एका मराठा स्त्रीला उपटून आणली होती. ही बाई आणली त्या वेळी कशीबशी दिसत होती, पण मग सुखावली. तिच्या अंगावर मूठभर मांस चढलं. देखणी दिसू लागली. गोरीपान, नाकेली नि अंगापिंडानं दणकट. तिचे गाल वर आले. आखेवरचं नि गालावरचं हिरवंगार गोंदणं गोऱ्या रंगावर उठून दिसू लागलं.

तिला देसायानं दोन म्हशी घेऊन दिल्या. ती नि तिची म्हातारी आई दुधाचा धंदा करून राहू लागली. हळूहळू तिच्या अंगावरचं लुगडं जाऊन छापीव रंगाचं पातळ आलं नि तिला तुकतुकीत कांती आली. देसाई नेमानं तिच्याकडं येत होता.

आम्ही पोरं त्या बोळात खेळत होतो. एकजण रोजगाऱ्यासारखा दिसणारा माणूस तिथं आला. चार दिवसांची दाढी वाढलेला, रानातल्या तांबूळ मातीनं

धोतर मळलेला, डोईला फाटून फाटून उरलेल्या पटक्याचे चार तिढे घातलेला, पण तरणा. खाली वघून दारातोंडालाच बसला होता. त्याच्या डोळ्यांतनं पाणी पडत होतं. पुरुष रडत असल्याचं पहिल्यांदाच मी पाहात होतो.

रडक्या आवाजात तो काहीबाही बोलत होता. त्यावरून कळून येत होतं, की तो तिचा नवरा आहे. त्याला दोन बारक्या मुली आहेत. त्यांना टाकून ही कागलात आईला घेऊन राहायला आली आहे.

तो तिला " पोटच्या पोरींसाठी तरी गावाकडं चल, " म्हणून विनवत होता. ती नकार देत होती. तरी आपल्या पोरींची चौकशी करत होती. बराच वेळ हे चाललं होतं. शेवटी ती म्हणाली, " देसाई कागलात आल्यात. तुम्ही जावा आता. ते यायचा वकूत झालाय. हे पोरींसाठी बारा रुपयं घ्या. जाताना त्येंच्या अंगांवर झगं घेऊन जावा. मला तिकडं यायला आता तोंड न्हाई. भाऊबंद मला जिती ठेवायची न्हाईत. तुम्ही जावा. "

तो दीर्घ उसासा टाकून उठला होता. जाताना तिनं दिलेले बारा रुपये त्यानं हळुवारपणानं चंचीत ठेवले होते. देसायाचा दरारा ओळखून तो असावा. दीड मणाच्या बेडया घातल्यागत पाय ओढत निघून गेला.

पुढं साताठ वर्षं गेली नि देसाई यायचा बंद झाला. तिला भरपूर भोगून कंटाळला असावा. मग ती मारुती कदमाला ठेवून कागलातच राहिली. मारुती-बरोबर विहिरीच्या फोडपाच्या कामाला जाऊ लागली. वर्षभरातच वाळलेल्या बाभळीगत झाली. सगळ्या रोजगारी बायांत मिसळून गेली.

विहिरीभोवतालच्या जुन्या खुणा आठवता आठवता मला ही आठवण होत होती. याच विहिरीचं फोडाप करून अधिक खोल करताना ती इथं कामाला येत होती. गाळानं माखून जात होती. मागचंपुढचं विसरून दगड चिखलाच्या बुट्ट्या नेत होती. ढिगावर टाकत होती.

तो गाळाचा आणि दगडांचा ढीग आता विहिरीशेजारी दिसत नव्हता. तिथं रान सफय केलं होतं....तरी मी जुन्या खुणा शोधत होतो. माझी खोप कुठं होती, जनावरांचा गोठा कुठं होता, घाणवड कुठं होती, चुलवाण कुठं होतं, खळं कुठं होतं, वैरणीची व्हळी कुठं होती हे सगळं अंदाजानं आठवत होतो. तिथं वावरणारं माझं जुनं शेतकरी रूप न्याहाळत होतो.

पण ते सगळं आता गाडलं गेलं होतं. बुलडोझर आणून सगळं बावीस एकराचं रान एक केलं होतं. बांध, झाडं, छोट्या पट्ट्यांच्या मालकांची त्या त्या बांधावरची खोपटं आणि त्यातले प्रत्येकाचे गाडग्यामडक्यांचे संसार नाहीसे झाले होते. सगळं एका पातळीत एक रान झालेलं. माझी नजर पुन:पुन्हा विहिरीकडं खेचली जात होती.

हिशोब भागवून काठी हलवत मास्तर माझ्यापाशी आले.

" काय पाहतोस विहिरीत वाकून वाकून ? "

" काही नाही. सहज आपलं बघतोय झालं. "

" सूर्य मावळायला गेलाय. चला आता, परत या. असंच मधनं नारळीच्या रोपांकडून जाऊ. "

" ....न्हाई मास्तर, ' सूर्य मावळायला गेला ' न्हाई. दीस बुडाय लागलाय. आणि ' नारळीची रोपं ' काय ! ' नारळीच्या वळीनं जाऊ या ' म्हणा. शेतकऱ्याची भाशा हाय ती. या मातीत असं कसं आळवावरच्या पाण्यागत बोलतासा ! "

मास्तरांच्या मागोमाग उसाकडनं मी नारळाच्या ओळीला आलो. झाडं जोमानं वाढताना दिसत होती. त्यांच्या बुडात भरपूर शेणखत घातलं होतं. दोन झाडांच्या मधलं रान उघडं दिसत होतं... माझ्या जुन्या मळ्याचीच माती; पण आता चांगली खतलेली होती. एक कष्टाळू शेतकरी-संसार तिच्यात गाडला होता. त्याच मातीवर जन्मभर पोसलेला त्यामुळं त्याचं खत चांगलं झालं असणार. माती सुखावली होती. खतानं तिचं गाल वर आलं होतं. नारळीची झाडं हिरव्यागार गोंदणागत उठून दिसत होती.

पलीकडल्या आवडातली खुरपण संपवून रोजगारी माणसं ओढ्याकडंच्या घराकडं एका ओळीनं, शिवल्यागत तोंड बंद करून चालली होती. कुणाच्या तोंडात कोळमसलेली तीनतीन दिवसांची शिळी पानं कात-चुन्याबरोबर कोंबलेली, कुणी नुसताच तंबाखू, तर कुणी चुनातंबाखू दाढेत धरलेला, कुणाजवळ दीसभराच्या कामानं बोलायला उत्साह नसलेला, कुणाचं गाल फक्त एक वेळच्या जेवणामुळं आत ओढून शिवल्यागत झालेलं...सगळी आठनऊ माणसं हाडांच्या सावल्या होऊन एका अज्ञात दोरीनं बांधल्यासारखी एकामागोमाग एक चालली होती. नुसती कष्टासाठी जन्माला आलेली जिवंत यंत्रं. जिवंत राहावीत म्हणून मास्तरांनी त्यांना बटवडा केला होता....शेती गेल्यानं रोजगारी झालेला माझ

भाऊही त्यातच नि मास्तरांनाच जमीन विकलेल्या बळ्ळाळाचा पोरगाही त्यातच. सगळ्यांच्या रक्तामांसांचा घाम होऊन तिथं गळत होता नि मास्तरांच्या बावीस एकरी शेतीला खत मिळत होतं. त्यातनं एक पांढऱ्या विजारीचा शेतकरी सुधार जातीच्या उसासारखा डंग उगवत होता.

उसासून मी त्या विजारीमागोमाग चाललो होतो. तोंडात काहीही नसताना माझंही तोंड परतीच्या वाटेवर शिवल्यागत झालं होतं नि पायांतही दीडमणाच्या बेड्या घातल्यागत वाटत होतं.

(पाणभवरे)

☆

७

आखरातल्या जागणाऱ्या रात्री

मधुकर केचे

कापसाचे दोन-तीन वेचे भरपूर येऊन जातात. मग पऱ्हाट्या कशा म्हशी-सारख्या भाकड होतात. सारे वावरच मुळी खट्ट्या बैलासारखे तेज गेलेले वाटते. सितादहीचे बोणे शिंतडल्या दिवसानंतर दोनेक महिने कापसाला 'हा' जोर असतो.

वावरे चांदी फुलल्यासारखी दिसतात. बोंडांतली रग बाहेर फुटून चमकते आणि डोळे दिपवते. पानांच्या हिरव्या आंथरीवर हे रानलक्ष्मीचे डोळे हिऱ्याप्रमाणे चमकतात; जोडीला असतात कांबोडीची पिवळी-लाल फुले. हिरवे हिरवे आकाश बोंडातून फुटलेल्या लसलसणाऱ्या नक्षत्रांनी नुसते भरून निघते आणि त्याच आकाशात रंगीत फुलांचे थवे इंद्रधनुष्याशी नाते सांगतात. पुढे पुढे तर कापसाचा जोर असा वाढतो की, पऱ्हाटीवरची हिरवी पानेच दिसेनाशी होतात. काही काळबंडून भुईभेट होतात. उरतो केवळ कापूस. त्याचे मस्त दोन-तीन वेचे होतात. मग कापूस संपलेले पऱ्हाटीचे सांगाडे तेवढे उरतात. अति भकास. त्यातही चाळू मालाचे झाड असते एरंडा-सारखे उंच ! ते कसेसेच वाटते. ते कसेबसे उभे असतात. जमिनीची मायाच तशी चिवट म्हणून तशाही अवस्थेत एकटीदुकटी हिरवी पाने त्या भाकड झाडावर आढळतात. पण त्या सरत्या हिरव्या हुंदक्यांना फारसे मोल नसते. सारे गाव मग ओळखायला लागते की आता उलंगवाडीचा महिना आला

आहे. बारकाजी सातपुत्यासारखा एखादा कंजुष तशाही झाडांवर एखाद्या उरल्या-सुरल्या बोंडातला पान्हा शोधण्याचा प्रयत्न करतो. नाही असे नाही. पण आसपासची वावरे उलंगल्यावर त्याच्या टीचभर वावराची सोकारी अवघड होऊन बसते. त्यात शेतीच्या उलंगवाडीचा महिना ठरवितात ते लोक नाहीत– मस्तवाल गुरेच आपल्या इच्छेने मग हुंदडायला लागतात. ती ढोरे एखाद्या वावरात एकदा शिरली म्हणजे ती उलंगवाडीच ठरते.

गावाजवळच्या शेतांची गोष्ट जराशी न्यारी असते. साऱ्या रानाची उलंग-वाडी होऊन दोन हप्ते होऊन जातात. पहिली वाही करण्यासाठी मग वखरणीला आरंभ होतो. तरीही गावाजवळचे मोठे आखर आपला हिरवा दिमाख सोडायला तयार नसते. ती जमीनच मोठी रंगदार आहे. इतर वावरांत बोंडयांची बोळकी झाली तरी आखरातल्या बोंडया मात्र शुभ्र हासत असतात. पानातला पाचू मुळी वाळायला तयार होत नाही. दुहेरी भाऱ्यांचे कुंपण अख्ख्या आखराभोवती असल्यामुळे मस्तातल्या मस्त गोऱ्यांचीही त्या दिमाखदाखवू हिरवेपणास खिजवण्याची हिंमत होत नाही. अजूनही कापूस फुटतच असतो व सारी ढोरे त्याच्यावर मनातल्या मनात दात खात उगीचच त्या भक्कम दाट कुंपणाशी खेटे घेऊन रक्तबंबाळ होत असतात.

आखराची उलंगवाडी अजून न झाल्याने नुसत्या गुराढोरांचीच अडचण होत नाही. खंबीत पांधणीपेक्षा या आखरातून सरळ बैलगाडया नेल्या तर साडेआठ वावरांचा वळसा वाचतो. आखर मोकळे झाले म्हणजे हा फेरा कमी होतो. त्यामुळे अंतोऱ्याची गुरेढोरेच नव्हे तर वाटेच्या छकडयाचे बैलही आखराच्या उलंगवाडीची वाट पाहतात. आणि अशा वाट पाहणाऱ्यांत विशेष संख्या असते गावकऱ्यांची. आखराच्या शेल्यावरच्या आंबराईवर तीव्र सुगंधाचे तुरे फुलतात, मग हळूहळू हिरवे दाणे धरतात; ते दाणे बोराएवढे मोठे होऊन त्यांना आम्रफळांचा निश्चित आकार येतो — तोपर्यंत उन्हाळा आपली सारी चिन्हे दाखवू लागतो. आखरालगतच्या परमसुखच्या वावरात कडब्याची गंजी रचली जाते. तो गूड चांगला तिमजली हवेलीहून उंच होतो. त्याला घेर धरून लहान लहान कास्तकारांचे खळे बांधले जातात. वासरा-बगारांसाठी वाडगी ठेवली जातात. म्हणजे आता उन्हाळ्याने पुराच जोर धरला म्हणायचा. तरीही आखर मात्र आपला हंगाम सोडण्याचे नावच घेत नाही. मग

मात्र घरात झोपणे अशक्य होणारी मंडळी वाणदुकान, वाढ्याचा कामठा, सातासतीची बिहीर–जिथेतिथे बसून आखराबद्दलचा जोरदार खल करतात. इतःपर जास्त वाट पाहणे त्यांना जमत नसते. मग त्यांतले काही मुखंड पाटलाकडे चकरा टाकू लागतात. पण त्याचे होते काय की आज मोठ्या आप्पाजीची भेटच होत नाही, उद्या होते तर इकडतिकडच्याच गोष्टींत मुद्दा वाहून जातो, परवा तो बारकाजीच तिथे येऊन 'मरतो'. हो, बारकाजीसमोर आखराच्या उलंगवाडीची गोष्ट काढणे बरे नव्हे. तो म्हणजे 'नक्की 'तली 'फक्की काढणारा' माणूस! जिथे आपल्या वावरातल्या बोंडयांत तो दिवसा कंदील लावून कापसाच्या दशा शोधणार तिथे मोठ्या आखरात तर कापूस बद बद हासून राहलेला. तेव्हा हे नक्की की बारकाजी मोडता घालणार. म्हणून अशा ना तशा कारणाने भेटी हुकतात. अखेर एक दिवस मोठ्या आप्पाजीसमोर गावातले पाचसहा जण बसतातच.

"काय महादेव, कुणकडे आलता?"

"नाइ, येरीच आलतो. मनलं मोठ्या आखरात अवंदा काय पेरनार आहा––"

"लमच्या, तुंले आतापासून काऊन रे इचार पडला?"

"तसं काई नाई. पर मनलं, गहू पेरत असान तं मी जोलवाडीवाल्याइचा होका घेत नाई...."

"बापा, तू मोठा होकेवालाच लागून गेला का नाई? तुले तं बलावन्यावर बलावने येत असतीत जोलवाडीवाल्याइचे?" खरी गोष्ट अशी आहे की जोलवाडीवाल्याचे नावही मोठ्या आप्पाजीसमोर शहाण्याने काढू नये. झगडयाला ही पाचवी पिढी चालू आहे. त्यामुळे महादेवची शिष्टाई पाण्यातच जाणार.

मग जराशाने मोठे आप्पाजीच महादेवला सांगतात,

"म्हाद्या, अवंदा मोठ्या आखरातली पऱ्हाटी पाह्यली तुवा?"

प्रश्नाचा रोख नीट न समजल्याने महादेव अनेक अर्थी मान हालवतो.

"लमच्या, तुहे डोये फुटले काय? आरे कांबोडी असून तुह्या डोक्शाच्यावर वाढली ना व्ये! माहा इचार काय हाये ऐक...."

मग पाटील डोळे मिचकावून मिस्किलपणे महादेवच्या निमित्ताने साऱ्या

मंडळीलाच सांगतात,

" थे पन्हाटी पुढच्या वर्षीपर्यंत ठिवली तर पुन्हा बोंडं धरतील असे यागरी–कलचेरचे साहेब म्हणत होते. माहीही विच्छा थेच हाये. "

येथे सारे प्रश्न संपतात. उन्हाळ्यात उघड्यावर झोपण्यासाठी आता मोठ्या आखराची आशाच सोडलेली बरी. मंडळी चूपचाप उठल्यासारखे करतात तसे मग मोठे आप्पाजी एकाएकी हासून उठतात. ' आता तुम्ही असे का हसले ? ' हे विचारण्याची हिंमत वाड्यात कोणालाच नसते. तेव्हा मग दाराशी बसलेल्या गोंद्या कोतवालास हासण्याचे कारण विचारण्याची सक्ती खुद्द आप्पाजीच करतात. आणि मोकळ्या मनाने सांगतातही.

" कशी जिरवली लमच्याची ! बेटे आले होते एका हेतूनं. दाखोतेत दुसराच. आता गावातल्या पोट्ट्यापाट्ट्याइले निजाबसासाठी मोठं आखर मोकयंच पाह्यजे हे मले काय समजत नाई ? पन मनलं जरासीक तेइची गंमतच कराव. का गा, कशी राह्यली ? "

गोंद्या मग सोयीसोयीने ती बातमी गावात उघड करीपर्यंत मोठ्या आप्पाजींनी कुंपण खोद्दन गुराढोरांना मोकळीक दिलेली असते. जवळ पडते म्हणून गावातल्या बाया मजुरी न घेताच पन्हाट्या उपटून घरी नेतात आणि आखर खऱ्या उघड-पणाने शोभू लागते. मारवाड्याच्या दुकानासमोरचा तख्तपोस चारसहा लोक उचद्धन आणून आखरात ठेवतात. तसे काही करायला मारवाड्याची परवानगी ध्यावी लागत नाही. परमसुखाच्या आज्यापासूनचा हा रिवाज आहे. तेवढ्यात येतेजाते छकडेही पांधण सोडून सरळ आखरातून चाकोरी करतात. केवळ दोनतीन दिवसांत तिथे हिरवी पन्हाटी होती की नव्हती असा देखावा दिसायला लागतो. दिवस आंबरसाचे म्हणून लेकीबाळींनी भरलेले छकडे भरधाव जातात–येतात. धावणाऱ्या रेंग्यामागची धूळ तेवढी माहेराच्या ओढीसारखी धुंदपणाने उंचावत आकाशाकडे चढते. असे हे आखर मग लोकांच्या आटोक्यात येते.

काही आजारीपाजारी आणि काही मुळातच सकवार असलेले लोक सोडले तर निदान निम्मातरी गाव मग रात्रीला आखरात सापडतो. आधीचे महिनेच असे गडबडीचे गेलेले असतात की कणसे खुडणे, मळणी करणे, सोकाऱ्या या धांदलीत कोणी कोणास नमस्कारापलीकडे भेटतच नाही. त्यामुळे एका गावात राहूनही एकमेकाला परके असल्यासारखे लोक एकमेकांच्या दूर असतात.

असे हे दूरपण सहन करायला आम्ही गावेवाले काय मुंबैकलकत्त्याचे पब्लीक थोडेच आहोत ? म्हणून आखरात झोपण्याचा महिना येण्याची वाट जो तो पाहात असतो. शक्यतो येथे झोपण्याकडेच प्रत्येकाची ओढ असते. आता त्यालाही अपवाद नाहीतच असे नाही. पण तशा ' नसान्या ' माणसांकडे कोणी लक्ष देत नाही. काही असतात, त्यांना लवंग खाल्ली तर उष्णता होते अन् दोडा खाल्ला तर ताप येतो. अशी माणसे आखरात झोपायला न आली तर पाप कटले !

आखरात झोपणारे लोक मोठे बाणीचे हवेत. कच्चापच्चा माणूस तेथे झोपणे म्हणजे अवघ्या इतरांना नुसती तकलीफ. त्या सत्याग्रहाच्या साली अशीच गंमत झाली. तो सावकाराचा मुंगण्या (त्याचे खरे नाव बहुतेक शाळेच्या हजेरीपटाला माहीत असेल. आम्ही त्याला मुंगण्याच म्हणतो.) एक दिवस आखराची हवा खायला आला. अर्ध्या रात्री एकदम किंचाळायला लागला. काय तर म्हणे त्याला स्वप्नात ' हवा ' दिसली होती. झोटे सोडलेली, भरल्या कुंकवाची एक कराल बाई त्याला हाताने खुणावून बोलावत होती. सुधमुंध त्याच्या विहिरीत जीव दिलेल्या चुलतीसारखी ती दिसत होती म्हणे, झाले ! नंतर पुऱ्या घातीत त्या आखरात कोणी निजण्याचे धाडस केले नव्हते. मग मुद्दाम मोठ्या आप्पाजींनी त्या आखरात वट्टीबुवाचे कीर्तन घडवले व शुद्धी शांती केली तेव्हा कुठे सर्वांचा दमदमा बसला.

त्यानंतर तसे काही घडले नाही पण धास्ती म्हणजे धास्ती. म्हणून मंडळी जरा पक्क्या पिंडाची असली तरच तेथे येते. गौरव असा की असे पक्के लोकही गावात निम्मेशिम्मे आहेत. उगीच नाही इथले कुणबी रजपुतांशी देठ लावत.

आखर अशा पक्क्या लोकांनी गजबजलेले पाहिले म्हणजे डोळे धन्य होतात. निदान बुढीचे खाटले आभाळाच्या खालच्या अंगाला कलंडेपर्यंत ही मंडळी झोपत नाही. ते तेथे झोपायला आलेले नसतातच. रामकुस्ना भुजाड्या पहिलाच कुंभकर्ण. तो मात्र जसा आला तसा तख्तपोसावर ताणून देतो. अनेकदा तर तो झोपेतच चालत येतो. त्याच्या जोडीला अनपुरना झाडपीनचे पोट्टेपाट्टे येतात. ते बेवारश्यासारखे कुठे व कधी झोपतील त्याचा नेम नसतो. रामकुस्ना व ते पोट्टे यांनीच पुष्कळदा तो तख्तपोस भरून जातो. आणि काय ते झोपणे ! रांगोळी काढल्यासारखे ते हेंगाडेतिंगाडे पसरतात. नाही म्हणायला झाकटीतच

औत धरायला उठणारे पाचदहा लोकही जरा गोष्टीमाष्टी करून डोळे मिटतात. ते स्वतः जांभया देतादेताच इतरांनाही बजावतात, " पोट्टे हो, मरना आता लवकर. आता कितीक गोष्टी करान ! गोष्टी गोष्टी मेला कोष्टी ! "

पण त्याच्या या गाऱ्हाण्याकडे कोणाचेच लक्ष नसते. झोपणारे झोपतात. जागणारे जागतात. पहिल्यांदा हे थोडेसे अवघड जाते. काही झोपले आणि काही जागले हा भेद तितकासा बरा वाटत नाही. जागणारांचा त्रास झोपणारांना होतो. आणि झोपणारांचा (' हो, झोपणाऱ्यांचाही – आम्ही एवढे जागत असताना ते बेटे बादशहासारखे झोपतात म्हणजे काय ?) त्रास जाग्या मंडळीस होतो पण आता ही अनेक उन्हाळ्यांची ठरूनच गेलेली गोष्ट झाली.

जागणारी मंडळी नुकतीच तशी जागत नाही. आता घासलेट महाग आहे ही गोष्ट खरी. पण आळीपाळीने पाचदहा घरांचे कंदील आखरात जळतात. त्या उजेडात मग लांडीस, पाच तीन दोन, बीग फूल वगैरे रंगते. चांदणे असले म्हणजे तशा कंदिलांचीही गरज नसते. पत्ते खेळूनही दमले तर दमड्या बोपच्याची ढोलक येते. दमड्या घरी नसला तरी त्याची ढोलक ही गावाची मालमत्ता. दमड्याला हे अर्थातच मान्य नाही. मागच्या दंढारीत ढोलकीचे पान फुटले तर कोणी दुरुस्तीसाठी दिडकी दिली नाही. पण अशा आठवणी स्वतः दमड्यापलीकडे कोणीच ठेवीत नाही. दमड्याने जर ढोलक तशी नाही दिली तर त्याला प्रथम झोपू देतात. मग तर आणू देईल की नाही ? एकदा ढोलक आली की लावण्या रंगतात. आता पुऱ्यापुऱ्या लावण्या आठवायला ही काही दंढारीची जागा नव्हे. सहज आपली मन-करमणूक करायची. त्यामुळे ' आधी नमन गौरी गणपती ' वगैरे बऱ्या तऱ्हेने निभले तरी ' भावाबहिनी 'ची लावणी काही पुरी जमत नाही. ' घोडं फसलं गाऱ्यात । चिखलदऱ्याच्या नाल्यात ॥ ' वरून लगेच ' खंडीभर चरणे ' बाद करून ' भाऊ गेला बहिनीच्या भेटीला ! भाऊ गेला बहिनीच्या भेटीला ' अशी ती ऐन मध्यावर येऊन तुटते. तेथे लावणीची तालीम करणे हा हेतू नसतो. त्यामुळे त्याच ढोलकीवर एखादा मामुली आवाजवाला गडी आष्टीचा पोवाडाही अर्धासा म्हणून जातो. तो मात्र बऱ्या-पैकी रंगतो.

' एकोनीस्से बेचाळीसाला । आठा आगस्टाला । मुंबै शहराला । मिटंग भरली । दादा हो जी रे जी जीऽऽजी. '

पुष्कळदा तर झोपलेली मंडळीही अशा वेळी उठून बसून त्या जगप्रसिद्ध घटनेची आठवण पोवाड्यातून घोळवतात. पोलिसांनी जबरदस्तीने नेले होते हे खरे असले तरी देशासाठी जेल भोगून आल्यापासून चंद्राजी वाघमारे मोठाच भाविक झाला आहे. तो मग अंगात सारा सत्याग्रह संचारल्यासारखा मंडळींच्या पुढे आगूल धरून गाऊ लागतो,

'हे पाह्यलं तिथल्या गोऱ्यानं । भुऱ्या केसानं, पांढऱ्या पायानं । तार त्यानं पाठोली दिल्लीला । हुकुम मागे पुढारी पकडण्याला ॥ हो जी र जी ॥'

हा झाला आखराचा बैठा कार्यक्रम. पण जागणारी मंडळी नुसती अशी बैठी नाही. त्या ढोलकीच्या तालावर शेस्या नाचू लागतो. शेस्या काही दंढारीतला नाच्या नव्हे. तो मोहरमचा वाघ नाचत असतो. आता खास शृंगारिक लावणीवर शेस्याने वाघासारखे नाचावे व अब्दुल, हमजू यांनी त्याला साथ द्यावी, हे काही ठीक नव्हे; आखर जागृत ठेवायचे म्हणजे असे थोडे फार आलेच. उत्तम किंवा परशा यांतले कोणी असले तर नेसत्या धोतराचाच पदर डोक्यावरून घेऊन खास मंडळीच्या मानाखातर दंढारीचा नाचही तेथे रंगतो.

पुंडलीक पाटील आखरात झोपायला असले म्हणजे मात्र मजेला पार नाही. त्यांचा आखर प्रवेशही मोठाच नाट्यमय असतो. अशा त्या शांत वेळी पुंडलीक पाटील एकदम घरून धावत येतात आणि झोपलेल्यांपैकी एखाद्याच्या अंगावर धाडकन कोसळतात. मग त्या दचकून जागे झालेल्यांच्या किंचाळण्यापेक्षा कोसळण्याच्या आवाजानेच सारी मंडळी जागी होते. तरीही तेवढ्या अवधीत पुंडलीक पाटील गडबडून फिरून दोनचार माणसांना तुडवतात. तेथूनच खरा खेळ सुरू होतो. ही जागी झालेली मंडळी मग एकदम दुसऱ्या रात्री झोपतात. हुतुतू, खोखो, नुसतीच शिवाशिवी हे सुरू होते. त्यातही कंटाळा आला तर चरणारी गाढवे पकडून त्यांवर सवार होण्याचाही कार्यक्रम रंगतो.

खरे म्हणजे आखराच्या अफाटपणाला पुंडलीक पाटलांनी सुरू केलेला हा आडदांड कार्यक्रमच खरी शोभा आणतो. मिळमिळीत गुळगुळीत असे मामुली जीवन जगणाऱ्यांसाठी हे आखर नसतेच मुळी !

हे आखरातले जीवन 'रफ' 'रस्टीक' वगैरे समजून त्याला रीमोल्ड करण्याचा एक प्रयत्न एका समाजसेवकाने केला होता. या आखरात त्याने कुठल्या तरी 'वसंत व्याख्यानमाले'चे पिल्लू म्हणून एक कार्यक्रम सुरू केला. पहिल्या

दिवशी लोकांना जरा गंमत वाटली. दोनतीन चमचम गॅसबत्त्या तेथे ठेवल्या गेल्या. टेबलखुर्ची आली. मोठ्या दोन सतरंज्या तेथे टाकण्यात आल्या. बाहेरगावच्याच दोन बऱ्या गळ्याच्या पोरींनी वंदे मातरम् वगैरे म्हटले. आलेल्या पाहुण्या वक्त्यांनी चीन, रशिया वगैरे देशांची नावे भाषणात आणली. या गावच्या मंडळींनी ती निमूटपणे, कळत नसूनही ऐकून घेतली; पण नंतर त्याचा कंटाळा आला. पुढे पुढे तर श्रोतेमंडळी त्या सभेच्या सतरंज्यांवरच आडवी होऊ लागली. 'बसूनच काय आइकता येते अन् जरा रेटून पडून आइकले तर काय शब्द नाकात जातेत काय?' असा खडा खडा सवाल करून बहुतेकच जण पडल्यापडल्या चिंतन केल्यासारखे बाह्यसंज्ञाशून्य व्हायला लागले. त्या समाजसेवकाने त्या मंडळींस, समाजस्थितीस, भारतास व एकंदर जगासच दोष देऊन हा प्रयत्न थांबवला तेव्हा कुठे मग मंडळी तृप्त व शांत मनाने पुन्हा आपली नेहमीची हुंदड करायला लागली. प्रत्येकाला तेव्हा कसे सुटल्यासुटल्यासारखे वाटले!

चांदण्यात व काळोखात अशा जागत्या रात्री घालवणारे ते आखर एक दिवस दुसऱ्या वखरणीच्या दिवशी रूप पालटते. तिथल्या त्या पक्क्या मंडळींस मात्र त्या बदलाचे काहीही नसते. मोठमोठे ढिवले मातीतून वर फेकीत वखरणी या खाटा, तख्तपोशीच्या जवळ येते. 'आहे झालं ही वखरणी!' एवढीच फक्त जाणीव त्यामुळे लोकांना येते. दरम्यान लहरी पावसाने एकदोनदा झोपणारांची झोप व जागणारांची जाग मोडलेली असते. त्याच्यापासूनही हे लोक बोध घेत नाहीत.

पण ही मंडळी जरी सर्व विसरली असली तरी पावसाळा त्यांना विसरत नाही. तो आपला कधी थेंबाथेंबांनी, कधी उग्र वादळांनी आपली जाणीव करून देतो. झोपणारांची संख्या मग थोडी थोडी रोडावते.

एक दिवस आखराला पुन्हा कात्याचे दुहेरी कुंपण भरले जाते. झोपणारे तरीही तेथे येतात, पाऊस फारच झोडपीपर्यंत निजून पाहतात.

एक दिवस आखरात पेरणी होते. एक दिवस आखराला फाटक लावले जाते. एक मदाड्या व बेबुद्ध चेहऱ्याचे कसेचेकसेच कुळप फाटकाला ठोकले जाते. मग हे आखर आपले कोणीच नव्हे अशा वृत्तीने लोक तिऱ्हाईतपणाने त्याच्या समोरून पांधीच्या रस्त्याने जाणे येणे करतात. पऱ्हाटी अथवा जवारीच्या नव्या अंकुरांच्या कौतुकात आखरही मग उन्हाळी गमती विसरते. बैलगाड्यांनी केलेला

रस्ताही मग त्या आखरात दिसेनासा होतो. पुढच्या उन्हाळ्यापर्यंत हे विस्मरण, हा तिऱ्हाईतपणा असाच चालणार असतो.

गावातले लहान लहान पोट्टेपाट्टे मात्र तशाही स्थितीत आखराचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या सोबत्याला सांगतात—

" आमी कानी लेका, या आखरात झोपो. खरंच लेका, भल्ली मजा ये त्या वाक्ती. "

(आखर आंगण)

८

८

खडकावरची म्हातारी

शिवाजीराव सावंत

माझ्या गावापासून दीड-एक मैलावर 'रामतीर्थ' नावाचे एक नयनहर स्थान आहे. हिरण्यकेशीच्या पात्रप्रवाहाचा, दहा-वीस हात खोलावा असलेला, घरघरता धबधबा तिथे अखंड कोसळत असतो. कुठल्या अनादी युगातले आहेत कुणास ठाऊक, पण काळीशार झिलई असलेले, हत्तींच्या माटाचे प्रचंड कातळ तिथे मुक्त पहुडलेले आहेत. धबधब्याला धरून चहूबाजूंनी आभाळवेड्या उंच झाडांची गर्द हिरवाई पसरलेली आहे.

रामतीर्थावर जाऊन गर्जत कोसळणाऱ्या, फेसाळत्या धबधब्यात उड्या घालणं हा माझा अत्यंत लाडका छंद ! तिथल्या विस्तीर्ण कुंडात पोहणीला पडून वरचं निळंभोर आभाळ बघताना वाटतं की, पृथ्वीचा जन्म नुकताच झालेला आहे. आपण तिच्यावरचा पहिला मानव आहोत ! भोवतीच्या प्रचंड, काळ्या कातळातून आपण बाहेर आलो आहोत ! मनसोक्त डुंबणीला पडलो आहोत. थोड्या वेळाने आपण पाण्याबाहेर पडणार आहोत. ताज्या उन्हात खरपूस पाठ तापवून घेणार आहोत, नि पुन्हा काळ्या कातळात निघून जाणार आहोत !...

या रामतीर्थाच्या वाटेवरून जाताना उजव्या हाताला, एक घोड्याच्या नालेच्या आकाराचं मोठं ऐटबाज वळण लागतं. त्या वळणावरच्या टेकडीवजा उंचवट्यावर एक साधं घरकुट दिसतं. निम्मं कौलारू, अर्धं गवताळू. त्या घरकुटासमोर दोन-चार रवंथ करत पसरलेली कुणबाऊ बैलं, माना वाकड्या करीत, क्षणात ओट्यावर,

क्षणात पिंपरीच्या बुंधावर, क्षणात बैलगाडीच्या जुवावर अशी उडया मारणारी बकरीची करडं, मानेचं शिंग ताणून बांग देणारे कोंबडे, राखेच्या उबारीला मुटकळ्यात जीवनाचा अर्थ हुंगत बसलेलं काळंबाळं कुत्रं असा नजारा दिसतो. त्या घराला सगळे गाववाले ' खडकावरच्या नायकाची झोपडी ' म्हणतात.

त्या नायकाच्या झोपडीत एक म्हातारी होती. आता ती गेलीय. पण रामतीर्थाच्या आठवणीबरोबर तिच्या कुणबाऊ, निचळ स्मृतींचा धबधवा माझ्या मनात कोसळत राहतो.

समोर तिला आम्ही ' मामी ' म्हणत असू. पण तिच्याबद्दल कुणाला काही सांगायचं झालं की तिचा उल्लेख आम्हाला नकळतच आमच्या तोंडून " खडकावरची म्हातारी " असा व्हायचा ! आजही मला तिचं नाव माहीत नाही.

मी बघत आलो तशी ही म्हातारी जशीच्या तशी होती. जोंधळ्याच्या शेताच्या बांधावर चांगली दोन-तीन वर्षे टिकून राहिलेल्या तुरकाटीसारखी ! शिडशिडीत, गोंदल्या हातांची, कपाळी आडव्या कुंकवाची बोटे घेतलेली, सुताडी लुगडं नेसणारी, डोकीवरच्या चुंबळेवर सदा एक पाटी असलेली. पान खाणारी (पण जिला पिंक, पिचकारी टाकताना मी कधीच पाहिले नाही) अशी.

रामतीर्थाच्या धबधब्यात यथेच्छ डुंबून आम्ही चढलेली उन्हं माथ्यावर घेत घरी परतू लागायचो. आमच्या दाढेखाली हिरवेकंच रानआवळे फुटत असायचे. ' खडकावरच्या म्हातारी ' ची झोपडी आली की तहान, आतडी आणि घशात उसळ्या घेऊ लागायची.

झोपडीच्या कवाडात राहून मी म्हातारीला सादवायचा. " मामेSS ! "

" क्कोन हाय ? आलू ल्येका ! " आतल्या अंधारातून शब्दांचा सुगंध बाहेर यायचा.

" मी शिवबा, पाणी दे जरा. " माझा जीव पाण्यात डुंबला असला तरी तहानेनं कासावीस झालेला असायचा.

" दमाखा. " म्हातारी स्वच्छ पितळी तांब्या शिगोशिग भरून घेऊन यायची. तांब्या हातात घेऊन तो तोंडाला न लावता मी नरडयाच्या घाटीत पाणी सोडण्याची घाई करायचा. आणि नेमकं सपकारा मारल्यासारखं पाणी थोबाडावर शिवरून पडायचं. त्या थंडगार स्पर्शानं बरं वाटायचं. पण पोटातली तहान उफाळून यायची !

" आन. " म्हणत म्हातारी तांब्या पुन्हा आपल्या हातात घ्यायची. धारेनं पाणी सोडू लागायची. मी हातांची पन्हाळीसारखी ओंजळ करून पाणी पिऊ लागायचा. पहिल्याच घोटावरोबर, आवळे खाल्ल्यामुळे पाण्याची मधुर चव तोंडात फिरत असतानाच त्याहून मधुर असे म्हातारीचे बोल कानांवर पडायचे. " कुटं हुंदाडतिसात माज्या वासरांनू ? तू आंबराईतला न्हवं ? दादांचा ल्योक ? वा ग्येला नि काय हाल रं तुमचं ! हा. दमानं प्ये. "

दादांची–माझ्या वडिलांची आठवण तिच्या तांब्यातील धारेसारखी अज्ञाताच्या कलशातून झिरपू लागायची. पाणी पिऊन तृप्त झालेला मी म्हातारीकडं पारखून बघायचा. ऐतिहासिक नाटकं बघितल्यामुळं असो, गडकिल्ले पाहिल्यामुळं असो, मला उगाचच वाटायचं, " शिवाजीराजांची जिजाऊ अशीच असेल काय ? छे. जिजाऊ गोरी असली पाहिजे ! मग ? जिजाऊच्या दासींपैकी कुणीतरी हिची जोड होईल. "

" मामी, शंकर कुठाय ? " मी म्हातारीच्या मुलाची चौकशी करायचा. शंकर हा म्हातारीचा शेवटचा मुलगा. शेंडेफळात आईबापांचा जीव किती मजेदार पद्धतीनं अडकलेला असतो याचं शंकर हे नमुनेदार उदाहरण होतं. शंकर हा म्हातारीचा ' शाळकरी ' असा एकटाच मुलगा. बाकीचे सगळे नांगरगट्टे.

शंकरच्या चौकशीबरोबर म्हातारीच्या शेवाळी डोळ्यांत कसली तरी विलक्षण शिकल उतरायची. शंकर आपल्या डोळ्यांसमोर असल्यासारखी म्हातारी म्हणायची, " त्येची शिकवन हाय. तकडं ग्येलाय त्यो. ईल आत्ता. वाटंत वी नदरं पडल तुज्या. "

म्हातारीच्या झोपडीसमोरच्या डेरेबाज पिंपरीच्या सावलीत उभं राहताना मला वाटायचं, " ही नायकाची म्हातारी या गारेगार सावलीसारखीच आहे. लोटक्यात लावलेल्या घट्ट गोड्या दह्यात तिनं आपली जबान बुडवून काढली असावी ! "

म्हातारीचा नवरा बाळा नाईक. बावनकशी कुणबी. हातछाटीचं मुंडं, पटका आणि तुकारामबुवांचा चित्रात असतो तसा धोतराचा घेर हा बाळामामाचा पेहेराव. बाळामामा आमच्याशी कधीच काही बोलायचा नाही. शतकं न् शतकं जणू तो शिवारातल्या मातीशी बोलत आला होता ! आणि आता कुठं खऱ्या मनच्या बोलण्याला तोंड फुटलंय अशा अंदाजानं ' बाळामामा ' कशात तरी हरवलेला असायचा. काही इंग्लिश नट्यांच्या डोक्यावरच्या झुलपांना असते तशी तांबूस,

सोनेरी केसांची लव बाळामामाच्या हातापायांवर होती. शाळूच्या लुसलुशीत दिवसांत, कोवळ्या उन्हाच्या तिरिपेत ती लव चमकताना बघून मला एक मजेदार विचार सुचायचा. " बाळामामा खरा–कुणबी आहे. आपल्या शेतातील लाल मातीशी त्याची एवढी दाट गट्टी जमली आहे की, त्या लाल मातीनं ही तांबूस रंगाची घोंगडी त्याला बहाल केलेली असावी ! "

म्हातारीला ' खडकावरची म्हातारी ' म्हणत असले तरी सारे बाळा नायकाला मात्र ' बाळामामा ' म्हणायचे. कधी गावात आला, आणि बाजारहाटाची पिशवी आपल्या घराकडं पाठवायची असली की रामतीर्थाकडं जाणाऱ्या माणसाला थोपवून खुद्द बाळामामाच म्हणायचा, " खडकावरल्या म्हातारीचं घर ठावं हाय न्हवं ? एवडी थैली देतासा का म्हातारीच्या हातात ? "

म्हातारीच्या घरासमोर थोड्या पल्ल्यावर एक पाणंद आहे. त्या पाणंदीच्या मावळतीला लागून एक देवळाची छोटेखानी घुमटी आहे. ' तुकाई ' हे त्या देवीचं नाव. म्हातारीच्या शिवाराला लागून एका बगलेवर तुकाई किती वर्षं उभी आहे कुणास ठाऊक. म्हातारीचा जाम विश्वास होता, ' तुकाई शिवारातल्या जित्रापावर नदर देती ! '

दर दसऱ्याला तुकाईसमोर बकरं पडायचं. डोकीवर चिवाट्यांच्या बेळांची, शेणसारवण केलेली पाटी घेऊन ' खडकावरची म्हातारी ' खंडेनवमीचं आमंत्रण द्यायला माझ्या घरी यायची. माझ्या आईशी ती नेहमी खास मनाच्या कप्प्यातलं बोलायची. अंगणात उभी राहून ती आईला हाक घालायची, " व्वैनीऽ, जरा भाहेर येवा. "

आई बाहेर गेली की त्या दोघींच्या अंगणातच गप्पा जमून यायच्या. म्हातारी ' खंडेनवमीच्या निवेदाचं आवतन ' द्यायला आलो आहोत हे विसरायची ! आपल्या शंकरचं ' शिक्षांन ' कसं करावं याचा सल्ला विचारताना म्हातारी आपली शेतीवाडी, घरशेकरणी सारं सारं विसरलेली असायची. आई तिला घरात नेऊन चहा द्यायची.

" येतो वयनी. " म्हणत म्हातारी माझ्या घरासमोरच्या कंपौंडाच्या फाटकापर्यंत जायची आणि पुन्हा परतायची. " बघितलासा वयनी, तरकंतच न्हात न्हाई, लेकरांस्नी तुकाईच्या निवदाला खडकावं लावून देवा सांग्याला. "

तुकाईचं देऊळ दीड-एक मैलावर असल्यामुळं माझी भावंडं जायला

कुरकुरायची. मी एखादा जोडीदार घेऊन, चिंचेच्या हिरवा पिसारा फुलविलेल्या डेरेदार झाडांच्या राईतून 'तुकाई'च्या घुमटीजवळ यायचा.

वडाच्या पानांच्या पत्रावळीवरचा 'निवेद' घोंगडीवर बसून खाताना कसली तरी आगळीच 'चव' तोंडात रेंगाळू लागायची.

म्हातारीची देवस्कीची कल्पना खरोखरच अनाकलनीय होती. दर अविधवा नवमीला ती बाजारात येऊन दोन नवी करकरीत लुगडी खरेदी करायची. श्रीपाद भटजीला गाठून खडकावर यायला निरोप द्यायची. पूजेचा सगळा साज पाटीत भरायची. श्रीपाद भटजीला बरोबर घेऊन हिरण्यकेशी नदीवर यायची.

भटजी एकसारखे मंत्र पुटपुटू लागायचा. म्हातारीनं पाळलेला 'महादू' नावाचा गुराखी बच्चा लंगोट कसून तयार व्हायचा. भटजी सांगेल तशी म्हातारी हिरण्यकेशीवर हळदी-कुंकू-फुलं सोडायची. जोड दिलेल्या दोन्ही लुगड्यांची घडी हातात घेऊन भटजी म्हणायचा,

"हां. ह्याला हात लावा म्हातारबाई." म्हातारीनं लुगड्याच्या घडीला हात लावला की भटजी त्या घडीचा एक शेव महादूच्या हातात द्यायचा. महादू पाण्यातून एक हात चालवीत पोहत पलीकडे जायचा. दुसऱ्या हातानं त्यानं लुगड्याचा शेव पाण्याला भिडणार नाही असा उंच धरलेला असायचा.

पलीकडं गेलेल्या महादूला भटजी खूण करायचा. वरचा निळाभोर आकाश-पुरुष आणि खाली खळाळ उड्या घेत धावणारी जीवनवेडी हिरण्यकेशी नदी यांच्यामध्ये भटजी आणि महादू लुगड्याचा अंतरपाट धरायचे! तो दोन तीन वेळा लयीत वरखाली करायचे. भटजी आकाशाकडं बघत काहीतरी गडबडीत पुटपुटायचा. आणि महादू आणि भटजी झेपावत्या हिरण्यकेशीला क्षणभर का होईना गावाच्या वेशीत थोपवून तिला 'लुगडं' नेसवायचे!

अधाशासारखी हिरण्यकेशी लुगड्याचा आहेर कवटाळून घेत धावू लागायची. तिच्या पात्रातून दूरवर वाहत जाणाऱ्या लुगड्याच्या पिळ्याकडं बघताना 'खडका-वरची म्हातारी' पाझरू लागायची. तिचं साधंसुधं कुणबाऊ काळीज डोळ्यांच्या पायवाटांनी सुरकुतल्या गालांवर उतरू लागायचं.

श्रीपाद भटजीनं दिलेला नारळाच्या खोबऱ्याचा प्रसाद खात म्हातारीकडं बघताना मला प्रश्न पडायचा, 'म्हातारी का पाझरली असावी?' तेव्हा त्या प्रश्नाचं उत्तर मला कधीच मिळालं नव्हतं. आज ते सापडलंय.

खण-नारळ आणि लुगड्याचा 'अहेव' आहेर घेऊन धावणाऱ्या नदीला बघताना म्हातारीच्या मनात विचार येत असले पाहिजेत, "माजं धनी हाईत तवरच माज्या ध्याईचा तरवा तुज्या काटाला पेटू दे! तुज्यावानी भरल्या मळवटानं नवऱ्याकडं बघत, तुज्या बगलंला पडू दे!!"

हिवाळ्याच्या दिवसांत हॉलीबॉल खेळून आम्ही संध्याकाळचे देवदर्शन करून परतू लागलो की दुधाचा रतीब घालायला आलेली म्हातारी मला वाटेवर दिसायची. मला बघून ती आपोआपच रस्त्याच्या कडेला थांबायची.

सोबतीच्या खेळाडूंना सोडून मी हळूच रस्त्याच्या कडेला म्हातारीकडं जायचा. मी तिची विचारपूस करतो आहे तेवढ्यात तिच्या डोकीवरची पाटी खाली यायची. मांड्यांवर पाटी तोलून धरून म्हातारी चवळीच्या कोवळ्या शेंगा बचकभर माझ्या ओंजळीत ठेवताना म्हणायची, "आता मोटी झालासा तुमी बाबांनू! कदी खडकाकडं पाय वाकडं व्हत न्हाईत तुमचं. घे."

तिनं दिलेल्या चवळीच्या शेंगा भर रस्त्यावरून खात जाताना मला कशाचंच भान उरायचं नाही. वाटायचं, या म्हातारीचं आणि आपलं कसलं तरी गुंतवा झालेलं नातं आहे. कसलं ते काही कळायचं नाही.

शंकर या 'शेंडेफळात' म्हातारीचा जीव टांगणीला लागलेला असायचा. आपल्या शंकरनं चांगली कापडं घालावी, बुकं वाचावी, 'लई मोट्टं व्हावं' असं म्हातारीला वाटायचं. त्यासाठी ती उरात गावरान माया भरून जिवाचा आटापिटा करायची. बाळामामाला सासूद लागणार नाही अशी डोकीवरच्या पाटीत चार-एक पायली भात भरून घेऊन ती माझ्या आईकडं येऊन म्हणायची, "बयनी, वाईच नड हाय. संकरला पैकं होवं. एवडं भात घ्येवा नि ईस रुपये द्येवा." तिचं ते, काळाला आपल्या गोंदल्या हातांनी पकडू बघणारे बोल ऐकले की मी कुठंतरी खोलवर गलबलून उठायचा.

"मामी पैसे घेऊन जा. भात कशाला त्याबद्दल? शंकर काही परका नाही. माझी जशी चार आहेत तसाच तो पाचवा." आई म्हातारीला स्त्रीपणाचा आधार देऊ बघायची.

"तसं कसं? तुमचाबी सौंसार हाय. घराला कर्ता मानूस न्हाई. ह्ये भात घानवट न्हाऊ द्या होतर तुमच्याकडं!" खूप पावसाळे वाहून जाताना बघितलेली म्हातारी, वनवासातल्या कुंतीसारखी शहाणपणाचं बोलायची.

शंकर शिकतोय हे त्याच्या भावजयींना मानवायचं नाही. त्या शंकरला आड-पडद्यानं घाल्दून-पाडून बोलायच्या. त्यांच्या बोलण्याचे वळ म्हातारीच्या सुरकुतलेल्या काळजावर उमटायचे.

" भवान्या माज्या लेकराला सुखाला लावायच्या न्हाईत वयनी. एकदा ह्या पोराचं हात पिवळं क्येलं म्हंजी ह्या हाडाचं खत शिवारात टाकाया मोकळं जालं बगा. " म्हातारी आपल्या मनाच्या कणसाचे कितीतरी पापुद्रे आपल्या कुणबी जबानीनं माझ्या आईसमोर उलगडायची. आतले लखलखीत, मोतीवाणाचे दाणे बघताना माझ्या मनात सारखी म्हातारी फेर धरू लागायची.

दर शिवरात्रीला रामतीर्थावर प्रचंड झिंबडीची यात्रा भरते. त्या दिवशी म्हातारी, ओल्या फडक्यानं झाकलेले दोन मातीचे, मोठे राजण आपल्या खडकावरच्या घरासमोर मांडून हाती तांब्या घेऊन उभी राहायची. तान्हावलेल्या कैक जिवांना म्हातारीचे गोंदले हात धारेनं पाणी पाजू लागायचे. त्या दिवशी दहा-वीस तरी अनोळखी माणसं तिच्या छपराखाली मुक्कामाला असायची.

न चुकता हिरण्यकेशीला ' लुगडं नेसवून ' म्हातारीनं तिला साकडं घातलं होतं-पण-पण हिरण्यकेशी बेइमान झाली ! ! एका संध्याकाळी बाळामामा शिवारातनं कसणूक करून घराकडं परतला. घोंगडीवर टेकून हिरण्यकेशीच्या पाण्याचे दोन घोट त्यानं नरड्याच्या घाटीखाली सोडले आणि बाळामामाच्या अस्सल कुणबी जिवाचा पिळा काळाच्या नदीबरोबर वाहत गेला ! आपल्या अंगावरची तांबूस, सोनरंगी केसांची घोंगडी बाळामामानं, " हे घे बाई तुझं वजं. लई दमणूक जाली. " म्हणत लाल मातीला परत देऊन टाकली !

बाळामामा गेला आणि म्हातारीच्या पाठीची कमान झाली. म्हातारी खचली. फक्त शंकरसाठी ती आपल्या जीवनाची पाटी डोक्यावर घेऊन हरवल्यागत चालताना दिसू लागली. याच वेळी मी गाव सोडून कोल्हापूरला आलो.

बऱ्याच दिवसांनंतर माझं लग्न झालं तेव्हा कुलदैवताचं दर्शन घ्यावं म्हणून मी बायकोसह गावी आलो. म्हातारी आता ' खडकावरचं घर ' सोडून गावात राहायला आल्याचं मला कळलं.

देवदर्शन करून मी बायकोसह म्हातारीच्या अंधाऱ्या घरात गेलो. शिंदीच्या चटईवर, वाकळ पांघरून म्हातारी पडली होती. तिच्या शेजारी एक चिमणी ढणढणत होती.

मी आलोय हे कळताच म्हातारी अंथरुणात उठून बसली. आम्ही दोघांनी तिला नमस्कार केला. मी चटईवर टेकलो. म्हातारी आपल्या शंकरकडं बघत क्षीण आवाजात म्हणाली, " जोडप्यानं आल्यात. त्वांड गॉड कर बाबा त्येंचं !! " शंकरनं आमच्या हातांवर साखरेचे चमचे पालथे केले.

" ब्येस क्येलंस ल्येका. दादांचं नाव राकलंस. संकर कागदात वाचून दावतो." म्हातारीचा कुणबाऊ कंद शब्दाशब्दांतून फुटत होता. मी सुन्न होऊन तिचा शब्द न् शब्द नुसता ऐकत होतो. म्हातारी या दुखण्यातून उठणार नाही ही जाणीव मला हैराण करीत होती.

आवळा खाल्लेल्या तोंडात पाण्याचा घोट घेताना उठलेली मधुर चव, चवळीच्या शेंगा, तुकाईचा निवेद, पाण्याची ओघळती धार, हिरण्यकेशीच्या धारेला लागलेला नव्या लुगड्याचा पिळा यातून माझं मन होलपटत, गरगरत फिरत होतं. चिमणी ढणढणतच होती.

नेपोलियनला लहानपणी उसने आवळे खिलवणारी ती मावशी मला आठवली. मी नेपोलियन नव्हतो. म्हातारी मात्र मला त्या नेपोलियनच्या मावशीपेक्षा केवढी-तरी मोठी वाटली. जग जिंकून आलेला नेपोलियन दृष्टी गेलेल्या, अंथरुणाला खिळलेल्या, त्या मावशीला भेटताना गुडघे टेकून म्हणाला होता, " मी तुझ्या-कडून उसने आवळे खाणारा तो उनाड स्कूल–बॉय आहे. " मला म्हातारीला तसंच म्हणावंसं वाटत होतं, " मामी, तहान लागलेय ! पाणी आण तांब्याभर ! " म्हातारी मग शिगोशिग भरलेला तांब्या हातात घेऊन त्यातून पाण्याची धार माझ्या ओंजळीत सोडताना आजही म्हणेल, " कुटं हुंदाडतिसात माज्या वासरांनू ! ! "

बराच वेळ म्हातारीशी घरोब्याचं बोलून आम्ही दोघं जायला म्हणून उठलो.

घरच्या सुना विसरल्या होत्या, पण अंथरुणाला खिळलेली म्हातारी नव्हती विसरली. जेवणाच्या खोलीकडं बघत, म्हातारी सुनांना उद्देशून म्हणाली, " अगं सवाशीन आली. कुनीतरी कुकू लावा कीगं तिच्या कपाळाला ! " म्हातारीचं बोलणं ऐकताना माझं काळीज चिरल्यासारखं झालं.

म्हातारीच्या घराबाहेर पडताच मी बायकोला म्हणालो, " बघितलंस, अशी माणसं भेटायची नाहीत इथून पुढं. "

देवकीचे सगळे विधी आटोपून, सत्यनारायणाची पूजा घालून, प्रसाद म्हातारीला देऊन मी कोल्हापूरला परतलो. थोड्याच दिवसांत माझ्या हातात

एक पोस्टकार्ड पडलं—

" प्रिय शिवबा,

तुझी खडकावरची आई गेली. तुझं नाव काढलं तिनं जाताना.

तुझा शंकर. "

आजही कधीमधी मी गावी गेलो की रामतीर्थाच्या धबधब्याच्या कुंडात पोहणीला पडतो. काळीशार झिलई चढलेले कुंडाभोवतीचे प्रचंड कातळ, कोवळ्या उन्हात अंगभर चमकत असतात. ते बघताना मला वाटतं, " मी नाही... ' खडकावरची म्हातारीच ' या नुकत्याच जन्मलेल्या पृथ्वीच्या पाठीवरची सर्वांत पहिली स्त्री होती ! आदिस्त्री ! त्या कातळांच्या झिलईत ती कुठंतरी निघून गेली आहे ! दूर दूर ! न परतण्यासाठी ! "

मी वेडयासारखा त्या चमचमणाऱ्या झिलईकडं एकटक बघू लागतो. क्षणभरच. पण मला विलक्षण भास होतो. ती झिलई बोलते आहे— " ल्येका, किती योळ जाला पवतोस ? पड की भाईर आता ! "

(लाल माती-रंगीत मने)

ॐ

१

सोकारी

केशव मेश्राम

नदीवरून इतका वेळ वाहणारा वारा अवघडला होता. आधीचा गडद अंधार अधिक दाट झाला. रातकिड्यांच्या आवाजात बाभुळवन बोलत होते. नदीच्या अवतीभोवतीच्या घळ्या व टेकाडे राहूकेतूच्या भयावह आकृत्यांसारखे भयाण वाटत होते. एकाकी टिटवी अशुभाचा इशारा देत फडफडत होती. रात्र काजव्यांच्या डोळ्यांनी पहारा करीत होती. त्या दाट चिंचबनाकडे एक आकृती कुंपण ओलांडून निघाली होती. वाट तिच्या सरावातली नित्याची असावी. बनातली घुबडे, गरगरत्या डोळ्यांनी अवघडून ते पाहात होती. वाघुळांच्या भराऱ्या व अर्धवर्तुळाकार फेऱ्या वाढल्या होत्या. गोफण, बांबूचा फटाका आणि करकत्या वहाणा, मचाणावरच ठेवून अलगदपणे कुणी खाली उतरले होते. ते दोन्ही जीव एकमेकांकडे आवेगाने झेपावले होते. श्वास एकमेकांत मिसळले होते. रात्र जडधुंद बनली होती. वारा सावध होता.

शुक्राची चांदणी फिकट क्षीण झाली होती. दूर कुठेतरी पहिला कोंबडा आरवला होता. सावल्या विखुरल्या होत्या, हलल्या होत्या. कुंपणाच्या फाटकाच्या आवाजाचा हलकासा ओरखडा वातावरणावर उमटला. प्रचंड वाड्याच्या पाठच्या दरवाज्याला अडसर लागला. गोठ्यातील गुरे उभ्या-उभ्यानेच शहारलीत. काहींच्या गळ्यांतील घंटा किणकिणल्या. त्यांनी पाय झाडले. चिलटेगोमाश्यांची गुणगुण अंधारातही जाणवली. त्या गुरांच्या ताज्या शेणामुताचा वास, खालच्या

चघळात मिसळला. पालीने काळोखातच भक्ष्य गिळले होते. अवघडपणाचा तवंग थरारून पुन्हा पूर्ववत झाला होता.

रावसाहेब पटवारी हे अकोला-बाळापूर भागातले नामवंत जमीनदार. त्यांच्या शेतीवाडीचा, बागबगीच्याचा, गुराढोरांचा आणि नोकरचाकरांचा पसारा अवाढव्य होता. जवळपासच्या खेड्यापाड्यातला कोणीही माणूस, पटवाऱ्याकडे गरजू गरिबाला घेऊन गेला की, तो त्यांच्या चाकरमान्यात रुजू केला जायचा. गावच्या महारामांगांची–ढोराचांभारांची विनंतीही, कधी अव्हेरली गेली नव्हती.

माझ्या मोठ्या काकांचा कुणी खूप दूरवरचा साळभाऊ. नावागावांची आठवण नाही. पण रिणमोचनच्या यात्रेला गेले आणि अख्खे कुटुंब कॉलऱ्यात गेले. एकुलता एक बारातेरा वर्षे वयाचा सखाराम पोरका झाला. काकांनी त्याला आणले होते. महिन्या-दोन महिन्यांत तो मुलगा आमच्या वस्तीत रुळला होता. शिकण्या-वाचण्याची सखारामला कधी आवड निर्माण झाली नाही. काकांनी त्यांचे कर्तव्य त्यांच्यापरीने केले आणि त्यांच्या कामाधामात व व्यापात आकंठ ते बुडून गेले.

सखारामला शहराची हवा चांगलीच मानवली होती. नदीच्या पाण्यार्ची रोजची आंघोळ. सगळ्यांच्या बरोबरीने भरपेट खायला. मोठी काकू त्याच्यावर सगळ्यां-पेक्षा जास्तच माया करायची. 'लासलाभुजला जीव' म्हणून कानाडोळाही करायची. 'मागच्या जल्मीचा करजदार', म्हणून त्याला ती वागवायची.

सखाराम उंच, भरदार आणि नाकेला होता. त्याच्या अंगात ताकतही आडमाप होती. स्वभावाने बेदरकार होता. हक्काचे प्रेमबंधन नसल्यामुळे त्यात भरच पडली होती. त्याच्या कामाची मदतीची रीतही अशीच होती. एखाद्या आठवड्यात मनात आले की कोसभर अंतराच्या नदीवरून, पिण्याच्या पाण्याच्या आठ-आठ खेपा करायचा. त्याच वेळी रात्रभर जागून, आंघोळ, वापरायचे खाऱ्या पाण्याच्या खोल विहिरीचे पाणीही शेंदायचा. सगळीच्या सगळी साताठ रांजणे डवाडब भरायचा. जंगलातून जळणसर्पणाचे भारे आणून टाकायचा. रानातील शेण्यांनी उडवा भरून काढायचा. खराटा घेऊन घरामागला भाग झाडून काढायचा. गावा-बाहेर गुरे कापण्याचा कत्तलखाना होता. त्या दोन्ही कमेल्यांवरून भल्या सकाळी गंज भरभरून रक्ती आणायचा. चर्वीने खायचा. इतरांनाही आग्रह करायचा. कधी रानातून तित्तीर बाटरं पक्षी व बाभळीचा-जांभळीचा डिंक आणायचा. तळून ध्यायचा.

आणि दोन-तीन आठवडे, काही म्हणजे काही करायचा नाही. नुसता दोनतीन वेळा भरपेट खायचा आणि सगळा वेळ झोपून राहायचा. आमच्या मोठ्या संयुक्त कुटुंबात, त्याचे असे हे गैरशिस्त वागणे, इतरांना उदाहरण बनायचे. त्याच्या धोधो वागण्याने सगळी मोठी मुले हातावाहेर जाण्याइतपत बोलायला शिकली होती. पाचसात वर्षे वयाच्या शाळेत जाणाऱ्या मला सखाराम राजपुत्र वाटायचा. शापित, उमदा राजपुत्र.

सखाराममुळे गावभऱ्याची भांडणे घरी येऊ लागली. काकीला काकांच्या कानावर ते घालणे भागच पडले. शाळेत जाणाऱ्या पोरांच्या पाट्या फोडणे, त्यांना धमकावणे, मधल्या वयाच्या पोरींच्या आंगचटी जाणे, त्यांना घाबरवणे, वस्तीतल्या बदनाम, जुगारी पोरांना घेऊन, वस्तीभर धुडगूस घालणे, झाडबंदर खेळणे, कुत्रा-कुत्रींचा पाठलाग करून त्यांना झाडांना बांधून झोडपणे, गावातल्या फुल-झाडांची फुले तोडणे, काहींचे रांजण, बाफे तोडणे, खुंदळणे अशा असंख्य उचापती सखाराम करायचा. रागावण्या-बोलण्याचा त्याच्यावर परिणाम न होण्याइतका तो कोडगा बनला होता. जवळच्या नात्यातल्या ओळखीच्या कोणालाही सखाराम नको होता.

मोठे काका आतल्याआत धुमसत होते. हा पोरगा चांगला की वाईट, ठरवताच येत नव्हते. एक मात्र त्यांच्या ध्यानात आले होते; आपल्या मुला-माणसांतला याचा शेर संपला आहे. याचे राहणे इतरांना बिघडवणारे, उद्दाम व मनमानी बनवणारे आहे, हे त्यांच्याही लक्षात आले होते. कोणाची ना कोणाची सायकल घेऊन, दिवसभर वस्तीच्या व शहराच्या चारी बाजूला फिरणारा, भटकणारा सखाराम, त्यांनीही कितीतरी वेळा पाहिला होता. आणि विशेष म्हणजे त्याचे कधीही लक्ष गेले नव्हते व त्याने पाहूनही आपण पाहिलेच नाही, असे दाखविले असले, तर ते, तर फारच वाईट होते. काकांच्या स्वभावशिस्तीला व प्रेमळ स्वभावाला; त्याचाच चरा पडला असावा.

सखाराम बाळापूरला जायला तयारच नव्हता. काकूला तो पुन्हा पुन्हा सांगत होता, " मावशी ! मले नोको धाडू वो. मले गमावाचा नाई तेथे. त्या बगर जातीपातीच्या लोकायमंदी. नोको. बोलाखेलावालेच कोणी नसंल. आता मी उगामुगा राईन. नमं नमं राईन. "

राजपुत्राला रडताना पाहून पाच-सहा वर्षे वयाच्या मलाही रडू आवरत नव्हते.

दुष्ट चेटक्यांनी कट करून उमद्या राजकुमाराला संकटात पाडणे चालले होते. मी गोष्टी वाचत होतोच.

" अरे बेटा ! तेथचा केवडा कारोबार. म्हेनत घेतंतं थ्ये लोक. पन तिचा मोल बी करतंतं. काई काई मान्सांची खुदची शेतीवाडी, घरबार उभा झाला आहे. खातापेवाची पैशाघेल्याची तेथले काय आपल्यावानी कमी आहे ? आमी येत जाऊ नं भेटाकराले. इकडे लगनकाज निंगालं की, निरोप सांगून, एकदोन दिवस येता बी येईल. " काकूच्या समजावणीचा सखारामच्या मनाला दिलासा मिळाला होता. त्याने कबुली दिली होती.

आसपासच्या शहाण्यासुत्र्यांनीही, त्याला धाकागोडीचे चार शब्द सुनावले होते. जगाची रीतिभाती समजावून सांगितली होती.

" कवा ना कवा, कोणाची ना कोणाची, नोकरीचाकरी करालेच पायजे की नाही ? येती, कोण बेटा, तालेवाराचा बेटा आहे ? आपल्याच पोराबारायचा, पोट भरता, बारा हात बाज फिरते. मग दुसऱ्याच्या लेकरार्ची जल्माची जबाबदारी कोनी काय मनून घेवावा गा ? " एक म्हातारा तडातडा बोलत होता. सखाराम मुकाट ऐकून घेत होता.

" आनी बापा ! आज ना उंद्या, तू मोठा झाल्यावर तुवा लगन, घरदार.... सगळी जिंदगी उभी आहे ना डोक्शावर घागर घेऊन लायनीमंदी. तुवा बरा झाला तर आमाले....तुया गेल्या मायबापाले, ओरखणाऱ्यायले बरं वाटंल की वाईट ! आमी येऊ गड्या तुचा लगनात. कडक पायजे मव्हाची दारू अन् कोमडी. " दुसरा एकजण, सखारामला परिस्थितीची कल्पना देत होता.

सगळ्यांचाच निर्धार पाहिल्यानंतर सखाराम मग बोललाच नाही. रविवारच्या दिवशी ते गेले होते. पंचायत गुरुवारी भरली होती. पण तीन दिवसांतच सखाराम हा....हू यापलीकडे काही बोलतच नव्हता. घरची सगळी कामे त्याने लखलखीतपणे केली होती. कोणात तो मिसळला नव्हता, की सायकलवर हिंडला नव्हता. काकूने मांडे-मटणाचा आणि वड्या-पैल्यांचा, त्याचा पाहुणचार केला होता. त्याला आवडणारे कुसुमभुट्टे केले होते. पण मी पाहात होतो, नेहमी चारी ठाव भरपेट जेवणारा सखाराम, जेवायचे म्हणून जेवला होता. सगळ्यांच्या सोबतीला ताटावर बसला होता, सगळ्यांच्या सोबत उठला होता.

काका, नाना आणि दोन बुजुर्गांच्या सोबतीने सखाराम बाळापूरला....तिथून

थोडे आत असलेल्या, डोंगरगावला पोचला होता.

रावसाहेब पटवाऱ्याने काकांचे म्हणणे ऐकून घेतले होते. सखारामच्या वांडपणाबद्दल, ते एक चकार शब्दही बोलले नव्हते. त्याच्या नादारीबद्दल, दैवाने दिलेल्या एकटेपणाबद्दल ते बोलले होते. त्यांना दुरूनच, पण जेवणखाण झालं होतं. एक रात्र तिकडे थांबून सकाळच्याला तिघेही परतले होते. एक म्हातारा तिकडूनच, मोटारने आपल्या लेकीकडे खामगावला गेला होता. घर मला उगाचच रिकामे झाल्यासारखे वाटले होते.

चार दिवस आमच्या घरात सखारामच्या गोष्टी-आठवणी निघाल्या. आणि मग झाडे नेहमीसारखी सळसळू लागली.

....रावसाहेब पटवाऱ्यांच्या पंधरावीस वेठमजुरांत आज आणखी एकाची भर पडली होती. महारामांगांची पाचसहा पोरे आता झाली होती. जंगलातला लाकूडफाटा, मळ्यातल्या विहिरींचा गाळ, शेतीला बोरीबाभळींची कुंपणे, घरच्या सरपणासाठी झिलप्या फोडणे, साचवणीचे चर खोदणे, जित्रापजनावरांची देखभाल करणे, गोठ्यांच्या दुरुस्त्या, कौले-शाकारणी आणि कुठल्याही अंग-मेहनतीच्या हरकामाला, ही सहा पोरे नाही म्हणायची नाही की मागे हटायची नाही.

रात्री झोपायला निरनिराळ्या जागी ही पोरे धाडली जायची. एक-दुसऱ्यांशी गप्पा मारायला, सुखदु:खांच्या गोष्टी बोलायला सवडच मिळायची नाही. आपल्या स्वत:बद्दल रावसाहेबांच्या अमिरीबद्दल विचार करायला जमायचेच नाही. सकाळी चार साडेचार वाजल्यापासून, तो रात्री ताटवाटी साडेनवाला घासेपर्यंत, काही सुधरायचेच नाही. तंबाखू दाढेखाली दाबला की शेणसडा झालेले दमगीर शरीर एकदम लाश बनायचे. कुणी कापून तुकडे केले तरी जाग आली असती की नाही कुणास ठाऊक? असेच दिवस सरकायला लागले होते.

....मी शाळेच्या सुटीत वस्तीबाहेर आजोळी गेलो असताना, पटवाऱ्याकडे गावची काही माणसे जाऊन आली होती. पण सखाराम ठीक असल्याचेच त्यांना कळले होते. त्यांचीही भेटगाठ झालीच नव्हती. परतल्यावर मला जेव्हा कळले, तेव्हा तितके मला काहीच वाटले नव्हते. माणसांची ओढही प्रत्यक्षाच्याच भेटीच्या दानावर टिकते की काय? दृष्टीआड झालेली वस्तू–माणसे मनाच्याही पार, सांदीकोपऱ्यात पडते की काय? की माझ्या त्या वेळच्या पोरमनाला वाटणारे

प्रेम, एखाद्या आवडीच्या खेळण्यासारखे होते ? दोन-तीन वर्षांत कोणी-कोणीच सखारामची आठवण काढली नव्हती. काकूलाच घरात सणासुदीला गोडाधडाचा किंवा विशेष काही स्वयंपाक केला तर, आठवत असावे. ती त्या दिवशी कोणाची तरी वाट पाहिल्यासारखी आतबाहेर करायची. रेंगाळत रेंगाळत आवराआवर करायची. कुणी काही बोलले विचारले तर लक्ष नसल्यासारखी ऐकायची-बोलायची. पण तिच्याही मनात त्या वेळी नेमके काय चाललेले असायचे ते कळायचे नाही.

रावसाहेब पटवाऱ्यांच्या कारभारात आता वाढही खूप झाली होती. गावातला एक मांग जमातीचा गडी सर्पदंशाने वारल्याचे कानावर आले होते. एका निवडणुकीच्या धामधुमीतही पटवारी अडकले होते. पहिलीच निवडणूक होती ती. डोकेवाल्यांचे आणि पैसेवाल्यांचे एकमेकांशी जुळले होते. 'ह्या पार्टीचा त्या पार्टीचा '....असे शब्द प्रचारात आले होते. काही समजत जरी नव्हते, तरी, अवोला, तणातणी, शह-कारस्थाने, नवे राजकारण, देशभर जन्माला आलेले होते. गावात भावाभावांसारखे राहणारे, प्रतिष्ठित भाऊबंदकी राजरोस जोपासत होते. सगळीकडे तट, गट, टोळ्या तयार झाल्या होत्या. राजकारणाचे विष रक्तात भिनत होते.

रावसाहेबांना एकुलता एक मुलगा होता. लाडात वाढलेल्या, समृद्धीत व श्रीमंतीत वाढलेल्या, ह्या मुलाला, कोणी बोललेलं, चिडवलेलं रावसाहेबांना खपायचे नाही. लहानपणापासूनच, भुजंगराव आपल्या वयाला न झेपणाऱ्या धाडसी गोष्टी करायचा. रानडुक्कर–चित्त्यांच्या शिकारीला जायचा. पण त्यात त्याला यशच मिळत होते. बापाचा कानाडोळा, खऱ्या-खोट्या स्तुतिपाठकांची गर्दी आणि अधिकाराची जाणीव गोंजारत, फडा उभारणारे तारुण्य यांचा एक-मेळ झाला होता. पंधरा वर्षांचा होता भुजंगराव.

गावात पोळा फुटला होता. त्या रात्री बैलजोड्यांच्या शर्यती होत्या. रावसाहेब पटवाऱ्यांचीही बैलजोडी होती. भुजंगरावाने हट्टच घेतला. आपण गाडी दामटणार म्हणून. कारभारी छोट्या मालकाला हात जोडजोडून सांगत होते, " ही जोडी धावण्यासाठीच, अंमली चारा घालून, खास वाढवलेली आहे. बाकी कधीही घ्या. आज नको. " प्रत्यक्ष पटवाऱ्यांनीही भुजंगाची समजूत काढायचा प्रयत्न केला होता. पण त्यांचे एक मन, आतून त्यांना सांगत होते...ह्या पोराला वेताळ

वश असला पाहिजे. जे काम करतो, त्यात तो बाजीच मारून येतो. एकटा एकच असला तरी शेराच्या हिंमतीचा आहे.

बंदुकीचा हवेत बार उडाला आणि पंधरा-सोळा जोड्या भन्नाट धावत निघाल्या. पिरगाळलेल्या शेपट्या, रुतणाऱ्या पराण्या व सैलावलेले कासरे, सोबतीला उत्साहाने चेकाळणाऱ्या, तालुक्याभरच्या गावकऱ्यांची गर्दी; ह्यात शर्यत रंगत होती. धुरोळाही खूप उसळला होता. भुजंगरावाची जोडी सगळ्यांच्या पुढे होती. तो तर आतून नुसता फसफसत होता. गरज नसताना त्याने हातातली पराणी, पुन्हा एकदा कचकन टोचली होती. वादीच्या चाबकाचा फटकारा, तडाड करून बैलांवर काढला होता; आणि दोन्ही बैलं गर्रकन वळली. एक मानेकडून खाली झुकला होता. कासऱ्यांचा ढिला हात, दुसऱ्या हातातली वादी फलकावणाऱ्या भुजंगाचा एकदम तोल गेला; आणि उधळलेले बैल, रिकामी गाडी घेऊन, त्याला तुडवून भलत्याच दिशेला पळाले. मागल्या चारपाच गाड्यांतल्या माणसांनी, पुढल्या अनर्थापासून वाचण्यासाठी, उड्या मारल्या होत्या. भुजंगाला वेडावाकडा तुडवत गाड्या खडखडत धडधडत निघाल्या होत्या. एकच गोंधळ झाला होता. रावसाहेब आणि सगळे नोकरचाकर व गावकरीही धावले होते. रक्तबंबाळ भुजंगराव जिवंत होता.

एकदीड वर्षाच्या उपचारानंतर भुजंगराव बरा झाला होता. काठीवर भार टाकून तो चालू शकत होता. एक डोळा कायमचा मिटला होता. फुटला होता. दोन-तीन वर्षे, पटवाऱ्याच्या वाड्यावर अवकळा होती. दिवाळी-दसऱ्याला, सणासुदीला चालणाऱ्या भोजनावळी बंद पडल्या होत्या. वैद्य-हकिमांची, मांत्रिक-देवऋषींची आधीची चंगळ व चलती कमी कमी होत गेली होती. घडले ते स्वीकारले.

ज्या बैलजोडीने भुजंगाला पाडले, तुडवले होते, त्या बैलांना, औषध चारून मारण्यात आले होते. ढोका-गिधाडांना त्यांच्या मांसाची खिरापत वाटवली होती.

एकाच माणसाला खूप दुःख झाले होते. त्या जोडीची सूचनेप्रमाणे देखभाल आणि वाढ, त्यानेच केली होती. रक्ताच्या माणसांसारखे तो त्यांच्याशी बोलायचा. तो सखारामच कासरे सांभाळणार होता. आपला वांझोटा राग गिळून तो रडला होता. दूर नदीपलीकडल्या शेतांवर त्याला राखणदार म्हणून फेकले होते. तिकडला चाकर जानू सुतार, त्याच्या न्याहारीपाण्याचे पाहात होता. मालकाचा

तसा हुकूम होता.

भुजंगाचे एकदाचे लग्न झाले होते. त्याला आठदहा दिवसांनी फेफरे येते. एकदोन दिवस त्याला कसले, म्हणजे कसलेच भान उरत नाही. बोलणी, नाती, व्यवहार, खाणेपिणे, हगण्यामुतण्याचेही न सुचण्याइतके. भुजंग रिक्त-रिकामा व्हायचा. त्याच्या ह्या 'ब्लंक' अवस्थेत तो भीतिदायक, त्रासदायकही व्हायचा. वेठबिगारीचेही, मजूरही त्याचे काम करायला तयार व्हायचे नाहीत. काही बोलासांगायचे नाहीत.

लग्नानंतर तीनचार महिन्यांत, त्या जवळपासच्या गावांत बोंबाबोंब झाली होती. निवडणुकीच्या रावसाहेब पटवाऱ्यांच्या प्रचाराच्या वेळी, सगळ्यांना हे कळले होते. माहेरी म्हणून गेलेली उदगावच्या पाटलांची कुसुम, पुन्हा त्या घरात आलीच नव्हती. पटवाऱ्यांनी सगळे उपाय वापरले होते. पण उदगावचा बाळा पाटीलही शहाण्णव कुळीचा, कडवा जबरा माणूस होता. सुप्रिम कोर्टापर्यंत खटला लढवण्याची, 'फेफऱ्याला पुरता वेडा शाबूत करून', पटवाऱ्याची खानदान पुसण्याची त्यानेही प्रतिज्ञा केली होती. रावसाहेब पटवाऱ्यांना, हा दुसरा मोठा तडाखा होता. निवडणूकही हातची गेली होती. ज्याचे नावगाव ठाऊक नाही, अशा हरिजन माणसाला, लोकांनी निवडून दिले होते. विजयी मिरवणुकीचा खर्च उदगावकरांनी केला होता.

लांब भंडाऱ्याकडल्या भागात जाऊन, पुन्हा भुजंगरावाचे लग्न करून देण्यात आले होते. सहा महिन्यांतच त्याही पोरीने घासलेटने पेटवून घेऊन, स्वतःला संपवले होते. हे प्रकरणही फार गाजले होते. रावसाहेब पटवाऱ्यांनी हाय खाल्ली होती. तरी पण ते चांगले होण्या-घडण्याची उमेद धरून होते.

शेवटी सैन्यातून निवृत्त झालेला, एक अनुभवी म्हातारा डॉक्टर, डोंगरगावलाच मुक्कामाला बोलावला होता. ह्या भुजंगाला गुंगीची इंजेक्शने देऊन, तो काबूत ठेवायचा. डॉक्टरनेच पटवाऱ्याला सांगितले होते, "रावसाहेब! एक-दोन समजदार गरजू बायका, नर्स म्हणून ठेवा; नाहीतर पोराचे आणखी एकदा लग्न करून टाका." अर्थ कळून रावसाहेब विचारात बुडाले होते.

पटवाऱ्यांना शिंदळकीची फार चीड होती. डॉक्टरने त्यांना तिढ्यात घातले होते. रावसाहेब विचार करून थकले. भुजंगाला चिडचिडण्यावाचून काही येतच नव्हते. सगळा त्वेष आणि जोर, आता जिभेत एकवटला होता. बापालाही

गडीचाकरांपुढे तो अद्वातद्वा बोलायला मागेपुढे पाहायचा नाही. हातातली एक कुबडकाठी टेकवीत, तो थैमान घालायचा. आणि रागसंताप अनावर झाला की, सगळा वाडा साताठ दिवस, पू धरलेल्या जखमेसारखा ठसठसत राहायचा.

जानू सुतार व त्याची लक्ष्मी, दोघाही नवराबायकोला जेव्हा कारभाऱ्याकडून निरोप गेला; तेव्हा ते हबकून गेले होते. बावीस वर्षांच्या त्यांच्या चाकरीत कधी चुकले नव्हते, की खोट नव्हती. कारभाऱ्यांचा मालकासाठी निरोप म्हणजे चाबकाचे फटकारे. बारा-पंधरा दांडगटांकडून बेदम मारझोड आणि तुडवणे. मरणाहून हालहाल, हे जानूला माहीत होते. लहानशा चुकीसाठी दहशतीचा हा हुकमी इलाज, त्या वेळच्या सगळ्या धनिकाप्रमाणे रावसाहेबही वापरावयाचे.

वरच्या माडीवर रावसाहेबांनी त्या दोघांना बोलवल्यावर, सगळ्यांना जायला सांगितले होते. इतकेच नव्हे तर, म्हाताऱ्या कारभाऱ्यालाही पार खालच्या चौकात पाठविले होते. आणि तासभर रावसाहेब पटवारी, त्या दोघाही नवराबायकोशी बोलत होते. ते ऐकल्यावर जानूला बरेही वाटले होते. भीतीही वाटली होती. घशात कडवट कोरडी थुंकी जमत होती. काहीतरी चुकते आहे, असे वाटत होते. पण रावसाहेबांनी, देव्हाऱ्यातल्या सुवर्णाच्या पिंडीवर हात ठेवून, आपण बोलल्याप्रमाणे वागणार, याची खातरजमा केली होती. धाकाने-सक्तीनेही तसे करता आले असते. पण ह्या तीनचार वर्षांत, एकसारख्या घडणाऱ्या विपरीतांनी, रावसाहेब हळवे झाले होते. मनातून भ्याले होते. मालक आपल्याला हात जोडून बोलतो म्हणून जानूही भ्याला होता. नवेच काहीतरी घडत होते. पण जानूला चांगलेच ठरणार होते.

आणि सहा महिन्यांत, वेगाने घटना घडल्या होत्या. नदीपलीकडल्या जुन्या वडिलोपार्जित वाड्याची, हजारो रुपये खर्च करून, शेकडो गवंडी-सुतार-बेलदार लावून, डागडुजी झाली होती. नवा रंग लेवून, पन्नाससाठ वर्षांनी वाडा नवा झाला होता. नदीअलीकडे आलेले डोंगरगाव आता पलीकडल्या किनाऱ्यावरही पसरायला हरकत नव्हती. नाहीतरी आधी ते तिकडे भुताळ्या चिंचबनापर्यंत होतेच म्हणे.

जानू सवादकर सुताराची, पंधरा वर्षांची लेक मैना, आता रावसाहेब पटवाऱ्यांची सून झाली होती. गेली तीनचार महिने जानू आणि लक्ष्मी, लेकीशी दबून पण समजुतीने खूप खूप बोलले होते. लग्नापर्यंत आणि वरात वाड्यात

जाईपर्यंत जानू, लक्षुमी, नामा डोंगरगावात दिसले होते. त्यानंतर ते तिघेही कुणाला दिसले नाहीत. रावसाहेबांनी त्यांना वेठबिगारीतून मोकळे केले होते. लेकाला घेऊन, पाच हजार रुपये नगद देऊन, त्यांची खानगी केली होती. एकट्या सखारामलाच ठाऊक होते ते तिघे रायगडाकडे कोकणात, कोटे-तरी गाववाल्याच्या ओळखीने गेले म्हणून. त्याला भाकरी पोचवणारी, त्याच्याशी बोलणारी, त्याला लाजणारी मैनाच त्याला बोलली होती. जीवनातला हा टप्पाही संपला होता.

भुजंगराव-मैनेचा संसार, या नव्या उभ्या झालेल्या जुन्या काळच्या नांदत्या वाड्यात सुरू झाला होता. कारभारांची सर्व हुकुमाची कचेरी रावसाहेबांकडेच होती. डॉक्टर एक फेरी रावसाहेबांकडे मारायचे. बाकी बराच वेळ, आपल्या जगावेगळ्या पेशंटला द्यायचे.

आता भुजंगरावाचे फेफऱ्याचे प्रमाण कमी झाले होते. पण रोज रात्री झोपताना त्याला ब्रँडी लागायची. खाणेपिणे झाले की, तासाभरात भुजंगरावाचे डोळे झोपेने जड व्हायचे. डॉक्टरांनाही हे चांगलेच सोयीचे झाले होते. रात्री-बेरात्री पेटी घेऊन तपासाला धावण्यापेक्षा हे सोयीचे होते. नशेने नशा मारली जात होती. दिवसरात्रीचा गाडा खडखडत चाललाच होता.

गणपतीचे विसर्जन झाले होते. ह्या नव्या तिसऱ्या लग्नालाही चारपाच महिने झाले होते. पोराकडली खास बातमी ऐकण्यासाठी तर रावसाहेब पटवारी अधीर झाले होते. पण त्यांना निराशाच पदरी मात्र पडत होती. डॉक्टरांनी त्यांना सांगितले नव्हते की, उजव्या भागावर मुंग्या व कमरेच्या मणक्याफऱ्यांवर ताण आला की भुजंगा गलितगात्र व्हायचा. कारण त्यानेही कधी कोणाला सांगितले नव्हते. फक्त उभ्यानेच तो आपल्या बायकोला स्पर्श करू शकत होता. कुरवाळू शकत होता. पण तो ताण, त्याचे ठेचले-पिचलेले शरीर, फार सहन करू शकायचे नाही. प्रत्यक्ष जवळकीच्या वेळी, मेंदू पोखरणारी कळ, मणक्यातून उठायची आणि त्याला विव्हळत, गुरासारखे कण्हत, तास दोन तास, नुसते पडून राहावे लागे. सारा निसर्गक्रमच आता विस्कटून गेला होता. सुखाचा परिपूर्ण आकंठ उपभोग घेण्यासाठी, त्याचे मन तळमळायचे, पण शरीर, फटका खालेल्या सापासारखे नुसते तडफडायचे. विचित्रच काहीतरी घडले होते. प्रत्येक वेळी असे आणि इतकेच घडत होते.

पिके चांगलीच भरारली होती. माकडांचे, कोल्ह्यांचे कळप एकसारख्या फेऱ्या मारत होते. लोखंडी नांगरांच्या वापराने आता रावसाहेब पटवाऱ्यांची शेती भरात होती. गोफणगुंडा चालवीत, हातातला सोटा आणि कंदील सावरीत सखाराम रात्रभर पिकांची रखवाली करीत होता. जित्राप-जनावरात रमलेला सखाराम, आता त्या भरात येणाऱ्या पिकांचा, सोकारी बनला होता. कोल्ह्या-माकडांचे काही काही चालत नसे. त्याच्या मचाणाखालच्या शेकोटीत, गोवऱ्यांचा धूर पहिला कोंबडा आरवेपर्यंत, निघत असायचा. दुसऱ्या शेतांवरल्या अनेकांनी, झालेल्या मोठ्या नुकसानीबद्दल, रात्री झोप लागल्याबद्दल बोलणी खाल्ली होती. एकदोन दिवस भाकरी बंद व्हायची शिक्षाही भोगली होती. पण सखाराम मिळालेल्या कामात, सारा भूतकाळ, रगाडयात दाबून टाकत होता. तो सदा जागरूक सोकारी होता. सगळी जवानी अशीच घालवायची. रावसाहेब बोलतील तरच लग्न वगैरे होईल.

वाड्याकडून नोकरांच्या मार्फत येणाऱ्या त्याच्या शिदोरीत चांगले चांगले खायला येत होते. पोट भरायला खायला शिकलेल्या जिभेला, पुन्हा चवी कळू लागल्या होत्या. भाकरी सोडून नदीकाठावर खायला बसणाऱ्या त्याला, हे नवलच झाले होते.

...आणि शिवाशिवीचा धाक असणारे सवर्ण मजूर, शिदोरी लांब दगडावर ठेवून, फक्त 'सखा' अशी हाळी द्यायचे आणि निघून जायचे. त्याच्याशी बोलायला...चारदोन गप्पा करायला. धर्म बुडण्याची त्यांनाही भीती वाटत होती. आणि बोलायलाही नवे असे होतेच काय ? तीच नेहमीची कामे.

पिकातून फेरफटका मारून, सखाराम आपल्या मचाणाकडे परत आला होता. चिलमीचा दम मारून गोफण हातात घेऊन तो उभ्याने, सारे सवयीप्रमाणे न्याहाळत होता. शेताच्या दूरच्या कडेला चिंचबनाकडे, त्याला काहीतरी हालचाल झाल्यासारखे वाटले. ते ठिकाण तर गोफणगोट्याच्या टप्प्यापलीकडे होते. तो पुन्हा थांबला. पाने सळसळत होती. थंड वारा वाहात होता. नुसते खांबाला टेकून उभे राहिले, तरी झोप, मोहिनी मंत्र घालायला टपलेली होती. त्याने पुन्हा वहाणा खाली फेकल्या आणि विळा व कंदील-सोटा हातात घेऊन, तो तिकडे निघाला.

त्याच्या चपलांचा करकर आवाज होत होता. हातातल्या चिरलेल्या बांबूच्या

फटक्याचा आणि दाण-थाड असा सोट्याचा आवाज करीत तो चिंचबनाकडे निघाला होता. नुसता वारा वाहात होता. वाघळे चिरचिरत नेहमीसारखी झपकत होती. दूर कोल्हेकोई ऐकू येत होती. सखाराम एकदम थांबला. कोणीतरी श्वास सोडल्याचा भास झाला.

बांगड्या किणकिणल्यासारख्या वाटल्या. तो एकदम अस्वस्थ झाला. अजूनपर्यंत भुतापिशाच्चाशी कधी त्याची गाठ पडली नव्हती. आणि त्याच्या नावाची हाक आली. एकदम जवळून. आकस्मिकपणे.

सहासात महिन्यांनंतर ती हाक. मैनाच त्याला भेटायला आली होती. दहाबारा वर्षांपूर्वीचा मार सखारामला आठवला. गावाहून येऊन महिनाच त्याला झाला होता. साऱ्या मजुरांना रावसाहेबांनी हजेरीला व मुजऱ्याला बोलावले होते. दिवसभर कुंपणाचे खड्डे खोदून आंबलेला–शिणलेला सखाराम, गेलाच नव्हता. झोपूनच राहिला होता. मुजरा-हजेरीचा दिवस आला, निरोप आला की, माणसं तास-दोन-तास आधीच जाऊन बसत. काही तरी वाडयाबाहेरच झोपत.

दोन महिने मग लक्ष्मी सखारामला शेकहळद, लेपदवा करीत होती. फक्त हाड मोडले नव्हते. पण मेल्या जनावरावरही कोणी वार करणार नाही, इतके त्याला बारापंधरा लोकांनी रक्त फुटेपर्यंत, बेशुद्ध होईपर्यंत, शुद्धीवर आला की, पाणी पाजून, पुन्हा झांज येऊन पडेपर्यंत; चारपाचदा बडवले होते. त्या आठवणीने सखाराम चुरगळून गेला होता. मुकाट उभा होता.

मात्र मैना तोंड दाबून रडत होती. हुंदके देत होती. "बाई, तुमी जा येथून. मले हराममोतीनं मरावाचा नसे." एवढेच तो म्हणाला होता. पण पंधरावीस मिनिटे, ती मनसोक्त तोंडात बोळा दाबूनच रडली होती. तिच्या लुगड्याला, ब्रँडीचा वास येत होता. आणि नंतर मैना बोलत गेली. चिंचेच्या त्या दाट बनात हलक्या आवाजात सारी लाजलज्जा सोडून ती सगळे सांगून गेली. आईबापाच्या जाण्याने गदगदली.

पुन्हा तिला गदगदून आले आणि ती त्याला आवेगाने बिलगली. रात्र वस्त्रांच्या सळसळींनी उत्कट झाली होती. दूर....दूर कुठेतरी कोंबडा आरवत होता. मैना परतली होती. फाटक बंद झाले होते.

दर दोनचार दिवसांनी चिंचबनात, गजऱ्यातल्या पाकळ्या विखुरलेल्या सापडू लागल्या. चिंचांना सुगंधाची भरती येऊ लागली. दिवाळीचे फटाके फुटताना तर

चिंचबन आळसावलेले, सुस्त दिसत होते. मैना गरोदर होती. त्या दोघांचे गुपित भुजंगाच्या नावावर खेळणार होते.

....वस्तीत बातमी आली तेव्हा मी मॅट्रिकची परीक्षा पास होऊन कॉलेजात जात होतो. सकाळीच माणूस आला होता. सखाराम मयत झाला होता. काकांसोबत मीही गेलो होतो. अचानक हे काय झाले होते?

सखाराम चिंचेच्या त्या बनात, दोन्ही हात आणि दोन्ही पाय लांब ताणून, छत ताणल्यासारखे, ताणलेल्या अवस्थेत, झाडांना उलटा ताठ लटकवलेला सापडला होता. त्याच्या चेहऱ्यावर गोठलेपणाच्या खुणा होत्या. रावसाहेब पटवारी सांगत होते, " आमच्या कामाचा चांगला माणूस होता. चांगला सोकारी होता. उदगावच्या गड्यांसोबत गेल्याच हप्त्यात, कापसांच्या गाड्यांवरून वादावादी झाली. त्याचा त्यांनी गुपचूप बदला घेतला असेल. मी एकेकांना बघून घेईन."

बैल बडवावा तसे सखारामला ठेचला होता. त्याच्या मांड्या-जांघांवर रक्त साकळले होते. पद्धतशीर त्याला ठेचून, मग हातपाय बांधून लटकवले होते. माझ्या लहानपणीच्या, शापित राजकुमाराचा शेवट बघताना मला कसेसे वाटत होते. कोणी कोठे कशाला सांभाळायचे? काय राखायचे?

परतताना उदगावच्या गड्यांनी तर आम्हाला सांगितले होते. '....पटवाऱ्याची सून लग्नाआधीपासूनच सखारामला लागू होती. भुजंग्या पुरुष राहिलाच नाही. आता मैनेच्या पोटी असलेला गर्भही, ह्या सखाचाच आहे. रावसाहेबांनीच, पाहिजे ते होऊ दिले. घराण्याला कसाही वारस मिळवला. आपली आणि पोराची अब्रू वाचवली.'

बाळापुराहून आम्ही विषण्ण होऊनच परतलो होतो. कुठेही चिंचेची दाट आठदहा झाडे, कधीही दिसली की, मला मचाणावरला सखाराम सोकारी आठवतो. तो क्षण मी मग आतल्या आत गुदमरून जातो. शापित राजपुत्राच्या गोष्टी तेवढ्या काळबंडलेल्या आभाळाखाली म्हातारे घुबड सांगत बसते. सारे चिडीचिप्प ऐकत असतात. मी अवाक् असतो.

१०

गाणे

शांता ज. शेळके

त्या दिवशी फार म्हणजे फारच लख्ख चांदणे पडले होते. माझ्या आजोळच्या वाड्यात ते सांडले होते. अगदी काठोकाठ भरून ओसंडत होते. वाड्यातल्या ओटीवर ठेवलेल्या जुनाट वस्तू–गाडीचे मोडके चाक, पत्र्याच्या जुन्या टूंका, शेतीची अवजारे, बैलांच्या गळ्यांतल्या घुंगुरघंटा–सारे त्या चांदण्यात उजळून निघाले होते. चमचमत होते. वाड्याच्या भिंतीवर उगवलेले, वाळलेले गवत देखील चांदण्यात वर्ख लावल्यासारखे झगमगत होते.

वाड्यात आमचीच पाच-सहा घरं. माझ्या पाच चुलत आजोबांची पाच बिऱ्हाडं. मूळ एक घर. पण त्याचे आता पाच-सहा फाटे फुटलेले. चुली म्हणायला तेवढ्या वेगळ्या. पण या घरातले कालवण त्या घरात पाठविले जाई. तिकडची पोरे इकडे येऊन पोरांत पोरं जेवून गेली, तरी त्यांचा कुणाला दखल नसे. पाच–सहा आजोबा, पाच–सहा आज्या, किती काका, किती काक्या, किती माहेरवाशिणी, आत्या आणि या साऱ्यांची मिळून पाच-पन्नास पोरे. दिवसभर वाड्यात नुसता गलका चाललेला असायचा.

त्या अनेक पोरांतलीच मी एक. वय वर्षे सात किंवा आठ. खणाच्या परकराचा फलकारा मारीत साऱ्या वाड्यात दिवसभर मी हुंदडत असे. लहर लागेल, त्या घरात शिरावे. गूळ, खोबरे, शेंगदाणे, जे हातावर पडेल, त्याचे बोकाणे भरावेत. पोरांशी खेळावे, भांडावे, धुडगूस घालावा. जेवायला पाने वाढली असतील,

तर तिथेच जेवावे. त्यामुळे मी कुठे आहे, याची आमच्या घरात कुणाला काळजी नसे की चिंता नसे. जेवायच्या वेळी मी घरी नसले, तरी मी उपाशी राहीन, अशी आईला कधी भीती वाटली नाही.

तर त्या दिवशीची गोष्ट. चांदणे लख्ख पडले होते. यमुनाकाकीच्या सांडग्यांचे कालवण शिजत होते. त्याचा दरवळ वाड्यात घुमत होता. आणि रंगीकाकीने आज तव्यावर थालीपिठे लावायचा कार्यक्रम टेवला होता. त्या थालीपिठांचा खमंग वास नाकात भरून मन अस्वस्थ करीत होता.

मी अधीर होऊन सारखी आत–बाहेर येरझारा घालीत होते. जेवायला रंगीकाकीकडे जावे, की यमुनाकाकीकडे, याबद्दल मनाचा पक्का निर्णय होत नव्हता. शेवटी थालीपिठांच्या वासाने सांडग्यांच्या वासावर मात केली. मी आईला म्हटलं,

" रंगीकाकीकडे जाऊ ? थालीपीठ खायला ?"

" जा. कुठेही तरफड ! " आई वैतागाने म्हणाली, " सदा दुसऱ्याच्य घरच्या जेवणात जीव अडकलेला. जा तिकडे. जेव. अन् तिकडंच झोप रात्री."

माझी चुलत आजी–ताई आमच्या घरात शिरत होती. आईचा कडकडाट ऐकून मी गोरीमोरी झाले होते. मला पोटाशी घेत ती आईला म्हणाली,

" अग, आपली का वेगळी घरं आहेत ? जेवेना पोर, कुठंही जेवली, तर ! नाही तर असं करू या. मी सांगते सगळ्यांना. सगळ्यांच्याच घरचं जेवण आणू अन् इथं पडवीत जेवू एकत्र. जा, ग. " मला दूर करीत ती म्हणाली, " आमच्या घरी जाऊन सांग जा. यमुनाकाकीला म्हणावं, इकडंच आण सगळं जेवण. चला. आज साऱ्यांची अंगतपंगत करू. "

मी उडया मारीत गेले. घरोघर निरोप पोहोचवला.

थोड्याच वेळात पाचही घरातल्या सासवा–सुना आपापल्या घरचे जेवण घेऊन आल्या.

माझ्या आईने आणि माझ्या दोन काकींनी भराभरा पाने वाढली. पोरे-सोरे पानांवर बसून जेवू लागली. त्यांचे जेवण होत आले, तशी बायकांची पाने वाढायला घेतली. आज वाड्यात पुरुषमाणसे कुणी नव्हती. ती गेली होती शेजारच्या गावी. कुणाकडे लग्न होते, की आणखी काही होते, मला आठवत नाही. पण माझे लत आजोबा, मोठे चुलत भाऊ, काका–कुणी वाड्यात

नव्हते, एवढे खरे.

मी बायकांच्या बरोबर जेवायला थांबले होते. आम्ही जेवायला बसलो आणि थट्टाविनोदाला, हसण्या-खिदळण्याला जो काही भर आला, तो बेसुमार.

माझ्या एका छोट्या आतेला फार हसायला येई. आता देखील कुणाच्या तरी एका विनोदाला ती इतकी हसली, की तिला ठसका लागला. डोळ्यांतून पाणी आले. ती पाणी पिऊन ठसका घालवू लागली. आणि तरी एकीकडे ती हसतच होती.

त्या गोंधळात वाड्याच्या दाराशी सायकलची घंटी वाजली, तिकडे आधी कुणाचेच लक्ष गेले नाही. पण मग आईने सायकलची घंटी ऐकली. ती बघते, तर गावातल्या गुरवाचा वसंता सायकल घेऊन दाराशी उभा. तो घाबऱ्या घाबऱ्या काही तरी सांगत होता. आधी तो काय म्हणतो आहे, तेच कुणाला कळेना. पण मग त्याला आत बोलावले. त्याने जे सांगितले, ते भयंकर होते. लग्न होऊन सासरी नांदणारी माझी एक आत्या–ताईची लेक सुलोचना–हिने सासुरवासाला कंटाळून विहिरीत जीव दिला होता. तीच बातमी वसंताला कळली होती. ती आम्हाला कळविण्यासाठी तो तडक सायकलवरून आमच्या वाड्यात आला होता.

सुलोचनाआत्या गेली. सासरच्या जाचाला कंटाळून तिने विहिरीत जीव दिला.

वसंताने बातमी सांगितली मात्र, साऱ्या वाड्यात एकच हलकल्लोळ उडाला. जेवण जागच्या जागी राहिले. बायका रडू लागल्या. पोरे भेदरून जागच्या जागी गप्प बसली.

सुलोचनाआत्या मला फार आवडायची. माझ्याबरोबर बिट्ट्या, सागरगोटे खेळणारी, माझ्या बाहुलीला मोत्यांच्या माळा करून देणारी, मला न्हाऊ घालून माझे केस न ओढता हळू हाताने विंचरणारी, सावळी, नाकेली, नुसत्या डोळ्यांनी हसणारी सुलोचनाआत्या गेली. ती आता पुन्हा वाड्यात कधी येणार नाही, आपल्याला कधी दिसणार नाही, आपल्याशी बोलणार नाही...

मला काही सुचेना, काही कळेना. जाणत्या वयात मी ऐकलेली ती पहिली मरणवार्ता होती. अन् ते मरणही मला अत्यंत आवडणाऱ्या माझ्या सुलोचना-आत्याचे होते.

मी आधी घाबरून गप्प झाले अन् मग ओक्साबोक्शी रडू लागले.

त्यानंतरच्या घटना स्वप्नात घडल्यासारख्या मला अंधूक आठवतात. वसंतानेच गावात चार घरी ती बातमी कळविली. मग तो सायकलने शेजारच्या गावी गेला–आमच्या घरच्या माणसांना बोलवायला.

पहाटे दोन वाजता माझे सारे आजोबा, काका, मोठे चुलतभाऊ आले आणि तेवढ्या पहाटे ती सगळी मंडळी सुलोचनाआत्याच्या गावी निघून गेली.

आत्या गेली. पण तिचे नंतरचे किती सोपस्कार व्हायचे होते. पोलिस–पाटलाला कळवलेले असणारच. तो येणार. गावची चार माणसे जमणार. बिचाऱ्या आत्याचे मरणानंतरही बरेच धिंडवडे होणार होते.

माझे एक आजोबा भयंकर चिडले होते. ते सारखे म्हणत होते,

" साल्यांच्यावरती केस करतो. खडी फोडायला पाठवतो तुरुंगात. आमची सोन्यासारखी पोर, यांनी छळून छळून मारली....नाही यांना तुरुंग दाखवला, तर नावाचाच मी नव्हे. "

माणसे गेली. घर सुन्न रिकामे झाले. आणि मग एकदम गावातली माणसे यायला सुरुवात झाली. वाडा भरून गेला. साऱ्या बायका रडत होत्या. सुलोचना-आत्याचे एकेक गुण आठवून गहिवरत होत्या. तिच्या सासरच्या छळाच्या आठवणी काढीत होत्या.

ताईची अवस्था भयंकर झाली होती. तिच्या शोकाला पारावार नव्हता. तीन-चार लेकींतून वाचलेली सुलोचनाआत्या ही तिची एकुलती एक लेक. लाडा-कोडात वाढलेली. दोन की तीन वर्षांपूर्वी हळदीच्या अंगाने, चुडेभरल्या हातांनी सासरी धाडलेली, आणि तिची आज ही गत झाली होती. ताई सारखी तोंड झोडून घेत होती आणि आक्रंदून म्हणत होती,

" माझ्या सुलोचने, ग, माझ्या लेकरा, ग... "

दिवस उजाडला, सुलोचनाआत्याच्या गावी तिचे शेवटचे संस्कार उरकून घ्यायला गेलेली माणसे अजून परत आली नव्हती. इकडे वाडा तर रात्रभर जागाच होता.

सकाळ अशी तशी गेली.

दुपारी ताई बाहेरच्या पडवीत कपाळाला हात लावून बसली होती. तिचे डोळे रडून रडून मुठीएवढे झाले होते. वय दहा वर्षांनी अचानक वाढावे, तशा चेहऱ्यावरच्या, जिवणीभोवतालच्या रेषा ठळक दिसत होत्या. डोकीवरच्या केसांचे विस्कटून टोपले बनले होते. ती स्वतःच्या दुःखात चूर होऊन बसली होती. गावातल्या आयाबाया येत. ताईजवळ बसत. डोळ्यांतून पाणी काढीत आणि निमूटपणे पुन्हा निघून जात. वाडयातली बायकामाणसे, जरा जाणती मुले वाडयात, सावल्या सरकाव्यात, तितक्या हलक्या पावलांनी वावरत होती. मधूनच एखादा उसासा उमटे. एखादा हुंदका बंद ओठातून बाहेर पडे. बाकी सारे शांत होते. स्तब्ध होते. एक मरणसुन्न उदासी सर्वत्र पसरली होती.

यमुनाकाकीने, ताईच्या सुनेने ताईला दोन घास खाऊन घ्यायला विनवले. ताई पानाजवळ येऊन बसली. पण एक घास तोंडात घालताच तिला भडभडून आले. ताट बाजूला सारून तिने मोरीशी जाऊन हात धुतले. तोंडावरून पाणी फिरविले आणि ती पुन्हा पडवीत येऊन बसली.

जरा वेळाने माझ्या दुसऱ्या एका काकीची चार वर्षांची पोर मथुरी ताईजवळ आली. नेहमीसारखी ताईच्या गळ्यात हात टाकून तिला बिलगली. तिने आवेगाने मथुरीला पोटाशी धरले आणि तिच्या मऊ मऊ केसांवर आपला आसवांनी भिजलेला गाल टेकून ती स्तब्ध राहिली. मथुरीने डोळे वर उचलून ताईकडे पाहिले आणि मग आपल्या बाल–आवाजात ती ताईला म्हणाली,

"ताई...."

"काय, ग, बाळा?" ताईने थकलेल्या स्वरात विचारले.

"ताई...." मथुरी म्हणाली, "तू काल म्हनत होतीस, ते गानं म्हन ना पुन्हा."

"गाणं?" ताई विस्मयाने उद्‌गारली.

"ते नाही का?" मथुरी खुलासा करू लागली, "ते नाही का, काल तू म्हनत होतीस? माझ्या बाई, ग–माझ्या सोने, ग—ते? ते गानं म्हन ना!"

ताई गद्‌गदली. हादरली. काल ती लेकीसाठी गहिवर घालून शोक करीत होती. आक्रंदन करीत होती. लेकीला साद घालून दुःखाचे उद्‌गार काढीत होती. आणि चार वर्षांच्या भाबडया मथुरीला ते गाणेच वाटले होते. त्याने तिची करमणूक झाली होती, आणि तेच गाणे पुन्हा एकवार म्हणण्याचा ती

ताईला आग्रह करीत होती.

ताईला दु:खाचा प्रचंड उमाळा आला. अश्रूंचा उभड आला.

तिने मथुरीला पोटाशी घट्ट कवटाळले आणि आक्रंदून ती म्हणाली,

" माझ्या नशिबाचंच गाणं झालंय, लेकरा. आता आणखी कुठलं गाणं म्हणू? माझी सुलोचना गेली. माझी बाई मला म्हातारपणी मागं टाकून गेली. माझ्या सुलोचना, ग, माझ्या बाई, ग! अशी कशी, ग, गेलीस मला म्हातारीला सोडून?..."

—आणि ताई पुन्हा गहिवर घाळून रडू लागली.

मथुरी न समजत्या नजरेने तिच्याकडे बघत राहिली. नुसती बघत राहिली.

(आनंदाचे झाड)

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३२३०
कुपा १९१८७
मोफत (फक्त मराठी)

११

गोवा आणि गोवेकर

सुभाष भेंडे

बाह्यत: पाहिलं तर कोकण आणि गोवा रूपानं एकसारखे. नारळीपोफळीच्या कुशीत विसावलेली नेटकी घरं, स्वच्छ सारवलेलं अंगण, फुलापानांनी बहरलेलं परसू, उन्हाळ्यात थंडगार असलेली कुळागरं...निसर्गसौंदर्यानं मुसमुसलेले हे दोन्ही प्रदेश. प्रकृतीनं जणू 'देता किती घेशिल दो करांनी' म्हणत गर्द वृक्षराजी न् स्फटिकवत झाडी यांची मुक्तहस्तानं उधळण केलेली.

असं असलं तरी रत्नांग्रीचा माणूस आणि गोंयकार प्रकृतीनं आणि प्रवृत्तीनं एकमेकांपेक्षा फार वेगळे. इंग्रजांनी कोकणावर दीडशे वर्षं राज्य केलं. या काळात कोकणाची सुजलाम् सुफलाम् भूमी दरिद्री राहिली. तिथं शेती भरघोस पिकली नाही की तिथल्या लाल मातीत उद्योगधंदे रुजले नाहीत. व्यापार-उदीम भरभराटीला आला नाही. देवगड-रत्नागिरीच्या हापूस आंब्यावर मुंबईचे दलाल गब्बर झाले, पण हापूस पिकवणारा कोकणी माणूस दरिद्रीच राहिला ! रेल्वे नाही--मुंबईशी संबंध ठेवायला बोटी आणि मोटारी. पोट भरण्यासाठी कोकणी माणूस मुंबईच्या गिरण्यांत चाकरमाना म्हणून राहणार आणि त्याचं कुटुंब त्यानं पाठवलेल्या मनिऑर्डरीवर जगणार ! धुवांधार पाऊस कोसळत असताना लाल चिऱ्यांच्या घरात, पाऊस नसेल तेव्हा तीन रस्ते एकत्र मिळतात त्या तिठ्यावर गजाली करत बसणं हा कोकणी माणसाचा आवडता उद्योग. बावू तायशेटेचा झील काय करतो 'पासून' पेडणेकराले चेडू तीस वर्सां जाले--लगीन कित्यां

होऊन?' पर्यंत असंख्य विषय. बांधावरच्या झाडांची मालकी कुणाकडं हा लाख मोलाचा प्रश्न सोडविण्यासाठी सख्ख्या भावांची कोर्टात वर्षानुवर्षं जुगलबंदी! दारिद्र्यामुळे स्वभावात अपरिहार्यपणे आलेला कुत्सितपणा. कोणत्याही गोष्टीकडं तुच्छतेनं पाहण्याची जन्मजात सवय. कोकणातल्या पाऊलवाटांसारखी नागमोडी भाषा! 'हेगिष्ट्याकडला पेपर घेऊन ये बघू—खोताचा पोरगा म्याट्रीकला बसला होता. तो नापास झाला का बघू!' अशी जगावेगळी जिज्ञासा. 'कांवळी ना—हंय इथंच ऱ्हातो! ताज्या घराक उजो लागलां तां हंयसून दिसता!' या प्रकारची फुरशासारखी डंख करणारी भाषा....मात्र मनानं प्रेमळ. अडीअडचणीला उपयोगी पडणारा. सारांश, तिथं मुबलक पिकणाऱ्या फणसासारखा. वरून खडबडीत, काटेरी—आतून रसाळ.

साडेचारशे वर्षं पोर्तुगीजांच्या अमलाखाली असलेला गोवा तुलनेनं कितीतरी समृद्ध. पोर्तुगाल युरोपमधला तसा फार पुढारलेला देश नव्हे. सोळाव्या शतकाच्या आरंभी पोर्तुगीज सरदार आफोंसु द अल्बुकॅर्क गोव्यात आला आणि मुसलमानांना हुसकून त्यानं पोर्तुगीज सत्ता स्थापन केली. लवकरच सेंट झेवियर गोव्यात आला आणि हिंदूंचं मोठ्या प्रमाणावर खिस्तीकरण झालं. नाडकण्यांचा डेनिस झाला तर रेगेचा रिबेरो. (हिंदुधर्मातील जातिव्यवस्था इतकी जबर की आजही गोव्यात ब्राह्मण किरिस्तांव, शूद्र किरिस्तांव असे भेद तगून आहेत!) बाकीचं सोडा, पण एक गोष्ट मान्य केली पाहिजे. पोर्तुगीजांनी या लहानशा, टुमदार प्रदेशाचं भरपूर कोडकौतुक केलं. गोव्याच्या कानाकोपऱ्यात रस्त्यांची जाळी विणली, रेल्वे बांधली आणि गोंयकारांना आधुनिक जीवनातल्या साऱ्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या. कायदेकानू कडक. वाहतुकीचे साधे नियम मोडणाऱ्याला जबर दंड किंवा तुरुंगवास. भुरट्या चोऱ्या केल्या तरी दीर्घ कारावास. परिणामी खिडक्यांना गज बसवायची गोंयकारांना कधी गरज वाटली नाही. राहणी आणि वृत्ती यांवर युरोपीय संस्कृतीचा जबरदस्त पगडा. मुक्तिपूर्वकाळात गोव्यात खाणधंदा ऊर्जितावस्थेस आला. गोंयकारांना 'इंपोर्टेड' मालाची सवय झाली. भाज्या हॉलंडहून, बटरचीज डेन्मार्कहून, कापडचोपड अमेरिकेकडून आणि गाड्या जर्मनीहून. एकूणच गोंयकार सुखासीन आयुष्याला चटावलेला. जगण्यासाठी फार यातायात करणं त्याच्या प्रकृतीला मानवत नाही. जीवन कसं 'सुशेगाद' हवं—! सगळ्या गोष्टींची चव सावकाशीनं घेतली पाहिजे—

गोंधळ, गडबड उपयोगाची नाही !

गोंयकाराचं सुशेगाद जीवन बाहेरच्यांच्या डोळ्यावर येतं. 'काय बुवा-दुपारी एक ते चार तुमच्या गोव्यातली सगळी दुकानं बंद ! संध्याकाळी साडे-सातनंतर पणजी-मडगावसारख्या शहरात शुकशुकाट !—' अशी तक्रार मुंबई-पुण्यातल्या धावपळीच्या जीवनाची सवय झालेली मंडळी करत असतात. मुंबईला सारंच विचित्र-वांद्र्याला उतरायचं असेल तर भरगच्च भरलेल्या लोकल-मध्ये दादरपासून दाराकडे सरकावं लागतं—नाहीतर वांद्र्यापुढं अंधेरीला उतरून पुन्हा उलटी गाडी पकडून वांद्र्याला यावं लागतं ! बसमध्ये तुमचा स्टॉप आला, की तुम्ही खाली उतरायची तयारी करता—तेवढ्यात कंडक्टर घंटी वाजवतो आणि तुम्हाला चालत्या बसमधून खाली उडी टाकावी लागते ! एवढी धावपळ गोंयकाराला बापजन्मी झेपणारी नाही. गोव्यात बसला स्टॉप नसतात. 'राव रे' म्हणून सांगितलं की बस थांबते. हाकारा देणारा शांतपणे उतरून जातो. भाणस्तरीच्या तिठ्यावर मासळीची गाथण घेऊन कुणी उभा असेल तर बस थांबते. पासिंजर रेंगाळत खाली उतरतात. घासाघीस करून शेवटाळ्याची, वा काळुंद्राची गाथण खरेदी करतात. तेवढ्यात बसचा ड्रायव्हर समोरच्या ताव्हेर्न-मधून फेणीचा एखादा 'कॉप' सुद्धा संपवून येतो ! दुपारचं जेवण झालं, की आकाश कोसळो—काजुबिया वा कातलीचा तुकडा तोंडात टाकून वामकुक्षी घेतलीच पाहिजे. दुकान रात्री आठला बंद वगैरे ठीक आहे—पण उन्हाळ्याच्या दिवसांत मीरामार वा कोलवा बीचवर हवा खायला जाण्यासाठी सात वाजताच दुकानाला कुलूप लावलं तर काय जगबूड होणार आहे ? खाली नुसती चड्डी अडकवून, उघड्या अंगानं, घरापुढल्या दगडी बलकांवावर बसून गजाली करण्यात, 'हांव सांगता ते तू आयक-पोर्तुगीज आसतना आम्ही जो इंपोर्टेड माल वापरला तो इंडियनांच्या नशिबात आसा ?' हे एकमेकांना पटवून देण्यात जो आनंद आहे त्याची सर आणखी कशाला येणार ? चघळायला दुसरा कुठला विषय नसला तर वर्षानुवर्षं पुरणारा 'कोकणी-मराठी वाद' आहेच. (मराठी वृत्तपत्रं वाचताना, मराठी नाटकं पाहताना मराठीला शिव्या देणारा बेरकीपणा गोंयकारच करू जाणे !)

गोंयकाराचं 'जीभ' या अवयवावर फार प्रेम आहे. स्वतः पोटभर खाईल. दुसऱ्यांना आग्रह करकरून खाऊ घालील. वाटीभर लाडू, मूठभर चिवडा

एवढ्यावर तो पाहुण्याची बोळवण करणार नाही. डब्यातले करून ठेवलेले पदार्थ पाहुण्यांना द्यायला त्याला कमीपणा वाटतो. ताजे पदार्थ हवेत. बशी तीनचार वस्तूंनी कशी भरलेली हवी. पदार्थ खाल्ल्यावर पाहुण्यांना चहाचा कप. मध्ये पाणीबिणी नाही. (हेही गोव्याचं एक वैशिष्ट्य.) कुणाला जेवायचं आमंत्रण दिलं म्हणजे पाहुण्याची सरबराई नीट व्हावी यासाठी काय करू न् काय नको असं यजमानांना होऊन जातं. (शाकाहारी ऊर्फ ' शिवराक ' पाहुणा न आलेला बरा !) ताज्या माशाची गाथण म्हणजे परब्रह्म. गणेश चतुर्थीनंतर बाजारात येणाऱ्या परित्या बांगडुल्यांचं त्रिफळ घालून केलेलं सुकं म्हणजे ब्रह्मानंदी टाळी. विस्वण, रांवस, कल्ली आणि लाखेच्या चिंबोऱ्या ऊर्फ कुरल्या—वा ! खाता किती खाशिल एक मुखाने ? असा प्रश्न पडावा. बाजारात शिनाणी आल्यात ? उत्तम कालवं मिळतात ? हे कळून सुद्धा घरी स्वस्थ बसणारा गोंयकार अजून जन्माला यायचा आहे ! गोंयकार ' सुशेगाद ' असेल—पण चविष्ट मासळीच्या शोधात तो कुठंही जायला तयार ! खाजणाजवळ उत्तम कुरल्या मिळतात आणि मानशी-पाशी चवदार कोळंबी सापडतात ही अचूक माहिती त्याच्यापाशी असते. लग्नसमारंभानंतरच्या जेवणाविषयी उदासीन असणारा एकतरी माणूस या पृथ्वी-तलावर आढळेल काय ? या प्रश्नाचं उत्तर : होय—तसा माणूस म्हणजे गोंयकार ! लग्नाचं जेवण शुद्ध शाकाहारी—वरण, साखरभाताचं जेवण म्हणजे केवढं मोठं संकट. ते टाळण्यासाठी लग्नाला वधूवरांना आशीर्वाद द्यायला आलेले पैपाहुणे अक्षता पडल्या, की काहीतरी निमित्त काढून पसार होतात; जवळची नातेवाईक मंडळी नाइलाजानं मागं राहतात. मात्र लग्नानंतर आठवड्याभरात वधूपक्षानं वा वरपक्षानं आयोजित केलेलं श्रमपरिहाराचं जेवण कुणी चुकवणार नाही. शेकडो रुपयांची चविष्ट मासळी फस्त केल्यावर पाहुण्यांनी तृप्तीचा ढेकर दिल्याशिवाय लग्नसमारंभाची सांगता कशी होणार आणि वधूवरांना मनापासून शुभाशीर्वाद कसे मिळणार ?

गोव्यातले असंख्य स्त्रीपुरुष प्रवासात खाण्याची-जेवणाची मनासारखी व्यवस्था होणार नाही म्हणून काशी-रामेश्वरची यात्रा टाळतात. बाहेर जेवायचे हाल होतील, मासळीबिसळी मिळणार नाही या भीतीनं हजारो गोंयकार गोव्याच्या सरहद्दीबाहेर पाऊल टाकायला तयार नाहीत ! ' हं-आम्ही खाण्यासाठी जगतो-जगण्यासाठी खात नाही—आणि हे मान्य करायला आम्हाला अभिमान वाटतो—'

असं गोव्याचे लोक तावातावानं सांगतात. (कोणतीही गोष्ट तावातावानं सांगायची हे गोंयकाराचं वैशिष्ट्य !)

खाण्यापिण्याची आबाळ होईल म्हणून काशी-रामेश्वर टाळणारा गोंयकार तसा मनानं सश्रद्ध, भाविक आहे. इनमिन दीड दिवसाचा गणपती-पण रजा काढून, धक्केबुक्के सहन करून, मुसळधार पावसातला ओलाचिंब प्रवास संपवून बाहेर राहणारा गोंयकार गजाननाची मखरात प्रतिष्ठापना होण्यापूर्वी चौकीच्या घरात प्रविष्ट होतो. गणेशचतुर्थी, रथसप्तमी, माघी पुनव, जत्रोत्सव हे गोंयकाराचे परम आनंदाचे दिवस. मंगेशीला दर सोमवारच्या पालखीला नेमानं जाणारे गोंयकार असंख्य आहेत. देवाचा 'प्रसाद' घेतल्याशिवाय कोणतंही लहान-मोठं कार्य गोंयकार हाती घेत नाही. मुला ा मुलगी पसंत पडली–सगळं काही जमलं–पण देवानं उजवीकडला कौल दिला नाही म्हणून लग्न मोडणारे असंख्य गोंयकार आढळतील. खिश्चन माणूससुद्धा मंगेश-शांता-दुर्गेचा 'प्रसाद' घेऊन पुढल्या कार्याला लागतो. श्रद्धेच्या बाबतीत गोमंतकीय माणूस कुणाला हार जाणारा नाही. पहाटे शांतादुर्गा स्वप्नात आली आणि तिनं सगळे दागिने मागितले म्हणून गळ्यात काळी पोत तेवढी ठेवून तीस-चाळीस तोळे सोन्याचे दागिने देवतेला अर्पण करणारी भाविक स्त्री गोव्याच्या तांबड-मातीतच जन्म घेऊ शकेल !

मंगेशी–कवळ्याची ती जत्रा...देवळापुढली दीपमाळ फुललेली असते. देवळाच्या भोवताली स्त्री-पुरुषांची ही गर्दी. आबाल-वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुललेला. रस्त्यापासून मंदिरापर्यंतचा रस्ता एकसारखा उचंबळत असतो. देवळा-भोवती पालं पडलेली असतात. खाजं, चणेफुटाणे, चिरमुरे-बत्तासे विकणारी असंख्य दुकानं. शिवाय लाकडी खेळणी, खोटे दागिने, विविध चीजवस्तू. झगझगीत प्रकाशात या गर्दीत रमतगमत रात्रभर फिरणं मोठं आनंददायी असतं. भूक लागली, की पुऱ्या, पाव, सुकी-पातळ भाजी आणि ग्लासातून गरमागरम चहा. (असल्या हॉटेलात कप कधी ठेवत नाहीत. हात भाजले तरी चालतील, पण काचेचा ग्लासच हवा !) मग हळूहळू पहाट उमलू लागते. माघातल्या थंडीनं अंगावर शिरशिरी येते. पहाटे देवाचा रथ निघतो. प्रचंड गर्दी उसळते. रथावर नारळ फोडण्यासाठी मंडळी धडपडत असतात. एका फटक्यात नारळाची दोन भकलं व्हावीत म्हणून तळमळत असतात....

म्हादोळला जायांची पूजा पाहण्यासारखी असते. जायांच्या शुभ्र फुलांनी नटलेलं म्हाळसेचं मंदिर सुगंध उधळत असतं. ज्योत्स्ना भोळे, जितेंद्र अभिषेकी वा प्रभाकर कारेकर यांसारखे गोव्याच्या मातीत जन्मलेले कलाकार देवीसमोर सुरांचा नजराणा पेश करतात. सुगंधात न्हालेले सूर आसमंत दरवळून टाकतात. कुणीही बेभान होईल असं ते दृश्य. देवळाचा सभामंडप ओलांडून एखादा नास्तिक प्राकारात स्थिरावला तर क्षणभर तो चळल्याशिवाय राहणार नाही !

शिरगावच्या लईराईच्या जत्रेचा थाट याहून कितीतरी आगळा. होमकुंड धगधगत असतं. लाकडाचे ओंडके चांगलेच पेटलेले असतात. लांबलचक चरात अंगार रसरसत असतात. वाद्यांचा भीषण कल्लोळ वातावरण भरून टाकत असतो. स्नान करून शुचिर्भूत झालेले 'धोंड' हातातली वेताची छडी वरखाली नाचवत उभ्या उभ्या घुमत असतात. मग ते अनवाणी पायांनी फुललेल्या लालबुंद निखाऱ्यांवरून धावत जातात. फुलांच्या पायघड्यावरून चालत जावं इतक्या सहजतेने ! गुलाल उधळावा तसा देवीचा जयजयकार भगतगण आकाशाच्या घुमटात उधळू लागतात....

उत्सव कोणताही असो—पणजीचा महालक्ष्मी देवळाचा असो वा माशेलच्या देवकीकृष्णाचा. गावकऱ्यांनी बसवलेल्या नाटकाचा प्रयोग झालाच पाहिजे. कोकणी माणूस नाटकाचा वेडा. सौभद्र, संशयकल्लोळ यांसारखी जुनी संगीत नाटकं किंवा 'मराठ्याची मुलगी', 'बेबंदशाही' ही ऐतिहासिक नाटकं. रात्री बाराला सुरू झालेलं नाटक पहाटेचा कोंबडा आरवला, की संपतं. नाटकानंतर भक्तगणांनी देवासमोर ठेवलेल्या नारळांचा, फळांचा लिलाव. देवादारचा नारळ खरेदी करण्यासाठी 'पावणी'च्या वेळी चांगलीच चढाओढ होते. कधी खण, साड्या, पैठण्या, पावणीला काढल्या जातात. हजारो रुपये गोळा होतात. देवळाच्या खजिन्यात भर पडते. उत्सवाचा खर्च भरून निघतो.

व्यापारउद्योगात हिंदू गुंतलेले. खेड्यापाड्यात ठुमदार घरं बांधून राहणारे किरिस्तांव प्रामुख्यानं भाटकार. त्यांची राहणी वेगळी, खाणंपिणं वेगळं. गणेशचतुर्थीच्या वेळी हिंदू भाईबंदांना 'हॅपी गणेश' अशी शुभेच्छा देणारा किरिस्तांव वृत्तीनं, मनानं पक्का गोंयकार. तो ख्रिसमस साजरा करतो, पाश्चात्त्य नृत्यांत रमतो, घरात मद्यपान त्याला निषिद्ध वाटत नाही, मराठी नाटकांऐवजी त्याला कोकणी 'तियात्र' जवळचं वाटतं. बाकी हिंदूप्रमाणं तोही उत्सवप्रिय,

अगत्यशील, मनानं प्रेमळ आणि वृत्तीनं 'सुशेगाद'.

कोकणात राहणाऱ्या 'कोकणी' माणसावर पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव फारसा पडला नाही. राहणीत, विचारसरणीत, त्यानं 'भारतीयत्व' टिकवून ठेवलं. गोव्याच्या ख्रिश्चन समाजानं युरोपीय संस्कार आत्मसात केले यात नवल नाही; पण गोव्यातल्या हिंदू समाजावरही पाश्चात्त्य संस्कृतीचे खोलवर संस्कार झालेले दिसतात. वृत्तीनं तो 'रोमँटिक' आहे; सुखासीन आहे. दैनंदिन व्यवहारात त्याचं हे 'पाश्चात्यीकरण' जाणवतं. छानछोकीनं राहणं त्याला आवडतं. राहणीतला, पोषाखातला नेटकेपणा त्यानं जपला आहे. तरुण मुलींची राहणी, पोषाख अद्ययावत् फॅशनचे. मुंबईत येणारी फॅशन एक-दोन दिवसांत गोव्याला पोचते. कोकणात पोचायला बराच अवधी जावा लागतो! काही गोंयकारांच्या बाबतीत पाश्चात्त्य व भारतीय संस्कृतीचं 'गंगाजमनी' मिश्रण आढळतं. धोतरात शर्ट खोचून वर टाय लावणारे गोंयकार परवापरवापर्यंत समाजात सहजपणे वावरत असत! उच्चभ्रू हिंदू गोंयकार कडक इस्त्रीचा सूट घालून ख्रिश्चनांच्या 'बॉल डान्स'मध्ये सामील होतो. लग्नसमारंभानंतर होणाऱ्या 'फॉक्स ट्रॉट आणि 'चा चा चा' नृत्यात मनापासून भाग घेतो.

हिंदू स्त्रिया पाश्चात्त्य संस्कृतीपासून कटाक्षानं दूर राहिल्या. मुक्तीनंतरच्या काळात स्त्रिया शिक्षण, नोकऱ्या, बाजारहाट यांसाठी बाहेर पडताना दिसल्या तरी मुक्तिपूर्वकाळात बहुतेक स्त्रिया 'चुलखंडाच्या नागरिक' असायच्या. चूल आणि मूल यांत स्त्रियांचा जन्म जायचा. सकाळी चपात्या, दहा वाजता पेज, दुपारी दीड वाजता मासळीचं जेवण, चार वाजता चहा आणि रात्री नऊला जेवण या 'रासवळी'त दिवस सरायचा. एकत्र कुटुंबात उस्तवाऱ्या अधिक. घरात काळोखी बाळंतिणीची खोली. आई आणि मुलगी एकाच वेळी बाळंत होण्याचे प्रसंग अनेकदा येत. नवऱ्याबरोबर संध्याकाळी फिरायला जाणं वगैरे अघटितच! गृहिणी सटीसामासी घराबाहेर पडे. देवळातल्या वार्षिक उत्सवासाठी किंवा विवाह-समारंभासाठी. सर्वसाधारण स्त्रियांना दागिन्यांची आवड असतेच; गोव्यातल्या स्त्रियांना दागिन्यांचा सोस अंमळ जास्तच. आर्थिक परिस्थिती कशीही असो, दागिन्यांनी शरीर अक्षरशः नखशिखांत मढवून काढणं ही स्त्रियांची अत्युच्च सुखाची कल्पना. कानांत हिऱ्याच्या कुड्या हव्यातच. मात्र नाकात नथ वर्ज्य. (कोकणात दागिन्यांचा सोस कमी. हिरे दुर्मीळ. मात्र नथ हवीच.) दागिन्यां-

साठी शंभर नंबरी सोनं वापरात नसतं. परवडत नाही म्हणून नव्हे–सोन्यात तांबं मिसळलं तर दागिने टिकतात, असा समज. हा समज इतका पक्का, की देशावरल्या स्त्रियांना 'कसलं पिवळं धम्मक सोनं वापरता हो'–असं हिणवायला तयार!

गोव्यात कोकणी–मराठी भाषावादानं बरीच वर्षं धुमाकूळ घातला. नुकतीच गोवा सरकारनं कोकणीला राज्यभाषा म्हणून मान्यता दिली. मात्र मराठीला समानस्थान दिलं. गोव्यात हिंदू पासष्ट टक्के, किरिस्तांव तीस टक्के. हिंदू आणि ख्रिश्चन घरात कोकणी बोलतात. हिंदूंच्या कोकणीत मराठी शब्दांचा भरणा; किरिस्तांवांची कोकणी पोर्तुगीज शब्दांवर भर देते. हिंदूंचं लेखनवाचन मराठीत, कोकणी लिहिलीच तर देवनागरी लिपीत. उच्चवर्णीय किरिस्तांव (बामण लोक!) पोर्तुगीज वा इंग्रजी भाषा व्यवहारासाठी वापरतात. वरकड किरिस्तांव रोमन लिपीत कोकणी लिहितात. कोकणी ही मराठीची बोली की स्वतंत्र भाषा हा वाद अजून निकालात निघालेला नाही. हा वाद खेळण्यात गोंयकाराची शक्ती आणखी बरीच वर्षं खर्च होणार अशी लक्षणं दिसताहेत!

तर असा हा गोवेकर. कोकणातल्या माणसासारखा पण अनेक बाबतींत कोकणी माणसापेक्षा वेगळा. ह्या छोट्याशा प्रदेशानं अनेक कलाकार निर्माण केले. उभा भारत आज गोव्याच्या गळ्यानं गातो–? लता मंगेशकर, आशा भोसले गोव्याच्या भूमीतली रत्नं. दीनानाथ मंगेशकर, मोगूबाई कुर्डीकर, किशोरी आमोणकर, ज्योत्स्ना भोळे, जितेंद्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, श्रीपादराव नेवरेकर–किती नावं घ्यावीत! आचार्य अत्रे म्हणत : मराठी भाषेच्या पायात पैंजण घातले, की झाली कोकणी... मराठीतलं नादमाधुर्य खऱ्या अर्थानं भावलं ते बाकीबाब बोरकरांना. 'गोवा म्हणजे भारतमातेच्या गालावरील तीळ' असं पं. नेहरू म्हणाले. या टीचभर प्रदेशात निसर्ग जेवढा संपन्न तेवढंच तिथलं कलाजीवनही संपन्न.

पूर्व-पश्चिम संस्कृतीचा संगम कुणाला पाहायचा असेल तर त्यानं गोव्याला जायला हवं. हिरव्या झाडीतून डोकावणारे मंदिराचे कळस आणि चर्चवरील क्रूस त्याला गोमंतकात दिसतील. आणि गोव्याच्या कुठल्याही खेड्यात तानपुऱ्याच्या आवाजात गिटारचे सूर मिसळलेले त्याला ऐकू येतील.

१२

आंब्या-फणसाचे दिवस

मधु मंगेश कर्णिक

चैत्र-वैशाखाची दारे उघडून आंब्या-फणसाचे दिवस येतात, व नुसतेच येत नाहीत; जांभळांना आणि करवंदांनाही बोटाशी धरून येतात आणि आमचे चित्त शाळेतून उडते. या दिवसांची आम्ही वर्षभर वाट पाहात असतो आणि हे दिवस जवळपास दिसू लागताच आम्ही आनंदाने वेडे होऊन जातो. आमच्या शाळेला उन्हाळ्याची सुटी नसते. कोकणातील आमच्या शाळा ऐन पावसाळ्यात बंद असतात. पास-नापास कळलेले असते नि नवी पुस्तके जूनशिवाय मिळत नसतात तेव्हा हे दिवस हुंदडण्याला मोकळे असतात. आंब्या-फणसांचे दिवस आम्हाला सणाचे दिवस. नाना तऱ्हेचे नवे रंग, सुवास आणि नाद अनुभवीत हुंदडण्याचे. नाना तऱ्हेच्या फळांनी पोट यथेच्छ भरण्याचे आणि नदीच्या कोंडीत तासन्‌तास डुंबण्याचे. हे दिवस कधी येतात, असे आम्हांला झालेले असते.

पौष महिन्यापासून आंब्यांच्या झाडावर लटकू लागलेल्या कैऱ्यांवर दगडफेक करून आम्ही कंटाळलेले असतो, नि अचानक कुणीतरी बातमी आणते, अमक्या अमक्याच्या दारातला आंबा पिकू लागला आणि आमची तमाम वानरसेना त्या मंतरलेल्या झाडाच्या दिशेने जीव तोडून धावू लागते आणि खरेच, त्या झाडावर पिकलेल्या आंब्यांचे पिवळी शेंदरी घड लोंबताना दिसतात.

एक घिटुकली खार शेपटीचा गोंडा उभारून या आंब्यावर तुरूतुरू पळताना दिसते. नि आम्ही सगळे आशाळभूतपणे तिच्या हालचालीकडे नजरा लावून

बसतो. मग ती एखाद्या पिकलेल्या आंब्याला अडखळते नि ते पिवळसर फळ पटकन् खाली पडते. शंभर पोरांचा घोळका त्या पडलेल्या आंब्यावर तुटून पडतो. पण एखाद्याच्या हाती ते फळ लागते नि बाकीचे पुन्हा 'पड पड आंब्या गोडांब्या ऽ' करीत वर डोळे लावून राहतात...

पण ही नवलाई लवकरच संपते नि गावातली एकूण एक आंब्याची झाडे एकामागून एक पिकू लागतात. आमची वानरसेना मुठीतल्या लाह्या उधळाव्या तशी गावभर उधळते. अंगभर आंब्याच्या रसाचे ओघळ दिसू लागतात. गावात शंभर नावांची नि दोनशे जातींची आंब्यांची झाडे असतात. मिरमिरीत वासाचा मिरमिंड्या, भरपूर चीक असणारा काजाळ्या, साखरेसारखा गोड साखऱ्या, पोपटाच्या चोचीसारखे टोक असलेला टोकेरा, धष्टपुष्ट मांसल देहाचा धोब्या आणि सुपारीएवढ्या बारीक आकाराची बिटकी; असे नाना जातींचे आंबे चोखता चोखता तोंड दुखू लागते. मग घरोघर आंब्याच्या आढ्या पडतात. भातेणात लपून बसलेले ते गरमगरम आंबे सात-आठ दिवसांत पिकून दरवळू लागतात आणि आंबरसाची लयलूट होते. आंबा कोणी कापून खाऊ लागला, की आम्ही हसू लागतो. या दिवसांत आंबा खायचा तो चोखून-आख्खा! त्याला चाकू लावणे सगळ्यांनाच खुळेपणाचे वाटते.

रात्री चुडीच्या प्रकाशात हातात रोवळ्या घेऊन पडीचे आंबे निवडताना आमच्यात हमरीतुमरी होते...एखाद्या रुचकर आंब्यावर वाघळे फडफडतात नि हलक्या देठाचे ते आंबे धबाधब खाली कोसळतात. घराच्या पायरीवर मालक रात्रभर टपून जागत बसलेला असतो. त्याचा डोळा चुकवून पडलेले आंबे पळवण्यातली गंमत वर्षभर पुन्हा कधी दृष्टीला पडत नाही.

आंबे तसेच फणस. वैशाखाच्या मध्याला फणसांना पिकल्याशिवाय राहवतच नाही. दारातल्या फणसावर रोज एकदोन तरी फणस टिचक्या मारताच डब्डब् वाजतात नि आम्ही समजतो....फणस पिकला! सगळी फणसाची झाडे हिंडून त्यावरची फळे टिचक्या मारून वाजवून बघणे हा आमचा या दिवसांतला एक धंदाच झालेला असतो. घरात एक खोली फणसांसाठी खास मोकळी ठेवलेली असते. पिकाऊ जून फणसाच्या ढेली या खोलीत आणून ठेवायच्या नि रोज किती फणस पिकतात ते पाहावयाचे...फणसाच्या वासाने घर घमघमून जाते. पाहुणा आला रे आला, की त्याच्यासमोर ताजा फणस फोडून ठेवायचा....कापा असला की,

ल्याच्याबरोबर खोबऱ्याच्या कातळ्या पण ! कापे गरे नि ओले खोबरे यांसारखा मेवा दुनियेत दुसरा कुठला नसेल ! पण पाहणाऱ्याचे डोळे नि पोट तृप्त करावे ते रसाळ (बरक्या) फणसानेच....सोन्यासारख्या रसरशीत पिवळ्या वर्णाचे ते मधाने भरलेले टपोरे गर बघून माणसाचे डोळे निवले पाहिजेत आणि जीभ खवळली पाहिजे....पण रसाळ फणसावर गार पाण्याचा तांब्या ओठाला लावायला मात्र विसरता नये. आम्ही रसाळ फणस ओरपायला बसलो म्हणजे कुणीतरी म्हातारी जवळ पाळत ठेवून बसलेली असायची नि आम्ही वर पाणी पितो की नाही यावर खास नजर ठेवायची. रसाळ गऱ्यावर पाणी प्याले नाही तर अजीर्ण होते, आम्हांला त्याचे खरे म्हणजे भानच नसते.

या दिवसांत सकाळच्या पेजेबरोबर भाजी असते तीही फणसांच्या गऱ्यांची नि आठळीची. कांदा मिरी वाटून घातलेली ही भाजी आम्ही ढीगभर खातो. पावसाळा सुरू होईपर्यंत कोकणात फणसाच्या भाजीखेरीज दुसरी भाजीच नसते आणि कुणाला तिचा वीट येत नसतो.

आंब्या-फणसांची नवलाई संपली म्हणजे जांभळे आठवतात. कुठच्या जांभळीवर जांभळांचे घोस लटकलेले असतात, हे आम्ही जांभळे हिरवी असतानाच पाहून ठेवलेले असते. त्यामुळे शोधाशोध करण्यात वेळ जात नाही. पावले आपोआपच जांभळीच्या झाडाखाली वळतात. घनदाट छायेचा तो उंच वृक्ष जणू आमची वाटच बघत असतो. तशी कैक जातीची पाखरे त्याच्या पिकलेल्या डहाळ्यावर बसून पाहुणचार खाऊन गेलेली असतात. पण तरीही त्यांचे समाधान झालेले नसते. गावची पोरे दिवसातून एकदातरी आपल्या सावलीत जमली नाहीत तर जांभळीचे झाड ह्या दिवसांत हिरमुसले होते. आम्ही आवाठातली सगळी पोरे खाली जमताच त्याला स्फुरण येते नि एखादी फांदी वारा नसला तरी हलते, डुलते आणि पिकलेली रसाळ जांभळे टपाटप खाली कोसळतात....

पण तशी चारसहा जांभळे खाऊन आमची तृप्ती होत नाही. जीभ गर्द जांभळी झाल्याशिवाय आम्हाला चैन पडत नसते. मग आम्ही भराभर वर चढतो. हिरव्यागार गच्च पानांतून काळेभोर जांभळांचे घड लोंबत असतात नि आम्ही माजघरातून स्वैपाकघरात जावे एवढ्या सहजपणे एकामागून एक फांद्या ओलांडीत असतो. थोडयाच वेळात आमचे पोट तुडुंब भरते. जांभळाच्या रसाने अंग रंगते.

जीभ आबाशाईच्या रंगाची होते नि मग आम्हाला खाली राहिलेल्या, झाडावर चढता न येणाऱ्या पोरांची मस्करी करायची हुक्की येते. पिकलेल्या जांभळांचे घडामागून घड आम्ही त्यांच्या अंगावर फेकू लागतो. ती पोरे बुभुक्षितासारखी ती जांभळे टिपतात नि मग लवकरच त्यांचे कपडे निळे-जांभळे होतात. घरी मार बसेल या भीतीने एकेक पोर पळ काढते. आम्ही मग जांभळीच्या झाडाचा जड मनाने निरोप घेतो. उद्या पुन्हा यायचे वचन देऊन.

कुणीतरी म्हणते, करवंदांना चला आणि तेवढे आम्हांला पुरते. आडवणीची घाटी चढवून तळ्यावर जायचं नि व्हाळ ओलांडून चिरेखाणीच्या पलीकडे असलेल्या कावणाच्या सखलात गेले की सगळे रान करवंदाचेच ! कंबरभर उंचीच्या या झाळी अंगभर काळीभोर करवंदे दागिन्यासारखी लेवून उभ्या असतात. प्रथम आम्ही खूपशी करवंदे नुसतीच खाऊन घेतो. मग चोखंदळपणा सुरू होतो, एखादी करवंद आंबट जातीची असते. एकच करवंद तोडून जिभेवर टाकले की तिची जात कळते.

ती झाळी तशीच मागे टाकून आम्ही दुसऱ्या करवंदाकडे वळतो. एखादीवर मधासारख्या रसाची करवंदे सापडतात, नि मग ती झाळी अक्षरशः लुटली जाते. आजूबाजूच्या झाळी बापडया निमूटपणे बघत असतात.

मग कोंबडयांचा खेळ सुरू होतो. आत लालबुंद रंग असलेले करवंद म्हणजे कोंबडा, बाकीची पांढुरक्या गुलाबी रंगाची करवंदे कोंबडया ठरतात.

हा खेळ थोडासा चालतो नि मग कुणाची तरी नजर हेळूच्या झाडावर जाते. चिकूच्या रंगाच्या पण सालीवर पातळ सोनेरी लव असलेल्या ह्या लाडवाएवढ्या फळाची चव विलक्षण मधुर असते. चिकूची निव्वळ गोडी आणि पेरूचा आंबटगोडपणा एक केला म्हणजे जी चव होईल ती ह्या रानात जन्मणाऱ्या हेळूची असते. मग तोरणाच्या झाळी शोधल्या जातात. हेळू, तोरणे, भोकरे आणि शेवटी रातांबे. लालबुंद आणि रसानं तुडुंब भरलेली ही अमृतफळं पोटभर खाऊन आम्ही घरी परतू लागतो....

उन्हाचा ताप असह्य झालेला असतो. अनवाणी पाय, लाल धुळीवर होरपळत असतात, अंग घामाने निथळत असते. नि एका-एकी समोर दिसू लागतो तळ्याचा काठ. आरशांसारखा लखलखीत, शांत असा तो डोह पाहून आमची पावले घरची वाट विसरतात. अंगावरचे तोकडे कपडे भराभर दूर होतात नि

आम्ही एका पाठोपाठ एकेक जण धबाक्कन उड्या ठोकतो ! क्षणभर सगळा डोह डहुळतो नि मग आम्हांला सोबतीला घेऊन खुशाल रमूगमू लागतो. पाण्यातले लपंडाव, सुरसुरी, पाताळाचा शोध असले खेळ लवकरच संपतात, नि सारे अंग मऊसूद होते. मग आम्ही काठावर येतो. हाताचे तळवे लख्ख शुभ्र होतात. त्यांच्यावर मजेदार सुरकुत्या पडतात. मग गुळगुळीत दगड घेऊन सालटी जाईपर्यंत एकमेकांच्या पाठी चोळायच्या नि पुन्हा पाण्यात उतरायचे.

एवढे होईपर्यंत दुपार कलंडलेली असते. सगळा रानमेवा एव्हा जिरून गेलेला असतो नि घरची पुन्हा आठवण होऊ लागते...

आंब्या–फणसांच्या नि जांभळांच्या या दिवसांत एरवी उघड्याबोडक्या दिसणाऱ्या रानालासुद्धा एक शोभिवंत रूप येते. ठायीठायीची झाडे वसंतऋतूची लव्हाळी अंगावर लेवून उभी असतात. बकुळीला बहर येतो. सुरंगीवरही शे–दोनशे फुले शिल्लक असतात. मोगरा तडाकेबंद फुलतो. बाबलीच्या दारातला मोगरा, पान न् पान झडून सांगाडा राहिलेल्या शेवरीवर चढून असा बेबंद फुलतो, की ते शेवरीचे एरवी नग्न वाटणारे झाड शुभ्र वस्त्रात गुरफटल्यासारखे वाटते. तसाच राठ काळपट पानांच्या पारिजातालाही वेडा बहर येतो. पारिजातकाचा श्रावणातला बहर किती वेगळा नि हा वैशाखातला बहर किती विलक्षण !

आणि भुईचाफा ? बिनपानांचे हे नाजूक फूल जमिनीतून हलकेच वर येते, अवघी बागशाई भारून टाकते.

रानात आंब्यावर कोकिळा साद घालू लागते. अगदी ऐन पहाटेपासून तिच्या हाका सुरू होतात नि दिवसभर थांबतच नाहीत. दयाळ पक्ष्याला तर या दिवसांत एवढा गोड कंठ फुटतो की काही विचारू नका. शेवटी ऐटीनं वरखाली करीत हा बाकदार पक्षी जास्वंदीच्या झुकलेल्या फांदीवर बसून अगदी सकाळचे जे मंजुळ सूर काढतो ते सनईतूनही उमटणार नाहीत. रानातील यच्चयावत् वृक्षांना पालवी फुटते. पांगारा नि पळस लालबुंद फुलांच्या ज्योती ठायीठायी पेटवतात. कुडा पांढरा शुभ्र होतो आणि कदंबाची गोल, चेंडूच्या आकाराची पोपटी फुले इतकी फुलतात की त्यांच्या पानांची संख्या कमी वाटावी. एक धुंद सुवास कदंब सगळीकडे पसरवीत असतो.

वैशाख संपता संपता जमिनीतून एकेक कोंब वर येऊ लागतो. मृगाच्या चाहुलीने आतुर झालेले करांद्यांचे, चिन्यांचे आणि कणग्यांचे तांबडेलाल कोमल

अंकुर तरारत वर माना काढतात. सुरणाच्या जमिनीत दडलेल्या कंदावर एक सुरेख फूल उगवते. अळवाच्या मुंडल्या हळूच वर बोटे उचलतात. एकूण एक वनस्पती वसंतोत्सवात आपापल्या परीने भाग घेते. तल्लीन होऊन, तन्मय होऊन, उन्हाळी भातशेती, वायंगण आणि लव्ही वाऱ्याने सळसळत असते. हिरव्या वस्त्राचा पदर फलकावीत....

असे हे रसाने भरलेले, रंगाने रंगलेले नि वासांनी भारलेले जादूचे दिवस....

इथे शहरात पोटासाठी घाम गाळताना एखाद्या क्षणी ह्या रंगलेल्या दिवसांचे चित्र डोळ्यांसमोर तरळून जाते. मग लांब मागे पडलेले बालपण धावत जवळ येते नि खुणावू लागते, आंब्या-फणसांची मोहिनी पडते, जांभळे-करवंदे आठवू लागतात, तळ्याचा थंड काठ जागा होतो. कोकिळेचे गाणे कानात घुमू लागते. पालवीने पोपटी झालेले रान स्पष्ट दिसू लागते. आणि जीव कोकणात जाण्यासाठी, आंब्या-फणसांच्या दिवसांसाठी कासावीस होतो...

*

१३

जिणं !

डॉ. सरोजिनी बाबर

बदलत्या कालमानाप्रमाणे दळणवळणाची विविध प्रकारची साधनं वाढत गेली आणि पूर्वीच्या मानानं शहरे व खेडी यांमधील अंतरही कमी कमी होत गेलं. उद्योगव्यवसायाच्या कारणानं आणि नोकरीधंद्याच्या निमित्तानं खेडयातील माणसं शहरात राहायला गेली. शहरातील लोक खेडयात येऊन गेले. सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील सर्वांगीण विकासासाठी पंचवार्षिक योजना आखल्या गेल्या व राबविल्या गेल्या. त्याचा परिणाम म्हणून रस्ते तयार झाले. विहिरी व तलाव बांधले गेले. शाळागृहे अस्तित्वात आली. विजेचा वापर होऊ लागला. शेतीचा विकास घडत गेला. लोकांच्या आचार-विचारात बदल झाला. आकाशवाणीच्या आणि चित्रवाणीच्या माध्यमामुळं माणसं झपाट्यानं जवळ येत गेली. हरएक क्षेत्रातील शिक्षणाचा प्रसार वेगानं होत गेला.

या सगळ्या परिस्थितीचा परिणाम खेडयातील स्त्री-जीवनावरही विशेषत्वानं होणं अपरिहार्य झालं. तोंडावर साडीच्या पदराचा बुरखा घेऊन वावरणारी खेडूत स्त्री पूर्वीच्या मानानं अधिक प्रमाणात शेतावर जाऊ लागली. दळण-कांडणात हैराण होणाऱ्या तिला गिरणीचा आणि 'डंग'चा आधार मिळाला. अंधेऱ्या घरात आणि मिणमिणत्या चिमणीच्या उजेडात रहातेल्या तिच्या घरात वीज आली. घरांना खिडक्या लागल्या. न्हाणीघरं बांधली गेली. संडासाची सोय करणं शक्य झालं. शेतकामासाठी जशी गडीमाणसं नेमली जात तशी गडीमाणसं घरकामालाही

नेमण्यात आली. त्यामुळे लांबच्या अंतरावरून दोन दोन घागरीचं ओझं वाहत पाणी आणतेल्या तिला काहीसा विसावा मिळणं शक्य होऊ लागलं. धुण्याची गाठोडी घेऊन लांब कुठल्यातरी विहिरीवर जाऊन धुणं बडवतेल्या तिला थोडाफार का होईना हातभार मिळू शकला.

त्यामुळे तिला काहीसं हायसं वाटू लागलं. सासुरवासाच्या कचाट्यातून मोकळ्या मनानं श्वास घेताना तिचा जीव सुखावला. घरातून वावरताना आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची तिला जाणीव होऊ शकली. घरातील घडामोडीत उजळ माथ्यानं भाग घेण्यासाठी ती उतावीळ झाली. केवळ उपभोगाची एक वस्तू म्हणून जिणं जगण्यापेक्षा आणि पोराबाळांसकट घरादाराचा नुसता राबता उपशीत राहण्यापेक्षा घराची मालकीण म्हणून जगायचा मोह तिला अनावर होऊ लागला. आपण म्हणू ते या घरात केव्हातरी घडून यावं असं तिला वाटू लागलं.

पण बोलायची सोय नव्हती. मनातले हे मांडे पुष्कळ अंशी तिला मनातच ठेवावे लागले. घरात उतरंडी भरून साळीडाळी असल्या तरी माहेरपणाला न्यायला म्हणून घरी आलेल्या भावाला अंगुपती घासभर रांधायची तिला मुभा नव्हती. सासूच्या, दिराभावांच्या किंवा नवऱ्याच्या मर्जीवर जगणं तिला भाग होतं. म्हणून भारत देशाला स्वातंत्र्य मिळालं आणि रोजच्या आयुष्यात अनेक प्रकारच्या सुखसोयी येत गेल्या तरी तिचं जिणं पारतंत्र्यातून म्हणावं तसं बाहेर येऊच शकत नाही या जाणिवेनं ती फक्त ढोर-मेहनतीचीच मालकीण बनत गेली.

अर्थात गरतीच्या पोरीची ही अवस्था सोडली तर काही ढालगज बायकांनी याही परिस्थितीला अपवाद राखले. घरच्या कर्तेपणाचाच कबजा घेऊन त्या आपण म्हणू ते करीत राहिल्या. सारं घर त्यांच्या मुठीत राहू शकलं. नवरा देखील ! सासूसुद्धा ! पण समाजानं त्यांची संभावना केली ती 'जहांबाज' म्हणून ! ! त्या कारणानं चार माणसांत त्यांची वाहवा झालीच नाही. बाईनं नवऱ्याच्या मुठीत राहिलं पाहिजे याच खुळ्या परंपरागत कल्पनेनं पछाडलेल्या इतर बायकांनी देखील त्यांच्यावर तोंडसुखच घेतलं !

तथापि सणासुदीच्या कारणानं, डोहाळे-बारशाच्या निमित्तानं अगर लग्नादेवाच्या प्रसंगानं या सगळ्याजणी एक आल्या की, एकमेकींच्या सुखदुःखांचा उपसा करीत राहिल्या. बावळटपणापासून शहाणपणापर्यंत मग सारं एकमेकींसमोर आलं ! जे बोलू नये ते पण चर्चिलं गेल्याकारणानं सगळ्याजणीच उसासल्या.

कुणाचं कुठं काही चालत नाही म्हणून तर कुणाचं काही चालतंय तिथं मायेनं कुणी विचारपूस करीत नाही म्हणून !

घरात झाडलोट करावी, केरकचरा भरावा, सारवण-सुरवण करावं, पोतेरं घालावं, भांडी घासावीत, सैपाक रांधावा, धुणं धुवावं, वडीलधाऱ्यांच्या मर्जीमाप राहावं, मुलाबाळांचं बघावं, मिळेल ते ल्यावं व खावं, शेताचे हेलपाटे घालावेत, शेतावर जनावरागत राबावं, गुराढोरांचं पाहावं, आल्यागेल्यांचा राडा उपसावा, असलाच तिचा कारभार ! रात्रंदिवस कष्ट कष्ट ! त्यामुळं धरणीला टेकलं की तिला झोप येते. बाळंतपण सोपं जातं, अंगावर दूध येतं, शरीरबांधा सडसडीत राहतो आणि देवपूजेला बसावं त्याप्रमाणे ती सदोदितच प्रसन्न दिसते ! दुखल्या-खुपल्याचा विचार करायला तिला वेळच नसतो जसा आणि फावल्या वेळात लोळणफुगडी घालीत निजायची पण तिला संवय नसते. कधीमधी चुकून वेळ मिळालाच तर ती चड्डया, दुपटी नाहीतर वाकळा शिवीत बसते. उन्हाळकामात गर्क होते. मुलाबाळांना काहीतरी खायला करावं म्हणते. म्हणजे तिचा हात एकसारखा राबतच राहतो.

तरीदेखील तिचं आयुष्य सुखासमाधानानं जातं. कारण तिच्या कल्पनाच मुळी अशा असतात की, घरादारासाठी आपण राबावं, यातच आपलं सुख आहे. म्हणून असेल त्यात ती समाधान पावते. तिच्या गरजा त्यामुळं फारच माफक असतात. अगदी तुटपुंज्या–अंगभर वस्त्र आणि ल्यायला मंगळसूत्र असलं की बास होतं तिला. पण कधीमधी हे हवं, ते हवं अशी तिला बाधा झालीच तर मग ती देवादिकांची गीतं दळताना मनसोक्त गाते. आपल्या मनातील भावभावनांची शिंपण देवादिकांवर करताना ती हरखून जाते.

खेडयातील सामान्य स्त्री तशी साधी-भोळी. लिहावं-वाचावं हे तिला पचतच नाही अजून. त्यामुळं झालीच अक्षरओळख तर ती फुफाट्यातून रेघोट्या मारते, नाहीतर धामुक्या चिंचोक्यांच्या ओळींना आकार देत अक्षराशी जवळीक साधते. वाचायला आलं नाही म्हणून बिघडत नाही, अशीच तिची कल्पना. त्या कारणानं जगात कुठं काय चाललंय हे कळून घ्यायची गरज तिला नसते. बातम्या ऐकायचा मोह तिला नसतो. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडील बऱ्यावाईट गोष्टी ऐकायला बरीक ती उत्सुक असते. हेव्यादाव्यात ती रस घेते. अशा वेळी तिचा कान सारं काही टिपून घेतो. मग त्या जवळ केलेल्या गोष्टींचा उपसा कुठं न

केव्हा होईल त्याचा नेम नाही ! भावडेपणानं नको तिथंही ती बोलून जाते अन् मुत्सद्देगिरीत कमी पडते.

त्यामुळं कायद्याने मिळालेले अधिकारही तिला उपभोगता येत नाहीत. माहेरच्या धनदौलतीत आपला वाटा असला तरी ती वडीलधाऱ्यांच्या सांगण्यावरून आपल्याला काही नको असल्याचे लिहून देते अगर अंगठा देऊन कबूल करते ! तिच्या सासरी ते खपत नाही. त्यातूनही रुसवा-फुगवा निघतो. कधीमधी माहेरचे संबंध देखील दुरावतात ! तिला त्याचं दुःख फार होतं. फुंदत्या मनाला कवटाळताना अशा वेळी तिला असह्य होतं.

विधवेला नवऱ्याच्या वाटणीची धनदौलत मिळाली पाहिजे असं कायदा सांगतो. पण हिला कुणीही फसवतं. भाऊ-भावजयी, दीर-जावा, गोड बोलली की ही काही पण ऐकायला तयार होते. जणू स्वतःची हौसमौज या नातलगांच्या मुलाबाळांकरवी ती भागवून टाकते ! पण तिला हे कळत नाही की, आपलं सारं गिळून टाकायला ही माणसं धास्तावली आहेत ! तिच्या हे लक्षात येतं, पण फार उशिरा, ज्या वेळी दफ्फलुक व्हायची तिच्यावर वेळ येते त्या वेळी. पण त्याबद्दल ती नाराज झाली तरी तिची कुणी पर्वा करीत नाही. उलट ' मग ? हिनं केलं त्यात काय नवल झालं ? ' हाच ज्याचा त्याचा अभिप्राय !

ग्रामीण भागातील विधवा स्त्री बहुतांशी अशी भावडी असते. जग तिला ठाऊक नसतं. त्यामुळे कुणी गोड बोललं, अगत्य दाखविलं, की ती भाळून जाते. कधी कधी फशीही पडते. परंतु नीतिनियमांनी निश्चयी असलेल्या घरात तिच्याकडे होणारी ' ये ' ' जा ' कुणालाच खपत नाही. वाईट चालीचीही आहे म्हणून लगेच बभ्रा होतो. आपले म्हणून कुणी या जगात हवं म्हणून हपापलेल्या तिचा घरात दुस्वास होतो. कधी कधी घरच्या लोकांचा मग ती बेदम मारही खाते ! राजरोसपणे तिच्यासमोर संसाराच सुख भोगणाऱ्या जावा-नणंदांचा, दिराभावांचा राग राग ती सोस सोस सोसते खरी, पण जीवनातला आनंद लुटायची चटक लागल्यावर चोरून मारून का होईना तिचा कल वाईट मार्गानं जाण्याकडे झुकतो. समाजाच्या चर्चेचा विषय ती बनते. त्यामुळे तिचं मन झुरतं. तरीदेखील स्वतंत्रपणे काही चांगला उद्योगधंदा करून स्वतःच्या जिवावर जगायची तिला इच्छा होत नाही. फार फार तर शेतावर नाहीतर घरादारात जनावरागत ती राबेल. पण काही निश्चय करून स्वावलंबी होण्याचं पाहणार

नाही ? तिला जणू ते ठाऊकच नसतं. परंपरागत रूढींचा तिच्या मनावर एवढ संस्कार झालेला असतो की, मार खात, शिव्याशाप देत ती तिथंच गुदमरून मरेल, पण चार अक्षरं शिकून शहाणी हो म्हटलं तर अंहं ! !

स्त्री-जीवनातील सर्वांगीण उन्नतीचा विषय निघाला की, आता देशावर बाईचं राज्य चाललंय तर ते घरातही चाललं पाहिजे काय अशी हलकीफुलकी बोलणी होऊन विषयातील गांभीर्य नाहीसं करण्याचा प्रयत्न पुरुषांकडून होतो. त्यामुळं बायका-माणसंही हसण्यावारी नेऊन 'असं कुठं झालंय काय ?' असं पुटपुटत ये रे माझ्या मागल्या या नात्यानं मागच्या पानावरनं पुढच्या पानावरील इतिहास रंगवू देतात ! वास्तविक एक गोष्ट खरी की, घरात राज्य हे घरच्या बाईनंच केलं पाहिजे. कारण साऱ्या घराचा बरावाईट भार तिला पेलायचा असतो. सर्वांचं सुखदुःख तिला निस्तरायचं असतं. सगळ्या घराची उपसाभर तिला करायची असते. सारं घर तिला लावायचं असतं. उभ्या घराला वळण ती लावीत असते. घरात तिचा हात राबता राहतो. फक्त तिच्या हातात असतात ते कष्ट. पैसा तिच्या गाठीशी हवा तितका नसतो. म्हणून ती घरधन्यावर अवलंबून राहते. त्यांच्या मर्जीमाप राहते. म्हणून घर घरधन्याच्या तालावर चालतं. घरात राज्य असतं ते पुरुषांचं. थोडं कुठं बाई काही करीन म्हटलं की आकांडतांडव झालंच म्हणा ! !

भांड्याला भांडं भिडलं की, आवाज झालाच म्हणा. अशा कल्पनेत वावरलेली बाई घरात भांडणतंटा नको म्हणते. त्या कारणानं मुरडकानोला खात जगणं तिला भाग ठरतं. तथापि आमचं म्हणणं तिनं सर्वांना मान देत आपलं अस्तित्वही राखावं. केवळ मोलकरणीसारखं राबू नये. घरमालकीण म्हणून तिचाही दरारा घराला जरूर बसावा. हा दरारा असतोही. पण अशी उदाहरणं विरळा. आणि त्यांचा बोभाटाही अमाप.

कधी कधी खेड्यातील एखाद्या घरामध्ये स्त्रीला मान असलेलाही आढळून येतो. घरमालक कारभारणीचा सल्ला घेतल्याशिवाय काहीही करीत नाही, अशीही उदाहरणं आढळतात. पण ती फारच क्वचित.

अलीकडे अलीकडे घरच्या कारभारात लक्ष घालणाऱ्या स्त्रिया स्थानिक स्वराज्य संस्थांमधूनही काम करताना दिसून येतात. कुठं कुठं अपवादादाखल म्हणून उभी ग्रामपंचायतही स्त्रियांनी निवडणूक जिंकून काबीज केलेली आढळून येते. पण

अशी उदाहरणं हाताच्या बोटांवरदेखील मोजता येणार नाहीत इतकी कमी आहेत.

निवडणुका लढवाव्यात आणि राजकारणात रस घेऊन काम करावं यातली सवड व आवड अद्यापही ग्रामीण स्त्रीला रुचलेली नाही. कायद्यानं एखादी तरी स्त्री ग्रामपंचायतीत वा जिल्हा परिषदेत हवी म्हणूनच त्यांचा प्रवेश होतो. पण कामकाजात भाग घ्यावा आणि आपल्या गावाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अहोरात्र धडपडावं ही कल्पना तिच्या आयुष्यात बसणारी नाही. घर संसार हेच तिचं मुख्य कार्यक्षेत्र असल्याकारणानं इथं ती थिटी पडते. आर्थिक स्वातंत्र्यात ती जशी परावलंबी राहते तशीच वैचारिक क्षेत्रातही ती खुजी पडते. म्हणून घरातील कर्त्या माणसांच्या तालावर जगणाऱ्या तिला हे कार्यक्षेत्र परवडतच नाही. 'तिला काय कळतंय?' याच समजुतीवर आयुष्य घालविणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीत तिला विचारतंयच कोण तेव्हा तिनं अंगुपती काही करावं? फार फार तर शेळी किंवा म्हैस बाळगून तेलमिठापुरते पैसे उभे करण्याची तिची कुवत! काही एक नवीन करून दाखविण्याची हिंमत असतेच कुठं तिच्याजवळ? म्हणून ती परावलंबी राहते. स्वतःच्या स्वास्थ्यासाठी काय काय अत्यावश्यक आहे याचा देखील विचार तिला शिवत नाही ती सामाजिक जीवनाचा विचार करणारच कशी? तिचं विश्वच मुळी घराभोवती केंद्रित झालेलं असतं. जगाची पर्वा तिला फारशी नसते. म्हणून ती घराबाहेर कुणाचाही विशेष विचार करीत नाही आणि तिलाही कुणी फारशी किंमत देत नाही. त्यामुळं ती मागासलेली ठरते आणि समाजसुधारक तिच्या विकासासाठी धडपडत राहतात. अज्ञानाच्या अथांग सागरात होणारी ही धडपड फार थोडं यश घेऊन उठते आणि त्यातूनच उद्याच्या भवितव्यातील प्रकाश थोडाफार का होईना दिसू शकतो. हळूहळू या परिस्थितीत बदल होत जाईल आणि ग्रामीण भागातील स्त्री सर्वार्थानं कर्तबगार ठरू शकेल. मात्र ही गती अत्यंत मंद राहिली तरी निराश होण्याचं कारण नाही. कारण असं घडलंच पाहिजे या कल्पनेनं आता हीच स्त्री पुढं व्हावी अशी काळवेळ चालून आली आहे!!


मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
३२३२
वा. क्र. २५४३
दि. २७/१२/८५
शाखा (स्थळ प्रत)

१४

खमंग हुरड्याचे खमंग दिवस !

चंद्रकुमार नलगे

हुरड्याचे दिवस म्हटले, आठवले की तोंडाला एक खमंग चव येते. शेणींचा पेटलेला, धगधगलेला आर एका खरपूस वासानं जीव भुलवून टाकतो. हिरव्याचार पानातल्या झालरीतून डोकावणाऱ्या आणि हिरवट दुधाळू झालेल्या भरदार घोसांच्या देखण्या जोंधळ्याच्या शिवाराचा पट्टाच्या पट्टा नजरेसमोर झुलत राहतो. वाफ्या-वाफ्यांतून, झाडाझाडांवरून कलकलणाऱ्या भोरड्यांची भुर्रकन उडणारी झुंडच्या झुंड दंग करून टाकते. चिमण्या पाखरांच्या झुळका रानभर सतावताना दिसतात. पोपटाचे हिरवे थवे पोपटी रानात दिसेनासे होतात. जागत्या गस्तीचा पहारा ठेवीत पांढरे बगळे नदीपट्ट्यानं नजरेपार होतात.

जोंधळ्या जोंधळ्यातल्या माळ्यावर पाखरांना हाकारा घालणारे राखणे हुडहुडणाऱ्या थंडीतही गोफण फिरवीत असतात. शिवारभर एकच दंगा चाललेला असतो....हाऽहा....आला रं आला घोळका आला....हा ऽ हा ऽ हाणाऽहाणाऽ.... साळुंख्या उतरल्या बग वरच्या कोपऱ्यात....अगंऽ शाणे बाभळीवरच्या भोरड्यास्नी दगड हाण...हाऽहाऽ... ! फोडली रं फोडली, कुंभारकी फोडली सारी....ये भैऱ्या, वाडीच्या बाजूनं थवा आला बग....उतरला बघ....आला आला. तिकडं आला....गेला गेला गेला....नदीच्या रोखानं गेला...वाऱ्यावर डोलणारं सारं शिवार असा दंगा करीत असतं. माळ्या-माळ्यावर गोफणी फिरत असतात. कुठून आलेले चित्रविचित्र पाखरांचे थवे चुकापाडी करीत असतात. चड्डी परकरातले

राखणे दम खात नसतात.

कुणी डबा वाजवतं, कुणी फुटक्या थाळ्यांची रणधुमाळी करतं. ज्याच्याजवळ काहीच नसतं ते गंमतीनं पण मोठ्यानं ओरडत असतं. कुणी माळ्यावरच्या माळ्यावर माकडउड्या मारून थवा पांगवण्याचा प्रयत्न करतं. कुणी आढामोढा पायमोडा घालतं, तर कुणी काठीवर आपलीच चड्डी, नाहीतर फडकं अडकावून उंच उंच हेलकावून रघ्यांना पिटाळतं. कुणी ठेवणीतल्या शिव्यांचा वापर करतं. ओरडतच असतं. कुणी बुजगावणं नाचवतं, तर कुणी चिंध्या चिंध्या बांधलेल्या लांबवरच्या चिव्याला खुंटवलेल्या दोरीची माळ हेलकावतं. गोफणीतल्या ढेकळांचा मारा तर चहुअंगांनी चालू असतो. एखादं पिकल्या डोळ्याचं म्हातारं हालवणारी मान तोलत म्हणत असतं, " आरं भाद्दरानू आता अंगात रगात ऱ्हायलं न्हाई म्हणून दमवायला लागलासा व्हय, न्हाई तर एका एका टिपिऱ्यात पाडलं असतं, पाणीबी मागू दिलं नसतं."

जणू त्याला सुचवायचं असतं, ' गड्यानो हे धर्मयुद्ध नव्हं. ' पण म्हताऱ्याचं न ऐकताच दमातली पाखरं भरातल्या पिकावर पडत, जणू त्यांना म्हणायचं असतं,

" म्हताऱ्या, तरणपणी–' तेव्हा कुठं गेला होता तुझा धर्म. "

असा नुसता गलकाच गलका. या दंग्यानं पृथ्वी डळमळू लागू पाहते. आकाशातल्या नक्षत्रांचा सडा पडू पाहतो. मेरू मांदार पर्वतासारखे पर्वत थरथरू लागू पाहतात. नभमंडळ डगमगू लागू पाहतं. इंद्रादी देवश्रेष्ठांचं आसन डळमळू लागतं. देवमंडळी अमृत टाकून भयभीत होत राहतात, यमाचा रेडा दंग्यानं बुजून उधळू लागतो. ब्रह्मदेवापुढं संकटच उभ राहतं. तेवढ्यात पृथ्वीवरनं आलेला नारद आगीत तेल ओततो...मग जादू होते....वातावरण शांत होत येतं. कोणी कोणी कुठे तरी कुणाला तरी इशारे करीत असतं.

माळा माळ्याला गोड साथ करीत असतो. सळसळणाऱ्या पिकात शिळा घुमतात. शिवारातलं हे जादुमयी हिरवं जग नागासारख डुलत असतं. हुरड्यासाठी पेटवलेल्या आरातून निघालेला हिरव्या रानातला निळा धूर पिवळ्या कोवळ्या उन्हाला निळाईची जरतार ठायी ठायी लेवून जात असतो. पहाटेच्या धवल धुक्यात स्वप्नदंग झालेलं हिरवं जग विरत जाणाऱ्या धुक्यातून एखादी हिरवी माया नगरीच फेसाळलेल्या रुपेरी सागरातून अंकुरत वर वर येताना दिसावी तसे दिसते.

केव्हा केव्हा धुक्यातून काजळखोरी पाखरं हुलकावणी .देतात. राखण्याला

झुकवतात. त्याची गोफण फिरू लागली की, भर्रकन उठतात. झाडाझाडांत जाऊन लपतात. चिवारीच्या पानापानांतून टेहळणी करतात. राखण्याला बेसावध होऊ देतात. त्याचा डोळा चुकवून गुपचूप पिकात शिरतात. कुठल्यातरी माळ्याची नजर त्यांना हेरते, नी मग तो माळा ओरडतो,–

" वढ्याच्या अंगाला, वरच्या दंडाला पाखरं उतरलीत बग— " हा राखण्या सावध होण्याआधीच थवा उठतो नी सरळ त्या राखण्याच्या दिशेने चालून जातो. त्याच्या माळ्याशेजारीच बेदरकारपणे उतरतो.

दिशादिशांतून थवे तरंगत येतात नी आभाळातून उतरणाऱ्या छत्रीधारी सैनिकाबरोबर लढाई सुरू व्हावी तशी लढाई सुरू होते. एकमेकाला हरण्या हरविण्याचा दमछाक करून टाकणारा खेळ शिवारभर सुरू होतो—त्यातूनच गोड गुलाबी पहाट मोहरून जाते. ओळखीची शीळ वाऱ्यावर घुमत असते. अन् फुललेलं उंबराचं फूल आतल्या आत खुळं होऊन जातं. कुठल्यातरी विहिरीवरची पोटऱ्यातली केळ ओठात गुणगुणत राहते,

" रानात सांग कानात आपुले नाते ! मी भल्या पहाटे येते ! "

हुरड्याचे दिवस संपत येतात, तशा फुललेल्या जाईजुई हुरहुरून जातात. सुगीचे दिवस येतात नी न कळता सवरताच खळं उलगून जातं आणि मग उरतात त्या आठवणी—आकाशभूल पडलेल्या पाखरांच्या गाण्यांच्या....फुलून विझत गेलेल्या आरांच्या—खमंग चवदार उनउनीत हुरड्याच्या...गरम हुरडा चोळलेल्या गुलाबी तळहाताच्या—त्याच्यावरच्या बर्फगार फुंकर स्पर्शाच्या !

भाळ मारलेल्या धोतराच्या शेवतातल्या खोलीतल्या उनउनीत जोंधळ्याचा हुरडा संपत येतो तेव्हाच आभाळातल्या " सूर्या नारायणाच्या " तोंडाला पाणी सुटतं. मग कुठला तरी माळा अवतीभवतीच्या माळ्यांवरच्या राखण्यांना साद घालतो, " सोलं करूया ऽ रं ऽ ! सोलं ऽ ऽ ! " सगळ्यांच्या मनातलं घडतं. आनंदाच्या आरोळ्यांनी पोपटी हिरवं शिवार दुमदुमत निघतं. माळ्यावरनं पटाटा उड्या मारल्या जातात. कुणी दूरच्या धकटीतला विस्तव आणतं. कुणी वढ्यातल्या वाळलेल्या काटक्या गोळा करतं, कुणी चिंधीत बांधलेलं मीठ आणतं, कुणी कुडात खोवलेली चटणीची पुडी आणतं, तर कुणी कुणाच्या बांधाच्या बरण्याच्या शेंगा वटा भरून ओरबडून आणतं. कुंभाराच्या आठ्यातलं डोळा चुकवून आणलेलं अरगडं लोटकं ढेकळाच्या चुलीवर ठेवलं जातं.

बाभळीच्या सावलीला जोंधळ्यातच चटणीमिठाचं, बिनतेल तेलकटाचं सोलं शिजतं, तोंडाला पाणी सुटतं, तसल्या उनात ते उनउनीत चवदार सोलं मोठ्या चवीनं खाल्लं जातं. तोंड भाजत असतं, बिनमापी चटणीनं 'होऽहुऽ' करायला लावलेलं असतं. तोंडावरनं घाम फुटलेला असतो. समोरच्या बुजगावण्याला खडे मारीत बकणं भरले जातात. खोपीतल्या नजरकैद करणाऱ्या गप्पा रंगतात. तेवढ्यात चुकार पाखरांचा थवा निळ्या आभाळातनं उतरताना दिसतो. नजरा बावरतात. सगळीच गडबड उडते. जो तो सोल्याच्या मुठी भरून तसाच पळतो. तोबरं भरलेल्या तोंडानं 'हाऽहाऽ' म्हणत आपापल्या माळ्याकडं पळत सुटतो. सगळ्या माळ्यावर पुन्हा एकदा शिवार भरून दंगा सुरू होतो. सोल्यांना मग अधिकच चव येते. असा मौजेचा गाव पोपटी रानात उतरतो. जीवन रसरशीत करून जातो. सोल्याची चव जिभेवर आयुष्यभर रेंगाळत राहते.

दुपारचा ऊन चटका मारायला लागतं. पाखरं झाडाझाडांत शिरतात. एकाएकी शिवार शांत होऊन जातो. राखणे गोल कमानदार खोपीच्या भोंगीऱ्यात शिरतात. निद्रासपणे सोल्याच्या कैफात डोळे जडावतात. खोपी खोपीत दंग जिवाचा छंद विसाव्याला येतो. हिरव्या रानात खोपीच्या गारठ्यात, हिरव्या चुड्याचं स्वप्न रंगून जातं. कुठल्या खोपीत जिंकल्या कुस्तीफडाची आरास हलगीच्या ठेक्यात डोळ्यांसमोर मिरवत असते, तर कुणी कुठल्या करंज सावलीच्या थंडाव्यात चोरट्या नजरभेटीच्या नवलाईचा आठव कुरवाळत असतं.

टिपूर चांदणी रात्र म्हणजे या राखण्यांची चंगळच. वेगळ्याच हुरड्याचे बेत रचले जातात. हुंबराच्या वल सावलीत गोळा होऊन आतल्या आवाजात कुठं कुणी डाका घालायचा ते ठरतं. अवतीभवतीची चाहूल घेतली जाते. चंद्र साक्षीला घेऊन चोरपावलानं वल सावलीतनं बाहेर पडतात. बांधाबांधानं कुणी हावळा करायला हरभऱ्याच्या वाफ्याच्या रोखानं निघतं. कुणी लपतछपत रसरसीत गव्हाच्या हुरड्यासाठी गहू आणायला बामणकीत शिरतं. कुणी श्वास रोखून चार पायावर चालत असतं ते टपोऱ्या भरलेल्या वाटाण्याच्या देवस्कीच्या वाफ्याकडं. कुणी घाबरतं. कुणी लटलटतं. लटपटतं. कुणी पार घामेजून भिजतं. कुणी भित्रं कापरं भरल्यागत थडथडत असतं. बांधात जरा खुस झालं की, कुणी कुणाला भीतीनं मिठी मारतं. एखादं धीट सगळ्यांच्या मोटा बांधून पुढं ढकलीत असतं. रापत रापत वाटाण्याच्या शेतात शिरतात, जाळ्या उपटायला हात घालणार एवढ्यात पुढून कुणी तरी लपत येत असताना कुणाला तरी दिसतं. त्याचं काळीज फुटतं.

मोठ्यानं ओरडून पळायला लागतं. तसं काय झालं, बघायच्या आधीच सारी धडाधड उड्या टाकीत शिवारभर पळत सुटतात. कुणी उपराटा–तिफराटा होऊन पडतं. जाळ्यात पाय अडकून कुणी बांधावरनं आदळतं. कुणी शिऱ्यांत जाऊन अडकतं, तर कुणाच्या पायात बाभळीची फांजर घुसते. मागून पुढून, इकडून तिकडून, कुणी कुठून पळत असतं. ज्याला त्याला वाटत असतं, 'बाकीची आपल्याच मागं लागल्यात.' खरं तर गव्हाची चोरी करायला गेलेली टोळी वाट चुकून यांच्या समोर आलेली असते. हे न उमगताच सारे धावत असतात.

तीही टोळी यांना गनीम समजून भलतीकडेच वड्या वगळांनी धावत असते. बळ एकवटून कुंपणावरनं उड्या टाकीत असतात. हरभरा आणायला गेलेल्या टोळीची तर धडगतच उरलेली नसते. या टोळीचा प्रमुख सावटालाही भिणारा. ते सारे हरभऱ्याच्या वाफ्यात शिरणार तेवढ्यात वाफ्यात कुणी तरी घोंगडं खांद्यावर घेतलेलं दिसतं. सापडलो म्हणून त्यांची पळताभुई थोडी होते. पळता पळता कुणाचा पाय लचकतो. कुणी कुणाला धडकून कुणाचा घुणा फुटतो. कुणी सराट्याच्या काट्यांनी भरून जातो, तर कुणाला बांधाची कवसकुसली लागते. आणि कुणाच्या पैरणीत लांबसर करवंदीचे कुंपणशिरं अडकलेलं असतं. ते मागनं पायावर थडथडत असतं. काटे बोचत असतात, तरीही ते पळत असतं. ऊर फुटेपर्यंत–कुंपण घेऊन, खरे तर त्या वाफ्यात माणसासारखं उभं असतं ते कांबळकाठीवालं बुजगावणं! त्यालाही भितात. तरकून जातात.

रानामाळातल्या वस्तीवरचे राखणे जागे होतात, उठतात. खाकरतात. मग त्यांचा आणि वस्तीवस्तीवरल्या कुत्र्यांचा एकच दंगा सुरू होतो. चोर चोर म्हणून सारेच ओरडत असतात. हातात काही सापडेल ते घेऊन जो तो चांदण्यातून शिवारभर एकमेकामागं धावत असतं. जोंधळ्याची उभी पिकं नी उसाचे फड एकमेकाला दगा देतात. रात्र नुस्तीच दंग्यात विरून जाते. सकाळी गावात आवई उठते, 'शिवार लुटायला च्यार शिवारात शिरलं होतं.' मग हे सारेच पळपुटे आपण चोरांच्या मागं कसं धावलो याचा पराक्रम सांगू लागतात. एकजण म्हणतं, 'चोरानं चक्क मला तंबाखूसुद्धा दिली खायला–मळून.' खरे तर साऱ्यांचा हावळा भाजलेला असतो. साऱ्यांच्याच अंगाशी हुरडा आलेला असतो. पण त्यातच खरा रानातला गोड चकवा असतो.

(गावाकडची माती)

१५

म्हाईचा दिवस

महादेव मोरे

गुढी पाडव्यानंतर चौथी रात्र संपते, अन् काळोखाच्या पडद्याआडून पाचवा दिवस हळूच गावाकडे डोकावून पाहू लागतो तसे कोंबडे केकाटू लागतात, आणि गाव जागा होऊ लागतो. झोपेतून उठलेल्या सुस्त मनाला आज 'म्हाईचा दिवस' आहे ही जाणीव होते नि सकाळपारचा अंगातला 'पारूसा' आळस पार नाहीसा होतो—म्हाईला बोलावलेले पाहुणे काही कालच आलेले असतात. पुष्कळसे आज येणार असतात. दिवस कासराभर वर यावयाच्या आत त्यांची वर्दळ लागणार असते. शिवाय मुलाण्याला बोलावून आणून अजून बकरी कापावी लागणार असतात—आणि ती कापल्यावर मग हजारो कामे वाट पाहात खोळंबून असतात.

ह्या कामाला गोमगाल्याची याद येताच घरचा कर्ता माणूस आळसाबरोबरच पटका झटकील अन् डोईला गुंडाळून कामाला लागेल—हाताला गावेल त्याला वेठीला धरील, हुकूम सोडील, कुणावर खँस मारील—कुणाला गुमान सांगल.

"काय रे पोरा, काल मुलाण्याला सांगितलाईस न्हवं-लवकर यायला?" खांद्यावर कावड टाकून ओढ्यातील झऱ्याचे पाणी आणण्यासाठी बाहेर पडणारा जानू शेवाळ्या म्हणतो,

"आलोय तर गा!" बाचा मान राखण्याचा शक्यतो प्रयत्न करीत पोरगं म्हणतं, "खरं, आजून कसं आलं न्हाई बेटं-त्येच्या बायली?"

" मायला, माजल्यात् साली ! बरं, आता जा उभ्या उभ्या त्येच्या घरला; आनी हाय तसाच वडून आन् बेव्वाला ! "

मुल्ह्राण्याला कसं उभं–आडवं करायचं ह्याची वाटाघाट करीत पोरगा निघतो. बामणगल्ली, शेलार आळी पार करून खालच्या गल्लीत जातो. आळीच्या दूर टोकाला मुल्ह्राण्याचं घर असतं. तो तेथे पोहचतो तेव्हा त्याच्यासारखेच संतापलेले भिमू, रावण, केरबा, शिंदे व परगौंडे पाटील मुल्ह्राण्यावर तोंड सोडत असलेले दिसून येतात. हाही त्यात मिसळतो व तोंड वाजवू लागतो.

" का रे बाबा ऽऽ, गावात एकला एक मुल्ह्राणी म्हणून लै भाव आला ब्हय तुला ? "

" लै माजल्यात र ही लांडी ! लौकर यायला कालच म्या सांगितलंय पर ह्याचा पत्त्या न्हाई. पाव्हण्यानी तर घर भरायला लागलंय नि अजून कशाचीच जोडणी न्हाई ! काय करायचं मान्सानं म्हंतो मी ? "

" आम्चंबी तसंच हाय गा कुणाला सांगायचं ? "

आता ह्यापैकी कुणाकडं प्रथम जायचं हा यक्षप्रश्न मुल्ह्राण्याला पडतो, पण केरबा शिंद्यानं लवकर यावयास सर्व प्रथम सांगितलंय हे ध्यानात येताच तो बाकीच्यांची कशीबशी समजूत काढून त्यांना वाटंला लावतो, मग घरात जातो आणि आदल्या दिवशी पाणी पाजवून ठेवलेली सुरी, धार लावण्याची सळी व मदतीसाठी ८–१० वर्षांचा आपला पोरगा रसूल ह्याला घेऊन शिंद्याबरोबर तो बाहेर पडतो.

शिंद्याच्या घराकडे येताना वाटेत लागणाऱ्या अनेक घरांतून आलेल्या, संतापजनक प्रश्नांना मुल्ह्राणी मोठ्या धैर्याने तोंड देत असतो. 'लौकरच येतो. तुमचा खुळांबा करत न्हाई. भिवू नका' म्हणत दिलासा देत असतो.

शिंद्याचं घर येतं. तिघेजण मागील परडयात येतात. तिथल्या पेरवाच्या झाडाला बांधलेलं बकरं, हाती सुरी घेतलेला मुल्ह्राणी बघताच, जोराजोरानं ओरडू लागतं. बांधलेली दोरी तोडून घेण्यासाठी धडपडू लागतं.

" बे रांडके बच्चे, क्यों खाली–पिली गडबड करता है ? चूप बैठ छिनालके ! "

उठल्यापासून दुसरं, काही न खाता फक्त दुसऱ्यांच्या शिव्याच खाणारा मुल्ह्राणी आपली हौस भागवून घेतो.

मग धडपडणारे बकरे सोडून त्याला खाली पाडण्यात येतं. मुल्लाणी बकऱ्याचे मुंडके खाली जमिनीला जाम दाबून धरतो. शिंद्या व रसूल बकऱ्याचे चारी पाय ताकतीनं दाबून धरतात. तेवढ्यात शिंद्याचा पोरगा रक्त साठविण्यासाठी घरातून मातीच्या ५-६ झाकण्या घेऊन येतो-नि बकरे कसं कापतात हे बघण्याच्या उत्सुकतेनं तिथंच उभं राहतो. मग मुल्लाणी आतापर्यंत धडपड करणाऱ्या बकऱ्याचे मुंडके एका हाताने घट्ट असे जमिनीवर दाबून धरतो, आणि दुसऱ्या हाताने त्याच्या मानेखाली एक झाकणी ठेवून त्याच हाताने बकऱ्याच्या या कानापासून त्या कानापर्यंत सफाईने सुरी फिरवतो, तसे मानेखालील झाकणीत गरम गरम रक्त सांडू लागते. तसा एखादा भाविक असेल तर ते तसेच जमिनीवर सोडून देतो. नारळ मात्र देवाच्या नावाने फोडायचा पण नारळातील पाणी कंजुषपणाने साठवून ठेवायचे, मग नारळ फोडायचा तरी कशाला ? अशा प्रकारची काहींची भावना असते. ज्या काळभैरीसाठी म्हाई करायची, बकरं कापायचं, त्यालाच त्याचं रक्तही अर्पण केलं पाहिजे असं पुष्कळ जणांचं मत असतं.

मुंडकं धडावेगळं झालं तरी बकरं धडपडतच असतं. रक्त जसजसं कमी होईल तसतशी ही धडपडही हळूहळू बंद पडते.

मग जवळच्या त्या पेरवाच्या झाडाला बकरं उलट टांगून मुल्लाणी व त्याचा पोरगा थोड्याच वेळात ते सोलतात. चामडं वेगळं करतात अन् त्या 'गोसा'चे मोठमोठे ५–६ तुकडे पाडून शिंद्याच्या ताब्यात देतात आणि एवढे झाल्यावर समोरच्या घमेल्यात रक्ताळलेली सुरी धुताधुता मुल्लाणी म्हणतो,

"बरं, शिंदे सर्कार जाताव आता."

तसा शिंद्या म्हणतो,

"ह्येच्या माय् व्हलेऽ चाल्तास ! आनी हे तोडणार कोण ? तू का मी ?"

"पर अबी समद्या ठिकाणला जानेकू हाय. तोडत बसायला टैम कुटं हाय सर्कार ! तवा तुमीच मोठं धाटं तोडून द्या."

"त्ये काई सांगू नको मला ! अगुदर तोडून द्याचं, मागनच बाहीर पडायचं ! हां काम आर्धच सोडून जाशील तर तांगडीच तोडीन तुजी !"

आता जास्त घोळ घालण्यात काही अर्थ नाही असा समंजस विचार करून मुल्लाणी त्या लालभडक नि अजूनही थरथरणाऱ्या 'गोसा'चे कचाकचा तुकडे

करायच्या उद्योगाला लागतो.

घरोघर बकरी पडू लागतात. त्याचं ताजं मांस चुलीवरील हंड्यात रटरटू लागतं. घरातील बायका भाकरी भाजू लागतात. भात उकडू लागतात. मसाला कुटू लागतात. म्हाईसाठी म्हणून अगोदरच बोलावून आणलेल्या लेकी–सुना–नाती–लांबच्या जवळच्या आज्या–मावश्या–फलाणी भावजय–ती तमकी घस्टनीतली ह्यातल्या कुणीना कुणी स्वयंपाकाला मदत करू लागतात. कुणी नुसतीच धावपळ करीत असतात, वचावचा बोलत असतात, कचाकचा धांदलीत धक्के मारत असतात, पायाशी लुडबुडणाऱ्या पोराटोरांवर वरकन ओरडत असतात.

ह्या सगळ्या गडबडीने नि आतून येणाऱ्या चविष्ट खमंग वासाने घरे भरून जातात. ह्या वासावर तरंगतच आवतन गेलेला एक एक पाहुणा येऊ लागतो. सकाळपासूनच्या गडबडीतून नुकतीच जरा उसंत मिळाल्याने शिवाऽ म्हणून ओटीवर टेकलेला व चंची सोडून अडकित्त्याने सुपारी कातरीत 'बार' भरण्याच्या तयारीत असलेला कारभारी "या पाव्हणंऽ, वाईच येळानं येणं केलंसा?" असं म्हणत त्याचं आगत-स्वागत करू लागतो...

म्हाळाची पुनेव, चुडीची पुनेव, नव्याची पुनेव, तशीच ही म्हाईची पुनेव वर्षातून एकदाच येते. चैत्र महिन्याच्या सुरुवातीस. पहिली म्हाई काळभैरीची असते. पहिला मान तिचाच. निपाणीपासून आजऱ्याकडे उतर-भैरेवाडीपासून काही मैल गेल्यावर डाव्या हाताला शिवारात घुसलेली एक पाणंद लागते. त्या पाणंदीतून दक्षिणेकडे पाऊण मैल नि तेथून तितकेच अंतर पूर्वेकडे गेल्यावर एक डोंगराच्या बेचक्यात उतरणीवर काळभैरी हे देवस्थान लागते. येथून नजर खाली घसरते; अन् थेट खाली मैलभर अंतरावर असलेल्या गडहिंग्लज गावावर स्थिर होते.

तर ह्या काळभैरीची म्हाई संपली म्हणजे, मग आजूबाजूच्या विस्तीर्ण टापूत पसरलेल्या असंख्य खेड्यापाड्यांतून म्हाईला पेव फुटते–कुठल्या गावची म्हाई ह्यानंतर दुसऱ्या दिवशी असते. कुठल्या गावची तिसऱ्या, कुठल्याची चौथ्या. आणि हा दिवस ठरविण्यासाठी एखादेवेळी गावात बाचाबाची होते. गट पडतात. भांडणे उद्भवतात. आणि ह्या प्रकारांतून काही वेळा खून झाल्याची उदाहरणे आढळतात.

म्हाईचा दिवस जवळ येऊ लागेल तसा शेतकरी तयारीला लागतो. शेताभातात उन्हाळ्याच्या मशागतीला जाता-येता एकमेकाला विचारू लागतो,

" काय गा, जोडणी झाली का ? "

" चाल्लीया. आनी तुजी ? "

" कुटली मर्दा, ह्यो असला म्हागाईचा कार, तरीबी बघाया लागलोय. येत्या बेस्तरवारी बाजारला जाणार हाय–लिप्पाणीला. तशी तिथं मानसं राखून हाय मी. बघायचा शब्द टाकून. "

आणि असं कर्ज काढूनसुद्धा रक्कम जमविली जाते. बकरं खरेदी केलं जातं. म्हाईच्या पुनवेत बकरी महाग होतात म्हणून सदू भार्मलसारखी काही धूर्तन् हिकमती माणसं आधीच लहान लहान पालवी खरेदी करतात. म्हाईच्या दिसापर्यंत त्या पालव्यांची चांगलीच चरबीदार गुबगुबीत बकरी तयार झालेली असतात. मग एखादे घरी ठेवून बाकीची बेमाप भावाने विकली जातात.

एकदा बकरं खरेदी केलं की, बाकीच्या तयारीला वेळ लागत नाही. धान्यधुन्य घरीच असतं. एखादी अवजड खेप निपाणीला टाकली की जुंधळ्याचं पीठ होतं नि भाताचा तांदूळ. मग आजूबाजूच्या सगळ्या पैपाव्हण्यास्नी आवतने धाडायची, सांगणे द्यायचे, जवळ असेल तर स्वता जायचं, लांब असेल तर पत्रानं आवतान करायचं.

सासरी असलेल्या नववधूस माहेरी येण्यासाठी 'म्हाई' ही एक संधीच असते. माईचा दिवस हाय, न्हाई तरी कसं म्हणायचं ? असा इचारपाचार करून मग सासरची मंडळी गाडी जुंपतात. उन्हाचा रणका व्हायच्या आत पाव्हण्याचं गाव गाठावं, हा ताळा घालून पहाटंची चान्नी उगवायला निघतात. नोकरीचाकरी गावी असलेला एखादा तालेवार माणूस आपल्या बायकामुलांसह ह्या दिवशी अगदी टेसात टॅक्सी करून येतो. धुरळा–फुफाटा उडवीत अशी एखादी टॅक्सी एखाद्या कौलारू घरासमोर उभी राहिली की, गल्लीतल्या आजूबाजूच्या घरातील पोरं–टोरं मोठ्या अपूर्वाईनं टॅक्सीभोवती गोळा होतात. काही धीट असलेली रंगावरून नवलाईनं हात फिरवितात, तर नखानी अन् अणकुचीदार दगडानी ड्रायव्हरची नजर चुकवून रेघोट्या मारतात. तर एखादं जाणतं पोर त्या रंगावर 'काशी आणि शिरप्या' ही अक्षरं कोरून काही महिन्यांपूर्वी गावात

घडलेलं हे रंगदार ' प्रकरण ' जाहीर करतं. आणि असं ' पब्लिसीटी डिपार्टमेंट ' (प्रसिद्धि विभाग) ताब्यात असलेली काही इरसाल पोरं गावात आहेतही !

असा पै-पाव्हण्यांचा गोतावळा जमा होऊ लागतो. जेवण व्हायला अजून तसा खूपच वेळ असल्याने आणि शिवाय दुसरं काहीच काम नसल्याने पाव्हण्या-पाव्हण्यात गप्पा रंगू लागतात. मळ्यातून आणलेल्या ताज्या कोवळ्या पानाबरोबर विडा जमू लागतो; अन् दारापुढील अंगण रंगू लागतं.

आणि असाच दुपारचा एकदीडचा सुमार होतो. पाव्हण्यांच्यात बकऱ्यावर ताव मारायचा म्हणून आज आलेले पाव्हणे सकाळची न्हारी न करताच आलेले असतात. अन् ह्या वेळी त्यांच्या पोटात भुकेमुळे वायगोळे उठत असतात ! त्यात आणखी आतून-स्वयंपाकघरातून येणाऱ्या खमंग वासाची भर पडत असते. पाव्हण्यांच्या ह्या स्थितीचा त्यांच्या चेहऱ्यावर अंदाज येत घरमालक सारखा आत-बाहेर करीत असतो. बायकामाणसांना विचारीत असतो,

" काय ग-झालं का ? केवढा यळ अजून ? "

" थांबा म्हनावं वाईच, ह्ये काय, हे झालंच ! "

अशाच प्रकारे आनखीन अर्धा पाऊणतास जातो, जेवण तयार झाल्याचे अमृततुल्य शब्द मालकांच्या कानावर पडतात, मग मालक चाटदिशी जागचा उठतो. आत जातो. देवाला निवदफिवद दाखवितो. ह्या वेळात बायका मधल्या सोप्यात घोंगडी, ताटुकाच्या लांबट घड्या घालून पंगतीची तयारी करतात.

नैवेद दाखवून होताच मालक बाहेर येतो. म्हणतो,

" हंऽ, घ्या मंडळी, चालू करा ! "

तशी हा वेळपर्यंत आतून चरफडत नि तिष्ठत बसलेली मंडळी जेवणावर अक्षरशः तुटून पडतात ! नाक ओढीत, डोळ्यांतून येणारे पाणी आवरीत तो जीभ हुळहुळायला लावणारा तिखट डोम पण चविष्ट रस्सा ओरपू लागतात. ताज्या भाकरीबरोबर ' सुकं ' रिचवू लागतात.

अशी ही पहिली पंगत संपते-ह्यानंतर मागाहून, उशिरा वगैरे येणाऱ्या पाहुण्यांना येईल तसं वाढलं जातं-सगळी आवराआवर झाल्यावर मग आतमध्ये स्वयंपाकघरातच बायकांच्या पंगती बसतात-रस्सा कसा झालाय, सुकं शिजलंय का कच्चंच हाय, चटणी मीठ कसं काय पडलंय, भात सळसळीत झालाय का

किच्च झालाय अशी खाता खाता चर्चा होते. केव्हा-केव्हा पाहुण्यांमध्ये चौकशी होते, गेल्या साली गावातल्या कितीशा पोरी उजवल्या–कोण कोण नवीन आल्या-ल्यातल्या कितीजणी नि किती महिन्याच्या गरोदर आहेत वगैरे–

बायकांची जेवणं संपतात, भांडीकुंडी घासून होतात, तेव्हा बाहेरल्या सोप्यात जागा मिळेल तिथे (आणि ' चापून हाणलेल्या ' मटणामुळे सुस्ती आल्याने) झोपलेल्या पाहुण्यांचा पूर्वार्ध संपून उत्तरार्ध चालू असतो–अंधार पडेपर्यंत सारा गाव असाच देवाला सोडलेल्या वळूगत सुस्त पडून असतो–

मग किनीट पडू लागेल तसा एक एक जण जागा होऊ लागतो–जांभया देत, शेजारी झोपलेल्याला उठवीत. नंतर तोंड वगैरे धुऊन, क्वचित् गुळाचा चहा मिळाल्यास तो ढोसून जरा पाय मोकळे करावे म्हणून कोण कुठं, कोण कुठं निघून जातात.

जेवणाचा सुमार होईल तसा बाहेर गेलेल्यापैकी एक एकटा जमू लागतो. अजून सर्व पाहुणे आलेले नसतात. त्यामुळे ते येईपर्यंत गप्पागोष्टी होतात.

एक पाव्हणा चिलमीच्या तळाशी छापी गुंडाळीत नि आत प्रथम लहानसा खडा टाकून मग वर तंबाखू ठेचून भरीत घरमालकाला विचारतो,

" आज रात्री गेलं सालीगत कसला ख्योळ हाय का न्हाई ? "

म्हाईच्या रात्री प्रत्येक वेळी कसला ना कसला तरी खेळ असतो, केव्हा साधे भजन, तर केव्हा सोंगी भजन, केव्हा गव्हाणीच्या नाटक मंडळीचं 'रामायण' नाटक तर केव्हा फलाण्या गावच्या म्हाराचा तमाशा–असं अनेक प्रत्येक वर्षी काही ना काही असतं–

अशाच प्रकारे आणखी काही वेळ जातो. सर्वजण जमलेलेच असतात आणि ' आतून ' ही हाक येते,

" अहो, ऐकलंसा का ? भाकऱ्या तय्यार हाईत. जेवून घ्या म्हणावं सगळ्यास्नी. माग्नं आनी घोळ नको ! "

मग हातपाय धुऊन पंगती बसतात. दुपारचाच पण आता गरम गरम केलेला रस्सा सुकं मटण ह्यांवर ताव मारतात.

ह्या वेळपर्यंत रात्रीचा साडेआठ नवाचा सुमार झालेला असतो. विष्णुपंत कुलकर्ण्याच्या घरापुढील हामचौक जागेत तमाशा होणार असतो. त्यामुळे तिथे एक एक पटका जमू लागतो, आणि त्या चौकातच जिथे तिथे घोळक्याघोळक्याने

जमून गप्पा झडू लागतात. कुठंतरी मधाचं मोहोळ उठून माश्या याव्यात तशी पोरंटोरंही अचानक येऊन उगीच कालवा उसळू लागतात. लोक बसून उरलेल्या जागेतून पळापळी करीत आब्बूढब्बू खेळू लागतात. मध्येच एकमेकांशी भांडण उकरून काढून हातापायांना मेहनत देऊ लागतात.

चौकातच डाव्या बाजूस वामन दीक्षितांचं पडकं घर आहे. जळीत प्रकरणात हे घर सापडलं ... आणि दीक्षितानं गाव सोडलं ते कायमचंच. तेव्हापासून हे घर असंच आहे. पांढऱ्या मातीच्या विटांनी बांधलेल्या त्या भिंती झिजत जाऊन जमिनीत डोके रुतविण्याच्या मार्गावर आहेत.

पण धूर्त सदू भार्मलांचे हिकमती डोके ह्या पडीक जागेचा आज निराळाच उपयोग व फायदा करून घेत आहे.

मजबूत पाय रोवून उभ्या असलेल्या भिंतीशी थोडी साफसफाई करून भार्मल ३ दगडं ठेवतो, वर पाण्याचा हंडा चढवून खाली ढणाढणा जाळ घालतो....जवळच जमिनीवर ठेवलेल्या फळीवर ६–४ कप (त्यातील दोन–एक कान तुटलेले) व तितक्याच बश्या असतात. त्या धुण्यासाठी जवळच्याच बारडीत ' पेशल ' पाणी असते. आज १०-१५ तरी नगद जमतील असा व्होरा आहे....(गावात अजूनही एकदेखील ' हॉटेल ' नाही. कदाचित पुढे झालेच तर पहिला मान भार्मलचाच–ही नोंद इतिहास ठेवीलच.)

पुष्कळसा गूळ व थोडीशी साखर, पावडर नि दूध ह्यांचे भार्मलाच्या ' हॉटेलातले नामांकित मिश्रण ' दोन तीन वेळा पिऊन झाले तरी अजून तमाशेवाल्यांचा काहीच पत्ता नसतो.

" आयला, ह्ये पंच हाईत का स्वाँग हाईत गा ? "

" माय व्हले ऽ, तमाशा तरी हाय म्हणं, का, उगंचच ढाक मारली ! "

" घरांपती पट्टी वसूल केल्यांत बायली ऽ आनी नसल कसा तमाशा ? "

असं लोकांत बोलणं चालू झालेलं असतं. एवढ्यात तमाशेवाल्या मंडळींना घेऊन आलेली टॅक्सी ' पॅ पॅ ऽ ' हॉर्न वाजवीत गर्दीच्या टोकाला येऊन थडकते. गाडीचं दार उघडतं नि लोकांतून वाट काढीत तमाशेवाली मंडळी ' स्टेज 'कडे येते.

चौकाच्या एका कोपऱ्यात थोडी उंचवट्यासारखी जागा आहे तेच स्टेज. त्यांच्या पुढल्या बाजूस दोन वेळूच्या काठ्या रोवून, शेंड्याला एक आडवी काठी

बांधली आहे. आणि ह्या काठीच्या दोन्ही टोकाला दोन गॅसबत्त्या उत्साहाने लोंबकळत आहेत.

तमाशेवाल्यांत चारपाच पुरुष व दोघी नाचणारिणी आहेत. एक खूपच काळी, भिंतींना चुना फासावा तशी चेहऱ्यावर पावडर फासलेली आहे; नि दुसरी निमगोऱ्या रंगाची, कुठेच नजर न ठरविता चौफेर विभ्रम करणारी, शेलाटी व प्रमाणबद्ध शरीरयष्टीची आहे–

स्टेजवर आल्यावर सर्वजण प्रथम लोकांकडे तोंड करून मुजरा करतात. तेवढयात सोंगाड्या म्हणतोच, " गावकऱ्यानुं निपाणीस्नं येतावख्ती आम्ची मोटार पंक्चरली, आणि पुढारी सभेला लैटाइम करून येत्यात तसं आमी आल्ह ! तवा लेकरांची चूक मायबापांनी पदरात घेवावी. "

यावर उगीच हशा पिकतो आणि ताणलेलं वातावरण पुष्कळसं सैल होतं.

हा वेळपर्यंत डफ–हालगीवाले स्टेजच्या मागच्या बाजूला चगाळ गोळा करून जाळ करतात; अन् डफ–हालगी शेकू लागतात. तुणतुणंवाला तार ठीक करू लागतो. ढोलकीवाला ढोलक्यावर चापट्या मारीत, चामड्याच्या नाड्या सैल–आवळ करत ते ' लावून ' घेण्याच्या उद्योगाला लागतो. सुरपेटीवाल्याची पायपेटी असते. तेव्हा तो कुरकुर करू लागतो.

" हितं एखादं स्टूल न्हाई का खुर्ची न्हाई ! मी आता कसं वाजवायचं हो ? "

यावर स्टेजजवळच्या टवाळ पोरांपैकी एक पोर कृती करून दाखवीत म्हणतं, " तोंडावर हात मारून घिऊन ! "

आणि ह्यावर आजूबाजूस एकच हशा पिकतो. त्यात एक पोर समोरच्याची टोपी हवेत उंच उडवतो. ह्या गोंधळाचा फायदा घेत मागील मंडळी पुढच्यास रेटतात. शक्यतो स्टेजजवळ जाण्याचा प्रयत्न करतात. एकच कल्लोळ उडून जातो.

तसा एक पंच स्टेजवर चढतो. आणि म्हाईला बळी दिल्या जाणाऱ्या बकऱ्यागत लटालटा कापत म्हणतो,

" मंडळी ऽ शांत व्हा–व्हा ऽ. " आणि पुढे त्याच्या तोंडून नुसते ' व्हा ऽ, व्हा 'चे बुडबुडे येऊ लागतात ! यावर गावकरी मंडळी पोट धरधरून हसू लागतात. काही पोरं शिट्ट्या मारतात, काही ओरडतात. तमाशापूर्वीचा हा तमाशा फारच प्रेक्षणीय असतो.

असा हा फजितवाडा होताच पंच सुरपेटीवाल्याजवळ जाऊन त्याला म्हणतो,

" काय तरी यवस्ता करतो हं लवकरच ! "

पंच बोलत असताना त्यांच्या तोंडातून आलेल्या गावठी मंडेसच्या मदिरेच्या–तीव्र वासाने सुरपेटीवाला गुदमरून जातो. मान हलवून तोंड बाजूला करीत तो म्हणतो, " बरं, बरं. "

तसा पंच एका ढेंगेत स्टेजवरून खाली येतो नि गर्दीत पसार होतो.

मग काही वेळातच एक तरणं पोरगं जवळच्या कुलकर्णी बामनाच्या घरातून एक खुर्ची घेऊन गर्दीतून वाट काढीत स्टेजजवळ येतं.

आणि मग गरम झालेल्या डफावर थाप पडू लागते. हलगी खणखणू लागते. त्यात तुणतुण्याची ' तुई तुई ' आणि सुरपेटीचा सूर मिसळतो; नि ढोलकीच्या ठेक्यावर नमनास प्रारंभ होतो. न समजणारं आणि गोंधळाप्रमाणं वाटणारं नमन एकदाचे संपते नि मग गण-गौळणीस आरंभ होतो.

राधाकृष्णाच्या हरएक तमाशात हटकून असणाऱ्या लीला सुरू होतात.

त्या दोघी गौळणी दूध घालण्यास मथुरेला जाऊ लागतात. पण सोंगाड्या आणि कृष्णकनैय्या त्यांना सरळ थोडाच जाऊ देणार ? तो त्यांची वाट अडवून धरतो. तसा त्या गौळणी त्याची विनवणी करू लागतात.

" किस्ना सोड बघू आम्ची वाट ! दूध घालून मथुरेस्नं यायला योळ झाला तर सासू फाडून खातील आमच्या ! "

" एक फसकलास गाणं म्हटल्याबीगार सुटका न्हाई तुम्ची ! हं करा बघू सुर्वात. "

तशी राधा बनलेली ती निमगोऱ्या रंगाची, नयन बिभ्रम करणारी, शेलाटी व प्रमाणबद्ध शरीरयष्टीची नाचणारीण गाऊ लागते.

" बारा घरच्या ग ऽ आम्ही
बारा गौळणी
चालत असता मथुरेची वाट–"

ह्या लावणीच्या लयबद्ध ठेक्यावर सारे गावकरी डोलू लागतात. गावठी मंडेसगत, मदिरेगत, एक वेगळीच नशा त्यांच्या भाबड्या मनावर चढते. आणि त्यात नेहमीच्या विवंचना, भांडणे, पोटापाण्यासाठी ओढाताणी, आटापिटा,

दु:ख, जगण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या तारदाळ्या ह्या साऱ्यांचा विसर पडतो. आणि रसगंगेच्या दुथडी वाहणाऱ्या प्रवाहात ते स्वत:ला हरवून बसतात.

अशीच रात्र संपते; अन् मग उरतात केवळ म्हाईच्या दिवसांच्या आठवणी. गावच्या रोजच्या जीवनात त्या हरघडी काढल्या जातात....दिवस सरतील तसा त्यांचाही विसर पडतो....अशीच पावसाला सुरुवात होते. पिकं तरारतात. कापायला येतात....सुगी होते....तंबाखूचे देखील कापूनचाफ व तो वाळवून, बोदात भरून गावात आणला जातो. तसेच भुईमुगाच्या शेंगाचेही...असेच दिवस जातात; आणि मग चैत्र उजाडतो. गुढी पाडवाही आटपतो. त्यानंतरची चौथी रात्र संपते, अन् काळोखाच्या पडद्याआडून पाचवा दिवस हळूच गावाकडे डोकावून पाहू लागतो. तसे कोंबडे केकाटू लागतात. गाव जागा होऊ लागतो. झोपेतून उठलेल्या सुस्त मनाला आज 'म्हाईचा दिवस' आहे ही जाणीव होते नि सकाळपारचा अंगातला 'पारुसा' आळस पार नाहीसा होतो !

(इथे फुलांना मरण जन्मता)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. .....
शाखा (स्थळ प्रत)

परिशिष्ट

ललित गद्य लेखन/आत्मपरता व जीवनविषयक चिंतन तथा अनुभवांची लालित्यपूर्ण मांडणी. अनेक ठिकाणी ती काव्यात्मक रूप धारण करते. शब्द-योजना नेमकी व अर्थपूर्ण. त्यामुळे भाषा प्रौढ, ललित व प्रवाही. मराठी ललित गद्यलेखनात ह्या पुस्तकाचे महत्त्वाचे स्थान आहे.

—डॉ. गंगाधर पानतावणे

ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त.

—डॉ. यू. म. पठाण

प्रस्तुत पुस्तकात ललित लेख आहेत. मराठी साहित्यात ग्रामीण जीवनावर लालित्यपूर्ण भाषेत ललित लेख जवळ जवळ नाहीत म्हटले तरी चालेल. त्यामुळे 'गावाकडची माती' हे पुस्तक मराठी साहित्यात नवी भर टाकते, असे मला वाटते. विशेषत: ऐन विशीपर्यंत ग्रामीण विभागात वावरणारे, तेथील मातीशी, जीवनाशी एकजीव झालेले संवेदनशील मन प्रस्तुत पुस्तकात व्यक्त झालेले आहे. आज ग्रामीण विभागातून शेकडो तरुण विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शहरात येऊन पदव्या मिळवत आहेत. त्यांच्या हातात हे पुस्तक पडलेच पाहिजे, अशा योग्यतेचे आहे.

भाषा काव्यात्म, रसरशीत आणि चैतन्यपूर्ण असल्याने वाचकाच्या मनाची पकड घेते. तरुण संवेदनशील मन ज्या मन:स्थितीत ग्रामीण जीवनाचा आस्वाद घेते, ज्या दृष्टीने त्या जीवनाकडे पाहते, त्याला अनुकूल अशी मांडणी व तिची भाषा-शैली आहे. त्यामुळे आरंभापासून अखेरपर्यंत लेख मनाची पकड घेत असतात.

प्रस्तुत पुस्तकात ग्रामजीवनाची संस्कृती, तेथील लोकव्यवहार उत्तम रीतीने प्रतिबिंबित झालेले असल्याने महाविद्यालयीन पहिल्या व दुसऱ्या वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक क्रमिक पुस्तक म्हणून लावण्याच्या योग्यतेचे निश्चितपणे आहे.

—डॉ. आनंद यादव

प्रा. चंद्रकुमार नलगे हे एक शांत, धीरगंभीर व्यक्तिमत्त्व, आत्ममग्न, भावतंद्रीत स्थिरावलेले शांत अंत:करण, कविप्रवृत्तीशी सतत संवाद करणारी अंत:प्रेरणा आणि सात्त्विक विचारांचा साक्षेपी आविष्कार करण्याची तळमळ....

' गावाकडच्या मातीत ' अशा अनिवार, उत्कट, क्षणांचा फेर झपूर्झा घालत आहे. हा संग्रह म्हणजे एक गद्यकाव्य आहे. किंवहुना परत परत उलगडून पाहावी अशी काव्यपैठणी.

या बालपणाची पावले ज्या मातीत दुडदुडली, वाढली, टाचा उंच करून वरचं आभाळ न्याहाळू लागली त्या परिसराचं, तिथल्या माणसांचं, त्यांच्या प्रेमाचं, त्यांच्या अनेकविध भावभावनांचं, तिथल्या अपूर्वाईच्या घटनांचं भावचित्रण म्हणजे हे ललित लेख.

(" गावाकडची माती " म्हणजे जणू एक पूर्ण ऋतुचक्र आहे. सर्व भाव-भावनांना आवाहन करण्याचं सामर्थ्य त्यानं पेललं आहे. आनंद, माया, भया-नकता, उत्सुकता, प्रीती, मृत्यूबद्दलची गूढता, काव्यात्मा जशा अनेक भावतरंगांची उधळण झाली आहे. भावभावनांना बद्ध करताना, संतदृष्टीची हळुवार शलाका शब्दांना विणत गेली आहे. निसर्गाचे ऋतू जसे बदलतात तशीच गावाकडची घटनाप्रसंगांची मालिका बदलते. एक नवे विश्व, एक नवा संदर्भ घेऊन गाव उभे राहते. वादळातले, पावसातले, भुताखेतातले, जत्रेयात्रेतले, हुरड्यातले, गुऱ्हाळातले असे अनेक ऋतू आणि याच चंद्र-चांदण्यांच्या साक्षीत लेखकाचे बाळपण रांगलेले आहे. तोल सावरत उभे राहिलेले आहे. हळूहळू चालू लागले आहे....समज येण्याच्या गावाशिवेपर्यंत येऊन थांबले आहे. अशी ही " गावा-कडची माती " एकंदरीत हा एक आनंदडोह आहे.)

(एक प्रसिद्ध परीक्षण)

' मंतरलेले दिवस ' ह्या कै. ग. दि. माडगूळकरलिखित ललित लेखसंग्रहाची ही पाचवी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. यावरूनच ह्या पुस्तकाची लोकप्रियता सिद्ध होते.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील विचारांनी माडगूळकर जसे स्वत: भारावून गेले, तसेच हे पुस्तक वाचून त्यांचे वाचकही झपाटून गेले !

असे झपाटून, भारावून टाकण्याचे सामर्थ्य ज्या काही दुर्मिळ साहित्यकृतींमध्ये

आढळते, त्या जातीच्या उत्कृष्ट साहित्यकृतींपैकीच माडगूळकरांची 'मंतरलेले दिवस' ह्या संग्रहातील साहित्यनिर्मिती आहे. माडगूळकरांचे व्यक्तिमत्त्व या लेखातून जसे व्यक्त झालेले आहे, तसेच या लेखनाला विषय झालेल्या व्यक्ती, स्थळे, काळ, घटना व परिसर यांचेही व्यक्तिमत्त्व प्रकट झालेले आहे. त्यांचे हे लेखन आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वासह ते यांची येथे एकरूपता प्रत्ययाला येते.... वेलीवर कळी धरावी आणि तिचे फूल व्हावे, तशाच सहजपणाने त्यांच्या मनात विषयानुभव स्फुरतो. तो त्याची भाषा घेऊनच भाषेला अनुरूप असा रंग असतो, गंध असतो, रूपही असते....

(मंतरलेले दिवस)

"....मी माणदेशातल्या लहानशा खेडयात जन्मलो आणि तिथंच वाढलो.

खेडं सोडून मी शहरी वातावरणात राहू लागलो, त्याला आता चाळीस वर्षं होत आली, तरीही मी मनानं माणदेशातल्या रानावनातच असतो.

मी एक छंदिष्ट माणूस आहे. जनलोकातून थोडं बाजूलाचं असावं, काही नाद लावून घ्यावा आणि त्याचा पाठपुरावा करीत राहावं. यात मला विशेष आनंद वाटतो.

आपल्या जीवनाला फुरसदीचा एक लांबलचक, भरजरी पदर असावा, असं मनापासून वाटत असलं, तरी चरितार्थ चालविण्यासाठी कामधंदा करण्यातच आपण फार खर्ची पडतो. आपलं सगळं जीवन एका विलक्षण यांत्रिक गतीनं झपाटून टाकलं आहे. कधी अंगावर चांदणं पडत नाही, कधी झाडाच्या पानांची सळसळ ऐकू येत नाही, कधी ओढ्यात आंघोळ होत नाही, कधी उताणं झोपून चांदण्यांनी गच्च भरलेलं आभाळ पाहता येत नाही.

मी कुणी मृग-पक्षी-शास्त्रवेत्ता नव्हे किंवा बनशास्त्राचा अभ्यासकरी नव्हे. परंतु तरीही रानावनातील अद्भुत जगाविषयी माझ्या छांदिष्ट मनात जे अनिवार आणि न संपणारं कुतूहल आहे, त्यामागं लागून, रोजच्या यांत्रिक धावपळीतून एखादी झुकांडी मारून चौऱ्याहत्तर सालापासून चौऱ्याऐंशी सालापर्यंतच्या दहा वर्षांत मी कुठं कुठं हिंडलो; मला काय काय दिसलं, काय काय जाणवलं, त्याचा हा वृत्तान्त आहे.

जंगलातल्या दिवसांच्या या कहाण्या वाचून कुणी वाचक रानभैरी झाला

आणि त्यानं निसर्गाची भव्यता, श्रीमंती व सौंदर्य यांचा आनंद घेतला, तर बरंच आहे ..."

(जंगलातील दिवस)

पाऊलवाटा

स्वत:बद्दल बोलायचं नसतं, कारण स्वत:चा शोध घ्यायचा असतो. शंकररावांचं ललित गद्य स्वरूपाचा शोध घेता घेता जन्मलेलं. त्यांचं ललित लेखन विलक्षण पारदर्शी ! म्हणूनच त्यातून त्यांचं अनेकरंगी व्यक्तिमत्त्व जाणवतं. ललित लेखनातही त्यांच्यातला कथनप्रिय माणूस गवसतोच. ग्रामीण जीवन, ग्रामीण मन, ग्रामीण भाषा यांचा विचार करताना ' सारंच बदललं आहे ' ही जाणीव त्यांना तीव्रतेनं होते. तसे ते ' गतकाला'ला कवटाळत नाहीत. कधी ते पाऊलवाटांशी सुखदु:खाची बोलणी करतील, कधी जुन्या-नव्यातील पडलेलं अंतर समजून घेतील, तर कधी अवतीभवतीच्या माणसांशी गप्पागोष्टी करण्यात रंगून जातील. आपलं गाव म्हणजे गोष्टींचा वाहता झरा. अशा वेगळ्याच गावाची ' पाटीलकी ' लाभलेला माणूस ' चार पाऊले उमटवू आपुली, ठेवू खुणेचा मार्ग बरा ' असे म्हणत पाय नेतील तिकडं पाऊलवाटेनं चाललेला आहे. '

—डॉ. भालचंद्र फडके

' धोपट मार्गा सोडू नये ' हा उपदेश मी लहानपणी ऐकला खरा; पण मळलेल्या वाटेनं जाण्यापेक्षा नव्या नव्या पाऊलवाटांनी चालताना जे पाहिलं, ऐकलं, दिसलं आणि अनुभवलं तेच इथे लिहिलंय !

— शंकर पाटील

माझ्या कथालेखनातून मी माणसाचाच शोध घेत असतो आणि माणसाचा शोध हा त्याच्या मनाचाच शोध असतो. तो ध्यावा तेवढा थोडाच आहे. लेखणीनं केला जाणारा हा मनाचा पाठलाग काही वेळा चकवा देतो, तेव्हा तो मृगजळासारखा वाटतो, तरीही न थांबता मी धावतच राहतो. माणसाचं हे मन कधीच सरळसोट नसतं. ते विविध रूपांत न्याहळता येतं. मनाचं हे रूप माणसाच्या बोलण्या वागण्यातून विविध आकार व रंग धारण करतं आणि धारण

केलेल्या त्या विविध आकारातून माणसांचे नानाविध नमुने त्यांच्या चित्रविचित्र स्वभावासह डोळ्यापुढं येतात. एक दुसऱ्यासारखा नसतो आणि दुसरा वरवर दिसतो, तसाही नसतो. त्याला उमजून घ्यायचं तर त्याच्या मनाचा गुंता कौशल्याने उलगडावा लागतो. त्यासाठी लेखणीला त्यांच्या मनातच शिरावं लागतं. गूढ तळ चाचपावा लागतो. त्यातून होणाऱ्या मानवी मनाचं दर्शन शब्दबद्ध करण्यात मला मनस्वी आनंद वाटत आला आहे. जोवर हा आनंद मिळत राहील तोवर लिहिण्यातच मौज आहे.

शंकर पाटील

आखर आंगणमधील लेखांना ललितनिबंध असे परिचित नाव द्यावेसे वाटले तरी ते तितकेसे बरोबर होणार नाही. परिचित अशा वस्तूविषयाची अपरिचित बाजू दाखविणे, चमत्कृतिजनक कल्पना सांगणे, साध्या विषयातून मोठा आशय पाहणे इ. दृष्टिकोणातून लिहिलेले ललितनिबंध प्रचलित केले आहेत. केचे ह्यांच्या ललितानेबंधांचा आस्वाद घेताना वरील दृष्टिकोणांची मदत न होता एक प्रकारे अडचणच होते. केचे ह्यांच्या निबंधात सरळसरळ आत्मनिवेदन आहे. बदलत्या परिस्थितीने विस्मित झालेल्या मनाची तरल आणि सहज स्पंदने केचे ह्यांनी कलात्मक जाणिवेने शब्दबद्ध केलेली आहेत. त्यात नाट्य आहे, पण नाटकीपणा नाही. प्रांजळपणा आहे पण प्रदर्शन नाही. ह्या संग्रहातील ललित-निबंध वाचीत असताना जीवनातील स्वतःच्या वाट्याला येणाऱ्या अनेक आणि विविध अनुभवांना सामोरे जाण्यातील प्रसन्नता, समर्थता आणि समृद्धी सतत जाणवत राहते.

(आखर आंगण)

REFBK-0025443

आमची संग्राह्य प्रकाशने

निवडक गंगाधर गाडगीळ

संपादक : **डॉ. सुधा जोशी**

साहित्य प्रेमी रसिक हो !

गंगाधर गाडगीळ

पावसाआधीचा पाऊस

शान्ता ज. शेळके

दलित आत्मकथन

संपादक : **प्रा. नलगे–डॉ. पानतावणे**

दलित रंगभूमी

संपादक : **डॉ. भालचन्द्र फडके**

गाळ आणि आभाळ

केशव मेश्राम

खेकडे आणि खेकटी

भीमराव कुलकर्णी

नांगरी परंपरेचे लोकाविष्कार

डॉ. एस्. एस्. भोसले

लावण्ययात्रा

अरुणा ढेरे

साक्षी

मानसी कणेकर